
अर्न्स्ट हेन्री

थांबवा हा दहशतवाद !


REFBK-0024564

अक्षर प्रकाशन

अ० भा० (अंधश्रद्धा नि०)

थांबवा हा दहशतवाद !

संदर्भ ग्रंथ
३०८९
६४
२१८५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3 JUN 1985

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

प्रथमावृत्ती : १९८४

मूल्य : सहा रुपये

प्रकाशिका :

सौ. सुधा पाटकर,
अक्षर प्रकाशन,
कृष्ण निवास,
६४, हिंदू कॉलनी,
दादर, मुंबई ४०० ०१४.

मुद्रक :

गणपत वासुदेव सुद्रिक,
गणेश मुद्रणालय,
२०, म्युनिसिपल इंडस्ट्रियल एस्टेट,
केशवराव खाड्ये मार्ग,
मुंबई ४०० ०११.

: अनुक्रमणिका :

एक :	रक्तपात का होत आहे ?	१
दोन :	युवकांचे बंड	७
तीन :	लुम्पेन प्रोलेतारियतची जभवाजमब	२३
चार :	रेड ब्रिगेडना काय हवे आहे ?	४३
पाच :	अति–उजव्यांची धमाल	५९
सहा :	शुभ्र घोड्यांवर स्वार झालेले सेनापती	८५
सात :	उजव्या आणि "डाव्या" दहशतवाद्यांची युति	१०४
आठ :	माओवादी साथीदार	११३
नऊ :	सीआयए : सरकारी दहशतवाद	१२२
दहा :	लेनिन यांची उत्तरे	१३२
अकरा :	यांची मृत्युघंटा वाजलेली आहे	१४२

प्रकरण पहिले

रक्तपात का होत आहे ?

गेल्या ३६ वर्षात युरोप खंडाला युद्ध ठाऊक नाही– या खंडाच्या इतिहासात हा प्रकार अगदीच दुर्मिळ म्हटला पाहिजे. अर्थात तणावाचे कालखंड, किंबहुना निकराच्या तणावाचे कालखंड, या अवधीत येऊन गेलेले आहेत आणि आन्तरराष्ट्रीय रंगमंचावरील वर्गलढा ओसरण्याची कसलीच चिन्हे दिसत नाहीत. असे असूनही शान्ततेचा भंग झालेला नाही ही अधिकच वैशिष्टचपूर्ण गोष्ट म्हणायला हवी. आणि शान्तता टिकून राहील असा भरंवसा बाळगायला तसेच कारणही आहे.

तथापि जगाच्या इतर भागामध्ये रक्तपात रोजच्या रोज चालूच आहे. आणि या रक्तपाताचा शेवट अजून तरी दृष्टिपथात येत नाही. एक राक्षस मोकाट सुटलाय. तो माणसे मारत चाललाय. त्याच्यापायी सर्वस्वी निष्पाप पुरुष-स्त्रिया-मुले आणि वृद्ध लोक मोठ्या संख्येनिशी प्राणास मुकत आहेत. हा राक्षस म्हणजे दहशतवाद.

खून आणि खुनाचे प्रयत्न, बाँबस्फोट आणि रस्त्यावरील हिंसाचार या गोष्टी कित्येक भांडवलदारी देशांमध्ये दैनंदिन गोष्टी ठरत आहेत. इतक्या, की त्यांचे अतःपर नवल वाटेनासे झाले आहे. यांतले गुन्हेगार हे बहुतांशी अपरिपक्व आणि बेफाम युवक आहेत. गुंडांच्या जगातील गुन्हेगारांच्या टोळ्यांकडून होत असलेल्या गुन्ह्याबाबत आपण या प्रसंगी सांगत नाही (मात्र असले गुन्हे देखील क्रमाक्रमाने वाढतच आहेत). परंतु उदात्त उद्दिष्टांच्या नावावर होत असलेले हिंसाचार, 'वैचारिक' किंवा तसे म्हटले तर राजकीय हेतूंनिशी होत आलेले हिंसाचार आपल्याला अभिप्रेत आहेत. हजारो दहशतवाद्यांना तुरुंगात डांबले आहे; परंतु पोलिसांच्या पद्धती आणि कायदेशीर इलाज, त्यांना भरपूर प्रसिद्धी दिली जात असताना देखील, आतापर्यंत हे संकट नष्ट करण्यात अपेशी ठरले आहेत.

आता असले प्रकार अलग अलग किंवा अधूनमधून घडणारे आहेत अशी गोष्ट नव्हे, हे वाढत्या प्रमाणांत स्पष्ट होत चालले आहे; तसे म्हटले तर हा दुर्धर व

वाढत चाललेला रोग भांडवलदारी समाजाला भोवत आहे, या समाजाचा हा एक प्रकारे अविभाज्य भाग झालेला आहे.

काय घडते आहे याची थोडीशी आकडेवार माहिती अशी:

अमेरिकन मध्यवर्ती गुप्तचर एजन्सीने (सीआयए) स्पष्टपणे कमी प्रमाणात दर्शवून जाहीर केलेल्या आकडेवार माहितीनुसार (आणि या संस्थेला असली प्रकरणे चांगलीच माहीत असतात हे लक्षात घ्यायला हवे), वेगवेगळ्या देशांमध्ये दहशतवादी कृत्यांच्या परिणामी ठार झालेल्या लोकांचा आकडा १९६९ साली २९ होता, १९७२ साली १४५ होता, १९७४ साली ३१५ होता, १९७६ साली ४०२ होता, १९७८ साली ४३२ होता आणि १९७९ साली ५८७ होता. **न्यूयॉर्क टाइम्स** म्हणतो की १९७९ साली दहशतवादी कृत्ये ५८ देशांमध्ये घडली.

या आकडेवार माहितीत पश्चिम युरोप अग्रभागी आहे ही गोष्ट लक्षणीय म्हटली पाहिजे; अशान्त मध्यपूर्व, उत्तर आणि उर्वरित आफ्रिका खंड या प्रदेशांतील एकूण हत्याकांडांच्या प्रयत्नांपेक्षा दुप्पट हत्याकाडांचे प्रयत्न युरोप-खंडाच्या भूप्रदेशांत घडले. १९६८ – १९७९ या मदतीत जी दहशतवादी कृत्ये घडली, त्यांची वर्गवारी अशी : एकूण बॉंबस्फोटांपैकी ४७.६ टक्के बॉंबस्फोट, आगलाव्या बॉंबफेकीच्या एकूण प्रकारांपैकी १३.७ टक्के प्रकार, पत्रद्वारा बॉंब-स्फोटांपैकी ५.५ टक्के प्रकार, आणि सशस्त्र हल्ल्यांपैकी तितकेच म्हणजे ५.५ टक्के प्रकार युरोप खंडात घडले. (पाहा, पिक्टोग्राम, **ॲनॅटॉमी ऑफ इंटरनॅशनल टेरॉरिझम, यू एस् न्यूज अँड वर्ल्ड रिपोर्ट** तारीख १६ जून १९८०, पृष्ठे ४०–४१) याच्या भरोसा **सीआयए** चे तज्ज्ञ सांगतात की विविध पद्धतींचा वापर करण्यात येत असला तरी बहुतेक कृत्ये 'आराखडा तयारी आणि अंमल-बजावणी या दोन्ही बाबतीत साधी' असतात. त्यांना असे म्हणायचे आहे की दहशतवाद्यांना पुढारलेले शिक्षण लागते.

आन्तरराष्ट्रीय दहशतवादाचा अभ्यास करणाऱ्या इन्स्टिटचूटचे संचालक योना अलेक्झांडर यांच्या अंदाजानुसार भांडवलदारी जगामध्ये १९७० पासून १९७९ पर्यंत ५,५२९ दहशतवादी कृत्ये घडली, आणि त्यापैकी तीन-पंचमांश कृत्ये त्या आठ वर्षांच्या कालखंडापैकी गेल्या तीन वर्षांच्या अवधीत घडली.

इतर माहितीनुसार १९७९ सालाशी तुलना करता १९८० साली दहशतवादी कृत्यांचा आकडा घटला, परंतु बळी पडलेल्यांचा आकडा पांच पटींनी वाढला. (**मॉर्निंगस्टार**, तारीख ९ फेब्रुवारी १९८१)

हे आकडे देखील कमी प्रमाण दर्शविणारे असल्याचे दिसते. इटालियन कम्युनिस्ट पक्षाच्या म्हणण्यानुसार १९७० ते १९७९ या अवघ्या तीन वर्षांमध्ये एकटचा इटलीमध्ये ६,६३९ दहशतवादी कृत्ये घडली. सगळ्या प्रयत्नांपैकी तीनचतुर्थांश प्रयत्न प्रमुख शहरांमध्ये, म्हणजेच कामगार चळवळीच्या केन्द्रामध्ये

घडले, त्यापैकी रोम शहर हे ७४८ कृत्यांचे साक्षी होते. (**ल्यू' मानिते**, तारीख ७ जानेवारी १९८०) एकट्या १९८० साली इटलीत ५५७ दहशतवाद्यांना अटक झाली आणि दहशतवाद्यांचे तळ व शिक्षण केंद्रे मिळून ३६ स्थळे उघडकीस आली. परंतु हे रक्तपाती युद्ध अजून भडकतच आहे. टर्कीसारख्या तुलनात्मकदृष्टचा मागासलेल्या भांडवलदारी देशामध्ये देखील दोन वर्षांच्या अवधीत (१९७९–८०) दहशतवादाने ५,२४१ लोकांचे प्राण घेतले आणि आणखी १४,१५२ लोकांना पंगू केले. टर्कीमध्ये १९८० साली एका दिवसात चाळीस लोकांना ठार मारण्यात आले. स्पेनमध्ये १९६८ पासून १९८० च्या उत्तरार्धापर्यंत ४१३ लोक दहशतवादी कृत्यांना बळी पडले. या क्षेत्रातील एक अमेरिकन विशेषज्ञ ब्रियान जेन्किन्स असा इशारा देतो की अमेरिकेत दहशतवाद हा धोरणाचे सातत्य चालविणारा ठरणार आहे.

अनेक देशांमध्ये बळी गेलेल्यांची संख्या अगोदरच तीन आकडी झालेली आहे. उद्या काय घडणार आहे याचे भाकित करायचे धाडस कोणीही करत नाही, त्यांतल्यात्यात भांडवलदारी देशांतील अरिष्ट आणि संघर्ष आणखी निकरावर आले तर पुढे काय होईल याचा अंदाज करायला कुणीच धजत नाहीत. बहुतेक निरीक्षकांचा कल अशा मताकडे झुकतोय की सगळ्या सरकारी इलाजांना न जुमानता बळी जाणाऱ्यांची संख्या बऱ्याच मोठ्या प्रमाणात वाढेल. हे आणखी अधिक संभवनीय दिसते याचे कारण असे की समाजाविरुद्ध दहशतवादी हल्ले आजच्या घडीला दोन ठिकाणाहून होत आहेत– उजव्या आणि डाव्या अशा दोन्ही अतिरेक्यांकडून होत आहेत, आणि त्यापैकी उजवे कोण आणि डावे कोण असा फरक करणे अनेकदा कठीण होऊन बसते.

दहशतवाद या अगर त्या मार्गाने वाढतोच आहे, जणू काय त्याला सारावेळ उत्तेजनच देण्यांत येत आहे. कधी कधी असे दिसते, की काय घडते आहे याचे भांडवलदारी समाजाला एकतर आकलन करता येत नसावे, किंवा, दुसरे म्हणजे, खुद्द आपल्याच अंगी काहीतरी भयंकर व असाध्य रोग असण्याचा शोध लागेल की काय अशी त्याला धास्ती वाटत असावी. असे असूनही डाव्या अतिरेक्यांवर भांडवलदारी निरीक्षकांकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. दहशतवादाच्या अभ्यासासाठी न्यूयॉर्क विद्यापीठाने एक खास इन्स्टिटचूट स्थापन केली आहे; या इन्स्टिटचूटने प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तकात दहशतवादाचे वर्णन शान्ततेला वाढता धोका असे केले आहे. (पाहा: **टेरॉरिझमः थीअरी अँड प्रॅक्टिस**, संपादक वाय्. अलेक्झांडर, डी. कार्लटन, पी. विल्किन्सन, बोल्डर, कॅलिफोर्निया, १९७९)

खुद्द दहशतवाद्यांना वगळल्यास बाकीचे सगळे लोक किमानपक्षी आपल्या जाहीर वक्तव्यांमध्ये तरी सहमत झालेले आहेत की दहशतवादाचे कृत्य हा गुन्हा आहे. परंतु काही लोक या व्याख्येला विकृत स्वरुप देतात. आपल्या जनतेच्या

जीवनासाठी व स्वातंत्र्यासाठी जगाच्या विविध भागांमध्ये राष्ट्रीय बंधविमोचक लढवय्यांनी चालविलेल्या लढ्याचे वर्णन 'दहशतवाद' असे करून ते या व्याख्येला विकृत स्वरुप देतात. उदाहरणार्थ अमेरिकन परराष्ट्र मंत्री जनरल अलेक्झांडर हेग हे या लढ्याला 'आन्तरराष्ट्रीय दहशतवाद' असे नाव देतात आणि याबद्दल सोविएत संघराज्याला दोष देतात. अमेरिकन सेनेटने सुरक्षितता आणि दहशतवाद याबाबत एक खास उपसमिती नेमलेली आहे.

याच डावपेचाचा अवलंब १९८१ च्या मार्च महिन्यात उपरोक्त न्यूयॉर्क इन्स्टिटचूट फॉर द स्टडी ऑफ टेरॉरिझम या संस्थेने समाजवादी देशांविरुद्ध आपला मुख्य 'साक्षीदार' म्हणून परराष्ट्रीय खात्याचे माजी गुप्तचर व संशोधन ब्यूरोचे संचालक रे क्लाइन यांना एका पत्रकार परिषदेला हजर राहायला निमंत्रण देऊन केला. त्यांनी देखील सगळा दोष सोविएत संघराज्याच्या माथी मारला.

असले आरोप अर्थशून्य आहेत आणि गंभीरपणे विचारात घेता येत नाहीत. आरोप करणाऱ्यांचा दृष्टिकोन जर आपण मान्य केला, तर आपल्याला जॉर्ज वॉशिंग्टन आणि त्याचे अनुयायी यांना 'दहशतवादी' म्हणावे लागेल, कारण त्यांनी १८ व्या शतकात इंग्रजी अंमलाविरुद्ध अमेरिकेच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा केला, आणि त्याचबरोबर ज्यांनी प्रथम इंग्रजाविरुद्ध आणि नंतर जपानी जुलूमजबरदस्तीविरुद्ध लढा दिला त्या आशियाई स्वातंत्र्य योध्यांना देखील आपल्याला दहशतवादी म्हणावे लागेल. परंतु हे तर्कसंगत होईल काय ? जनरल हेग यांनी दहशतवाद या संकल्पनेचा चुकीचा अर्थ लावला आणि त्यांनी हे जाणूनबुजून केले असे दिसते.

१९८१ च्या एप्रिल महिन्याच्या उत्तरार्धात टेलीव्हिजनवर बोलताना अन्य कोणी नव्हे, तर फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनचे (म्हणजे अमेरिकेच्या सर्वोच्च पोलिस संस्थेचे) संचालक डब्ल्यू वेब्स्टर या मातब्बर असामीनी कबूल केले की अमेरिकेत उपद्व्याप करीत असलेल्या दहशतवादी गटांपैकी कोणताही गट सोविएत संघराज्याच्या नियंत्रणाखाली अगर प्रभावाखाली नाही.

अमेरिकन अधिकाऱ्यांनी जे सांगण्यात कसूर केली ते म्हणजे हे की **खराखुरा** दहशतवाद आधुनिक जगामध्ये अस्तित्वात आहेच आहे. असला दहशतवाद हा या पुस्तिकेचा विषय आहे. याच्यासाठी कित्येक भांडवलदारी देशांमध्ये उपद्व्याप करत आलेल्या दहशतवादी संघटनाविषयींचा कागदोपत्री पुरावा अभ्यासणे आवश्यक झाले आहे.

या प्रसंगी आणखी एका सोविएतविरोधी आरोपाचे खंडन करणे उचित ठरेल. हा आरोप असा, की विसाव्या शतकात या देशात सोविएत सरकारने **सरकारी** दहशतवाद आरंभलेला होता आणि ही गोष्ट १९१८ साली लेनिन यांच्या अमदानीत घडली. हे एक हास्यास्पद असत्य आहे. दहशतवादाची मोहीम

त्यावेळी सोविएत सरकारने आरंभलेली नव्हती, परंतु ती त्याच्या वैऱ्यांनी आरंभलेली होती.

अमेरिकेतील एक सोविएतविरोधी इतिहासकार आल्फ्रेड जी. मेयेर हे आहेत. शीतयुद्ध ऐन भरात असतानाच १९५७ साली त्यांचा **लेनिनवाद** हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यात ते लिहितात, की सोविएत सत्तेच्या स्थापनेनंतरचे काही महिने " हिंसाचारी दहशतवाद मुळीच नव्हता,' आणि '**चेकाने** आपली दहशतवादी मोहीम यादवी युद्धाच्या आरंभानंतरच आणि लेनिन यांच्या खुनाचा प्रयत्न झाल्यानंतरच सुरू केली (म्हणजे पारिपत्याचा इलाज म्हणून आणि खबरदारीचा इलाज म्हणून–अर्नेस्ट हेन्री), आणि हा दहशतवाद क्रांतीनंतर लगेच व्हाइटगार्ड सेनापतींना दिलेल्या सौम्य वागणुकीच्या संदर्भात ठळकपणे उठून दिसतो." (आल्फ्रेड जी. मेयेर, **लेनिनवाद**, हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, केम्ब्रिज (मॅसॅचुसेट्स), १९५७, पृष्ठ १९३.)

ए. जी. मेयेर हे सोविएतविरोधी असतानादेखील त्यांनी सत्य तेच लिहिलेले आहे. वस्तुतः १९१८ साली परिस्थिती अशीच होती. त्या काळी, क्रान्तीनंतर लगेच, प्रतिक्रान्तिकारकांनी रक्तपाती कृत्ये करून जनतेला धमकावायला आरंभ केला आणि यादवी युद्ध भडकावले. इतिहास त्यांनाच दोष देतोय आणि त्यांना कोणीही निर्दोषी ठरवू शकत नाही. क्रान्तीच्या रक्षणार्थच सोविएत सत्तेने ठोशाला ठोशाने उत्तर दिले. या पारिपत्याच्या इलाजांना अन्य कोणतेही कारण देणे म्हणजे सत्य घटनांना विकृत स्वरुप देणे ठरेल.

दहशतवाद्यांनी केलेल्या खुनांची इतरही अनेक उदाहरणे आहेत. १९१८ साली मोइसेई ऊरीत्स्की आणि मोइसेई क्लोदास्की या सोविएत नेत्यांचे खून, पहिल्या जागतिक महायुद्धाच्या सुरुवातीच्या सुमारास जीन जौरेस या फ्रेंच समाजवादी नेत्याचा खून, १९१९ साली जर्मन कम्युनिस्ट पक्षाचे नेते कार्ल लीब्नेहर, रोझा लक्झेंबर्ग आणि जान तिस्झाका यांचे खून, त्याच पक्षाचा नेता अर्नेस्ट थोज्मान्न यांचा १९४४ साली करण्यात आलेला खून, चिलियन समाजवादी नेते साल्वादोर आयंन्दे यांचा १९७३ साली करण्यात आलेला खून, चिलीच्या जनता ऐक्य सरकारचे एक प्रमुख नेते ओर्लान्डो लेटेलियेर यांचा १९७८ साली करण्यांत आलेला खून, आणि अशाच प्रकारची असंख्य कृत्ये युरोपात व लॅटिन अमेरिकेत, त्याचप्रमाणे जगाच्या इतर भागात घडलेली आहेत. ही दहशतवादी कृत्ये करणाऱ्या शक्ती उजव्या गटाच्याच होत्या आणि डाव्या गटाच्या नव्हत्या हे निर्विवाद आहे.

माहिती नसलेले किंवा चुकीची माहिती असलेले प्राश्चात्य देशांतले लोक आता इटलीत दुष्कृत्ये करत असलेली रेड ब्रिगेड्स ही दहशतवादी टोळी " कम्युनिस्ट संघटना " असल्याचे मानतात. इटलीचे राष्ट्राध्यक्ष आलेस्सान्द्रो पेर्तिनी यांनी अलीकडेच असा दावा केला की रेड ब्रिगेड्सना मॉस्कोहून आदेश मिळतात. या संघटनेचा समाचार नंतरच्या एका प्रकरणात आम्ही घेणार आहोतच. परंतु इथे

हे स्पष्टपणे सांगायला हवे की खरा प्रकार याच्या नेमका उलट आहे. रेड ब्रिगेड्स हे कम्युनिस्ट चळवळीचे प्रतिज्ञाबद्ध वैरी आहेत, तिचे मित्र नव्हेत, आणि ते स्वतःच ही गोष्ट गुप्त मुळीच ठेवत नसतात. इटालियन कम्युनिस्ट पक्षाने अनेक वर्षांपासून या संघटनेविरुद्ध खंबीर इलाज करायची हाक दिलेली आहे. लाल मुखवटा धारण केला म्हणून कोणी कम्युनिस्ट होत नसतो; लाल मुखवटा हा कम्युनिस्ट चळवळीविषयीच्या कडव्या वैराने विकृत झालेला चेहरा छपवू शकतो.


दहशतवादी संघटना भांडवलदारी जगामध्येच नंगा नाच घालत आहेत आणि अन्यत्र कुठेही त्या मोकाट सुटलेल्या नाहीत ही नाकारता न येणारी सत्य घटना आहे. त्याचप्रमाणे दहा वर्षांहून अधिक काळ भांडवलदारी देशांतली सरकारे दहशतवादाला आवर घालायला असमर्थ ठरलेली आहेत ही देखील एक सत्य घटनाच आहे. लोकांना ठार मारण्यात येते अगर पंगू करण्यात येते अगर त्यांच्या मुक्ततेसाठी जबर किंमत द्यावी लागते. दुकाने व बँका लुटण्यात येतात आणि सार्वजनिक ठिकाणी बाँब फेकण्यात येतात. तारीख २ ऑगस्ट १९८० रोजी बोलोग्ना येथील रेल्वे स्टेशनातील बाँम्ब स्फोटापायी ८५ लोक ठार झाले आणि सुमारे २०० जखमी झाले. म्यूनिक हे पारंपरिक उत्सवांचे स्थळ, आणि इथे तारीख २६ सप्टेंबर रोजी बाँम्ब स्फोटाने १२ लोक ठार केले आणि इतर २१५ लोक जखमी केले.

आजच्या घडीला जे प्रत्यक्षात घडत आहे ते हे आहे, आणि भांडवलदारी जगात अरिष्टांची घटिते व संघर्ष जसजसे निकरावर येतील तसतशी ही दहशतवादी अति दुःसह पीडा याच्याहूनही अधिक विनाशकारी होण्याचा संभव आहे. ज्या शक्ती प्रत्यक्षात या अति दुःसह पीडेची लागण आणि प्रसार करतात त्या सदैव कृतिशील आहेत. त्यांच्या लेखी प्रत्येक व्यक्तीचा जगण्याचा मानवी हक्क मुळी अस्तित्वातच नाही.

आजच्या भांडवलशाही जगात दहशतवादाला उत का आला आहे ? त्याचा प्रादुर्भाव कसा होतो ?

या प्रश्नांची उत्तरे द्यायचा प्रयत्न करायच्या अगोदर उजव्या व 'डाव्या' या दोन्ही अतिरेक्यांना पाठिंबा कोण देतो हे आपण शोधून काढले पाहिजे. दहशतवाद विरळ हवेतून खाली टपकत नसतो. दहशतवादी संघटना **सामाजिक** पाठिंब्याला पारख्या झाल्या असत्या तर त्यांच्या विनाशकारी कृत्यांच्या व त्या घडवून आणत असलेल्या मनुष्यहानीच्या कारणास्तव फार पूर्वीच बरखास्त करण्यात किंवा निपटून काढण्यात आल्या असत्या. तरी देखील त्यांना सारा वेळ कुमकच मिळत आहे आणि काहींचा विस्तार देखील करण्यात येत आहे. कुणाच्या खर्चाने ?

दोन वेगवेगळे सामाजिक थर आजच्या घडीला दहशतवादाची जोपासना करतात. त्यातल्या पहिल्यापासून आपण सुरुवात करू या.



प्रकरण दुसरे

युवकांचे बंड

१

... फ्रान्स, तारीख १०–११ मे, १९६८. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतरच्या काळातील अन्य कोणत्याही वेळेच्या पेक्षा पॅरिस शहरात अधिक खळबळ माजलेली आहे. सोर्बोन विद्यापीठाच्या बहुतेक शाखा असलेल्या लॅटिन क्वॉर्टरमध्ये शेकडो बॅरिकेड्सचे (मेढेकोटांचे) जाळे पसरले आहे. विद्यार्थी पोलिसांशी व लष्कराशी लढाया करत आहेत. सुमारे एक हजार लोक जखमी झालेले आहेत, काहीजण ठार झालेले आहेत. विद्यार्थ्यांचे नेते सरकारी खात्यांवर व शेअर बाजारावर हल्ले करायची हाक देत आहेत. इतर विद्यापीठांतील आणि लाइसीज मधील विद्यार्थी सोर्बोनच्या विद्यार्थ्यांचा धडा गिरवीत आहेत. बंडखोर विद्यार्थ्यांनी उपयोगात आणलेल्या पद्धती नापसंत करत असतानाच कम्युनिस्ट अशी मागणी करत आहेत, की सरकारने लॅटिन क्वॉर्टरमधून पोलिस काढून घ्यावेत.

त्यानंतर दोन दिवसांनी पॅरिस शहरी ८,००,००० चे दणदणीत निदर्शन होते. भांडवलदाराना अशी धास्ती वाटते आहे, की विद्यार्थ्यांना जर कामगार सामील झाले, तर विद्यार्थी राजधानी काबीज करतील असा संभव दिसतो. सरकारची देखील घाबरगुंडी उडालेली आहे. पकडलेल्या विद्यार्थ्यांना ते सोडून देते, शिक्षण-मंत्री आलेन पेयरे फित्ते याची हकालपट्टी करते. आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांचा विस्तार करून विद्यापीठाची सुधारणा अमलात आणायचे अभिवचन देते. दंगली क्रमाक्रमाने बंद पडतात.

...इटली. त्याच वर्षीचा वसंतऋतु. टूरिन, शेम, नेपल्स, पालेर्मो, व्हेनिस, फ्लॉरेन्स, मिलान, पिसा या शहरांतील आणि नगरांतील विद्यापीठे विद्यार्थी ताब्यात घेतात. पोलिसांशी केलेल्या झटपटीत विद्यार्थी काठ्या व दगड आणि लोखंडी साखळ्या यांचा वापर करतात. इथे देखील दंगली क्रमाक्रमाने बंद पडतात. परंतु बरेच विद्यार्थी दहशतवादी गट निर्माण करतात.

...पश्चिम जर्मनी. वेळ जवळजवळ तीच. पश्चिम बर्लिनमधील (हे पश्चिम जर्मन भूप्रदेशाच्या बाहेर आहे) विद्यार्थ्यांच्या पावलांवर पाऊल टाकून कलोन, म्युनिक, फ्रँकफुर्ट–ऑन–द मेन, हॅम्बुर्ग आणि हॅनोव्हर या शहरातील विद्यार्थी रस्त्यावर येतात आणि त्यांना तरुण कामगारांचे गट सामील होतात. ते विद्यापीठांच्या इमारती ताब्यात घेतात, पोलिसांवर धुराचे बाँम्ब, ज्वालाग्राही द्रवाने भरलेल्या बाटल्या फेकून ही गोष्ट साधतात. सहाशे विद्यार्थ्यांना अटक होते आणि दोन ठार होतात.

...अमेरिका. त्याच वर्षीचा वसंत आणि ग्रीष्म. सॅन फ्रॅन्सिस्को, बोस्टन, न्यूयॉर्क आणि इतर शहरांतून विद्यार्थ्यांच्या हिंसाचारी कृती. चित्र तेच; विद्यापीठांच्या इमारती ताब्यांत घेणे, पोलिसांशी लढाया, काही तुरुगांतून अन्नत्याग. सुमारे पाच लाख विद्यार्थी यात गुंतलेले. लष्कर भरतीच्या कचेऱ्यांसमोर निदर्शने (अमेरिका विएतनाममधील युद्धात गुंतलेली असते), विद्यार्थी लष्करभरतीची कार्डे फाडून टाकतात आणि इमारतीना आगी लावतात. १९७० चे विद्यार्थी मोर्चे देशाच्या वेगवेगळ्या भागातून निघून वॉशिग्टन येथे व्हाईट हाऊससमोर जमा होतात. निदर्शन एखाद्या वेढ्यासारखे दिसते. पोलिस जमाव उधळून लावतात.

तेच महिने आणि तीच वर्षे. स्पेन हुकुमशहा फ्रँको अजूनही सत्तेवर आहे. माद्रिद शहरातील विद्यार्थी 'फ्री असेंब्ली' (**असेंब्लिया लिब्र**) स्थापन करतात, बेकायदेशीर 'वर्कर्स कमिशन'ला (**कोमी सिओन ओब्रेराला**) मदत करतात. आणि अधिकाऱ्यांना विद्यापीठांच्या क्षेत्रामधून पोलीस काढून टाकायला भाग पाडतात. टर्की विद्यार्थ्यांची हिंसाचारी निदर्शने, दहशतवादी कृती, पोलिसांशी चकमकी. उजव्या गटाच्या सरकारला राजीनामा द्यावा लागतो. जपान: तीन दिवस पोलीस टोकियो विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी रक्तपाती झटपटी करण्यात गुंतलेले असतात.

लॅटिन अमेरिकेत १९६८ साली परिस्थिती विद्यार्थ्यांच्या खऱ्याखुऱ्या उठावासारखी दिसायला आरंभ झाला. मेक्सिकोत लष्कर पोलिसांच्या बाजूने विद्यार्थ्यांविरुद्ध लढले. २ ऑक्टोबर १९६८ रोजी ३९ विद्यार्थी ठार झाले, २०० जखमी झाले आणि ५०० हून अधिकांना एकाच दिवसांत अटक झाली. ब्राझीलमध्ये रिओडी जानीरो, साओ पावलो आणि इतर शहराच्या रस्त्यावर विद्यार्थ्यांच्या जमावाविरुद्ध लष्कराने रणगाड्यांचा वापर केला. याच सारख्या गोष्टी इतर काही लॅटिन अमेरिकन देशांमध्ये घडल्या. परंतु, इतर सर्व ठिकाणांच्या प्रमाणे, विद्यार्थ्यांचे बंड क्रमाक्रमाने ओसरले.

भांडवलदारी देशांतील राज्यकर्त्या वर्तुळांनी पहिल्याप्रथम कृतीविषयी तुच्छता दर्शविली, परंतु मागाहून तरुण पिढीशी त्यांच्या असलेल्या संबंधातील या फेरबदलामुळे त्यांच्या तोंडचे पाणी पळाले. त्यांना सगळ्यात जास्त जी धास्ती वाटली ती म्हणजे विद्यार्थ्यांची दोस्ती कामगारांशी झाली या गोष्टीची.

सगळ्या भांडवलदारी जगभर विद्यार्थ्यांच्या बंडाचा जो प्रसार झाला तो योगायोगाने झालेला किंवा आपसूक असू शकत नव्हता. भांडवलदारी विद्यापीठांमध्ये काही तरी घडल्याच्या योगाने या बंडांना चालना मिळाली असली पाहिजे. जें विद्यार्थी आतापर्यंत एक गंभीर स्वतंत्र सामाजिक घटक कधीही मानले जात नव्हते ते एक किंवा दोन वर्षांच्या अवधीत एक गतिशील सामाजिक शक्ति होऊन वसले.

तेव्हापासून पुढे ती नवी शक्ति म्हणजे चिंतेचा विषय मानली जाऊ लागली. तिचा वापर कसा केला जाणे शक्य होते ? ती कोणते वळण घेणार होती ?

१९६० च्या दशकाच्या अखेरीस १९७० च्या दशकाच्या आरंभी विद्यार्थ्यांचे बंड हा खरोखरी विश्वव्यापी खळबळ उडविणारा प्रकार झाला. त्या बंडाची बाधा केवळ विद्यापीठानाच झाली अशातला प्रकार नव्हता. भांडवलदारी जगातील **विद्यार्थ्यांच्या समुदायाचा** असंतोष व संताप त्यात प्रतिबिंबित झालेला होता.

...१९८१ चा जुलै महिना. इंग्लंड. काहीतरी अभूतपूर्व असे सुमारे तीस प्रमुख औद्योगिक शहरांमध्ये घडत आहे– लंडन, लिव्हरपूल, मँचेस्टर, ब्रिस्टल, बर्मिंगहॅम, लीस्टर, नॉटिंगहॅम आणि इतर शहरांमध्ये–गौरेतर श्रमिक युवक पोलिसाविरुद्ध रस्तोरस्ती भयंकर लढाया देत आहेत. ते पोलीस स्टेशनावर हल्ले चढवीत आहेत, कायद्याच्या संरक्षकांवर दगडांचा व विटांचा मारा करत आहेत, मोटारी उलथून पाडत आहेत. काही ठिकाणी ते बॅरिकेड्स (मेढेकोट) उभारत आहे. त्रिशूळ आणि प्लास्टिकच्या ढाली हाती घेतलेले आणि अंगात बुलेट–प्रूफ जाकिटे घातलेले पोलीस रांगा धरून दंगेखोरांवर हल्ले चढवीत आहेत, अश्रुधुराच्या नळकांड्यांचा मारा त्यांच्यावर करत आहेत. या अश्रुधुराने डोळे चुरचुरतात, भयंकर खोकला येतो, आणि उलटच्या होतात.

कित्येक शहरांमध्ये आगी भडकत आहेत. लिव्हरपूल शहराला भेट द्यायला आलेल्या पंतप्रधान श्रीमती मार्गारेट थॅचर यांच्यावर सडक्या टोमॅटोंचा मारा होत आहे. धरपकड येवढचा मोठ्या प्रमाणावर झालेली आहे की न्यायकोर्टांना एकेका केसवर केवळ थोडी मिनिटेच खर्च करता येत आहेत. तुरुंगांमध्ये बेसुमार गर्दी झाल्यामुळे लष्कराच्या पाहऱ्यानिशी कॉन्सेन्ट्रेशन कॅम्प (छळ छावण्या) उभारण्यात येत आहेत.

सगळ्या देशाची घाबरगुंडी उडाली आहे. पार्लमेंटात तुफान उसळले आहे. मजूरपक्षीय खासदार मार्टिन फ्लॅनरी पंतप्रधानांना तडकावून सांगत आहेत, की 'जिथे तुम्हाला पाऊल ठेवायची हिंमत होणार नाही असे सबंध जिल्हेच्या जिल्हे आहेत. आणि ज्यांच्यावर तुम्ही राज्य करता आहात असा तुमचा समज आहे, त्यांच्यापासून तुम्हाला आपले तोंड लपविणे भाग पडत आहे. गृहमंत्री व्हाइटलॉ

युवकांच्या कृतींचे वर्णन गुंडागिरी व बसुमार लोभीपणाची अभिव्यक्ती या शब्दांत करत आहेत. बंडखोर युवकाविरुद्ध खास कायदा सुचविला आहे.

सरकार लष्कर बोलावण्याची शक्यता नाकारत नाही. अल्स्टरमध्ये अगोदरच लष्कराकडून वापरात असलेल्या प्लास्टिकच्या गोळचा पोलिसांना बंदुकीसाठी वापरायला द्याव्यात, तसेच त्यांना वायनरी गॅसची नळकांडी वापरायला द्यावीत असा निर्णय घेण्यात आलाय.

हुजूर पक्षीय सरकारविषयी सहानुभूती असलेली वृत्तपत्रेदेखील लिहितात की दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतरच्या काळातील सगळचात जास्त वाईट अरिष्ट इंग्लडच्या पुढचात उभे ठाकले आहे. युवकांच्या दंग्यांची वाढ बंडाचे रुप धारण करत आहे. **लेव्कोदियेन दे पॅरीस** या वृत्तपत्राचा लंडनचा बातमीदार आसुरी आनंदाच्या भरात लिहितोय, की इंग्लडमधील दंग्यांनी "जे सामाजिक व राजकीय अरिष्ट घडवून आणलय त्याच्यासारखे अरिष्ट या देशाने या शतकाच्या आरंभापासून पाहिलेले नाही, या सतत चालू असलेल्या दंगेखोरीच्या, पाठीशी यादवी युद्धाचे भूत झेपावत आहे."

हा सगळा उत्पात भावनाप्रधान इटलीत किंवा फ्रान्समध्ये घडत नाही; तर तो भांडवलदारी जगातील अत्यंत शान्ततापिय व प्रतिष्ठित देशांमध्ये गणना होण्याचा लौकिक असलेल्या चांगल्या जुन्या आणि जाणीत्या इंग्लंडमध्ये घडत आहे. बंडावा करून राहिलेले, 'यादवी युद्धाचे भूत' उठविणारे हे अंगात लॅटिन रक्त सळसळत असलेले तापट विद्यार्थी नव्हत. तर हे आहेत उत्तम रीतीने वाढलेले गौरकाय युवक आणि इंग्लंडच्या शहरोशहरी गौरेतर लोकांसाठी असलेल्या गलिच्छ वस्त्यांतील गौरेतर तरुण लोक. कारण त्यांच्या पुढचात उभा आहे तोच तो सतावणारा प्रश्न : बेकारीतून सुटका कशी करून घ्यायची ? लुम्पेन प्रोलेटारियन्स (बाजारबुणगे) होऊन ? का गुन्हेगार होऊन ? बंडाची दोन उपांगे, परंतु समस्या एकच.

बंडाची कारणे खोल रूजलेली होती. युवकांनी उठाव केला, तो आळशीपणापोटी नव्हे; बाल गुन्हेगारीपोटी नव्हे; किंवा साहसापोटी नव्हे. खुद्द भांडवलदारी समाजपद्धतीने त्याना उठाव करायला भाग पाडले.

आपण खोडचात अडकलो आहोत असे त्यांना आढळून आले म्हणून ते बंधने तोडून बाहेर आले. १९६० च्या आणि १९७० च्या दशकांमध्ये या उठावात युवकांचे वरचे थर सामील होते. परंतु, आपण पुढे पाहणारच आहोत तद्नुसार, श्रमिक युवक–खूपच अधिक मोठा सामाजिक गट–याहून अधिक चांगल्या अवस्थेत नव्हते. प्रकार काय होता ?

२.

आपल्या काळांतील युवकांच्या प्रभावाची आणि महत्त्वाची योग्य दखल घेतली पाहिजे. सगळे विश्लेषणकार हे करतातच असे नाही.

उदाहरणार्थ, त्यांना या गोष्टीचा विसर पडतो, की जगाच्या लोकसंख्येतील निम्म्याहून अधिक भाग पंचवीस वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या युवकांचा आहे. अनेक देशामध्ये हे प्रमाण ६० टक्क्यांच्या आसपास आहे आणि काही देशांमध्ये हे प्रमाण ७० टक्के आहे. त्यांचे संख्याबळ १९९० च्या सुमारास ४०० कोटींची मर्यादा गाठणार आहे. एकटचा युरोप खंडात २५ कोटी युवक आहेत. (टी. क्रेतोवा, **पश्चिम युरोपः भांडवलदारी जगातील युवक**, मॉस्को, १९७९, पृष्ठ ३.) मानवजातीच्या या महत्वाच्या व नाजुक विभागावरच या शतकाच्या मध्यावर जबरदस्त तडाखा बसला.

पहिली गोष्ट म्हणजे प्रकार असा घडला, की वरकरणी समाइक भल्याच्या कामी येणारा संपूर्णपणे नेहमीचा विकास अशी जी भांडवलदारी जगातील शास्त्रीय व तंत्रवैज्ञानिक क्रान्ती, तीच श्रमिक युवकांच्या बऱ्याच मोठचा विभागाच्या जिव्हाळ्याच्या हितसंबंधांच्या विरोधात उभी राहते. ती लक्षावधी तरुण स्त्रीपुरुषांना बेकारांच्या फौजेचा महत्वाचा भाग व्हायला भाग पाडते. खूपच बिनचूक आकडेवार माहिती हे दाखवून देते.

१९७० च्या दशकाच्या मध्यावर फ्रान्समधील एकंदर बेकारांपैकी ४५·८ टक्के, इटलीतील ३२·७ टक्के, इंग्लडमधील ३० टक्के,, बेल्जियममधील ३० टक्क्यांहून अधिक, डेन्मार्कमधील ४७·२ टक्के, हॉलंडमधील ३७·६ टक्के, आणि पश्चिम जर्मनीतील २८·४ टक्के येवढे तरुण लोक होते. १९८० च्या ऑक्टोबर महिन्यात युरोपियन आर्थिक मंडळाच्या सदस्य देशांतल्या बेकारांपैकी ४० टक्के बेकार हे २५ वर्षांच्या खालच्या वयोगटांतील होते. **फायनान्शिल टाइम्सने** लिहिले की शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या पन्नास लाखांपैकी दहा लाखांना म्हणजे दर पांचापैकी एकाला रोजगार कधीच भेटणार नाही असा दाट संभव आहे.

याचा अर्थ असा होता की स्वतंत्र जीवनाचा नुकताच आरंभ केलेल्या बेकार तरुण लोकांचे संख्याबळ एकूण बेकारांपैकी एक तृतीयांश पासून निम्यापर्यंत होते. मोठचा शहरातील गलिच्छ वस्त्यांमध्ये युवकांमधील बेकारी ८० ते ९० टक्के येवढी

भरमसाट होती. नोकरी नसलेल्यांमध्ये १६ ते १९ वर्षे वयोगटांतील मुलांमुलींचे संख्यावळ विशेषकरून मोठे होते. याचा आपल्या लेखी काय अर्थ होतो याची तावडतोब जाण त्यांच्यापैकी सगळ्यांनाच नव्हती.

केवळ आकडेवारी... परंतु सामाजिक वहिष्कृतांच्या एका सबंध पिढीचे भवितव्य ती बोलून दाखविते. उज्ज्वल भविष्यकाळाची ज्यांनी उत्कट आशा बाळगायला हवी, अशा तरूण लोकांचे भवितव्य ही आकडेवारी बोलून दाखविते.

आन्तरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या म्हणण्यानुसार १९७८ साली औद्योगिक भांडवलदारी देशांमध्ये २५ वर्षांच्या खालच्या वयाचे सुमारे ७० लाख लोक बेकार होते. इंग्लंडमध्ये दर तीन बेकारांपैकी एकजण २४ वर्षांच्या खालच्या वयाचा होता आणि शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या २,००,००० (दोन लाख) हून अधिक युवक-युवती सालोसाल बेकारांच्या फौजेत दाखल व्हायचे होते. १९८० साली अमेरिकेतील एकूण बेकारांपैकी निम्मे बेकार २४ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नव्हते.

या तरुण लोकांना जगणे कठीण जाते. डेन्मार्कमध्ये अधिकृत आकडेवार माहितीनुसार बेकार युवकांपैकी ४५ टक्के युवकांनी सात ते दहा वर्षाचा शालेय अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे.

शालेय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या इतक्या मोठ्या संख्येला नोकऱ्या का भेटू शकत नाहीत ?

अन्तहीन आर्थिक अरिष्टे हे याचे केवळ एकच कारण नव्हे. उपरोक्त निर्दिष्ट केलेली अनिवार्य प्रक्रिया हीच इथे कार्यरत असते. जसजशी शास्त्रीय व तंत्र-वैज्ञानिक क्रान्ती आधुनिक उद्योगधंद्याचे स्वयंचलीकरण घडवून आणते आणि ते अधिकाधिक गुंतागुंतीचे करून ठेवते, तसतशी त्याला वाढत्या प्रमाणात कुशल व विशिष्ट प्रकारच्या श्रमशक्तीची देखील गरज लागते आणि त्याला सतत अधिकाधिक कमी संख्येनिशी अकुशल कामगार लागतात.

उत्पादनाच्या गरजा अतःपर पूर्वीची शैक्षणिक परिमाणे भागवू शकत नाहीत. केवळ इंजिनियरांची व तंत्रज्ञांची, इतकेच नव्हे, तर अकुशल कामगारांची परिमाणे देखील या गरजा भागवू शकत नाहीत. आतांशा खास शिक्षण मिळाल्याशिवाय कोणीही यंत्रावरील कामगार होऊ शकत नाही. विशिष्ट कामगिऱ्या करता याव्यात म्हणून बारा वर्षे किंवा अधिक काळ अभ्यास करावा लागतो व खास शिक्षण घ्यावे लागते. ज्ञानाची उच्चतर पातळी व उच्चतर व्यावसायिक कौशल्ये लागतात. शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या १६ वर्षे वयाच्या युवकाला असले शिक्षण कसे मिळू शकेल ? त्यांच्यापैकी अनेक जण ते घेण्यात अपेशी ठरतात आणि आपण नोकरी शिवाय राहिलो आहोत असे त्यांना आढळून येते.

विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या परिस्थितीचा लाभ घेता येत असावा आणि तरुण कामगारापेक्षा आपण अधिक सुस्थिर आहोत असे त्यांना वाटत असावे असे

दिसायचा संभव आहे. परंतु अशी वस्तुस्थिती नव्हती. आपण पाहिले आहे तद्नुसार, तरुण कामगारांपेक्षा विद्यार्थीच अधिक चिंतातुर व संतप्त झालेले होते. त्यांची मनःस्थिती अशी असण्याला तशीच जबरदस्त कारणे होती.

या शतकाच्या उत्तरार्धातले विद्यार्थी त्याच्या पूर्वार्धात होते त्यापेक्षा, किंवा तसे पाहिले तर त्याच्या अगोदरच्या काळातल्यापेक्षा देखील फारच वेगळे आहेत. त्यांच्यामध्ये परिवर्तन झालेले आहे. पहिली गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांचे संख्याबळ खूपच वाढले आहे; दुसरी गोष्ट म्हणजे आजचा सरासरी विद्यार्थी कितीतरी अधिक कष्टाचे जीवन जगतो. या दोन घटकांचा निर्णायक प्रभाव घडामोडीना मिळणाऱ्या वळणावर पडला.

केवळ दहा वर्षांच्या कालखंडात, (१९५८–६८) अमेरिकेतील विद्यार्थ्यांचे संख्याबळ वीस लाखांवरून सत्तर लाखांवर गेले; १९६९ साली त्याचा एकूण आकडा पंचाहत्तर लाख भरला; इंग्लंडमध्ये त्याच कालखंडात विद्यार्थ्यांचे संख्याबळ जवळ जवळ दुप्पट झाले; पश्चिम जर्मनी, फ्रान्स व बेल्जियम या देशामध्ये त्यांचे संख्याबळ १९५४ पासून १९६४ या मुदतीत तिप्पट भरले, स्वीडनमध्ये ते चौपट वाढले. १९७० च्या दशकात पश्चिम युरोपात तीस लाखाहून अधिक विद्यार्थी होते; जपानमध्ये जवळजवळ दहा लाख. (ए. ग्राचेव, **पराभव किंवा धडा**, मॉस्को, १९७७, पृष्ठ १८)

या वर्षांच्या अवधीतील विद्यार्थ्यांच्या संख्याबळाची वाढ लोकसंख्येच्या कोणत्या विभागाच्या खाती जमा होते? आकडेवार माहितीनुसार बहुतांशी मध्यम थर आणि बुद्धीजीवी लोक आणि काही प्रमाणात कामगारवर्ग यांच्या खाती. विद्यार्थ्यांच्या सामाजिक पार्श्वभूमितील हे परिवर्तन क्रियाशील जहालपणामुळे घडून आले असे आपण म्हणू.

आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर अनेक विद्यार्थ्यांना नोकऱ्या शोधायच्या बाबतीत कामगारवर्गीय तरुणांना ज्या अडचणीना तोंड द्यावे लागते त्यांनाच आपल्यालाही तोंड द्यावे लागत आहे या वस्तुस्थितीचा त्यांच्या मनस्थितीवर प्रभाव पडू लागला. आर्थिक सहकार्य आणि विकास यांसाठीच्या संघटनेची आकडेवार माहिती तरुण बेकारांमध्ये उच्चतर शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण क्रमाक्रमाने वाढत आहे याचा पाठपुरावा करते. उदाहरणार्थ, इंग्लंमध्ये १९८१ साली उच्च शिक्षण संस्थांतून पदव्या घेऊन बाहेर पडलेल्यांपैकी २० टक्के लोक बेकार होते; हा आकडा आदल्या वर्षातल्या आकडयाच्या दुप्पट आहे.

त्याना केवळ भौतिक गरजेने अस्वस्थ केले अशातला प्रकार नव्हता. अभ्यासाच्या फार पूर्वीच्या कालबाह्य पद्धती, सार्वजनिक शिक्षणासाठी सरकारी मदतीचा तीव्र अभाव, विद्यापीठांमध्ये योग्य सोईची उणीव; शिक्षकांची कमतरता आणि त्यांची हीन गुणवत्ता, जुनाट अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या वाईट जागा, आणि इतर अनेक घटकांमुळे ते असंतुष्ट होते, किंबहुना ते वैतागलेले होते.

(उदाहरणार्थ, इंग्लंडमध्ये १९८२–८४ या मुदतीत सुमारे ३००० शिक्षकांना कामावरून काढून टाकणे, कित्येक महत्त्वाचे विषय शिकवायचे अजिबात बंदच करणे आणि बहुधा काही विद्यापीठे बंद करायची, असे सरकारचे बेत आहेत. याच्या संबंधात लंडनच्या **गार्डियनने** लिहिले की कांही विद्यापीठांचे बारा वाजण्याचा संभव आहे.)

फार पूर्वीच्या काळी बडचा भांडवलदारांच्या व सरकारमंडळींच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी पुरातन काळी प्रस्थापित केलेल्या भांडवलदारी समाजाच्या एकंदर पारंपरिक शिक्षण पद्धतीचा त्यांना वीट आलेला होता. विद्यापीठांचा कारभार अधिक लोकशाहीप्रवण करण्याच्या मागणीबाबत त्यांचा विशेषकरून आग्रह होता,

या सगळ्याची एकत्र फलनिष्पत्ती झाली. विद्यापीठे डावीकडे झुकली. अशा प्रकारे लढाऊ दले उदयास आली आणि त्यांनी १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९७० च्या दशकाच्या पूर्वार्धात विद्यापीठांच्या इमारतीवर आणि सबंध शहरी वस्त्यांवर हल्ले चढविले, पोलिसांशी रक्तपाती झटापटी केल्या. काही काळ ते वाटेल ते धाडस करायला तयार होते.

त्यांनी जिला "सोर्बोन विद्यापीठाची सदन" असे नांव दिले होते तीत १९६८ च्या मे महिन्यात लॅटिन क्वॉर्टरवर हल्ला चढविणाऱ्या बंडखोर फ्रेंच विद्यार्थ्यांनी असे म्हटले होते:

"पूर्वी समाजाने अपरिहार्यपणे एकत्रित केलेले आम्ही केवळ मूठभर खास हवक असलेच्या व्यक्ती होतो. आजच्या घडीला आम्ही भलतीच मोठी 'अल्पसंख्या'क' झालो आहोत. नेते या नात्याने आमच्या भावी दर्जाविषयी आम्हाला अतःपर विश्वास वाटत नाही. म्हणूनच आमचा क्रांतिकारकपणा. यापुढे सगळ्या इतरेजनांप्रमाणे आम्ही श्रमिक बहुजनसमाज आहोत." (क्रेतावाकृत **पश्चिम युरोपः भांडवलदारी जगातील युवक** या ग्रंथातून उद्धृत, पृष्ठ ११३.)

याचा अर्थ असा होतो काय, की ज्या शक्तीच्या सहभागाशिवाय कोणतीही अस्सल क्रांती होऊच शकत नाही त्या शक्तीशी म्हणजेच कामगार वर्गाशी पाश्चात्य देशातले बहुसंख्य बंडखोर विद्यार्थी निकटची दोस्ती प्रस्थापित करायला तयार होते ?

नाही, त्या काळातल्या विद्यार्थी नेत्यांनी असली तयारी मुळीच दर्शविली नाही. ते सर्वस्वी स्वतःवरच भिस्त ठेवून राहिले, आणि त्यांच्यापैकी ज्या अनेकांचा ओढा अराज्यवादी प्रवृत्तीकडे होता त्यांनी आमच्या काळातील प्रमुख क्रांतिकारक शक्ती जो कामगारवर्ग, त्याच्या जागी अन्य शक्ती आणायचा प्रयत्न केला. या भूमिकेची परिणती त्यांनी लढाई हरण्यात आली. अन्य काही होणे शक्य नव्हते.

या कारणास्तव अनेक विद्यार्थी, त्यांच्यातले सगळ्यात जास्त बेफाम व संतप्त असे, दहशतवादाचा निसरडा मार्ग अवलंबू लागले. उजव्या गटाचे त्याचप्रमाणे बनावट डाव्या अतिरेक्यांनी याची ताबडतोब नोंद घेतली.

दरम्यान, सामान्य तरुण मंडळीच्या, त्यांतल्या त्यांत कामगारवर्गातील तरुण मंडळीच्या पुढचात तोच जुना प्रश्न उभा राहिला : स्वतःचे काय करून घ्यावे ? लुम्पन प्रोलेतारियन (बाजारबुणगे) व्हावे का ? किंवा गुन्हेगार व्हावे ?

इटलीसारख्या काही देशांमध्ये अनेकांची घसरगुंडी गुंडांच्या जगात झाली, आणि अजूनही होत आहे. याची चर्चा पुढच्या प्रकरणात करण्यात येईल. इथे आपण येवढीच नोंद घेऊं या, की अलीकडे पाश्चात्य देशांमध्ये गुन्हेगारीची अभूतपूर्व वाढ, तीत मोठचा प्रमाणात तरुण लोकांचा, अनेकदा अल्पवयीन मुलांचा अनेकदा शिरकाव झाल्याच्या परिणामी झालेली आहे असे अधिकृत कागदपत्रे सांगतात.

उदाहरणार्थ फ्रान्समध्ये १९७२ साली युवक गन्हेगारी चौपट वाढली. स्पेनमध्ये लोक सांगतात की 'कडक इलाज' न केल्यास सुमारे अडीच लाख विद्यार्थी अखेरीस गुन्हेगार बनतील असा संभव आहे. अमेरिकेत २० हे "देशांतील जास्तीत जास्त गुन्हेगारीचे वय" असल्याचे अधिकृतपणे सांगण्यात येते. ही समस्या भयानक आकार धारण करीत आहे असे फेडरल तुरुंग ब्यूरोचे संचालक नॉर्मन कार्लसन म्हणाले.

म्हणून एका अमेरिकन संशोधन संस्थेने म्हटल्यानुसार अमेरिकन लोकसंख्येचा दोन पंचमांश भाग गुन्हेगारांच्या भीतीने सतत ग्रासलेला असतो; पाव हिस्सा भागाला स्वतःच्या घराजवळ देखील रस्त्यांवर असुरक्षितता वाटते, यांत नवल काहीच नाही (पाहा, **होरिझोन्ट**, बर्लिन, अंक ४१/१९८०, पृष्ठ ३०)

याच्या भरीला दारिद्र्य आणि आपल्या दुर्दशेबाबतचे नैराश्य तरुण मंडळीच्या जीवनात व्यक्तिगत शोकान्तिकेला कारणीभूत होते. त्यांच्यातले अधिकाधिक लोक लग्न करायला व कौटुंबिक जीवनाचा आरंभ करायला भितात. ही गोष्ट आकडेवार माहितीवरून सिद्ध होते. इंग्लंडमध्ये मृत्यूचे प्रमाण जननाच्या प्रमाणाहून अगोदरच अधिक भरते. पश्चिम जर्मन नियतकालिक **डेर स्पियगेल** याने हा प्रश्न सादर केला : "पश्चिम जर्मनी नाशाप्रत जाणार काय ?" : ब्रेमेनचे वृत्तपत्र **वेसेरकुरियन** याने अशी नोंद घेतली आहे : "पश्चिम जर्मनीची लोकसंख्या सालिना सरासरी दोन लाखांनी घटत आहे...तरुण लोक लग्न करायची इच्छा यत्किंचितही दर्शवीत नाहीत आणि मुले व्हावीत अशी इच्छा त्याहून कमी प्रमाणात दर्शवितात..." (जी. एस्. आलेक्सान्द्रोविचकृत '**पाश्चात्य देशांतील युवक : ' त्यांच्या व्यवसायाच्या दिशा आणि त्यांचो भवितव्ये** लेनिनग्राड, १९७७ पृष्ठे २८–२९ यांतून उद्धृत). ग्रीसमध्ये पोलि-

सांच्या म्हणण्यानुसार अमली द्रव्याचे व्यसन असलेल्यापैकी ६० टक्के व्यसनी १३ ते २० वर्षे वयोगटांतील आहेत.

आत्महत्यांची संख्या अनेक तरुण मंडळीच्या नैराश्याचा पुरावा देते. अमिरिकेत २० ते २४ वर्षे वयाच्या व्यक्तीनी आत्महत्या केल्याचे प्रमाण १९६९ ते १९७६ या मुदतीत जवळजवळ दुप्पट भरले. पश्चिम जर्मनीत ६००० तरुण लोक दरवर्षी आत्महत्या करतात आणि आणखी १०००० तरुण लोक आत्महत्येचा प्रयत्न करतात.

तरुण लोकांना लग्नाची धास्ती वाटते इतकेच नव्हे, त्यातल्या अनेकांच्या ठायी जीवनाला तोंड देण्यासाठी लागणाऱ्या धैर्याचा अभाव असतो. असल्या तरुण मंडळींचा अधिक चांगल्या जीवनावर विश्वासच नसतो. शेवटची गोष्ट म्हणजे ते इतरांना ठार मारायच्या बाबतीत पुरेसे बेगुमान का असतात याचे हे आणखी एक कारण आहे– भांडवलदारी जगातील वाढत्या दहशतवादाच्या कारणांचा अभ्यास करणाऱ्या अनेक संशोधकांना या बेगुमानपणाने बुचकळ्यात पाडले आहे. तरुण मंडळीना खून करायच्या बाबतीत, त्यातल्यात्यात या खुनांना राजकीय बुरखा चढवलेला असेल तर, कसलाही विधिनिषेध वाटत नाही, आणि असे बुरखे त्याना प्रत्येक ठिकाणी सुपूर्त केले जातात.

अशाप्रकारे या शतकाच्या उत्तरार्धात भांडवलदारी जगातील तरुण लोकांना बंडाचा उठाव करायला कारण होते इतकेच नव्हे, तर त्यांच्या सहनशीलतेचा कडेलोट झाल्यामुळे त्यांना असे करण्यावाचून गत्यंतर नव्हते. पॅरिस येथील डॅनियल कोहन–बेन्डिट याजसारख्या त्यांच्या जवळजवळ अराज्यवादी नेत्यांनी धड विचार न करता उपयोगात आणलेल्या पद्धती अपेशी ठरणे अपरिहार्य होते. काही देशांमध्ये विद्यार्थी व श्रमिक बहुजनसमाजाचे नेते म्हणजे कम्युनिस्ट यांच्या दरम्यान संपर्काचा अभाव हे देखील बहुतांशी या अपयशाचे कारण होते.

परंतु जवळजवळ साऱ्या जगभर खुद्द तरुण लोकच कृति करायला सिद्ध होते. त्यांच्या बंडाने कित्येक देशातील राज्यकर्त्या वर्गांना कांही किरकोळ सवलती विद्यार्थ्यांना देणे भाग पडले असले तरी हे बंड एकंदर युवकांना ग्रासणारी मुख्य समस्या सोडविण्यात अपेशी ठरले– ती समस्या म्हणजे सततची बेकारी. असल्या समस्या विद्यापीठांचा ताबा घेण्याने सुटू शकत नसतात.

युवकांच्या बंडाचा एकदाचा शेवट झाला असे त्या वर्षांच्या अवधीत अनेक लोकांना वाटले. विद्यार्थी आपापल्या हॉस्टेलांमध्ये परत गेले आणि तरुण कामगारांनी रोजगार विनिमय केंद्रांकडे खेटे घालणे चालू ठेवले किंवा फालतू ठरायच्या धास्तीनिशी काम करणे चालू ठेवले. यावरून राज्यकर्त्या वर्तुळांनी असा निष्कर्ष काढला की चळवळीची लाट ओसरू लागलेली आहे, उद्रेक नाहीसा झालेला आहे आणि युवक लोक अतःपर कसलीही कटकट उपस्थित करतील असा संभव नाही.

मागाहून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष कार्टर यांचे अत्यंत निकटवर्ती सल्लागार झालेले कम्युनिस्टविरोधक झिग्न्यू ब्रझेझिस्की यांनी १९६८ च्या या घडामोडींनंतर दोन वर्षांनी समाधानपूर्वक अशी नोंद घेतली की अलीकडील कित्येक मोहिमांचे नेतृत्व ज्या लोकांनी केले त्यांना नव्या तंत्र वैज्ञानिक समाजात अधिकाधिक कमी वाव राहिलेला होता. त्यांच्या प्रतिक्रियांमध्ये आपण स्वतः ऐतिहासिकदृष्ट्या कालबाह्य झालेलो आहोत या जागृत, आणि अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अबोध, अशा दुहेरी जाणिवेचे प्रतिबिंब दिसत होते... त्यांची मनोरचना आणि त्यांच्या क्रान्तिकारक घोषणा म्हणजे इतिहासाने धुडकावून लावलेल्यांच्या बेफाम बडबडीपेक्षा अधिक काहीच नव्हत्या. (झेड्. ब्रझेझिन्स्कीकृत **दोन युगांच्या दरम्यान**, न्यूयॉर्क, १९७०).

ब्रेझेझिन्स्की यांचे हे म्हणणे सपशेल चुकीचे होते. युवक चळवळीच्या तळाशी काय घडते आहे आणि त्याची परिणती कशात होणार आहे हे समजून घेण्यात त्यांच्या हातून कसूर झाली. युवकांनी आशा सोडलेली नव्हती. रस्त्यात लढून समाधान मिळविण्यात अपेशी झाल्यावर क्रियाशील युवकांचा बराच मोठा विभाग

भूमिगत होऊन आणि दहशतवादाकडे झुकून आणखी एक मार्ग शोधायला लागला.

नंतरच्या केवळ काही वर्षांच्या अवधीतच इटलीतील रेड ब्रिगेड्स आणि पश्चिम जर्मनीतील रेड आर्मी फॅक्शन यांजसारख्या गुप्त संघटना उदंड वाढू लागल्या. त्यांचे संस्थापक हेच विद्यार्थी होते, परंतु हे आता अधिक वैतागलेले आणि कडवट झालेले होते, आणि अत्यंत रानटी व विवेकशून्य हिंसक कृत्ये करायची त्यांची तयारी झालेली होती. त्यांचे नेते म्हणजे आपल्या स्वतःच्या जीवाची यत्किंचितही पर्वा नसलेले असे भांडवलदारी कुळांतले बेफाम लोक होते. यांतच आजच्या जहाल (आणि केवळ जहालच नव्हे अशा) अतिरेकीपणाची पाळेपुळे सापडतात.

अधिक विचारशील अशा भांडवलदारी निरीक्षकांपैकी काही जणांनी त्या काळी काय घडत होते याची दखल घेतली. १९७६ च्या अगदी थेट सुरुवातीलाच **ल' एक्स्प्रेसो** या इटालियन वृत्तपत्राने लिहिले : "इतिहासाची पुनरावृत्ति जरी होत नसली, आणि उद्या हा कालच्यासारखा दिसणार नसला, किंवा १९७८ हे साल १९६८ सालासारखे दिसणार नसले, तरी देखील बंडाव्यात मुख्य भाग घेणारे हे पुन्हा युवकच असतील. परंतु यावेळी हे युवक केवळ विद्यार्थीच असणार नाहीत. आता त्यांना सामील होतील –आणि यामुळे हे 'मिश्रण' अधिकच स्फोटक होईल- ते म्हणजे ज्यांनी दुय्यम शाळा सोडलेल्या असतील आणि जे बेकार बुद्धिजीवी लोकांच्या प्रचंड फौजेत दाखल झालेले असतील–म्हणजेच जे सगळ्यात जास्त निरुपयोगी ठरलेले आणि भ्रमनिरास झालेले असे लोक असतील, ज्यांना कसलीही आशा राहिलेली नाही आणि म्हणून जे सगळ्यांत जास्त धोकेबाज आहेत असे हे लोक असतील." (**ल' एक्स्प्रेस्सो** तारीख ४ जानेवारी १९७६).

युवक लोक हे फारच स्फोटक असे सामाजिक साहित्य होऊ लागलेले होते. राजकीय रंगमंचावरील दोन्ही अंतिम टोकांकडे असलेल्यांच्या हे ध्यानात आलेले होते.

एका बाजूने नव-फॅसिस्ट त्यांचे स्वागत मनापासून करून राहिलेले होते. अधिक जोरदार कामगिऱ्या सुरू करण्यासाठी त्यांना नेमके हवे असलेले असेच हे चिडलेले आणि संतप्त युवक होते. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर फॅसिस्टांची नियमित राखीव दले अल्प होती; जे आपल्या देशांतून पळून गेलेले होते आणि जे जुने खाटीक निवृत्त होऊन आता गुलाबांची जोपासना करीत होते त्यांच्या जागा घ्यायला माणसांची जरुरी होती. याहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही होती की हिटलरच्या थर्ड राइशचा आणि मुसोलिनीच्या फॅसिस्ट हुकुमशाहीचा लाजिरवाणा उच्छेद झाल्यानंतर अलिकडच्या भूतकाळाविषयी ज्याना काही एक माहिती नव्हती असे अपरिपक्व युवकच निर्घृण दहशतवादी कृत्ये करू शकत होते.

यात भरीला भर म्हणजे युद्धोत्तर तरुण पिढीच्या एका विभागाला भकास, बेरोजगारीच्या ध्येयशून्य जीवनाला सामोरे जाणे भाग होते आणि म्हणून हे लोक साहसाच्या शोधात होते. ते रक्त सांडायला आसुसलेले होते.

सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे असल्या मनोवृत्ती इटली, पश्चिम

जर्मनी आणि जपान या देशांमध्ये डोके वर काढून राहिल्या. परंतु अमेरिकेत, फ्रान्समध्ये आणि इतर पाश्चात्य देशांमध्ये देखील नव-फॅसिस्टांनी असल्या युवकांची रिक्रूट भरती करायचा सपाटा चालविला, आणि हिटलरने जसे आपल्या काळात केले त्याप्रमाणे त्यांनी या युवकांना आनंदी आणि भौतिक भरभराटीच्या जीवनाचे आमिष दाखवीत आहेत.

त्यांच्यामध्ये अर्थातच कमीत कमी शिकेलेले अत्यंत रासवट असे घटक होतेच. युद्धपूर्व काळात हिटलर आणि मुसोलिनी यांच्या भोवती जसे बहुतांश मध्यमवर्गीय कुटुंबातले असलेले युवक जमा झालेले होते तसेच याही वेळी या युवकांमध्ये होते. परंतु 'उदारमतवादी' पश्चिम युरोपमधील नव–फॅसिस्टांना नेमके हेच लोक हवे होते. त्यांच्या लेखी हे घटक म्हणजे स्टॉर्मट्रूपर्सचे गट आणि एस्. एस्. दले तयार करायला हा मानवी मसाला चांगलाच सोईचा होता.

आजच्या नवफॅसिस्ट संघटनांचा (त्यांच्या दहशतवादी गटांसकट) केवढा मोठा हिस्सा या थरांतून आलेल्या तरुण कार्यकर्त्यांचा बनलेला आहे हे सांगणे कठीण आहे; त्यातल्या त्यात स्थानिक परिस्थितीवर बरेचसे अवलंबून असते म्हणून हे सांगणे कठीण झाले आहे. परंतु इटली, पश्चिम जर्मनी, इंग्लंड, (अलीकडेपर्यंतचा) टर्की, आणि इतर कित्येक देश यामधील नवफॅसिस्ट टोळयांचे बहुतेक सदस्य युवकांतूनच भरती झालेले आहेत यात मुळीच शंका नाही. अमेरिकेत परिस्थिती काहीशी वेगळी असण्याचा संभव आहे; तिथे मध्यम वयस्क तुच्छतावादी लोक वर्णद्वेष्ट्या कु क्लुक्स क्लानकडे आकर्षित झालेले होते. आणि फ्रान्समध्ये नाझींच्या अंमलाची आठवण सर्वसामान्य जनांच्या मनांत अजून जितीजागती आहे.

तथापि ते काहीही असले तरी सर्व ठिकाणचे नव–फॅसिस्ट हे असंतुष्ट युवकांना आपल्याकडे वळवून घेण्यासाठी आणि त्यांना दहशतवादी कृतींत गुंतविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. १९७२ च्या नोव्हेंबर महिन्यात, विद्यार्थ्यांच्या हिंसाचारी दंगलीनंतर लवकरच, एक नव–फॅसिस्ट पक्ष इटालियन सोशल मूव्हमेंट (आय्. एस्. एम्.) याचे मुखपत्र **इल् सोकोलो द इटालिया** याने राजरोस लिहिले : "आता पहिल्या प्रथमच ८,००,००० येवढे तरुण लोक काम शोधत आहेत. या वास्तवतेवर प्रतिकारांतून उदयास आलेले पक्ष (म्हणजे फॅसिस्ट–विरोधी शक्ती– अ. हे.) नियंत्रण ठेवू शकतील असा संभव दिसत नाही. नैराश्य, द्वेष आणि संताप यांनी आंधळे झालेल्यांचा हा बहुजनसमाज–याच्याकडे या समाजव्यवस्थेत गमावण्याजोगे काहीच नाही. त्यांनी आपल्याला देऊ केलेल्या या संधी आपण घेतल्याच पाहिजेत." ("**इल् सोकोलो द' इटालिया** तारीख २७ नोव्हेंबर १९७२)

इटलीतील ब्लॅक ऑर्डर आणि मुसोलिनी ॲक्शन ग्रूप, इंग्लंडमधील ब्रिटिश मूव्हमेंट आणि नॅशनल फ्रंट, अमेरिकेतील यंग अमेरिकन्स फॉर फ्रीडम, टर्कीतील

नॅशनॅलिस्ट ॲक्शन पार्टी, पाकिस्तानातील इस्लामी जमायत तुहाबा, जपान-मधील रेन्गो सेकिगुन, डेथलिंग फॉर कॉम्बटिंग कम्युनिझम, आणि याकुसा, असल्या संघटनांची वाढती सदस्यसंख्या तरुण लोकांचीच आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेतील वेदरमेन, ब्राझीलमधील कोअर फॉर स्ट्रगल अगेन्स्ट कम्युनिझम, आर्जेन्टिनामधील ताकुआरा आणि आल्फा–६६, ग्वाटेमालामधील ओजोपोर ओजो, आणि मॉबिला-इझ्ड युरुग्वेयन यूथ यांचा समावेश देखील याच सदरात होतो.

हीच प्रवृत्ति अधिक ठळकपणे पश्चिम जर्मनीत दिसून येते. इथल्या नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टीचा (एन्डीपीचा) नेता मार्टिन मुस्स्नुग हा पूर्वी हिटलर–पुरस्कृत स्टूडंट्स युनियनचा सदस्य होता. कित्येक वर्षापूर्वी बव्हेरियात केलेल्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले की प्रश्न विचारलेल्या तरूण लोकांपैकी ४० टक्के हे हुकुमशहा जर " कर्तबगार मुत्सद्दी " असेल तर त्याचे स्वागत करतील. एकंदर पश्चिम जर्मनीतील मुलाखत घेतलेल्या तरुण लोकांपैकी ३३ टक्के याच मताचे होते. त्यांच्यापैकी किती जणांचो रिक्रूट भरती अगोदरच दहशतवादी गटांतून झाली असेल ?

युवक, कुटुंब आणि आरोग्य व्यवहार या खात्याचे बॉन येथील मंत्री आन्ट्जे हचूवर म्हणाले : " मला वाढत्या प्रमाणात चिंता पडली आहे ती या गोष्टीची की तरुण लोकांचा एक विभाग उजव्या गटाच्या विचारसरणीविषयी, हिटलरच्या व्यक्तिमत्त्वाविषयी, हिटलरी फौजेच्या रोमान्सविषयी सतत अधिक बारकाईने आस्था दर्शवीत असलेला दिसत आहे " (**मिरोवाया एकोनोमिका इ मेझ्दूनारोदन्ये आन्नोशेनिया** (' जागतिक अर्थव्यवस्था आणि आन्तरराष्ट्रीय संबंध ') अंक १ ला, १९७९, पृष्ठ १०२ यांतील एल् इस्त्यागिन यांच्या एका लेखातून) ही आस्था म्हणजे नव–नाझी कामगिरीचा उघड उघड परिपाक आहे.

शाळकरी मुलांचे देखील " ब्रेन वॉशिंग " करण्यात आले आहे. दुय्यम शाळातील विद्यार्थ्यांपैकी ४० टक्क्यांहून अधिक मुले सांगतात की ' राष्ट्रीय सोशालिस्टांनी ' देशातील ' मोक्याच्या जागा घ्यायला ' आपली मुळीच हरकत नाही.

पश्चिम जर्मनीतील शाळकरी मुलांना नव-नाझींनी किती पद्धतशीरपणे विघडविलेले आहे याचे प्रमाण पुढील सत्य घटनेवरून दिसू शकते. १९७८ च्या ऑक्टोबर महिन्यात फ्रँकफूर्ट-ऑन-द-मेन येथील दूरदर्शन केन्द्राने एक सर्वेक्षण संघटित केले. त्याने शाळकरी मुलाना असे विचारले की तुम्हांला जर संधि दिली तर तुम्ही देशावर राज्य कसे कराल ? १५ वर्षे वयाचा आर्मीन (आडनाव दिलेले नाही) याने उत्तर दिले : " सर्वप्रथम देशाचे खरेखुरे शुद्धीकरण केले पाहिजे. म्हातारी माणसे, अपंग माणसे, आणि बहुधा मुले देखील, यांचे संख्याबळ कमी करायला पाहिजे. आणि मग मी सगळ्या वृद्ध व दुर्बल व अपंग लोकांना रद्द करून टाकीन. मला हवे आहेत आरोग्यसंपन्न लोक." ' रद्द करणे ' याचा अर्थ तू

काय करतोस ? असे विचारल्यावर आर्मीन उत्तरला : " म्हणजे काढून टाकणे, नष्ट करणे."

काई–उवे या नावाचा १३ वर्षे वयाचा विद्यार्थी आर्मीनशी सहमत झाला आणि याच्या भरीला त्याने सांगितले की " मी विरोधकांना उलटे टांगून ठेवीन, त्यांच्या जखमांवर मीठ चोळेन आणि त्यांना छळछळून ठार करीन." (**होरिझोन्ट**, बर्लिन, अंक ३ रा, १९७९, पृष्ठ २१).

हा कुमार पूर्ण तयार झालेला दहशतवादी आहे, ओस्वीसीम येथील छळछावणीत शोभणारा नरपशू आहे आणि असा असल्याचा त्याला अभिमान वाटतो आहे.

एल्ब नदीच्या पश्चिमेकडील भागांत भावी नव–फॅसिस्ट दहशतवाद्यांना कसे कवाइती शिक्षण देऊन तयार करण्यात येत आहे ते हे असे आहे.

डाव्या अतिरेकी कार्यकर्त्यांना वेगळ्या रीतीने शिकवून तयार करण्यात येते. ते अल्पवयीन असले तरी त्यांच्या पिढीतील अधिक परिपक्व व सुसंस्कृत विभागातून भरती केलेले असतात. भांडवलदारी समाजाच्या अरिष्टातून व आपल्या स्वतःच्या व्यक्तिगत अरिष्टातून सोडवणूक करून घेण्याचा मार्ग मनापासून शोधत असलेले असे ते विद्यार्थी असतात (याला अपवाद म्हणजे बाजारबुणगे–लुम्पन प्रोलेतारियन्स–यांना खास 'शिक्षण' असे कसलेच लागत नसते). त्याच्यापैकी अनेकजण अति–जहालवादी प्रोफेसरांच्या प्रभावाखाली येऊन अतिरेकी बनतात. त्यांचे हे गुरुवर्य कितीही विद्वान असले तरी मार्क्सवाद–लेनिनवादाचा गाभा ग्रहण करण्यांत त्यांची कसूर झालेली असते आणि अराज्यवादाच्या दिशेने त्यांची घसरगुंडी होते. हे पुन्हा इटलीत उघड दिसून आले. तिथे आन्तोनियो नेग्रीसारख्या प्राध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठांवर केलेल्या हल्ल्याचे स्वागत केले.

नवफॅसिस्ट जसे तरुण लोकांना भौतिक कल्याणाचे व फायदेशीर जीवनाचे आश्वासन देतात तसे आश्वासन डावे अतिरेकी देत नसतात. उलटपक्षी त्यांची मने ते खुबीदारपणे तयार करतात. " तुमच्या मार्गात अनेक अडचणी येतील, तुमचा छळ होईल, तुम्हाला त्याग करावा लागेल आणि बहुधा मृत्यु तुमची वाट बघत असेल " असा इशारा ते त्यांना देऊन ठेवतात. परंतु अशा लोकांना आकर्षक वाटणाऱ्या धोकेबाज साहसांनी भरलेल्या जीवनाचे आमिष त्यांच्यापुढे उभे करण्यात येते. याच्या भरीला हे सांगायला हवे की, या तरुण लोकांपैकी काही जणांना कशाचेच भय वाटत नसते.

ही तर वस्तुस्थितीच आहे, की युवकांच्या सहभागाअभावी भांडवलदारी जगातील विविध देशातल्या डाव्या अतिरेकी संघटना अस्तित्वात राहूच शकल्या नसत्या. १८ ते २९ या वयोगटांतील तरुण स्त्री–पुरुष हा त्यांचा गाभा असतो, मात्र त्यांचे नेते साधारण मानाने अधिक वयस्कर असतात. सर्वसाधारणपणे सांगायचे म्हणजे आजच्या डाव्या अतिरेकी जहालवादाची स्थापना करणारे विद्यार्थीच होते. त्यांनी लुम्पन प्रोलेतारियतच्या (बाजार बुणग्यांच्या) काही घटकांची मदत घेऊन ही

स्थापना केली. इटली विषयी सांगायचे म्हणजे १९७६ च्या पार्लमेंटरी निवडणुकीत अतिजहाल डाव्या संघटनांनी जी ५,५७,००० मते मिळविली ती बहुधा या समाजाच्या त्या भागातूनच आली असली पाहिजेत. (१९७० च्या दशकात चळवळीला 'ओहोटी' लागलेली असताना देखील इटलीतील जहालवादी विद्यार्थ्यांनी शस्त्रे खाली ठेवली नव्हती. १९७७ च्या वसंत ऋतूत त्यांनी रोम आणि बोलोग्ना येथील विद्यापीठांच्या इमारती उध्वस्त केल्या).

हे तर उघडच दिसते आहे की या शतकाच्या उत्तरार्धातील उजवे व डावे अतिरेकी हे दोघे एकाच निष्कर्षाप्रत आले आहेत आणि एकाच सामाजिक थरावर त्यांनी आपली मदार ठेवलेली आहे. आजच्या घडीला युवक हे राजकीय रंगमंचावरील येवढा क्रियाशील आणि प्रभावी घटक होऊ शकतात की त्यांना आपल्याकडे वळवून घेण्यासाठी कोणत्याही प्रयत्नाची कसूर करण्यात येत नाही. उभय संघटनांचे रिक्रूट भरती करणारे या अतिउत्साही व संस्कारक्षम युवकांना मुख्यत्वे करून आपल्या लढाऊ दलांसाठी उपयोगात आणायचे बकरे मानतात. राजकीय जहालवाद आणि दहशतवाद हे केवळ एकच पाऊल एकमेकांपासून दूर असतात.

तथापि राजकीय पातळीवर या युवकांचा कालखंड दीर्घ कालीन नसतो. अति उजव्या किंवा अति डाव्या दहशतवादी संघटनेत जो १८ वर्षे वयाचा युवक दाखल होतो आणि 'साहसाच्या' भोवऱ्यात खेचला जातो, तो (यांतून जगला वाचला तर) मागाहून सात आठ वर्षांनी एक परिपक्व माणूस होतो, त्यावेळी तो एखादा व्यवसाय पत्करतो व संसाराला लागतो.

परंतु एक बंडखोर सामाजिक शक्ती या नात्याने तरुण लोक जगाचा रंगमंच सोडून जात नसतात. जे युवक सोडून जातात त्यांची जागा सतत भरून काढणारा कालच्या अल्पवयीनांचा अखंड वाढता प्रवाह चालूच असतो. अगोदरचे तरुण लोक ज्या परिस्थितीत व मनःस्थितीत असतात त्याच परिस्थितीत व मनःस्थितीत आपण असल्याचे या तरुण लोकांना आढळून येते. उजवे आणि डावे हे दोघेही याची योग्य ती दखल घेतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे युवकांचा बंडावा खंडित न होता चालूच राहतो.

जवळ जवळ दोन शतके भांडवलदारी समाजाने खरोखरी कामगारवर्गाची धास्ती घेतलेली आहे. आता या समाजाला असे आढळून येते की आपल्याला आणखी एका शक्तीची धास्ती घेणे भाग आहे–ही शक्ती म्हणजे तरुण लोक. हे लोक अलीकडेपर्यंत असे होते की यांना ऐकायला फर्मावायचे आणि सांगितले असेल तसे यांनी करायचे. यांचे संख्याबळ सुमारे २०० कोटी आहे.

तथापि दोन्ही टोकांकडील अतिरेक्यांनी केवळ युवकांचीच रिक्रूट भरती चालविलेली आहे अशातला प्रकार नसतो. आपला दुसरा सामाजिक टेकू म्हणून अतिरेक्यांनी लुम्पन प्रोलेतारिएतवर (बाजारबुणग्यांवर) भिस्त ठेवलेली आहे असेही म्हणता येण्याजोगे आहे.

प्रकरण तिसरे

लुम्पेन-प्रोलेतारियतची जमवाजमव

१.

आजच्या भांडवलदारी जगाच्या रंगमंचावर क्रियाशिल असलेल्या ज्या प्रमुख सामाजिक शक्तींचा संघर्ष सगळ्या आधुनिक काळात चालू आहे, त्या अथपासून इतिपर्यंत त्याच आहेत–त्या म्हणजे एका अंगाने कामगारवर्ग आणि दुसऱ्या अंगाने भांडवलदारवर्ग. आणि या दोहोंच्या दरम्यान आहे मध्यमवर्ग. तथापि गेल्या कांही दशकांच्या अवधीत जागतिक रंगमंचावर आणखी एका शक्तीला आणायचे प्रयत्न सातत्याने चालू असलेले दिसत आहेत. ही शक्ती भांडवलदारी समाजाच्या परसदारीच सतत वावरत आलेली आहे आणि हिने राजकीय जीवनात कसलीही स्वतंत्र भूमिका बजावलेली नाही. ही शक्ती म्हणजे लुम्पेन–प्रोलेतारियत (बाजारबुणगे). कमअस्सल कामगार.

हे प्रयत्न अखेरीस विफल होणार ही काळचा दगडावरची रेघ असली तरी आजच्या काळातील जागतिक घडामोडींमध्ये यांचे प्रतिबिंब काही प्रमाणात पडलेले असतेच.

लुम्पेन–प्रोलेतारियन (**लुम्पेन** या मूळ जर्मन शद्बाचा अर्थ 'लक्तरे' असा असून त्यावरूनच हा शद्बप्रयोग तयार झाला आहे) म्हणजे 'तळागाळातला' माणूस. हा सामाजिक शिडीच्या सगळ्यात खालच्या पायऱ्यावर उभा असतो. आणि याच्या स्वतःच्याच अपराधापायी याच्याविषयी सर्वसाधारणपणे अविश्वास किंवहुना तिरस्कारच दर्शविण्यात येतो. याची गणना कोणत्याच वर्गात होत नसते, याला कसलीही नीती मान्य नसते, कसल्याही उत्पादक कामामध्ये हा भाग घेत नसतो आणि जेव्हा जेव्हा याला शक्य असेल तेव्हा तेव्हा हा कायद्याची पायमल्ली करतो. याचे एकजात सगळ्यांशीच वैर असते आणि हा आपल्यापुरताच पाहातो. समाजाशी याचा संघर्ष असला तरी देखील हा समाजपरिवर्तनासाठी क्रान्तिकारक संघर्ष टाळतो. आणि याला शिस्तीचे वावडे असते. राजकारणापेक्षा याला गुन्ह्याविषयी अधिक आस्था असते. भांडवलदारांचा हा द्वेष करणारा

असल्यामुळे व्यक्तिगत भांडवलदाराच्या मालमत्तेची याला हाव सुटलेली असते कसलेही उपयुक्त काम करण्यापेक्षा याला आइतखाऊ जीवन जगणे अधिक पसंत असते.

तो स्वत:चा फायदा करण्याच्या दृष्टीने महत्वाकांक्षी असतो परंतु त्याला ध्येये नसतात. पैशाकरिता तो गुन्हा करण्यास तयार असतो आणि म्हणून त्याला सहजासहजी लाच देता येते.

लुम्पेन–प्रोलेतारियतचे (कमअस्सल कामगाराचे) घटक कोण कोण असतात ? मार्क्सवाद–लेनिनवादाच्या अभिजात ग्रंथांनी त्यांची सुस्पष्ट व्याख्या दिलेली आहे. मार्क्स यांनी त्यांना वर्गाचे 'टाकाऊ मांस,' वर्गांचा 'गाळसाळ,' असे नाव दिले. **लुई बोनापार्ट याचे अठरावे ब्रुमेअर**, कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स, **संकलित ग्रंथ**, खंड ११ वा, प्रोग्रेस पब्लिशर्स, मॉस्को १९७९, पृष्ठ १४९) १८४९ साली पॅरिस शहरी लुई बोनापार्टने "सोसायटी ऑफ डिसेंबर १०" ही लुम्पेन–प्रोलेतारियन्सची संघटना उभारली. तिचा निर्देश **लुई बोनापार्टचे अठरावे ब्रुमेअर** या आपल्या ग्रंथात करताना तिच्या रचनेविषयी मार्क्स यांनी लिहिले आहे; "संशयास्पद चरितार्थाची साधने असलेल्या आणि संशयास्पद जातकुळी असलेल्या सडक्या कुजक्यांच्या जोडीला, भांडवलदारांच्या दिवाळखोर व साहजबाज शाखांच्या जोडीला, ज्यांची भरती केलेली होती ते म्हणजे उडाणटप्पू, लष्करांतून कमी केलेले सैनिक, तुरुंगाच्या वाऱ्या करून आलेले गुन्हेगार, शिडांच्या जहाजावर वल्ही मारणारे पळून आलेले गुलाम, लफंगे, थापाडे, **लाझ्झारोनी** (उदारमतवाद्यांविरूध्द धर्मगुरूंनी चिथावलेले लुम्पेन प्रोलेतारियन्स-अ. हे.), खिसेकापू, हात चलाखीवाले, जुगारी, सोंगाडे, कुंटनखानावाले, हमाल, **लितेरात**, वाजंत्री. चिंध्या गोळा करणारे, सुऱ्यांना धार लावणारे, जंगूमिया, भिकारी–थोडक्यात सांगायचे म्हणजे इतस्तत: भिरकावून दिलेला सगळाच अनिश्चित, उध्वस्त समुदाय." (कित्ता).

या भाडोत्री फ्रेंच लुम्पेन प्रोलेतारियन्सना "श्रमिक राष्ट्राचा बळी देऊन स्वत:चा फायदा करून घ्यायची जरूरी होती" म्हणून त्यांनी राजवाड्यातल्या टोळक्यासाठी घाणेरडी कामे कशी केली यांचे वर्णन मार्क्स यांनी केले आहे. त्यांनी लुम्पेन प्रोलेतारियन्सच्या संघटनेला 'अव्यवस्था, वेश्याव्यवसाय व चोऱ्या करणारा समाज' असे नांव दिले आहे (कित्ता) आणि याना कामगारवर्गाचे शत्रू मानले आहे.

लेनिन यांनी देखील आपल्या ग्रंथांमध्ये लुम्पेन प्रोलेतारियन्सचा उल्लेख केलेला आहे आणि त्यांनी देखील या लोकांच्या आइतखाऊपणाची व सामाजिक विसंगतपणाची नोंद घेतलेली आहे. भांडवलदारी समाजातील परिस्थितीविषयी सांगताना त्यांनी लिहिले आहे की हा समाज म्हणजे "असा समाज आहे की यांतील हजारो

हजार लोकांना दारिद्र्याने आणि टंचाईने दंगलखोरीचा, भ्रष्टाचाराचा आणि लफंगेगिरीचा मार्ग अनुसरायला भाग पाडले आहे, आणि त्यांना माणुसकीच्या सगळ्या खाणाखुणा हरवायला भाग पाडले... धनदांडगे आणि लफंगे म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, भांडवलशाहीने पोसलेल्या **आइतखाऊंचे** दोन प्रमुख प्रकार आहेत." (व्ही. आय. लेनिन, **संकलित ग्रंथ**,' खंड २६ वा, पृष्ट ४११).

लुम्पेन प्रोलेतारियतच्या समाजविरोधी स्वरुपावद्दल याचा कडाडून धिक्कार करताना लेनिन यांनी त्याच्या संख्याबळावर भर दिला. **राशियांतील भांडवलशाहीच्या विकास** (१८९९) या ग्रंथात त्यांनी म्हटले आहे की बिनकामवाल्या लोकसंख्येमध्ये " जवळजवळ पाच लाख भिकारी, उडाणटप्पू इत्यादी, इत्यादींचा समावेश आहे." (**कित्ता**, खंड ३ रा, पृष्ठ ५०४). तीन वर्षानंतर याच विषयाकडे पुन्हा वळून, रशियातील दुष्काळापायी " उडाणटप्पूंची व भिकाऱ्यांची वाढती संख्या— हंगामी वस्तीमध्ये त्यांच्यावर, तुरुंगांतून व इस्पितळातून त्यांची गर्दी," या गोष्टीकडे लेनिन यांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. (कित्ता, खंड ५ वा, पृष्ठ २७४). १९०५ च्या क्रान्तीच्या दोन वर्षे अगोदर प्रसिद्ध केलेल्या **खेड्यांतील गरिबांसाठी** या आपल्या पुस्तिकेत लेनिन यांनी असे दाखवून दिले आहे की खेडोपाडी बेकारांची उपासमार होत आहे, " तर शहरांमध्ये त्यांनी ' उडाणटप्पू ' व ' कंगाल ' यांची गर्दी केलेली आहे, ते शहराच्या बाह्य परिसरात पशूंप्रमाणे बिवरांचा आसरा घेत आहेत, किंवा मॉस्को शहरातील खित्रोव मार्केटातल्याप्रमाणे भयानक गलिच्छ वस्त्यांचा व तळघरांचा आसरा घेत आहेत." (**कित्ता**, खंड ६ वा. पृष्ठ ३७१)

परंतु आपल्या तळघरांमध्ये सडत असलेल्या व क्रान्तिकारक मार्ग पतकरायला नकार देणाऱ्या ' तळागाळातल्या ' लोकांविषयी लेनिन यांनी यत्किंचितही सहानुभूति प्रदर्शित केली नाही. लुम्पेन प्रोलेतारियन्सचे दारिद्र्य असून देखील लेनिन यांनी मार्क्स यांच्या प्रमाणेच त्यांना कामगारवर्गापासून खड्यासारखे वेगळे काढले आणि त्यांच्या विधिनिषेधशून्य व भाडोत्री स्वरुपाची नोंद घेतली आणि असा अभिप्राय दिला की भांडवलदार त्यांचा वापर कामगारांविरूद्ध विस्तृत प्रमाणात करतात. १९१२ साली झूरिच येथे जो सार्वत्रिक संप झाला त्या काळात लेनिन यांनी ज्या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले ती म्हणजे ही, की स्विस मालकांनी हॅम्बुर्ग येथून भाड्याने आणलेल्या सपफोडचांमध्ये भडवेगिरी, दंगलखोरी, वगैरे केल्याबद्दल जर्मनीत शिक्षा झालेले सर्व प्रकारचे गुन्हेगार होते. भांडवलदारांनी या उडाणटप्पूना किंवा गुन्हेगारांच्या टोळीला (लुम्पेन प्रोलेतारियन्सना) पिस्तुले दिली, संपफोड्यांच्या या बेशरम टोळीने कामगार वस्तीतील गुत्त्यांतून गर्दी केली आणि तिथे न भूतो न भविष्यति अशी गुंडगिरी माजविली." (**कित्ता**, खंड १८ वा, पृष्ठ १६१)

१९१७ च्या ऑक्टोबर क्रान्तीनंतर रशियामध्ये जे उरले सुरले लुम्पेन प्रोलेतारियन्स होते आणि त्यावेळी देखील ज्यांनी गुंडांच्या अड्ड्यांमध्ये आपली गर्दी चालूच ठेवलेली होती, त्यांच्या बाबतीत लेनिन यांनी कितीतरी अधिक कडक भूमिका घेतली. लेनिन यांनी या 'लफंग्यांची, ऐतोबांची व दंगलखोरांची' गणना जनतेच्या शत्रूमध्ये केली. त्यांनी लिहिले : " या शत्रूंना एकंदर जनतेच्या खास देखरेखीखाली ठेवले पाहिजे; समाजसत्तावादी समाजाच्या कायद्यांचे व नियमांचे यत्किंचितही उल्लंघन केल्याबद्दल त्यांना निर्घृणपणे शिक्षा केली पाहिजे " (**किस्सा** खंड २६ वा, पृष्ठ ४११.)

मार्क्स आणि लेनिन यांनी लुम्पेन प्रोलेतारियन्सचे मूल्यमापन हे असे केले. कामगारवर्गाच्या महान नेत्यांनी त्यांची बिलकुल गय केली नाही.

लुम्पेन प्रोलेतारियतविषयी इतर प्रमुख मार्क्सवाद्यांचे मत देखील असेच होते. १९१८ साली रोझा लक्झेंबर्ग यांनी लिहिले: " लुम्पेन प्रोलेतायन्सशी करायचा लढा म्हणजे प्रत्येक क्रांतीच्या लेखी महान महत्वाची खास समस्या झालेली असते. तिचा समाचार जर्मनीत आणि इतरत्र घ्यावाच लागतो. लुम्पेन प्रोलेतारियन घटक हा भांडवलदारी समाजामध्ये .एक खास थर म्हणून उदयास आला इतकेच नव्हे, भयंकर वेगाने वाढत जाणारा समाजाचा तळचा गाळ म्हणून उदयास आला इतकेच नव्हे, विशेषेकरून समाजपद्धतीच्या भिती कोसळतात अशा वेळी उदयास आला इतकेच नव्हे, तर एकंदर समाजाचा एक अविभाज्य भाग म्हणूनही तो उदयास आला..... सर्व ठिकाणच्या कामगारवर्गीय क्रांत्यांना या शत्रूशी, प्रतिक्रांतीच्या या साधनाशी, मुकाबला करावाच लागेल. (**रोझा लक्झेंबर्ग, गेसा मोल्ले बेर्के**, खंड ४ था, पृष्ठ ३६१). नाझीवादाची चढती कमान होती त्या काळामध्ये रोझा लक्झेंबर्ग यांचे हे भाकीत खरे ठरले.

आजच्या घडीला आपण असे म्हणू की मार्क्स आणि लेनिन यांनी आपले अभिप्राय प्रदर्शित केल्यापासून लोटलेल्या वर्षांच्या अवधीत लुम्पेन प्रोलेतारियतचे स्वरूप बदललेले नाही. पूर्वीप्रमाणेच हे लोक कामगारवर्गाच्या कक्षेबाहेर असतात आणि क्रांतिकारक चळवळीशी यांचे काहीएक सोयरसुतक नसते. अजूनही हे लोक भांडवलदारी समाजाच्या परसात आसरा घेतात, केवळ स्वतःचाच तेवढा विचार करतात आणि नेहमींच्या कामापेक्षा आईतखाऊ जीवन पसंत करतात. यांच्या समाजविरोधी भावना अधिक बलवत्तरच झाल्या आहेत. आमच्या काळात देखील हे लोक भांडवलदारांशी न लढता त्यांचा द्वेष व हेवा करतात. आणि केवळ गुन्हेगार व गुंड या नात्यानेच हे भांडवलदारांच्या विरुद्ध कृती करतात. पूर्वीच्या प्रमाणेच आताही त्यांना कसलीही ध्येये नसतात. परंतु खुद्द लुम्पेन प्रोलेतारियतमध्ये बदल झालेला नसला तरी त्याच्या सभोवारच्या अनेक गोष्टी बदललेल्या आहेत आणि याच्या योगाने त्याच्या लेखी महत्त्वाच्या फलश्रुती परिणत होत आहेत.

२

आधुनिक उद्योगधंद्याची गतिशील वाढ होत असताना देखील लुम्पेन प्रोलेतारियतचे आकारमान,लोकसंख्येचा हा वर्गविहीन विभाग,कमी होणे तर दूरच राहो, उलटपक्षी आमच्या काळात बराच वाढला मात्र आहे. भांडवलशाहीच्या सार्वत्रिक अरिष्टाचा हा परिपाक आहे. शास्त्रीय व तंत्रवैज्ञानिक क्रांती ही कमअस्सल कामगारांचे आकारमान वाढवून ठेवते, कारण फालतू अकुशल कामगार त्यात सारा वेळ सामील होत राहतात. अरिष्टाची आणखी एक परिणती म्हणजे सारावेळ काम करणाऱ्या गुन्हेगारांची व वेश्यांची वाढती संख्या, एका नव्या प्रकारच्या उडाणटप्पूचा उदय– हा म्हणजे हिप्पी (याचा विचार नंतर करायचाच आहे) आणि रिकमटेकड्यांचे आणि अशाच सारख्यांचे वाढते संख्याबळ. आजचा लुम्पेन प्रोलेतारियत समाज हा १९ व्या शतकातल्यापेक्षा निःसंशयपणे आकारमानाने अधिक मोठा आणि विविधतेच्या बाबतीत अधिक विस्तृत आहे. परंतु अधिक ज्ञानजागृत व कमी भाडोत्री व्हायच्या बाबतीत तो अपेशी ठरलेला आहे : झालाच असला तर तो अधिक लाचखाऊ झालेला आहे.

आजच्या लुम्पेन प्रोलेतारियतचे अत्यंत वैशिष्टचपूर्ण उपलक्षण म्हणजे त्याची गन्हे करायची प्रवृत्ति निश्चितपणे वाढलेली आहे, आणि अत्यंत दुष्ट अणि हिंसक गुन्हे करण्याकडे त्याची वाढती प्रवृत्ति असते. गुंडाचे अड्डे हा सदैव लुम्पेन प्रोलेतारियतचा गाभा होऊन राहिलेला आहे. आजच्या घडीला यांचा एकजीव झालेली असतो.

भांडवलदारी जगातील संघटित गुन्हेगारी ही दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या पूर्वी होती त्यामानाने अलिकडील काही वर्षांच्या अवधीत परिमाणात्मक आणि गुणात्मक दृष्टचा वेगळी झालेली आहे. भांडवलशाहीने आपल्या अवघ्या इतिहासांत गुन्हेगारीचे आजच्या एवढे प्रचंड प्रमाण कधीही निर्माण केलेले नाही. उदाहरणार्थ, अमेरिकेत गुन्हेगारांचे संख्याबळ लाखो करोडोंच्या घरात गेलेले आहे आणि कित्येक बाबतीत त्यांची जी सिंडिकेट्स आहेत त्यांचा धाक सगळचा राष्ट्राला किंबहुना खुद्द सरकारला वाटतो आहे.

आजच्या लुम्पेन प्रोलेतारियतच्या या विभागाचा संबंध 'लक्तरांशी' असतोच असे नाही आणि हा तात्पुरत्या वसतिगृहात आसरा घेत नसतो. अनेकदा सर्वसामान्य भांडवलदारांपेक्षा याचे जीवन अधिक ऐषआरामी असते. याचे प्रमुख

पुढारी तर देशाच्या मलईवर जगत असतात. परंतु यांच्या प्रवृत्ती मात्र त्याच असतात. गुन्हा हा पुरोगामी धोरणापेक्षा अधिक चांगला–हीच याची धारणा असते. अमेरिकेतील याच्या सिंडिकेटची गुन्हेगारीची कमाई अधिकृत अंदाजानुसार सालिना ४०० कोटी डॉलर्स पेक्षा अधिक असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे आवश्यक असेल तेव्हा दहशतवाद्यांच्या विस्तृत जाळ्याच्या मदतीने गुन्हेगारीचा बडा धंदा चालू आहे. सिंडिकेटच्या व्यवहारांसाठी लुम्पेन–प्रोलेतारियतकडूनच कार्यकर्त्यांचा पुरवठा होत असतो आणि साऱ्या देशातल्या लुम्पेन प्रोलेतारियन्सवर आजच्या घडीला सिंडीकेटचीच देखरेख बहुतेक चालू असते.

अमेरिकेतील रिसर्च अँड फोरकास्ट्स इन्कॉर्पोरेटेड या संस्थेने १९८० साली प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या तीस वर्षांच्या अवधीत अमेरिकेतील दरोड्यांचा आकडा ३०० टक्क्यांनी वाढला आहे आणि खुनांचा आकडा ३७० टक्क्यांनी वाढला आहे. १९८० साली अमेरिकेत दर २४ मिनिटांना एक खून पडत होता, दर सात मिनिटांत एक बलात्कार होत होता, गुंडांच्या टोळीचा हल्ला दर ५१ सेकंदांना एक असा होत होता आणि दर दहा सेकंदांना एक घरफोडी होत होती. १९६० ते १९७० या अवघ्या दहा वर्षांच्या मुदतीत अमेरिकेतील गुन्हेगारी १७६ टक्क्यांनी वाढली तर लोकसंख्या केवळ १४ टक्क्यांनी वाढली; म्हणजे गुन्हेगारी ही लोकसंख्यावाढीच्या बारापट वेगाने वाढत आहे.

पोलिसांच्या रिपोर्टांनुसार १९७९ साली न्यूयॉर्क शहरात १,७३३ खून झाले, आणि १९८० साली १,७८७ खून पडले. म्हणजे १९७० च्या मानाने खुनांचे प्रमाण ६० टक्क्यांनी अधिक भरते; मात्र गेल्या दहा वर्षांत या शहराची लोकसंख्या दहा लाखांनी घटली. या शहरात एका दिवसात २२६ हिंसाचारी गुन्हे घडले. न्यूयॉर्क शहरातील मुलाखत घेतलेला दर चौथा माणूस सांगतो की संध्याकाळी आपल्याला एकट्याने बाहेर जायची हिंमत होत नाही. वॉशिंग्टन शहरी, **वॉशिंग्टन पोस्ट** या वृत्तपत्रानुसार, १९८० साली दर ५० तासांनी एक खून पडत होता; लॉस एन्जेलीस या शहरात १९८१ च्या अवघ्या पहिल्या सहामाहीत १००० पेक्षा अधिक खुनांची नोंद झाली. १९७६ च्या आरंभी असे सांगण्यात आले की अमेरिकेच्या तुरुंगांतील कैद्यांची संख्या जवळजवळ अडीच लाखांच्या घरात पोचली– अमेरिकेच्या इतिहासांतला हा उच्चांक होता. परंतु अधिकारी लोक गंभीर गुन्हे करणारांपैकी केवळ एक अल्पसा हिस्साच पकडून त्याला शिक्षा ठोठावतात (कांही लोकांच्या अंदाजानुसार दर बारा गुन्ह्यांपैकी एका गुन्ह्याचा पत्ता लागत नाही; तर इतरांच्या अंदाजानुसार दर पन्नास गुन्ह्यांपैकी एकाचा पत्ता लागत नाही), म्हणून गुन्हेगारीची दुनिया भरभराटत आहे आणि अधिकाधिक वर्गविहीन घटक ती आपल्याकडे आकर्षित करून घेत आहे. याच्या योगाने समजाला सतत वाढता धोका निर्माण होत आहे.

अशाच सारख्या घडामोडी, मात्र जरा कमी प्रमाणात, इतर पाश्चात्य देशांमध्ये निदर्शनास येत आहेत. इंग्लंडमध्ये, १९७६च्या एप्रिल महिन्यात लँकेशायर परगण्याच्या पोलिसप्रमुखाच्या सांगण्यानुसार हिंसाचारी गुन्ह्यांचा आकडा सालोसाल दुप्पट होत चालला आहे. जपानमध्ये १९७५ साली १२,३४,३०७ गुन्हे घडले, आणि त्यांतल्या तिसरा हिस्सा गुन्हेगारांचा पत्ता लागला नाही. १९७६ साली इटलीत वीस लाखाहून अधिक गुन्हे घडले.

पश्चिम जर्मनीत दर मिनिटात सरासरी दोन दरोडे किंवा घरफोड्या घडतात; नुकसानीचा आकडा सालिना अब्जावधी मार्क इतका भरतो. अमेरिकेतल्या प्रमाणेच इथे देखील गुन्ह्यांचा आकडा वाढतो आहे इतकेच नव्हे, तर धंदेवाईक गुन्हेगारांचे प्रमाण देखील वाढत आहे. १९७० ते १९७५ या मुदतीत इटलीतील गुन्ह्यांचा आकडा दुप्पट भरला.

आजच्या घडीला आणखी एक राखीव दल आहे. ते जवळजवळ लुम्पेन प्रोलेतारियत येवढेच मोठे आहे आणि लुम्पेन प्रोलेतारियनमध्ये त्याची भर पडत आहे. हे दल म्हणजे भांडवलदारी समाजाच्या आर्थिक, राजकीय व नैतिक अरिष्टापायी अस्थिरता प्राप्त झालेले तरुण लोक. सत्य घटना असे दाखवून देतात की बरेचसे मध्यमवर्गीय तरुण, आणि कामगारवर्गीय तरुण देखील भांडवलदारी समाजव्यवस्थेवर विश्वास ठेवीनासे झाले आहेत आणि समाजाच्या तळाशी रुतत चालले आहेत, ते लुम्पेन-प्रोलेतारियनांचे जीवन जगायला लागतात, किंबहुना त्यांतच त्यांना समाधान सापडायला लागते. त्यांचा आकडा तेरा ते एकोणीस वर्षे वयोगटांतील मुलामुलींचा मिळून दहा दहा हजारांच्या आणि कधी कधी लाखा लाखांच्या घरात जातो.

अमेरिकेत एका काळी त्यांच्यामध्ये 'हिप्पी' हे नाव असलेल्यांच्या विभागाचा समावेश होत होता–हे तरुण लोक, अनेकदा तेरा ते एकोणीस वर्षे वयोगटातले, आणि हे आपल्या कुटुंबांतून फटकून दूर झालेले असत. यांनी नियमित काम सोडून दिलेले असायचे 'संस्कृतीच्या बेड्या' फेकून दिलेल्या असायच्या, आणि साऱ्या देशभर हेतुशून्यपणे भटकंती सुरू केलेली असायची. त्यांच्या पैकी बहुतेकांना कामगारवर्गीय चळवळीकडे जायचा मार्ग सापडला नाही आणि ते सर्व प्रकारच्या हास्यास्पद विचारांचे आणि पंथांचे अनुसरण करीत बसले. जसजसा काळ जात चालला तसतसा असल्या लुम्पेन-प्रोलेतारियन्सचा आकडा घटला नाही आणि अधिकाऱ्यांना त्यांची गंभीरपणे हाताळणी करावी लागली. अगदी अलीकडेच काही हिप्पीनी मोटारसायकल स्वारांच्या टोळ्या तयार केल्या आणि देशभर भटकंती केली, अनेकदा राजरोज लुटारुपणा केला. शहरांमध्ये त्यांनी लुटारुंच्या टोळ्यांशी गुन्हेगारीच्या उद्देशांनी दोस्ती केली. १९६९ ते १९७१ या मुदतीत डझनवारी

मुलामुलींनी 'मॅन्सॉन गँग' ही टोळी तयार करून इतरांना 'दमदाटी देण्यासाठी' ३५ लोकांचे मुडदे पाडले आणि या प्रकरणाने सगळ्या अमेरिकेला हादरा दिला.

भांडवलदारी जगातील तरुण लोकांच्या एका विभागाला वर्गविहीन करण्यापासून लुम्पेन प्रोलेतारियतचाच फायदा होता. या प्रक्रियेचे आर्थिक कारण म्हणजे सामुदायिक बेकारी. या बेकारीने साऱ्या भांडवलदारी देशांमधून थैमान मांडले असून हिने युवकांना विशेष करून हैराण केले आहे. अशा परिस्थितीत अधिक निकरावर आलेले तरुण लोक यांतून बाहेर पडण्यासाठी गुन्हेगारीचा मार्ग शोधायचा प्रयत्न करतात यात नवल काहीच नाही. १९७६ च्या वसंतऋतूत अमेरिकेच्या मध्यवर्ती व प्रादेशिक तुरुंगांतल्या एकंदर कैद्यांपैकी निम्म्याहून अधिक कैदी १७ ते २९ वर्षे वयोगटांतले होते आणि यांच्या नोकऱ्या सुटलेल्या होत्या किंवा शाळा अगर कॉलेजे सोडल्यानंतर काम शोधण्यात यांना अपयश आलेले होते. त्याच वर्षी असा हिशेब काढण्यात आला की अमेरिकेत घडलेल्या एकंदर गुन्ह्यांपैकी जवळजवळ निम्मे गुन्हे २० वर्षे वयापर्यंतच्या व्यक्तींनी केलेले होते. अशा प्रकारे तरुण लोक मोठचा संख्याबळानिशी स्वेच्छेने किंवा अनिच्छेने लुम्पेन प्रोलेतारियन्स होतात, आणि त्यांतले अनेकजण आजन्म तसेच राहतात.

अर्थात हे लोक म्हणजे बेकारांतले, त्यांतल्या त्यात अधिक अपरिपक्व व मागासलेले घटक असतात. यांतले जागृत बहुसंख्याक लोक आपल्या जिव्हाळ्याच्या हितसंबंधांचे रक्षण करणाऱ्या कामगारवर्गीय चळवळीत दाखल होऊन हो समस्या सोडविण्यासाठी मार्ग शोधत असतात. असे असूनही बेकार तरुणांच्या एका विभागाचा धीर सुटण्याची व तो वर्गविहीन होण्याची प्रक्रिया चालूच असते.

हे तरुण गुन्हेगार म्हणा, हिप्पी म्हणा, आणि तत्सम घटक म्हणा, म्हणजे आर्थिक अरिष्ट ज्याला केवळ कारणीभूत आहे असे एक तात्पुरते घटित असेल यावर आपला खरोखरी विश्वास बसू शकतो काय ? नाही. १९६० च्या दशकांतील अरिष्टाच्या किती तरी अगोदर ते मोठ्या संख्याबळानिशी रंगमंचावर आले. भांडवलदारी जगातील युवकांचा एक विभाग वर्गविहीन होण्याच्या प्रक्रियेची पाळेमुळे कितीतरी अधिक खोलवर गेलेली आहेत : अगोदरच सांगितल्यानुसार ही पाळेमुळे त्या जगाच्या गंभीर आर्थिक अरिष्टाची दिशा दाखवितात इतकेच नव्हे तर भांडवलदारी समाजाच्या सार्वत्रिक ऱ्हासाची देखील दिशा दाखवितात.

अशाच सारखी घटिते आशिया आणि लॅटिन अमेरिका या खंडांतील देशांमध्ये निदर्शनाला येतात याची नोंद या मुद्याचा विचार करताना घ्यायला हवी. जगाच्या या भागामध्ये देखील लुम्पेन प्रोलेतारियत समाज राजकारणात खेचला जात असलेला उघड दिसत आहे आणि हा समाज निश्चितपणे प्रतिक्रान्तिकारक भूमिका बजावतो आहे. उदाहरणार्थ, अफगाणिस्तानची राजधानी काबूल या शहरावर

तारीख २१ व २२ फेब्रुवारी १९८० रोजीं प्रतिगामी टोळ्यांनी हल्ले चढविले त्या वेळी स्थानिक वर्गविहीन घटकांनी आणि गुन्हेगारांनी त्यांची बाजू घेतली. त्यांच्या मदतीने प्रतिक्रान्तिकारकांनी दुकानातून व हॉटेलांतून घुसून मालमत्तेची नासधूस आणि लुटालूट केली; त्यांनी मोटारींवर दगडफेक केली आणि त्यांना आगी लावल्या, आणि काबूलच्या जनतेला ब्रेडवाचून राहावे लागावे म्हणून बेकरी देखील उडवून लावायची खटपट केली. जो जो कोणी आपला साथीदार व्हायला नकार देईल त्याला ठार करायच्या धमक्या त्यांनी दिल्या. त्याचप्रमाणे १९७८ साली इराणमध्ये शहा–विरोधी क्रान्ती झाली त्यावेळी कत्तली अमलात आणणाऱ्या प्रतिगामी टोळ्यांमध्ये गुंडांतल्या अड्ड्यांतले गुन्हेगार हे शहाच्या पोलसांच्या हस्तकांच्या व लष्करी अधिकाऱ्यासमवेत सामील होते ही गोष्ट देखील सूचक आहे.

आजच्या लुम्पेन–प्रोलेतारियतची मूलभूत रचना ही अशा प्रकारची आहे. त्याच्या या रचनेमध्ये ठळक असे फरक गेली वर्षानुवर्षे कसलेच झालेले नाहीत. गुंडाचे जग हाच या थराचा गाभा असतो. चोर, लफंगे, मारेकरी, उडाणटप्पू, भिकारी, वेश्या आणि भांडवलदारी समाजाच्या तळाचा गाळ हे अजूनही अस्तित्वात आहेत. १८५२ साली मार्क्स यांनी ज्यांच्याविषयी सांगितले ते ढोंगी वैद्य, वाद्य वाजविणारे, लाझारोनी, चिंध्या गोळा करणारे आणि यांच्याचसारखे आता लुप्त झाले आहेत किंवा फारच थोडे शिल्लक आहेत. परंतु आता ज्यांनी त्यांची जागा घेतलेली आहे ते संघटित कामगारवर्गाच्या अधिक नजीक असे मुळीच आलेली नाहीत. याच्या भरीला आणखी एक गोष्ट अशी की कामगारवर्गापासून फटकून असलेल्या व त्याच्याशी वैर बाळगणाऱ्या शक्ती या लुम्पेन प्रोलेतारियतचा वापर करतात त्यावेळी हा समाज पूर्वीच्या पेक्षा देखील अधिक धोकेबाज हत्यार होऊ शकतो.

अगोदर दाखवून दिल्यानुसार लुम्पेन प्रोलेतारियतची रचना मुख्यत्वेकरून न बदलता तशीच राहिलेली आहे. परंतु त्याचा विचार करण्याच्या रीतींत व वृत्तींत बदल झालेला आहे काय ? हा बदल फक्त एकाच गोष्टीत झालेला आहे. ती गोष्ट ही की हा समाज अधिक कडवा व निर्घृण झालेला आहे.

हे लक्षात ठेवायला हवे की पाशवीपणा हा या घटकांच्या ठायी सदैव अंगभूतच असतो. लुम्पेन प्रोलेतारियन्सच्या नेत्यांनी आणि राजकीय स्फूर्तिदात्यांनी त्यांना सगळचा नीतीचा व दातृत्वाचा तिरस्कार करण्याचीच शिकवण सातत्याने दिलेली असते. १९ व्या शतकात मनुष्यद्वेषाचा प्रचार अराज्यवादी व तत्सम विचाराचे लोक करीत असत.

बाकूनिनचा सहकारी सेर्गेइ नेचायेव (मिखाईल ए. बाकूनिन (१८१४-७६) आणि सर्गेइ जी. नेचायेव (१८४७-८२)–क्रांन्तिकारक अराज्यवादी. यांना साहसवादी कटकारस्थाने व शेतकऱ्यांचे उठाव या साधनांनी झारशाहीविरुद्ध लढायला

हवे होते. कामगारवर्गाची ऐतिहासिक भूमिका व त्याचा क्रान्तिकारक तत्वविचार त्यांना अमान्य होता.) हा रशियात शेतकऱ्यांच्या व उडाणटप्पूंच्या रक्तपाती उठावाचे नेतृत्व करायची स्वप्ने रंगवीत होता आणि यासाठी त्याने त्यांना राक्षसी व निर्दय व्हायची शिकवण दिली. त्याचे विचार (आजच्या अतिडाव्या दहशतवाद्यांची तपशीलवार माहिती देणाऱ्या पुढील प्रकरणात आम्ही त्याच्याकडे पुन्हा वळणारच आहोत) म्हणजे सामुदायिक कत्तलीचा कार्यक्रम. हा राजकीय क्रांतीचा कार्यक्रम नव्हता. यात क्रांतिकारक व गुन्हेगार यांच्यांत काहीच फरक केलेला नव्हता. आणि लुटारू लुम्पेन–प्रोलेतारियन्सच्या बेगुमान उपद्व्यापात दोघांचा एकजीव करून ठेवलेला होता. गुन्हेगार लुम्पेन प्रोलेतारियतच्या मनोवृत्तीचे स्वरुप याहून अधिक स्पष्टपणाने उघड करून दाखविण्याचा प्रकार असूच शकत नव्हता. मार्क्स यांनी या पाशवीपणाच्या शिकवणुकीची छी:थू: केली. आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचे नेतृत्व करताना मार्क्स यांना अराज्यवाद्यांच्या कार्यक्रमात वास्तववादी क्रांतिकारक विचाराचा संपूर्ण अभाव तावडतोब दिसला इतकेच नव्हे, तर त्यात कामगारांविषयींचा बेगुमान द्वेष, त्याच्या लढ्याच्या शास्त्रीय पद्धतीविषयीं, त्याच्या सामाजिक स्थिरतेविषयी व हेतुपूर्णतेविषयी बेगुमन द्वेष देखील त्यांना तावडतोब दिसला.

बाकूनिन आणि नेचायेव यांनी लुम्पेन प्रोलेतारियन्सच्या ठायी 'दुष्ट भावना' चेतविण्याची शिकस्त केली, परंतु त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. विसाव्या शतकाच्या आरंभी त्यांच्या सिद्धांताचे लोण चालविणारे होतेच–मात्र ते राजकीय रंगमंचाच्या विरुद्ध बाजूला उभे होते. लम्पेन प्रोलेतारियत समाजात पाशवी हिंसाचाराचा प्रचार पहिल्या प्रथम करणाऱ्यांनी या प्रचाराचा रोख भांडवलदारांविरुद्ध न ठेवता लुई फिलिपच्या कारकीर्दीतल्या प्रमाणे डाव्या गोटाविरुद्धच ठेवला. हे होते रशियन राजेशाहीवादी. यांनी १९०५ साली क्रांतिकारकांच्या विरुद्ध ब्लॅक हंड्रेड्स, 'रशियन पीपल्स युनियन,' अशा मोठ्या संघटना उभारल्या. त्यांनी दुकानदार, दारूगुत्तेवाले, धर्मोपदेशक आणि श्रीमंत शेतकरी यांच्या जोडीला पोलिसांच्या मदतीने गुन्हेगारांच्या व गुंडांच्या सबंध टोळ्यांची या संघटनामध्ये भरती केली. या टोळ्या कामगारांवर हल्ले करीत असत, कत्तली संघटित करीत असत आणि जिथे शक्य असेल तिथे चोऱ्याही करीत असत. परंतु झारशाहीच्या पोलिसांचे पगारी हस्तक असलेल्या या तळागाळातल्या गुंडांना कामगारवर्गीय क्रान्तीचा विजय व्हायला प्रतिबंध करता आला नाही.

त्यानंतर पंचवीस वर्षांनी रशियाच्या अतिप्रतिगाऱ्यांचा कित्ता अतुलनीय अशा हा महाप्रचंड प्रमाणावर जर्मनीत नाझींनी गिरविला. १९२९ ते १९३३ या मुदतीतल्या तीव्र आर्थिक अरिष्टाने ६० लाख जर्मन कामगारांना बेरोजगार करून

ठेवलेले होते. त्याच्या कितीतरी अगोदरच हिटलरने आपल्या "स्टॉर्म ट्रूपर्स" साठी गरिबी आलेल्या मध्यमवर्गीयातील तरूण मंडळींच्या जोडीला निवडक लुम्पेन प्रोलेतारियन्सची भरती पद्धतशीरपणे चालविलेली होती. नाझीवाद उदयास यायच्या आरंभीच्या काळात मध्यमवर्गीय हेच तेवढे याचा सामुदायिक आधार होते असे समजणे चुकीचे आहे. त्याला पाठिंबा देणारा त्याचा दुसरा आधारस्तंभ म्हणजे अभूतपूर्व असा प्रचंड लुम्पेन प्रोलेतारियत समाज हा होता. १९२० च्या दशकाच्या उत्तरार्धात जर्मनीतील चलनवाढीच्या व बेकारीच्या परिणामी हा उदयास आलेला होता. जर्मनीची राजधानी त्यावेळी जर्मन गुंडांचे केंद्र होती. या केंद्रातून लुम्पेन प्रोरेतारियन्स फार मोठ्या संख्येनिशी नाझींना सामील झाले. एका काळी बर्लिनच्या स्टॉर्म ट्रूपर्सचा नेता असलेला त्यावेळी तिथल्या गुंडांमध्ये वीर पुरुष म्हणून गाजलेला हॉर्स्ट वेस्सेल हा होता. हा पूर्वी वेशांचा दलाल होता. याच्याच सन्मानार्थ नाझींच्या राष्ट्रगीताची रचना करण्यात आली.

या लुम्पेन प्रोलेतारियन्सनी आपली सेवाचाकरी करावी म्हणून हिटलरने त्यांना किती पैसे दिले? रशियन झार आपल्या भाडोत्री ब्लॅक हंड्रेड्सना देत होता त्यापेक्षा या रकमा अधिक होत्या. नाझी मारेकऱ्यांना नुसतेच ठराविक पगार मिळत नव्हते. त्यांना गणवेश मिळत असत, राहायला बराकी होत्या आणि हात खर्चाला पैसे मिळत असत. हिटलरने त्यांना "प्रतिष्ठित" करायची योजना आखलेली होती आणि त्यांना तो दर्जा द्यायचे गंभीर आश्वासन देखील दिलेले होते. या उडाणटप्पूंना व चोरांना अशीही आश्वासने मिळाली की फूहररने जिंकून घेतलेल्या प्रदेशांमध्ये तुम्हाला मॅनेजर व श्रीमंत मालक व्हायला मिळेल, आणि अशा रीतीने अखेरीस तुम्हाला उच्च वर्गाचा दर्जा प्राप्त होईल. या सौद्याच्या आधारावर या लुम्पेन प्रोलेतारियन्सना राजकीय चिथावणुकीची तंत्रे शिकवून तरबेज करण्यात आले आणि त्याच्या बदल्यात त्यांनी आपल्या परीने नाझींना सर्व प्रकारचे पाशवी अत्याचार करायचे शिक्षण दिले.

हिटलरच्या पक्षामध्ये सुरुवातीपासूनच ज्यांनी मोठ्या उत्साहाने वैशिष्ट्यपूर्ण लुम्पेन प्रोलेतारियन रीतींचे बीजारोपण केले त्यामध्ये ग्वालायटर ज्यूलियस स्ट्रायखेर हा होता. ज्यूविरोधी कत्तलींचा हा संघटक होता. हिटलरच्या मंजुरीनिशी या गळेकापूने ज्यूंचा संपूर्ण नायनाट केला पाहिजे अशी जवळजवळ उघडपणे हाक दिली. मानवहत्येचा आणखी एक पुरस्कर्ता म्हणजे हाइनरिख हिम्लर हा होता. ही अधिक महत्त्वाची असामी होती. याने सामुदायिक नायनाट करायच्या राष्ट्रांमध्ये स्लाव जनतांचा समावेश केलेला होता. सरकती सुरक्षा दलाचा प्रमुख झाल्यानंतर या हिम्लरने थेट उच्च पातळीवरून सामुदायिक दहशतवाद संघटित करायला सुरुवात केली. यासाठी आपले हस्तक म्हणून त्याने आत्मसंतुष्ट तुच्छतावाद्यांच्या पुत्रांचा आणि लष्करीकरण केलेल्या लुम्पेन प्रोलेतारियन्सचा वापर केला.

तारीख ४ ऑक्टोबर १९४३ रोजी स्ट्रॉर्म ट्रूपर्सच्या अधिकाऱ्यांच्या एका खासगी बैठकीत भाषण करताना हिम्लरने असे जाहीर केले की "जनता (म्हणजे नाझी जर्मनीने जिंकलेल्या देशांची जनता–अ.हे.) सुस्थितीत राहील का उपाशी मरेल या प्रश्नाविषयी मला जी आस्था वाटते ती केवळ हे लोक आमच्या संस्कृतीसाठी गुलाम म्हणून कामी यायला हवेत येवढ्यापुरतीच आहे; मला अन्य कशाचीही आस्था नाही...आपण केवळ आपल्या स्वतःच्या रक्ताच्या लोकाविषयीच प्रामाणिक, सभ्य व बंधुत्वाची भावना ठेवली पाहीजे आणि अन्य कोणाविषयीही ती ठेवायला नको." असले आदेश लुम्पेन प्रोलेतारियन्सना फारच छानपैकी सोईचे होते, मध्यववर्गीयांच्या पेक्षा यानाच हे अधिक सोईचे होते कारण मध्यमवर्गीयांपैकी अनेकांना आपल्या भांडवलदारी नीतीच्या अवशेषांचा अजूनही अडथळा होत होता. पाशवीपणाचे थैमान आणि ते देखील विश्वव्यापी प्रमाणावरील थैमान घालायची हाकच या लुम्पेन प्रोलेतारियन्सना नेमकी हवी होती.

याच्या अगोदर, १९४१ च्या मे महिन्यात स्टार्म पर्सचा माणूस डॉ. सिग्मुंड राश्चेर याने डाचॉ येथील छळ छावणीत पुढील प्रकारचे प्रयोग पार पाडायची परवानगी हिम्लरकडे मागितली होती. शून्याखाली २७ ते ३० अंश तपमान असतांना लोकांना ९ ते १४ तास विवस्त्र अवस्थेत ठेवायचे आणि नंतर ऊब देऊन त्यांचे पुनरुज्जीवन करता येते किंवा नाही याच्या चाचण्या घ्यायच्या. हिम्लरने ही परवानगी दिली. या छावणीतले सुमारे ३०० लोक मेले, कांही वेडे झाले. तारीख २४ ऑक्टोबर १९४२ रोजी हिम्लरने राश्चेरला लिहिले. "लोकांना गोठवायचा तुमचा अहवाल मी खूपच आस्थापूर्वक वाचला...लोकांवर असले प्रयोग करायला जे अजूनही विरोध करतात ते माझ्यामते देशद्रोहाचा गुन्हा करतात...मला व्यक्तिशः असे वाटते की हे प्रयोग शाश्वत मूल्यांच्या फलश्रुती उपलब्ध करून देतील."

हिम्लरची असली वक्तव्ये (यांतली अनेक सर्वश्रुत आहेत) म्हणजे साध्या राक्षसीपणाची अभिव्यक्ती नव्हती, त्याचप्रमाणे हे वेडेपणाचेही लक्षण नव्हे. ही वक्तव्ये म्हणजे मूलतः एक राजकीय इलाज होता–तो म्हणजे नाझींच्या मनोभूमिकेत पिसाट क्रौर्याची जोगवण करणे हा होता. नाझींच्या छळ छावण्यांमध्ये जे वॉर्डर झालेले होते आणि तिथे उच्च पदावर चढलेले होते त्यांतल्या अनेक जर्मन लुम्पेन प्रोलेतारियन्सना जर्मन शहरांतून आणि त्याहून अधिक मोठ्या प्रमाणात नाझींच्या ताब्यांतल्या जिंकलेल्या प्रदेशांतून आपल्या पाशवी उपजत बुद्धीचे समाधान करून घेता येत होते. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या अवधीत नाझींनी जी मानव हत्येची दुष्कृत्ये केली ती जर्मनींतल्या बडद्या भांडवलदारांची व मध्यमवर्गीयांची होती इतकेच नव्हे तर जर्मन लुम्पेन प्रोलेतारियन्सचीही होती. असे असूनही

एकंदरीने पाहता या लुम्पेन प्रोलेतारियतला नाझींच्या बरोबर दोस्ती करण्यापासून अखेरीस काडीइतकाही लाभ झाला नाही.

हिटलरवादी सत्ताधारी झाल्यानंतर अवघ्या दीड वर्षाच्या अवधीत नाझी पक्षातील भांडवलदारी व मध्यमवर्गीय सदस्यांच्या फायद्यासाठी लुम्पेन प्रोलेतारियतचा बळी देण्यांत आला. या वरच्या वर्गातल्या लोकांनीच स्टॉर्म ट्रूपर्सच्या एस्एस् दलातली वरिष्ठ पदे घेतली.

स्टॉर्म ट्रूपर्समध्ये हजारो लुम्पेन–प्रोलेतारियन्स होते परंतु एस्एस् दलातल्या लोकांनीच वर्चस्व आपल्याकडे घेतले आणि ते जर्मनीवर राज्य करू लागले. याचे कारण साधे आहे. हिटलर आपल्या तरुण वयात जरी नमुनेदार गुंड होता तरी विशाल फॅसिस्ट पक्षाची निर्मिती केल्यानंतर व सत्ता हस्तगत केल्यानंतर तो मक्तेदार भांडवलदारांच्या गोटांत दाखल झाला आणि त्यांच्या आदेशांचे पालन करायला लागला. फ्रेंच बोना पार्टिस्ट भांडवलदारांनी ज्याप्रमाणे पूर्वी केले होते, त्याचप्रमाणे जर्मन फॅसिझमने रासवटपणे लुम्पेन प्रोलेतारियतला राबवून घेतले.

आजच्या काळात लुम्पेन प्रोलेतारियत हा अजूनही वर्गविहीन समाज राहिलेला आहे आणि या अगर त्या प्रवृत्तीच्या साहसबाज धोरण चालविणाऱ्या शक्तींकडून त्यांची मोठ्या उत्साहाने रिक्रूटभरती करण्यात येते. आज तीन शक्ती या समाजाला आमिष दाखवत असतात–त्या म्हणजे नव-फॅसिस्ट, नव-अराज्यवादी आणि माओवादी.

३

आपण पाहिले आहे तद्नुसार अलीकडच्या काळातील इतिहास हे सिद्ध करून देतो की लुम्पेन–प्रोलेतारियतचा आकार केवढाही मोठा असला आणि तो अत्यंत आक्रमक कृत्ये करायला तयार असला तरी देखील जुन्या काळात तो एक स्वतंत्र राजकीय शक्ती असा कधीही मानला जाऊ शकला नाही. जेव्हा जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा तेव्हा प्रतिगामी वर्गाच्या गटांनी आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी त्याला लाच दिली किंवा भाड्याने घेतले व वापरून घेतले; परंतु समाजजीवनात त्याने स्वतंत्र भूमिका बजाविली नाही, किंवा त्याला ती बजावता आली नाही–ते करायला तो मुळातच असमर्थ होता. एका अंगाने कामगारवर्ग व शेतकरीवर्ग आणि दुसऱ्या अंगाने भांडवलदारवर्ग यांच्याहून वेगळा असलेल्या या वर्गविहीन व संमिश्र लुम्पेन-प्रोलेतारियन्सच्या समाजाच्या ठायी सत्तेसाठी झगडायला लागणारे डोकेही नसते आणि इच्छाशक्तीही नसते. याचे कारण म्हणजे त्यांची "लढण्याच्या बाबतीतील आश्चर्यकारक अस्थिरता व असमर्थता" हे असल्याची नोंद लेनिन यांनी घेतली (व्ही. आय. लेनिन **संकलित ग्रंथ**, खंड १५ वा, पृष्ठ ३०४)

लुम्पेन-प्रोलेतारियतचे नेतृत्व केवळ लुप्पेन-प्रोलेतारियनच करू शकतो असे आपण समजावे काय ? निश्चितपणेच नाही. हे मार्क्स यांनी स्पष्ट केले. "सोसायटी ऑफ डिसेंबर टेन" ही जी लुप्पेन प्रोलेतारियन संघटना १८४९ साली पॅरिस शहरी अस्तित्वात आली, तिचा उहापोह करताना त्यांनी लुई बोनापार्ट याला अनुलक्षून लिहिले की "हा स्वतःचा नेमणूक **लुम्पेन प्रोलेतारियतचा प्रमुख** म्हणून करून घेतो, ज्या हितसंबंधांचा तो व्यक्तिशः पाठपुरावा करतो त्यांचाच तो इथे सामुदायिक स्वरुपात पुन्हा शोध लावतो" (कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स, **संकलित ग्रंथ**, खंड ११ वा, प्रोग्रेस पब्लीशर्स, मॉस्को, १९७९, पृष्ठ १४९). त्याच ग्रंथामध्ये मार्क्स यांनी पुन्हा सांगितले आहे की लुई बोनापार्टने पॅरिसच्या लुप्पेन-पोलेतारियतचे नेतृत्व केले. ब्लॅक हंड्रेड्स "रशियन पीपल्स युनियन" यांचे नेते म्हणजे ट्रूब्रोविन हा डॉक्टर आणि मार्कोव धाकटाव पुरीश्केविच हे दोघे जमीनदार. नाझींचा फूहरेर होता हिटलर. हा पूर्वी होता एक लुप्पेन प्रोलेतारियन, परंतु मागाहून तो भांडवलदारांना व बड्या मक्तेदार भांडवलदारांच्या टोळीत

सामील झाला. आजच्या घडीला इतर शक्ती अशाच प्रकारच्या कामगिऱ्या लुम्पेन–प्रोलेतारियत समवेत पार पाडायची आशा धरून आहेत.

नव–फॅसिस्टांविषयी म्हणाल तर दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जिथे जिथे त्यांच्या संघटना उदयास आलेल्या आहेत तिथे तिथे हिटलरच्या अनुभवाची पुनरावृत्ती करायची त्यांची मनीषा उघड दिसून येते. त्यांचे एक खास उद्दिष्ट आहे.

ही वस्तुस्थिती हिशेबात घ्यायला हवी की आजच्या फॅसिझमचा पाया बराच संकोचला आहे. पूर्वीचे अनुयायी जे मध्यमवर्गीय, त्यांच्या पाठिंब्याची अतःपर तितक्याच प्रमाणात शाश्वती नसते. तीव्र आर्थिक अरिष्ट असताना देखील मध्यम-वर्गीय हे उजवीकडे झुकण्यापेक्षा डावीकडे झुकणे अधिक पसंत करीत आहेत. तीच गोष्ट बेकार युवकांना लागू पडते. परंतु गुंडांच्या अड्ड्यांतल्या लुम्पेन-प्रोलेतारियन्स सकट काही अतिसाहसी लुम्पेन-प्रोलेतारियन्सना आणि आर्थिक अरिष्टाने ज्या कामगारांना उडाणटप्पू केले आहे अशांना लांच देणे अजूनही फॅसिस्टांना जमत आहे. सत्य घटना असे दाखवून देतात की जवळजवळ सगळीकडीलच आणि त्यातल्या-त्यात अमेरिका, फ्रान्स, इटली आणि पश्चिम जर्मनी या देशातल्या फॅसिस्ट टोळ्यां-मध्ये बहुतांशी धंदेवाईक गळेकापू, लुटारू व गलितधैर्य युवक यांचा भरणा आहे.

अशा परिस्थितीत आपल्या पाठिराख्यांमध्ये अत्यंत पाशवी लुम्पेन-प्रोलेतारियन प्रवृत्तींचा प्रसार फॅसिस्टांनी पुन्हा जाणूनबुजून चालविलेला आहे याचे नवल वाटायला नको. अमेरिकेतले त्यांचे एक मुखपत्र **किल !** (ठार मारा !) हे असून याने १९६० च्या दशकांत लिहिले की ठार मारणे हा मानवी स्वभावच आहे. जगात पुढे येण्यासाठी माणसाने ठार मारणे भागच असते. खरे धनी कोण आहेत, जगातील मोठ्यात मोठे मारेकरी कोण आहेत, हे नीग्रोंना दाखवून दिले पाहिजे. गोऱ्या माणसांनी आपल्या तरवारी उपसल्या पाहिजेत, आपल्या शत्रूंना जमीन-दोस्त केले पाहिजे, आणि ठार मारले पाहिजे, ठार मारले पाहिजे, ठार मारले पाहिजे.

सर्वसाधारण लोकांना असली आवाहने केवळ शिसारीच आणू शकतात. ती लुम्पेन-प्रोलेतारियन्सवर बहुधा प्रभाव पाडत असतीलही, परंतु त्यांच्यापैकी सगळ्यांवर ती प्रभाव मुळीच पाडणार नाही.

आणखी एक अमेरिकन नवफॅसिस्ट हा डल्लास येथील धर्मोपदेश आहे. याने १ ६० च्या दशकातील एका पुस्तिकेत लिहिली की " तुम्हाला जर एखाद्या शत्रूला ठार मारायला हवे असेल तर त्याला अशा रीतीने ठार मारा की त्याचा तुमच्या इतर शत्रूंना धाक बसेल. " त्याने पुढे असे म्हटले आहे की " एखाद्या प्रेताच्या धडा-वर शिर आहे किंवा नाही याची त्या प्रेताला कसलीच पर्वा नसते. परंतु मानस-शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास शिरावेगळे नुसतेच धड कुणीही पाहिले

म्हणजे आपले असेच होईल की काय अशी तो कल्पना करतो आणि घाबरून त्याचा थरकाप होतो."

यावरून पुन्हा हिम्लरच्या भाषेची आठवण येते. "धंदेवाईक" लुम्पेन–प्रोलेतारियन्सचा दृष्टिकोन न बदलता जवळ जवळ तसाच राहिलेला आहे; त्यांचे वर्णन मार्क्स आणि लेनिन यांनी जे करून ठेवले आहे ते आज देखील लागू पडते. त्यांचे हेतू आणि प्रवृत्ती मूलतः लुई बोनापार्ट, मार्कोव घाकटा, आणि हिटलर यांच्या काळात जशा होत्या तशाच राहिलेल्या आहेत. हे ठाऊक असल्यामुळेच नव-फॅसिस्टांनी त्यांचा अनुनय हर मार्गाने चालविलेला असतो आणि त्यांचा सगळ्यांविषयीचा द्वेष ते चेतवत असतात. मी वर दिलेली अवतरणे १९६० च्या दशकांतील आहेत. आता गेल्या दहावर्षांत अमेरिकेत काय घडले आहे हे आपण बघू या.

१९७० च्या जून महिन्यात लॉस एन्जेलिस येथील एका कोर्टात एका खळबळ उडविणाऱ्या खटल्याची सुनावणी सुरू झाली. ३५ माणसांचे खून पाडलेल्या "मॅन्सॉन गँग" या लुम्पेन–प्रोलेतारियन टोळीवरील हा खटला होता. हा खटला नऊ महिने चालला. हे खून जे करण्यात आले ते चोरी करण्याच्या उद्देशाने केलेले नव्हते, सूडबुद्धीने केलेले नव्हते, भीतीपोटी किंवा गुन्ह्यांच्या खटल्यातील इतर रूढ कारणापोटी केलेले नव्हते; परंतु उघडकीस असे आले की हे खून जनतेला घाबरवण्याच्या उद्देशाने करण्यात आले. बहुतेक खुनांच्या बाबतीत आपण कुणाचे खून करतो आहोत हे खुनी लोकाना ठाऊक सुद्धा नव्हते. आणि स्वतःसाठी कसलाही दृश्य फायदा नसताना त्यांनी हे कृत्य केले. म्हणजे हे खुनासाठी खून होते.

त्यात हेही उघडकीस आले की खून झालेल्यांना त्यांचे प्राण गेल्यानंतर देखील सुऱ्यांनी भोसकण्यात आले होते. आरोपींपैकी सुसान ॲटकिन्स ही २१ वर्षे वयाची एक हिप्पी युवती होती. तिने तुरुंगात आपल्याबरोबर असलेल्या एका बाईला सांगितले की "आमच्या टोळीचा बेत खून केलेल्या लोकांचे डोळे ओरबाडून काढायचे आणि ते भितीवर भिरकावून द्यायचे आणि त्यांची बोटे कापून टाकायची, असा होता. ही केवळ सुरूवात आहे हे मला ठाऊक होतं." साक्षीदाराच्या म्हणण्यानुसार ॲटकिन्सने हे अशा थाटांत सांगितले की जण काय आठवड्यातल्या दर दिवशी करता येईल इतक्या अगदी स्वाभाविक गोष्टीविषयी आपण बोलत आहोत. हे जितके अधिक करावे तितके ते आपल्याला अधिक आवडते असेही तिने सांगितले.

ज्यांची कत्तल करायची होती अशा प्रख्यात व्यक्तींची नांवे देखील तिने या बाईला सांगितली. कोर्टाने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देतांना भयानक खुनांची वर्णने ती सांगत होती आणि हे सांगताना ती खुदूखुदू हसत होती. खटल्यानंतर

तिने पश्चातापाचे किंवा वाईट वाटल्याचे यत्किंचितही चिन्ह दर्शविले नाही. तुरुंगात आपल्याबरोबर असलेल्या आणखी एका कैदी बाईला तिने सांगितले की "शेवटी मी अशी मजल गाठलेली आहे की आता मी माझ्या आईवडिलांचे खून पाडू शकेन." टोळीतील इतर सदस्य देखील हिप्पीच होते आणि त्यांना खून केल्याबद्दल आणि खुनांचे बेत केल्याबद्दल शिक्षा झाल्या.

मुख्य आरोपी म्हणजे टोळीचा प्रमुख ३५ वर्षे वयाचा मॅन्सॉन याने फौजदारी गुन्ह्यांपायी आपले अर्धे आयुष्य तुरुंगवासात घालविलेले होते. त्याने "खुनी शिकवून तयार करायची शाळा" स्थापन केलेली होती; त्याने आपल्या साथीदार तरुणींना एकेक सुरा दिला आणि लोकांचे मुडदे कसे पाडायचे हे संपूर्ण तपशिलांनिशी त्यांना दाखवून दिले. खून केलेल्यांपैकी काहींची मुंडकी इतरांना धमकावण्यासाठी बांबूवर लटकावून ठेवायची होती. मॅन्सॉन शैलीनुसार केलेल्या प्रत्येक खुनागणीक हे टोळीवाले हसत असत असे एका साक्षीदाराने सांगितले.

हा राक्षसीपणा होता काय ? का ही मानसिक विकृती होती ? दोन्ही गोष्टी होत्या. परंतु पुन्हा हा पाशवीपणा राजकीय उद्दिष्टासाठी "परिपूर्ण" स्वरुप दिलेला होता. मॅन्सॉन टोळीवाल्यांची मनोवृत्ती हिटलरच्या एस्एस् दलातल्या लोकांच्या वृत्तीशी ठळकपणे जुळणारी होती. त्यांनी छळ छावण्यांत लोकाना असेच छळ छळून ठार केले. दोन्ही बाबतीत नैतिक तत्त्वांच्या बाबतीत जणू ती अस्तित्वांतच नाहीत अशी संपूर्ण तुच्छतावृत्ती होती. तोच जाणून बुजून केलेला अमानुषपणा होता. आणि तीच कट्टर समाजविरोधी प्रवृत्ती होती. मेंगेल हा नाझी डॉक्टर जिवंत मुले एकमेकांना शिलाई करून जोडत असे, त्याच्यांत आणि आता मॅन्सॉन व अॅटकिन्स यांच्यात तसा फरक जवळ जवळ काहीच नव्हता.

मॅन्सॉनच्या नमुन्याचे लुम्पेन-प्रोलेतारियन्स हे फॅसिझमचे फारच निकटवर्ती आहेत ही गोष्ट या खटल्याच्या चौकशीच्या ओघात सिद्ध झाली. खुद्द मॅन्सॉनला हिटलर विषयी नितान्त पूज्यबुद्धि होती. "प्रत्येक प्रश्नाला योग्य उत्तर ज्याच्याजवळ असते असा हा छान माणूस होता" असे तो हिटलरविषयी म्हणत असे. मॅन्सॉन हा कट्टर वर्णद्वेष्टा होता. आर्यन वंश हा इतर सगळ्या वंशांपेक्षा श्रेष्ठ आहे अशी त्याची श्रद्धा होती. आणि नीत्शेविषयी त्याला काहीतरी माहीत असावे असे दिसत होते. मॅन्सॉनच्या खटल्यांतील सरकारी वकील मागाहून म्हणाला की "मॅन्सॉन स्वतःला हिटलरपेक्षा कमी ऐतिहसिक महत्त्वाची व्यक्ती समजत नव्हता." खटल्यानंतर सरकारी वकीलाने आपले असे ठाम मत व्यक्त केले की मॅन्सॉन नशीबवान असता तर तो दुसरा हिटलर होऊ शकला असता.

मॅन्सॉनचा बेत आपल्या पाठिराख्यांना हिप्पींच्या मोटारसायकलच्या टोळ्यांमध्ये सामील करायचा होता असे आढळून आले. म्हणजे देशभर आणि जगभर भटकंती करायची, आणि लोकांना हवेतसे पकडून त्यांच्या कत्तली करायच्या आणि "जनतेला

इहलोकांतील जीवनातून मुक्त करायचे," असा हा बेत होता. त्यांचा उद्देश ? समाजावर दहशत बसविणे हाच. आजच्या फॅसिझमची नेमकी हीच एक प्रमुख पद्धती आहे आणि तणाव निर्माण करायची ही त्याची व्यूहरचना आहे. काही लोकांना पशू करायचे आणि इतरांचा नायनाट करायचा आणि संधि मिळाल्यावर कसेही करून आपले उद्दिष्ट साधायचे अशी या फॅसिझमच्या नेत्यांना आशा वाटते.

मॅन्सॉनच्या टोळीवरील खटला हे इतर अनेक उदाहरणांपैकी अवघे एक उदाहरण आहे. अमेरिकन हेरखात्याच्या म्हणण्यानुसार अमेरिकेतील बहुतेक सगळ्या सशस्त्र दरोड्यांमध्ये निरपराध लोकांना मारहाण करण्याचे, त्यांना गंभीर जखमा करण्याचे आणि त्यांचे खून देखील करण्याचे प्रकार घडतात. इतर लोकांच्या संपत्तीवर जगण्याची इच्छा यात निदर्शनाला येते इतकेच नव्हे, तर लुम्पेन प्रोलेतारियन्सच्या नमुनेदार पाशवीपणाचेही हे निदर्शक होते. आपण असे गृहीत धरायला हरकत नाही की जर एखाद्या दिवशी अमेरिकेतल्या गुंडांची ही अफाट दुनिया खटले व्हायच्या भीतीपोटी म्हणा किंवा भरपूर लाच देऊन म्हणा, गुंडांच्या मार्फत निर्धाराने फॅसिझमकडे वळली, तर " उदारमतवादी " अमेरिकेच्या पुढचात एक गंभीर धोका उभा राहील. लक्षावधी गुन्हेगार हे निःसंशयपणे एका मोठ्या फॅसिस्ट संघटनेचा गाभा होऊ शकतात. पैशाचे भरपूर साधन असलेला आणि हरहुन्नरी व भाषणबाजीचे गुण असलेला साहसी फ्यूहरेर आणि तो हिटलर, मॅन्सॉन व गुंडांचा बादशहा अल् कॅपोन यांचे मिश्रण असलेल्या स्वभावाचा असेल तर तो असली योजना अमलात आणू शकेल.

याच्या भरीला हे सांगायला हवे की लहान प्रमाणावर का होईना पण याच्याच सारखे काही तरी आजच्या घडीला इतर भांडवलदारी देशांमध्ये निदर्शनास येते. उदाहरणार्थ, १९७५ च्या सप्टेंबर महिन्यात इटलीमध्ये गुन्हेगार व नवफॅसिस्ट यांच्या दरम्यान निकटचे संपर्क असल्याचे उघडकीस आणण्यात आले. याच्या अगोदर पश्चिम जर्मनीत नॅशनल डेमोक्रॅटिक पक्ष (एन्डीपी) या नव-नाझी पक्षाने डायबुर्ग येथील स्थानिक सरकारच्या निवडणुकीला दोन कुप्रसिद्ध गुन्हेगार उमेदवार म्हणून उभे केले. एन्डीपीच्या एका ऑट्टे नामक नेत्याने ब्राउन्श्विग येथील बँकेवर दरोडा घालण्याचा प्रयत्न केला. जपानमधील विविध नव-फॅसिस्ट संघटनांच्या ३०,००० सदस्यांमध्ये अनेक लुम्पेन प्रोलेतारियन्स व धंदेवाईक गुन्हेगार आहेत. नव-फॅसिस्ट निदर्शनांमध्ये भाग घेणाऱ्यांना तासावारी पैसे देण्यांत येतात. दहशतवादी आकाओ याच्या नेतृत्वाखालील जपानी फॅसिस्ट पक्ष म्हणजे बहुतांश धंदेवाईक गुन्हेगारांचाच बनलेला आहे. १९७६ च्या ऑगस्ट महिन्यात पोर्तुगीज पोलिसांनी एक दहशतवादी फॅसिस्ट संघटना उघडकीस आणली. ती मध्ये व्यापारी व कंपन्यांचे माजी मालक यांचा समावेश गुंडांच्या बरोबरीने होता. लुम्पेन प्रोले-

तारियतवर भिस्त हे आन्तरराष्ट्रीय नव-फॅसिझमचे एकंदरीने वैशिष्ट्यच झाले आहे आणि त्याची मदार दहशतवादावर आहे.

हीच गोष्ट आजच्या डाव्या अतिरेक्यांना लागू पडते. इटलीमध्ये लुम्पेन प्रोलेतारियन्स हे अतिडाव्या संघटनांमध्ये सामील व्हायला उत्सुक असतात. त्यात त्यांना चरितार्थाला मिळवायची, आसरा, शस्त्रे आणि पोलिसांपासून संरक्षण मिळवायची आशा असते. काही अति-डावे "तत्व विशारद" आपल्यापरीने असा उघडपणे दावा करतात की क्रान्तिकारक शक्ती या नात्याने कामगारवर्गाची जागा लुम्पेन-प्रोलेतारियतला आणि त्यांच्या निकटवर्तीयांना द्यायला हवी.

याची सूचक गोष्ट म्हणजे उदाहरणार्थ ही आहे, की एका काळी दक्षिण इटलीत प्रभावी असणारे सशस्त्र कामगारवर्गीय केंद्र (एनएपी) हा अतिडावा दहशतवादी गट लुम्पेन प्रोलेतारियन्सनीच स्थापन केलेला होता. (दक्षिण इटलीत गुंडांच्या टोळ्यांचे प्राबल्य विशेष करून आहे). या गटाचे संस्थापक हे गुन्हेगार होते आणि यांनी १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात जवळजवळ सगळ्या इटलीभरच्या तुरुंगांमध्ये दंगे संघटीत केले आणि सगळे तुरुंगच संपूर्णपणे रद्द करावेत अशी मागणी करण्यापर्यंत यांनी मजल गाठली. मागाहून या एनएपीने "समाजाने बहिष्कृत केलेल्या" घटकांतून आपल्या सदस्यांची रिक्रूट भरती चालू ठेवली. इकडे अति डावे राजकारणी लुम्पेन-प्रोलेतारियन्सवर पसंतीचा शिक्का मारतात तर लुम्पेन प्रोलेतारियन्सचा असा आग्रह चालू असतो की अति डाव्यांनी रक्तपाती कृत्ये करावीत असा हा सगळा मामला आहे.

अशा प्रकारे नव-फॅसिस्ट आणि अतिडावे दहशतवादी हे दोघेही लुम्पेन-प्रोलेतारियन्सवर मदार ठेवायला मागत आहेत. मागाहून आपण असे पाहणार आहोत की माओवादी अशाच प्रकारच्या योजना अमलात आणू पाहात आहेत. लुम्पेन–प्रोलेतारियत हा समाज पूर्वीप्रमाणे आताही स्वतंत्र भूमिका बजावत नाही. याच्या अंगी गंभीर राजकीय कृती अंगिकारायचा वकूब नाही. याचे मार्गदर्शन उजवे करीत असोत किंवा डावे करीत असोत, वस्तुनिष्ठदृष्ट्या हा सदैव प्रतिगामी शक्तींचीच सेवाचाकरी बचावत असतो.

लुम्पेन प्रोलेतारियन्स हे क्रान्तिकारक होऊ शकत नाहीत. कामगारवर्ग हाच शेतकरी वर्गाशी आणि श्रमिक बुद्धिजीवी वर्गाशी दोस्ती करून भांडवलदारी जगाच्या विरोधांत मुख्य सामाजिक शक्ती होऊन राहिलेला असतो. मागच्या काळातल्या प्रमाणेच कामगारवर्ग आणि लुम्पेन प्रोलेतारियत यांना कसलीही समाइक उद्दिष्टे नसतात. समाजसत्तावादी समाजामध्ये लुम्पेन प्रोलेतारियत हा समाज अपरिहार्यपणे क्रमाक्रमाने विलयालाच जातो. केवळ समाजसत्तावादी समाजातच त्याच्या सामाजिक समस्यांची सोडवणूक होऊ शकते.

तथापि भांडवलदारी समाजामध्ये लुम्पेनप्रोलेतारियतने अजून आपल्या जीवन मार्गाची अखेर गाठलेली नसते. जे आपल्या दृष्ट उद्दिष्टांसाठी त्याला राबवू पाहात आहेत ते त्याला आणखी अधिकच अत्याचारी व राक्षसी बनविण्यासाठी आणि त्या अति भयानक दहशतवादी साहसे करायला लावण्यासाठी वाटेल ती मजल गाठायला कमी करणार नाही. परंतु काहीही घडणार असले तरी इतिहासात लुम्पेन-प्रोलेतारीयतच्या वाटणीला आलेले आयुर्मान अमर्याद नसते.

प्रकरण चवथे

रेड ब्रिगेडना काय हवे आहे ?

१

युवकांचा आणि विद्यार्थ्यांचा बंडखोर विभाग आणि सतत वाढत असलेला लुम्पेन प्रोलेतारियतचा समाज हे दोन थर असे आहेत की यातून दहशतवादी आपल्या पाठिराख्यांची रिक्रूटभरती करतात आणि यांना ते आपला स्वाभाविक सामाजिक दोस्त मानतात. दहशतवादी संघटना या कशा काय असतात ?

राजकीयदृष्टचा अति–उजवे आणि डावे अतिरेकी अशा दोन परस्परविरोधी गोटांमध्ये त्यांची विभागणी झालेली दिसते, मात्र एकापासून दुसऱ्याचा वेगळेपणा कशात आहे हे दाखवून देणे नेहमीच सोपे नसते; अनेक बाबतीत त्यांच्या पद्धती आणि उद्दिष्टे देखील सारखीच असतात.

आजच्या घडीला ज्यामध्ये अतिजहाल संघटना क्रियाशील नाहीत असा एकही भांडवलदारी देश नाही असे म्हटले तरी चालेल. प्रमुख भांडवलदारी राज्यांमध्ये दहशतवादी गट जवळजवळ अपरिहार्यपणे या संघटनांतून उदयास येतात आणि विविध शहरांमध्ये शाखा स्थापन करतात. काही शेकडे क्रियाशील सदस्यांहून अधिक सदस्य या शाखांमध्ये क्वचितच असतात, काही बाबतीत तर हे केवळ काही डझनच असतात, मात्र त्यांचे अनेक गुप्त सहकारी भांडवलदारांचा राबता असलेल्यांसकट विविध सामाजिक वर्तुळातून नेहमीच असतात. अनेक दहशतवादी गटांमध्ये पोलिसांचे **गुप्त हस्तक** असतात.

गेल्या दशकामध्ये असले गट इटली, पश्चिम जर्मनी (रेड आर्मी गट किंवा बाडेर-माईन हॉफ गट), स्पेन (ग्रापा गट,) फ्रान्स (डायरेक्टर ॲक्शन गट), अमेरिका, जपान (रेन्गो सेलिगुन), आणि आशिया व लॅटिन अमेरिका खंडातील कित्येक देश यामध्ये कामगिरी करून राहिलेले आहेत.

इटलीमध्ये खास स्थानिक परिस्थितीमुळे अतिडावे दहशतवादी जवळजवळ सरळच पुढे सरसावले. त्यांच्यापैकी बहुसंख्य तथाकथित रेड ब्रिगेड्सवाले (आर्‌बी वाले) आहेत. यांनीच १९७८ साली माजी पंतप्रधान आल्दो मोरो यांचा खून केला

आणि राष्ट्रव्यापी खळबळ उडवून राहिलेल्या इतरही कित्येक कृत्यांना तेच जबाबदार आहेत. १९८१ च्या एप्रिल महिन्यांत त्यांनी ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षातील एक प्रमुख व्यक्ती सी. सिरिल्लो याला पळवून नेले. मोरो यांच्या धोरणाचा हा सिरिल्लो एक पुरस्कर्ता होता. रेड ब्रिग्रेड्सच्या जोडीला फ्रंट लाइन, वर्कर ऑटॉनॉमी, आर्मड् प्रोलेतारियन न्यूक्लिआय (एन्एपी), रेव्होल्यूशनरी ॲक्शन, आणि कॉम्बटंट कम्युनिस्ट युनिट्स, हे गट इटलीत क्रियाशील आहेत. (**ले नुवेल ऑब्झर्वेतूर**, तारीख १२–१८ जानेवारी १९८१, पृष्ठ ३१).

यांची जडजंबाल क्रान्तिकारक नावे असली तरी देखील या संघटनांपैकी एकीचाही कम्युनिस्ट व कामगार चळवळीशी कसलाही समानधर्म नाही. वस्तुतः या चळवळीला त्या हिरीरीने विरोधच करतात. त्यांच्यापैकी काही संघटना, त्यांतल्या त्यात अधिक छोटे गट, त्यांची स्थापना झाल्यानंतर लवकरच, धरपकडीपायी व अन्तर्गत भांडणांपायी विलयाला जातात.

१९६८ साली इटलीला थरारून सोडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दंगलींच्या ओघात रेड ब्रिगेड्स उदयास आल्या आणि १९७० साली त्यांनी निश्चित आकार धारण केला. या वर्षी त्यांनी आपल्या कामगिऱ्यांमध्ये पहिल्याप्रथम बाँबगोळ्यांचा वापर केला. १९७२ साली त्यांनी प्रख्यात राजकारणी लोक, सरकारी अधिकारी आणि कधीकधी ट्रेड युनियन नेते देखील पळवून नेण्याचा व ठार मारण्याचा जवळजवळ सातत्याने उपक्रम आरंभला. आपल्या स्वतःच्या वर्तुळांमध्ये ते असल्या कृत्यांचे वर्णन "शहरी गनिमी युद्ध" असे करतात.

त्यांच्या क्रियाशील सदस्यांमध्ये बरचसे बेफाम विद्यार्थी, आणि तितकेच गोंधळलेले बुद्धिजीवी लोक, तसेच लुम्पेन-प्रोलेतारियन्स, यांचा समावेश असतो.

इटालियन पोलिसांच्या म्हणण्यानुसार १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात रेड् ब्रिगेड्सचे सदस्य एक हजारापेक्षा अधिक नव्हते. या संघटनेचे नियम कमालीचे कडक आहेत– १८६९ साली नेचायेवने रशियात स्थापन केलेल्या पीपल्स रेप्रिझल दहशतवादी गटाच्या पेक्षाही अधिक कडक आहेत. नव्या सदस्याने आपली निष्ठा "कृतींत" सिद्ध करीपर्यंत कित्येक वर्षे इतर फारच थोडे सभासद त्याला ठाऊक असतात. ब्रिगेड्सची विभागणी बहुतांशी शहरांमध्ये– म्हणजे रोम, मिलान, टयूरिन, जिओआ आणि बोलोग्ना या शहरांमध्ये कार्यरत असलेल्या "दलांमध्ये" केलेली असते. ती सगळी दले एका "कार्यकारी समितीच्या" अंकित असत.

परंतु या ब्रिगेड्सचे "सर्वसत्ताधीश राजकीय केंद्र" कडक बंदोबस्त असलेल्या तुरुंगांमध्ये लपलेले असते आणि या तुरुंगांमध्ये रेडब्रिड्सचे खूपसे क्रियाशील सदस्य असतात हे गुप्त रहस्य मुळीच राहिलेले नाही. इटालियन कम्युनिस्ट पक्षाचे तत्त्वविचारात्मक मुखपत्र "रिनासिता" लिहिते की रेड ब्रिगेड्सचे सदस्य तुरुंगाच्या बाहेर पडण्याऐवजी तुरुंगात शिरायला मागत असतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे

म्हणजे वैचारिक कारणांसाठी अतिडाव्या दहशतवाद्यांना तुरुंगांचे रुपांतर "लाल तळांमध्ये" करायला हवे असते, किंवा, अधिक रेखीवपणे सांगायचे झाल्यास, त्यांना तुरुंगांचे रुपांतर सरकारविरोधी केंद्रांमध्ये, म्हणजेच बेकायदेशीर सरकारच्या एक प्रकारच्या केन्द्रामध्ये करायला हवे असते आणि हे बेकायदेशीर सरकार सरकारी संस्थांचा व समाजाचा कारभार पाहणार असते. यासंबंधात एका गोष्टीची नोंद द्यायला हवी की या लोकांच्या कृत्यांच्या मुळाशी असलेली तर्कपद्धती ही गुन्हेगार टोळ्यांच्या प्रमुख पुढाऱ्यांनी अनुसरलेल्या तर्कपद्धतीहून मुळीच वेगळी नसते." (**रिनासिता**, अंक ४ था, तारीख २३ जानेवारी १९८१, पृष्ठ ६).

तुरुंग म्हणजे समाजाचा कारभार चालविणाऱ्या क्रान्तिकारक सरकारचे केन्द्र ! बहुधा रेड ब्रिगेड्सची रहस्यमय "कार्यकारी समिती" आपल्या बैठकी देखील तुरुंगातच भरवते ना ? असला विचार दस्तयेव्स्कीला देखील "सैतान" या त्याच्या कादंबरीत कधीच सुचला नव्हता.

असे सगळे असताना देखील रेड्ब्रिगेड्सकडून घडलेल्या एकाही प्रमुख दहशतवादी कृत्याचा प्रतिबंध पोलिसांना कित्येक वर्षात करता आलेला नाही. याचे कारण म्हणजे कसलाही विधिनिषेध नसलेले पिसाट लोक या ब्रिगेड्समध्ये आहेत इतकेच नव्हे, तर ब्रिगेड्सच्या नेत्यांचे पोलिसांशी व हेरखात्याशी कसल्यातरी प्रकारचे लागेबांधे असले पाहिजेत हे असल्याचे दिसते.

दुसरी प्रमुख दहशतवादी संघटना म्हणजे फ्रंट लाइन. ही १९७७ च्या उन्हाळ्यात दक्षिण इटलीत उदयास आली, आणि नंतर ती उत्तरेकडेही पसरली. दक्षिण इटलीत दारिद्र्याचे थैमान विशेषकरून मोकाट सुटलेले आहे. पहिल्या पहिल्यांदा या संघटनेने कारखान्यांतल्या व दुकानातल्या सामुग्रीची मोडतोड करणे आणि पोलिसांच्या बराकीत बाँब ठेवणे पसंत केले, परंतु मागाहून तिने खून करण्याकडे लक्ष दिले.

वर्कर ऑटॉनॉमी (आर्बी) आणि या संघटनेशी संलग्न असलेला गट "पी ३८" (एका पिस्तुलाचे नाव) यांची वाकबगारी म्हणजे विद्यार्थ्यांना पोलिसांशी झटापटी करायला चिथावणे ही आहे. ते कम्युनिस्टांचा छळही करतात. ते कम्युनिस्टांना "कामगारवर्गाचे शत्रू" म्हणतात. या गटांचे सदस्य चांगले शस्त्रसज्ज असल्यामुळे लोकशाहीवादी शक्तींच्या शांततापूर्ण निदर्शनांच्या वेळी रक्तपाती झटापटींना चिथावणी देतात. पादुआ विद्यापीठाचा प्रख्यात प्रोफेसर आन्तोनियो नेग्री हा वर्कर ऑटॉनॉमी संघटनेचा सदस्य असल्याबद्दल तुरुंगात आहे.

या संघटनांचे व टोळ्यांचे उद्देश तरी काय काय आहेत ? १९८० च्या ऑक्टोबर महिन्यांत फ्रेंच वृत्तपत्र **ले नूवेल ऑब्झर्वातूर** याचा प्रतिनिधी प्येर ब्लान्चेत याने एका पहाडी खेड्यांत मार्सेल्लो व आलेस्सान्द्रो यांची भेट घेतली. इटलीहून

हे दोघे निर्वासित म्हणून या खेड्यात आलेले होते आणि फ्रंट लाइन या अतिडाव्या दहशतवादी गटाचे सदस्य या नात्याने काय काय केले याचा यांना म्हणे पश्चात्ताप झालेला होता. यांच्यातला एकजण कामगार कुटुंबातला होता आणि दुसरा एका खूपच श्रीमंत कुटुंबांतला होता. दोघेही २९ वर्षांचे होते, तर इटलीतील यांचे दहशतवादी साथीदार २०–२१ वर्षे वयाचे होते.

त्यांची मुलाखत घेण्यांतला या फ्रेंच पत्रकाराचा उद्देश म्हणजे एखादी व्यक्ती दहशतवादी कशी होते, उदात्त विचारांनी भारावलेल्या तरुण लोकांना या काळ्या-कुट्ट व नैराश्यमय मार्गाने जाणे कशामुळे भाग पडते, रक्तपात हाच ज्याचा एकमेव कायदा असतो अशा एखाद्या गटात दाखल व्हायची प्रेरणा त्यांना कशामुळे मिळते, -- हे शोधून काढणे हा होता.

या मुलाखतीतला हा उतारा.

प्रतिनिधी : तुम्ही कित्येक महिन्यांपूर्वी इटली सोडून आलांत. आता तुमचे कसे काय चालले आहे ?

मार्सेल्लो : दहशतवादाची राक्षसी वाढ नष्ट करायची आम्ही खटपट करतो आहोत. जिथे रक्तपात आणि सूड यांचे संपूर्ण आणि निष्कंटक अधिराज्य आहे, अशी " लांबलचक सुऱ्यांची प्रदीर्घ रात्र " संपवायची आम्ही खटपट करतो आहोत.

प्रतिनिधी : म्हणजे ?

मार्सेल्लो : रेड ब्रिगेड्सचा उद्देश आणि व्यूहरचना म्हणजे सरकारच्या थेट हृदयावरच, त्याच्या मुख्य प्रेरक शक्तींवरच आघात करणे ही आहे. नेमकी हीच गोष्ट मोरो प्रकरण दाखवून देते (? !–अ. हे.)

आलेस्सान्द्रो : मोरो प्रकरणापूर्वी खून करण्याच्या उद्देशाने हल्ला करणे फारच क्वचित घडत असते. त्यानंतर खून ही गोष्ट फ्रंट लाइनच्या बाबतीत देखील सवयीची होऊन बसली.

प्रतिनिधी : आणि हिंसाचाराच्या या अलग अलग कृत्यांबद्दल तुम्ही नाराज होता ना ? तुम्हाला लष्करी धर्तीची संघटना उभारायला हवी होती. म्हणजे फ्रंट लाइन .....कशासाठी ?

आलेस्सान्द्रो : इतिहासाच्या ओघाला वेग आणण्यासाठी; उच्चतर वेग यावा म्हणून.

प्रतिनिधी : इतिहासाच्या ओघाला वेग आणायला तुम्हाला हवे होते, आणि एका छान दिवशी तुम्ही हातात बंदूक धरल्याचे तुम्हाला आढळून आले.....

मार्सेल्लो : १९७७–७८ साली खुनांचे कित्येक हजार छोटे मोठे प्रयत्न झाले... मला वाटते इटलींत १०,००० (?–अ. हे.) तरी दहशतवादी असतील असे म्हणणे सुरक्षितपणाचे ठरते . ...

आलेस्सान्द्रो : ...अशी एक वेळ येते की त्याप्रसंगी सगळा समाजच प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दहशतवादाने ओतप्रोत भरलेला असतो.

प्रतिनिधी : दहशतवादाच्या धाग्यादोऱ्यांचा शिरकाव सरकारच्या सर्वोच्च अधिकारी मंडळीत झालेला आहे असे म्हणतात.....

आलेस्सान्द्रो : इटलीतील अति–डाव्या घटकांचा बराच मोठा भाग बड्या भांडवलदारांतून आलेला असतो हे तुम्ही विसरू नका.

मार्सेल्लो : भांडवलदारांचे वंशज ज्यांच्यांतून आलेले असतात त्यांच्याशी त्यांचे लगेबांधे अपरिहार्यपणे राखलेले असतात.....ज्या अर्थी दहशतवादीच १०,००० आहेत, त्या अर्थी त्यांच्याशी संपर्क असणारे व त्यांना माहिती देणारे, त्यांना मदत करणारे व त्यांना आश्रय देणारे बऱ्याच मोठ्या संख्याबळानिशी असलेच पाहिजेत. प्रत्येक प्रमुख इटलियन शहरामध्ये हजारो लोक असे आहेत की जे या अगर त्या मार्गाने सशस्त्र गटांना मदत करीत आहेत. आणि हे केवळ समाजाच्या तळागाळातलेच नाहीत.

प्रतिनिधी : उदाहरणार्थ, कोण कोण ?

मार्सेल्लो : व्यापारी, न्यायाधीश, वृत्तपत्रकार्यालयातले वरिष्ठ अधिकारी, संस्थांचे व कोर्टाचे कार्यवाह, राज्यकारभार चालविणारे अधिकारी.

प्रतिनिधी : दहशतवाद्यांनी पद्धतीशीर खून करायचा मार्ग अंगिकारला त्यावेळी या सगळ्या लोकांच्या मनांत गंभीर शंका उद्भवल्या होत्या.

मार्सेल्लो : (फ्रंटलाईनच्या मते खून हा अपवादात्मक इलाज असावा असे ठासून सांगितल्यानंतर – अ. हे.) : रेडब्रिगेड्सनी राज्ययंत्र उध्वस्त करायचे डावपेच अंगिकारल्यानंतर त्यांच्या लेखी मरण हे अधिक सरावातले प्रकार होऊन बसले.

प्रतिनिधी : तुम्हाला हिंसाचार आवडतो का ?

आलेस्सान्द्रो : आम्ही तर त्यांत आकंठ बुडून राहिलो आहोत...

प्रतिनिधी : परंतु लोकांवर गोळ्या झाडणे हा कामगारवर्गीय लढ्याचा प्रकार मुळी होऊच शकत नाही. कामगार पिस्तुले घेऊन वावरत नसतात.

मार्सेल्लो : आम्ही स्वतःला कामगारांच्या अल्पसंख्य गटावर आधारून घेतो या वस्तुस्थितीवरच आमचा संबंध इतिहास उभारलेला आहे.

प्रतिनिधी : आल्दो मोरो याचा खून झाल्याचे तुम्ही ऐकलेत त्यावेळी तुमच्या भावना कशा काय होत्या ?

आलेस्सान्द्रो : (जनते पासून– अ. हे.) अलग पडल्याची सखोल भावना आम्हाला जाणवली. विस्मय वाटला. आम्ही हादरलो, बधिर झालो. नेमक्या त्याच-दिवशी रेड ब्रिगेड्सचा कमकुवतपणा आमच्या ध्यानांत आला. दहशतवादी हिंसाचाराचा सपशेल फोलपणा त्यावरून दिसला.

मार्सेल्लो : एका अर्थाने भूमिगत जीवन ही एक जीवनपद्धती होऊन बसते

आणि तिचे समर्थन सशस्त्र लढ्यात सांपडते. इतरांच्या जिवाचे आपल्याला हवे ते करता येते हा विचार आपल्याला अभूतपूर्व सामर्थ्याची जाणीव करून देतो. आणि ज्याला अन्य कोणत्याही ठिकाणापेक्षा दहशतवादाच्या वातावरणात अधिक बरे वाटते त्याला दहशतवाद्याचे जीवन सोडून द्यावेसे वाटणार नाही. दहशतवादी हे आदर्शीकृत लष्करी पंथांत वावरणारे स्त्री पुरुष असतात, ते प्रतिष्ठितांच्या पंथाच्या वातावरणात वावरत असतात. आणि क्रमाक्रमाने ते अधिकाधिक निर्घृण होत जातात...भूमिगत कार्य हे निर्मितिक्षम कामगिरी करणे अशक्य करून ठेवते; नियमित जीवनाशी ते विसंगत असते. आणि हल्ला करणे, दरोडे घालणे, " पायांवर गोळ्या झाडणे " यांच्या योगाने व्यक्तीला आपल्या असंतोषाची भरपाई करणे भाग पडते. असली ही अपरिहार्य तर्कसंगती असते.

प्रतिनिधी : अत्यंत क्रूर कर्मे करण्यांत प्रावीण्य मिळविलेले असे लोक संघटनेमध्ये होते का ?

आलेस्सान्द्रो : प्रथम प्रथम नव्हते. नंतर नंतर होते...एक प्रकारची जातच उदयास आली. प्रत्येक नगरात " रायफलवाल्यांचे " गट होते. प्रथम प्रथम त्यांची रचना हंगामी स्वरूपाची असे; मागाहून ती कायम स्वरूपाची झाली... रेड ब्रिगेड्समध्ये ट्रेड युनियनवाले, बुद्धिजीवी लोक किंवा माजी कम्युनिस्ट यांची भरती झाली. ओघाओघाने सांगायचे म्हणजे एकाकाळी कम्युनिस्ट पक्षात दाखल होणे हे रेडब्रिगेड्सच्या सदस्यांचे कर्तव्यच होते.

प्रतिनिधी : आपण शस्त्रांविषयी बोलत होतो. शस्त्रे विकत घ्यायला तुम्हाला पैसे कुठून मिळत असत हे तुम्ही आम्हाला सांगू शकता काय ?

आलेस्सान्द्रो : दरोड्यांच्या द्वारा.

प्रतिनिधी : तुमच्या संघटनेने अनेक दरोडे घातले काय ?

आलेस्सान्द्रो : बहुधा राजकीय कृती पेक्षा दरोडेच जास्त घातले.

प्रतिनिधी : कुणी ठार झाले काय ?

मार्सेल्लो : ठार झाले तर. दरोडे घालायच्या कामगिऱ्या करतांनाच आमच्या कॉमरेडस्पैकी अनेकजण मेले.

प्रतिनिधी : रेड ब्रिगेड्सनी दरोडे घातले व माणसे पळवली याबाबतच्या बातम्यांमध्ये दहशतवाद्यांचे लागेबांधे गुंडांच्या अड्ड्यांशी असल्या संबंधीची बरीचशी माहिती येत असे. तुमच्या संघटनांचे लागेबांधे गुन्हेगारांशी नसते तर त्या चिरडून टाकायला आपल्याला खूपच अधिक जड गेले असते असे जनरल दल्ला चिएसा याने स्वतःच कबूल केले आहे.

आलेस्सान्द्रो : आमचे लागेबांधे होते, परंतु ते केवळ किरकोळ गुन्हेगारांशी, भुरट्या चोरांशी व स्मगलर लोकांशी होते. त्यांची एक दहशतवादी संघटना

देखील होती, ती म्हणजे आर्मड प्रोलेतारियन न्यूक्लिआय. ही तुरुंगांतल्या गुन्हेगारांतून उदयास आली. परंतु आमचे गुंडांच्या अड्ड्यांशी लागेबांधे नव्हते.

प्रतिनिधी : रेड् ब्रिग्रेड्सचे देखील असे लागेबांधे नव्हते का ?

मार्सेल्लो : तुरुंगांमध्ये रेड ब्रिग्रेड्स आणि गुंडांचे अड्डे यांच्या दरम्यान एक अनाक्रमणाचा करार असतो, परंतु त्याहून अधिक काहीएक नसते.

प्रतिनिधी : रेड ब्रिग्रेड्सनी खंडणीचा पैसा मिळविण्यासाठी लोकांना पळविले. त्यांची दोस्ती गुन्हेगारी वर्तुळांशी असलीच पाहिजे, असे नव्हते काय ?

आलेस्सान्द्रो : गुन्हेगार जगाच्या "सगळ्यात वरच्या थराशी" दोस्ती नव्हती.

प्रतिनिधी : तुम्ही स्मगलर लोकांविषयी बोललांत... मला वाटते नेपल्स शहरी गुंडांचे अड्डे स्मगलर्सवर लक्ष ठेवतात आणि किरकोळ गुन्हेगारांवर त्यांचे नियंत्रण असते.


मार्सेल्लो : तसे असण्याचा संभव आहे...इटलीतील दहशतवाद ही एक सामाजिक घटना आहे, त्याची पाळेमुळे राजकीय व सामाजिक क्षेत्रात रुजलेली आहेत. ही गोष्ट कबूल करायची इटालियन कम्युनिस्ट पक्षाला इच्छा नाही. दहशतवाद हा गुन्हा असतो आणि सगळे दहशतवादी गुन्हेगार असतात असेच इटालियन कम्युनिस्ट पक्ष सदैव मानत आला आहे. आणि हे सगळे असे आहे.

प्रतिनिधी : या गुत्त्यातून बाहेर पडणे बहुधा फारच कठीण आहे.

मार्सेल्लो : धरपकडी व दगाबाजीचे प्रकार होऊन देखील इटलीतील दहशतवाद नष्ट होणार नाही. उलटपक्षी धोका असा आहे की तो आणखी अधिक निर्घृण होईल.....लोक हिंसाचाराला सरावू लागले आहेत.....आम्ही शारीरिक, खुनी हिंसाचाराचा टप्पा गाठला आहे, शस्त्रबळाचा पंथ अंगिकारला आहे.

प्रतिनिधी : परंतु तुम्हाला संपूर्ण निर्वेधपणाची मागणी करता येते काय ?

मार्सेल्लो : आम्हाला एवढेच हवे आहे की इटालियन सरकारने दहशतवादाला सामाजिक घटना म्हणून मान्यता द्यावी.



२

डाव्या अतिरेक्यांचे असले कबुलीजवाब वाचल्यावर आपले लक्ष कशाकडे वेधून राहते ? सगळ्यांत जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे कसलेही गंभीर समाजसत्तावादी विचार करण्याचा संपूर्ण अभाव हा विचार सपशेल शून्य आहे.

" सरकारच्या थेट हृदयावर, त्याच्या प्रमुख प्रेरक शक्तीवर हल्ला " करण्याऐवजी, या लोकांची संघटना म्हणजे धंदेवाईक दरोडेखोरांची व मारेकऱ्यांची एक जमात झालेली आहे, " गोंधळलेल्या " माणसांचे एक बंदिस्त वर्तुळ झालेले आहे असे आपल्याला दिसून येते. ही जमात अशी आहे की हिचे नेते वाढत्या प्रमाणात अरेराव आणि निर्घृण होतात, बहुजनसमाजापासून संपूर्ण अलग राहून कार्य करतात, आणि आपल्या कॉमरेड्सवर " अमर्याद सत्ता गाजवायच्या जाणिवेने " झपाटलेले असतात.

प्रत्यक्षात क्रान्तिकारक राजकीय चळवळीत भाग घेण्याऐवजी डावे अतिरेकी हिंसाचाराच्या दुष्ट कृत्यांचे थैमान घालतात, आणि जनतेत घबराट निर्माण करतात. त्यांचा पूर्वपक्ष म्हणजे अतिरेकी कृती जेवढ्या अधिक रक्तरंजित होतील तेवढा समाजसत्तावाद अधिक नजीक येतो.

फॅसिस्ट धार्जिण्या शक्तीचा मुकाबला करण्याऐवजी ते वस्तुतः सातासमुद्रापलीकडील पाठिंब्यानिशी पश्चिम युरोपमध्ये लष्करी हुकुमशाह्यांची साखळी प्रस्थापित करायचे उद्दिष्ट असलेल्या व्यूहरचनेचा पुरस्कार करतात. " क्रान्तीच्या ओघाला वेग आणण्या" ऐवजी ते प्रतिक्रान्तीचा पुरस्कार करतात. डाव्या अतिरेक्यांचा बराच मोठा भाग खूप श्रीमंत वर्गातून आलेला असतो हा काही केवळ योगायोग नव्हे.

त्याचप्रमाणे ते कामगारवर्गीय चळवळीविषयीच्या द्वेषाने आंधळे झालेले असतात आणि खून व लुटालूट यांच्या योगाने " इतिहासाला वेग आणायला " कामगारवर्ग नकार देतो म्हणून ते त्याचा मनापासून द्वेष करतात.

जर्मन डेमोक्रॅटिक प्रजासत्ताकात (पूर्व जर्मनीत) प्रकाशित होत असलेले **होरिझोन्ट** या वृत्तपत्रात नॉर्वेट मॅडलॉच लिहितो :

" फ्रान्स आणि इटलीमधील ऑटॉनॉमिस्टांचे (म्हणजे पादुआ विद्यापीठाचे प्रोफेसर आन्तोरियो नेग्री हे प्रमुख तत्त्वविशारद असलेल्या वर्कर्स ऑटॉनॉमी या अति डाव्या गटाचे सदस्य अ. हे.) वैशिष्ट्य हे आहे की ते कामगार वर्गाला

अनुलक्षून प्रतिष्ठित प्रवृत्तीचा प्रचार करतात. भांडवलदारी देशांतला कामगारवर्ग हा भांडवलदारी समाजव्यवस्थेत संपूर्णपणे एकात्म झालेला असा निष्क्रिय समूह मानतात. या समूहाकडून कशाचीही अपेक्षा करता येत नाही आणि याची आपण केवळ कीवच करू शकतो अशी यांची धारणा असते."

" इटालियन ऑटॉनॉमिस्टांनी आपल्या एका निवेदनात " आतापर्यंत अस्तित्वात असलेल्या कामगारवर्गीय चळवळीच्या संघटना व त्यांचे लढ्याचे प्रकार यांच्या पासून स्वायत्त होण्याच्या " बाबतीत धोरणाचे पुढील मूलभूत मुद्दे मांडले आहेत : पहिला मुद्दा म्हणजे राज्यसंस्थेकडून होणाऱ्या दडपशाहीचा प्रतिकार आम्ही सशस्त्र गनिमी युद्धाने करू; दुसरा मुद्दा म्हणजे आम्ही ट्रेड युनियनवाल्यांना समेटाच्या धोरणाचे पुरस्कर्ते मानतो आणि लाचखाऊ प्राणी मानतो; तिसरा मुद्दा म्हणजे आमच्या मते कामगार हे खास हक्कदार असतात, कारण त्यांना चांगले पगार असतात आणि चांगला दर्जा असतो. असल्या लोकांशी समानधर्मी असे आमच्याकडे काहीच नसते.

" मुख्यत्वेकरून कम्युनिस्ट पक्षाच्या विरूध्द रोख असलेल्या आपल्या कामागार-वर्गविरोधी धोरणाला बनावट तत्वविचारात्मक पाठिंबा उपलब्ध करून देऊन हे ऑटॉनॉमिस्ट असे जाहीर करतात की सामाजिक प्रगतीचे मुख्य शत्रू है मक्तेदार व बडे भांडवलदार नसून कामगारवर्ग हाच या प्रगतीचा मुख्य शत्रू आहे...त्यांचा दावा असा असतो की भांडवलदारी समाजव्यवस्था उलथून पाडण्यासाठी मुख्य लढ्याचा रोख पारंपरिक कामगारवर्गीय संघटनांच्या विरूध्द आणि कामगारांची राहणीमाने सुधारण्याच्या त्यांच्या धोरणाविरुध्द वळविला पाहिजे. परिश्रम आणि काम करण्याची शक्यता या गोष्टी रद्द करायला हव्यात. कामगारवर्गाविषयींच्या असल्या वृत्तीपासून सुरूवात केल्यावर ते आजच्या काळातील प्रमुख क्रान्तिकारक शक्ती म्हणजे कामगारवर्ग हा आहे असे मानत नसतात, तर, सगळ्यात जास्त महत्वाची गोष्ट म्हणजे, लुम्पेन प्रोलेतारियत आणि त्याचबरोबर कामाची टाळा-टाळ करणारे व आइतखाऊसारखे जगणारे भांडवलदारांच्या कुळातले लोक हे अशी शक्ती आहेत असे मानतात " **हॉरीझोन्ट**, अंक २८ वा, १९८० पृष्ठ ८).

जुन्या काळातले अराज्यवादी जसे सुस्पष्ट कार्यक्रमाची आखणी करण्यात यशस्वी झाले, तसे आजचे अतिडावे एकही सुस्पष्ट कार्यक्रम आखण्यात यशस्वी झालेले नाहीत आणि कधीकाळी यशस्वी होतील असा संभवही नाही. परंतु कामगारवर्गीय चळवळीविषयींच्या त्यांच्या वृत्तीचे वर्णन वर बिनचूकपणे केलेले आहे. माल्डॉपने एक अति-डावा आर-हेन्झ याचे म्हणणे उद्धृत केले आहे ते असे : "वाढत्या प्रमाणात रचनात्मक बेकारी निर्माण करून भांडवलशाही अशी परिस्थितो घडवून आणते की सगळे तरुण कामगार हे भांडवलदार होत नसतात, तरी परंतु निषेधकांचे संभाव्य सामर्थ्य वाढते..." **(स्तूदियेन फॉन झेइट्फ्रागेन-लिंक्स**, फ्रँटफूर्ट (एम्.), मार्च १९७९, अंक

१ ला, पृष्ठ ६६). दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे आशेची मदार जी ठेवण्यात येत आहे ती पुन्हा कामगारवर्गावर ठेवण्यात येत नसून ती लुम्पेन प्रोलेतारियतवर आणि गुंडांच्या अड्ड्यावर ठेवण्यात येत आहे.

या दुष्ट आणि रासवट "विचारसरणीचे" ऐतिहासिक मूळ शोधून काढणे कठीण नाही. १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात "क्रांतिकारक प्रश्नांची मांडणी" या मथळ्याचे बाकुनिन–नेचायेव या दुक्कलीचे एक हस्त-पत्रक प्रसिद्ध झाले आहे, त्यात असे म्हटले आहे: "लुटारूपणा हा रशियन राष्ट्रीय जीवनाचा एक अत्यंत सन्माननीय प्रकार आहे. लुटारू हा जनतेचा वीर पुरुष, रक्षणकर्ता, तिच्या वैऱ्यांवर सूड उगविणारा असतो.. .लुटारूंना समजून घेण्यात कसूर करणाऱ्या कोणालाही रशियन जनतेच्या इतिहासातील काही एक समजणार नाही. जनतेची तडफ, कळकळ आणि सामर्थ्य केवळ लुटारुपणातच आढळून येते. रशियामध्ये लुटारु हा एकमेव अस्सल क्रांतिकारक आहे–हा कस-ल्याही शाब्दिक कसरतीत किंवा पुस्तकी भाषणबाजीत दंग होणार नाही, हा असा क्रांतिकारक आहे की जो तडजोड करणार नाही, कृतीमध्ये अथक व दुर्दम्य आहे, तो राष्ट्रीय आणि सार्वजनिक क्रांतिकारक आहे, राजकीय व वर्गीय क्रांति-कारक नव्हे.....जंगलांतले, शहरांतले आणि खेड्यांतले, सगळचा रशियाभर विखुर-लेले लुटारू आणि साम्राज्याच्या अनेक तुरुंगात कैदी असलेले लुटारु म्हणजे एकच एक, अविभाज्य, निकटपणे एकजीव झालेली दुनिया आहे––ज्या कोणाला रशियामध्ये गंभीरपणे कट-कारस्थाने करायला हवी असतील त्याने या दुनियेत शिरकाव करुन घेतलाच पाहिजे." (कार्ल मार्क्स आणि फ्रेडरीक एन्गल्स, **संकलित ग्रंथ**, खंड १८, पृष्ठ ३९३ रशियन भाषा)

याच गटाने **क्रांतीची तत्वे** हा मथळा असलेले एक प्रकाशन प्रसिध्द केले होते, त्यात या गोष्टीवर भर दिलेला होता: "विनाश करायच्या उद्योगाखेरीज अन्य कसल्याही कामगिरीला मान्यता न देता आम्ही हे मान्य करतो की ही कामगिरी ज्या रुपामध्ये आपले स्वरुप प्रदर्शित करील ती रुपे वेगवेगळी असतील– म्हणजे विषप्रयोग, सुरामारी, फास वगैरे." नेचायेवच्या इतर दस्तऐवजांमध्ये आज ज्यांना दुष्ट परंतु आवश्यक भावना असे म्हणतात त्यांना "मोकाट सोडण्याविषयी," "प्रत्येक गोष्ट जमीनदोस्त करण्याच्या" महत्वाविषयी, आणि अनेक लोकांच्या "जिभा हासडून बाहेर काढल्या जाण्याच्या" वस्तुस्थितीविषयी म्हटलेले आहे (**कित्ता**). नेचायेवचे **क्रांतीचे सवाल जबाब** यामध्ये पुढील उपदेश आहे.

"क्रातिकारकाला....केवळ एकच शास्त्र माहीत असते–विनाशाचे शास्त्र– या जगातल्या कोणत्याही गोष्टीविषयी जर एखाद्याला वाईट वाटले तर तो क्रांतिकारकच नव्हे. त्याने एखाद्या व्यक्तीचा नाश करून, या जगात असलेल्या कोणाही व्यक्तीचा नाश करून थांबता कामा नये. प्रत्येक वस्तु आणि प्रत्येक व्यक्ती यांचा त्याने सारखाच द्वेष करायला हवा.

या जगामध्ये त्याचे जर कौटुंबिक संबंध असतील, मैत्रिचे व प्रेमाचे संबंध असतील तर ते त्याच्या लेखी अधिकच वाईट. त्याचा हात जर थांबवता येत असेल तर तो क्रांतीकारक नव्हेच." त्याच ग्रंथात असेही म्हटलेले होते: "त्याच्या मनोमनी, नुसत्या उक्तीत नव्हे, तर कृतीत, क्रांतिकारकाने मुलकी व्यवस्थेपासून संपूर्णपणे ताटातूट करुन घेतलेली असते, सगळ्या सुशिक्षित जगापासून जगाचे सगळे कायदे, सगळ्या सभ्यता, सगळे संकेत आणि नीती यांच्यापासून ताटातूट करुन घेतलेली असते." (कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स, **संकलित ग्रंथ**, खंड १० वा, पृष्ठ ४१६, रशियन भाषेत).

हा बेगुमान लुटारुपणाचा व हिंसाचाराचा उपदेश कोणत्या आवश्यक बाबतीत इटलीतील, पश्चिम जर्मनीतील व इतर देशातील अति–डाव्यांच्या कार्यक्रमाहून वेगळा आहे ? मार्क्स यांनी आवेशपूर्ण भाषेत धिक्कारलेली ही वक्तव्ये बाकूनिन आणि नेचायेव यांनी केली त्याला शंभर वर्षांहून अधिक काळ लोटला. तेव्हापासून जगामध्ये अमूलाग्र बदल झाले आहेत, परंतु अतिडाव्या दहशतवाद्यांची मते व आवाहने न बदलता तशीच राहिली आहेत. त्यांच्या विधानांमध्ये ठसठशीत सारखेपणा आहे तसाच सारखेपणा त्यांच्या वृत्तीतही आहे– म्हणजे कामगारवर्गातील विश्वासाचा अभाव, मार्क्सवादाचा खुनशी द्वेष, नक्की अपेशी ठरणारा रासबट राजकीय साहसबाजपणा आणि अपरिपक्क युवकांची बेशरमपणे केलेली राबवणूक.

अशा परिस्थितीत अतिडाव्यांचा निकटवर्ती असलेल्या नब–अराज्यवादी पश्चिम जर्मन युवक हॉर्स्ट बिनेक याने बाकुनिन व नेचायेव यांच्या मतांच्या गौरवपर पुढीलप्रमाणे लिहिले आहे यात नवल मुळीच नाही. " अराजकार्ची भाषा म्हणजे कृती करणे, सगळ्या तर्काविरुद्ध आडमाप कृति करणे, वाक्यरचना नष्ट करणे, अराज्यवादी होणे म्हणजे कार्यकारणभावाच्या विरुद्ध असणे, निसर्गाचा नियत ओघ क्षणभर थांबवणे . . ."

नेचायेववाद हा २० व्या शतकातील लुम्पेन–प्रोलेतारियतचा बाणा आत्मसात करुन " विकसीत झाला " आहे. रेड ब्रिगेड्स् आणि फ्रंट लाईन यांजसारख्या अति-डाव्या दहशतवादी संघटना १८६९ साली नेचायेवने मॉस्को येथे स्थापन केलेल्या " पीपल्स रेमिझल्स " या गटाची नक्कल करतात. दस्तयेव्स्कीची **सैतान** ही कादंबरी इटालियन भूमीवर पुन्हा अवतरलेली दिसते.

नेचायेवच्या राजकीय तत्त्वविचारांची नक्कल होते आहे इतकेच नव्हे, तर त्यांच्या संघटनापद्धतीची देखील नक्कल होते आहे. नेचायेवच्या संघटनेच्या नियमांमध्ये " संघटकाविषयी सदस्यांनी " संपूर्ण मनमोकळेपणा ठेवायची अट होती. म्हणजे सर्वसामान्य सदस्यांनी नेत्यांविषयी मनमोकळेपणा ठेवायचा होता आणि " सदस्यांनी संघटकाला कोणतेही प्रश्न " विचारायचे नाहीत अशी अट होती. सर्वसामान्य सदस्यांना त्यांना नेमून दिलेली कामगिरीच तेवढी ठाऊक असे. नेचायेवने विद्यार्थी इवानोव (दस्तयेव्स्कीच्या कादंबरीतील शातोव) याचा खून करायचा

कट रचला. त्याने आपल्या या कृत्याचा हेतु " संघटनेला रक्ताचे खतपाणी घालून मजबुती आणणे " हा असल्याचे सांगितले आणि तो स्वतः मात्र तावडतोब देशातून पळून गेला. नेचायेवने वर्णन केलेल्या भविष्यकालीन ' कम्युनिस्ट " समाजपद्धतीत काम हे प्राणदंडाच्या शिक्षेनिशी सक्तीचे करण्यात आले आहे (काम्पुचियातील पोलपोत राजवटीत असलेच काहीतरी अमलात आलेले होते) आणि सगळ्या व्यवहारांचा कारभार एक " समिती " करते, मात्र ती कुणालाच ठाऊक नसते आणि ती कुणालाच जबाबदार नसते; ही " समिती " समाजातल्या सगळ्या मानवी संबंधांचे नियंत्रण देखील जबरदस्तीने करते. आजच्या रेड ब्रिगेड्सची रचना देखील अशाच प्रकारची आहे.

पश्चिम जर्मनीतला डावा अतिरेकवाद कामगारवर्गीय चळवळीपासून अलग पडलेल्या बेफाम विद्यार्थ्यांमध्ये उदयास आला आणि तो देखील गुन्हेगारीच्या उंबरठ्यावर उभा आहे. " जे तुमचा नाश करते त्या सगळ्याचा नाश करा " या घोषणेनिशी रेड आर्मी फॅक्शन (आर्एएफ्) ही दहशतवादी संघटना, बाडर–माइनहॉफ ग्रूप या नावानेही ही प्रसिद्ध आहे. ही १९७० साली स्थापन झाली. " क्रान्तिकारक अग्रदल " आणि " शहरी गनिमीदल " म्हणून कार्यरत असल्याचे ढोंग करून आरएएफने प्रमुख भांडवलदार व्यक्तींचे खून करणे, बँका लुटणे, शस्त्रे व मोटार गाड्या चोरणे हे उद्योग आरंभले. यांचे डझनावारी बळी पडले. वृत्तपत्रांचा करोडपती मालक आक्झेल एल्. स्प्रिंगर आणि उजव्या गटाच्या ख्रिश्चन सोशल युनियनचा अध्यक्ष डॉ. फ्रॅन्झ जोसेफ स्टाऊस यांना मोठ्या रकमांच्या खंडणीसाठी पळवून नेण्याच्या धमक्या देण्यात आल्या. आरएएफने गुंडांच्या अड्ड्यांशी वाटाघाटी करुन त्यांच्याशी दोस्ती केली. आरएएफच्या कारवायांनी प्रेरित होऊन स्प्रिंगर वृत्तपत्र गटाच्या एका वृत्तपत्राने जनतेला " दहशतवादी मार्क्सवादा"च्या उदयाविरुद्ध इशारा दिला.

आरएएफचे सदस्य २०० पेक्षा कधीच अधिक नव्हते–आणि हे बुध्दिजीवी वर्गातील लुम्पेन प्रोलेतारियन्समधील कुटुंबातले विद्यार्थी होते. सदस्यांपैकी अनेकजण अल्पवयीन होते. परिणाम एवढाच झाला की आरएएफच्या कारवायांपायी पोलिसदलांना मजबुती आणण्यात आली, "राज्य घटनेच्या रक्षणासाठीच्या" इलाजांची व्याप्ती विस्तारण्यात आली आणि आणीबाणीचे कायदे मंजूर करण्यांत आले. कित्येक वर्षनंतर **फ्रँक फूर्टर आल्गेमेन झायटूंग** या एका प्रमुख भांडवलदारी वृत्तपत्राने अशी नोंद घेतली की आरएएफच्या दहशतवाद्यांनी ज्या समाजाचा नाश करायचा प्रयत्न चालविलेला होता, त्याचाच त्यांनी प्रत्यक्षात पाठपुरावा केला. व त्याला मजबुती आणली (**फ्रँक फूटर आल्गेमेन झायटूंग**, तारीख ३ डिसेंबर १९७४).

आरएएफ गटाचा नेता उल्रिके माइनहॉफ याला उद्देशून लिहिलेल्या एका अनावृत पत्रात प्रोफेसर रेनादे रायमेक यानी लिहिले की आरएएफ ही संघटना जर अस्तित्वात नसती तर पश्चिम जर्मन प्रतिगामी वर्तुळांनी अशी " एखादी

नव्याने निर्माण केली असती." पश्चिम जर्मन अतिडाव्या दहशतवाद्यांच्या प्रयोगाचा सपशेल फज्जा उडाला.

आन्तरराष्ट्रीय कार्लोस संघटनेचे जपानी " लढवय्ये " आणि अशा प्रकारचे इतर गट खंडणीसाठी माणसे पळविण्यासकट अनेक गुन्ह्यांमध्ये भाग घेतात. ऑटॉनॉमिस्ट हे फ्रान्समध्ये क्रियाशील आहेत. फ्रेंच गृहखात्याच्या म्हणण्यानुसार १९७० च्या दशकारंभीच्या काळामध्ये १०० ते २०० सशस्त्र हल्ले होत असत, ते एकटचा १९७८ साली ६३७ झाले. दहशतबादी कार्यकर्त्यांची रिक्रूटभरती सर्वत्र वर्गविहीन व अर्धवर्गविहीन घटकांमधून होत असते आणि हे लोक समकालीन नेचायेविझमच्या झेंड्याच्या बुरख्याखाली स्वतःला झाकून घेतात.

असल्या तत्त्वांचा आधार स्वतःसाठी घेतलेले सगळीकडले अतिडावे दहशतवादी हे कम्युनिस्टांचे कट्टर वैरी आहेत याचे नवल वाटायला नको. अगदी अलिकडेच इटालियन नियतकालिक **ल'युरोपेओ** याने रेड ब्रिगेड्सच्या मुख्यकार्यालयाकडून आखणी झालेल्या गुप्त " व्यूहरचनात्मक योजनेची " फोटोप्रत मिळविली. या दस्तऐवजातील मुख्य लक्ष्य परिणामतः इटालियन कम्युनिस्ट पक्ष हेच होते. " इटालियन कम्युनिस्ट पक्षाविरुद्ध रेड ब्रिगेडसची योजना " या मथळ्यानिशी प्रसिद्ध झालेल्या या योजनेत या पक्षाविरुद्ध शारीरिक हिंसाचाराची झिरझिरीत आवरणाखालील धमकी समाविष्ट होती.

या दस्तऐवजात म्हटले होते: " कम्युनिस्ट पक्ष ही ख्रिश्चन डेमोक्रॅट्स प्रमाणे राज्यकर्त्यावर्गाची मध्यवर्ती राजकीय यंत्रणा नव्हे किंवा पोलीसांसारखी दडपशाही करणारी लष्करी यंत्रणा नव्हे. परंतु तेवढ्यावरुन त्याच्या विरुद्ध जो हल्ला करणे गृहीत धरले पाहिजे त्या हल्ल्याचे स्वरुप लष्करी त्याचप्रमाणे राजकीय असल्याचे राहत नाही " (मॉर्निंगस्टार, तारीख २ फेब्रुवारी १९८१ पृष्ठ ४). "लष्करी स्वरुपाच्या " हल्ल्याचा अर्थ कम्युनिस्टांविरुद्ध राजरोस दहशतवादी हल्ले करणे असा होत नसेल तर अन्य अर्थ काय होतो ?

त्याचप्रमाणे या गोष्टीचीही नोंद घ्यायला हवी की निदानपक्षी इटालीतले अतिडावे जी गोष्ट नाकारत नाहीत ती म्हणजे त्यांची दहशतीची मोहीम पुढेमागे फॅसिस्ट हुकुमशाहीच्या स्थापनेतच परिणत होईल हीच आहे. रेड ब्रिगेड्सचे नेते हृदयशून्यपणे हे कबूल करतात की त्यांच्या मते नेमके हेच घडणार आहे. परंतु त्यांचा युक्तिवाद असा आहे, की जितक्या लवकर फॅसिस्ट हुकुमशाही येईल, तितकी जनतेची क्रांती अधिक नजीक येईल !

ही वस्तुस्थिती आहे–मी ही गोष्ट विनोद म्हणून सांगत नाही. अति–डावे आणि नव–फॅसिस्ट दहशतवादी कितीदातरी संगनमताने कामगिरी का करतात हे समजून घ्यायला बहुधा याची मदत होते.

१९३३ साली हिटलर सत्ताधारी झाला त्यावेळी प्रस्तुत लेखक जर्मनीत होता. त्यावेळी त्यांचे कम्युनिस्ट मित्र त्याला जे सांगत असत ते त्याला फार

चांगले आठवते. हिटलर एक वर्षभर टिकेल, अधिक मुळीच टिकणार नाही; नंतर कामगारवर्गीय क्रांती येईल आणि त्याला दूर भिरकावून देईल. हिटलर बारा वर्षे टिकला. त्याने असंख्य कम्युनिस्टांचा नायनाट केला आणि दुसरे महायुद्ध भडकावले. आजच्या घडीला भांडवलशाहीचा अजूनही वरचष्मा आहे आणि एल्ब नदीच्या पश्चिमेला एका काळी थर्ड राईश (तिसरे जर्मन प्रजासत्ताक) असलेल्या जर्मनीच्या बऱ्याच मोठ्या विभागात नव–नाझी उदयास येत आहेत. आजच्या काळातील अति–डावे अलिकडच्या भूतकाळाचे कोणतेही धडे शिकून घेण्यात अपेशी ठरले आहेत आणि ज्याच्यापासून फॅसिस्टांचा फायदा होतो तेच कसलेही आढेवेढे न घेता करत आहेत. त्यांच्या स्वतःच्याच दस्तऐवजावरून हे दिसून येते.

हा फायदा फॅसिस्टांचाच होतोय अशातला प्रकार नाही. अमेरिकन सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी (सी. आय् ए.) आणि रेड ब्रिगेड्स यांच्या दरम्यान कसल्यातरी प्रकारचे लागेबांधे आहेत या गोष्टीवर विश्वास ठेवायला चांगले आधार उपलब्ध आहेत. कित्येक वर्षांपूर्वी **ल'युरोपिओ** या वृत्तपत्राने सीआयएचा माजी संचालक विल्यम कोल्वी याला विचारले की "काय हो, तुमची एजन्सी आपला पैसा (म्हणजे कोटचावधी डॉलर्स) इटलीत कसा खर्च करते?" तो उत्तरला की "जिथे जिथे कम्युनिस्ट संघटना अस्तित्वात असतील, तिथे तिथे अमेरिका कम्युनिस्टविरोधी संघटना निर्माण करते आणि त्यांना पैशाचा पुरवठा करते." असल्या संघटना आपल्याला मिळालेल्या रकमांचा वापर कशा प्रकारे करतात असे विचारल्यावर कोल्वी म्हणाला, की "त्यांना या बाबतीत संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात येते." (म्हणजे स्वतःचे वर्णन "डावे" म्हणून करण्याचे स्वातंत्र्य देखील त्यांना आहे असे दिसते–अ.हे).

१९७८ च्या मार्च महिन्यात रेड ब्रिगेडसनी माजी पंतप्रधान आल्दो मोरो यांना पळवून नेले. इटलीच्या मंत्रिमंडळात कम्युनिस्टांचा समावेश असावा या मताचे ते होते. त्यावेळी भांडवलदारी मासिक **ला दिस्कुस्सियोने** याने म्हटले: "आर्बी' (रेडब्रिगेडस–अ.हे.) या आद्याक्षरांच्या पाठीशी काहीतरी अधिक भयंकर म्हणजे एका परकीय सत्तेच्या हेरखात्याचा पैसा, कार्यक्षमता आणि उद्दिष्टे उभी आहेत असा विचार म्हणजे भलतेच काहीतरी आहे असे ठरणार नाही." (**एक्सप्रेसो** तारीख २२ मार्च १९७८). या मासिकाला सीआयएचा खासकरून नामनिर्देश करायची हिंमत झाली नाही परंतु सीआयएचे "संपर्क" उभय दहशतवादी "पंथांशी" म्हणजे अति उजवे (म्हणजेच फॅसिस्ट) आणि अति डावे यांच्याशी आहेत यांत मुळीच शंका नाही.

रेडब्रिगेडसना कसल्याही सवलती द्यायला किंवा त्यांच्याशी व्यवहार करायला कम्युनिस्टांनी सुरवातीपासूनच खंबीरपणे विरोध केला, आणि अशी मागणी केली की त्यांच्याविरुध्द कडक इलाज केले पाहिजेत. इटालियन कम्युनिस्ट पक्षाचे

सरचिटणीस एन्रिको बोलिन्ग्वेर यांनी १९७७ साली आपल्या जाहीर निवेदनात अति–डाव्यांचा बुरखा घेतलेल्या सरकारी गुप्त हेरांचे स्वरुप उघड करून दाखविले. **ल'युनिता** या वृत्तपत्राला लिहिलेल्या पत्रात त्यांनी सांगितले की जे हिंसाचारी कृत्ये करतात, शस्त्रास्त्रांचा वापर करतात आणि कामगार चळवळीविरुद्ध, इटालियन कम्युनिस्ट पक्षाविरुद्ध व त्याच्या नेत्यांविरुद्ध पद्धतशीरपणे कामगिऱ्या अंगिकारतात, त्यांना केवळ नव–फॅसिस्ट असेच केवळ म्हणता येते. डाव्या अभिरेक्यांच्या साहजबाज कृती या परिणामतः आणि वस्तुनिष्ठदृष्ट्या केवळ उजव्या गटाच्या शक्तींच्या हितसंबंधाचीच सेवाचाकरी बजावतात.

"उजवा गट (म्हणजे इटलीतला– अ.हे.) हे जाणून आहे की दुसऱ्या जागतिक महायुद्धापासून रेड ब्रिगेड्स सर्वोत्तम कम्युनिस्टविरोधी प्रचार करतात," असे इंग्रज कम्युनिस्ट वृत्तपत्र **मॉर्निंगस्टार** याने १९८१ च्या फेब्रुवारी महिन्यात लिहिले आहे. (**मॉर्निंगस्टार** तारीख ९ फेब्रुवारी १९८१)

१९८१ च्या जानेवारी महिन्यात इटालियन कम्युनिष्ट पक्षाचे तत्त्वविचारात्मक मासिक **रिनासिता** याने अति–डाव्या दहशतवादावरील एका चर्चेत अशी नोंद घेतली की भांडवलदारी वर्तुळांमध्ये या दहशतवादाचे "स्वरुप व त्याची व्याप्ती यांना कमी लेखण्यात येते." या वर्तुळाच्या मते "हे घटित लष्करी बळाने चटकन नष्ट करता येते." याबाबत हे मासिक पुढे म्हणते की "दहशतवादाविषयी बोलताना गुप्त (अतिडाव्या–अ. हे.) संघटनांच्या अरिष्टाच्या सखोलपणाकडे आणि बहुधा अपरिवर्तनीयतेकडे लक्ष वेधल्यावाचून आम्हाला राहवत नाही. दहशतवादी आणि सरकार यांच्या दरम्यानच्या सशस्त्र झटापटीची परिणती अगोदरच ठरलेली असते हे अगदी उघड आहे आणि याचा अलिकडे भरपूर पुरावा उपलब्ध झालेला आहे. मात्र या झटापटीनंतर लोकशाही किती प्रमाणात शिल्लक राहील आणि ती कशी दिसेल हे अगदी स्पष्ट झालेले नाही." (लष्करी हुकुमशाही प्रस्थापित होण्याची शक्यता इथे अभिप्रेत आहे.)

"रेड् ब्रिगेड्सनी चालविलेल्या निव्वळ दहशतवादाच्या धोरणाच्या, आणि कित्येक सरकारी संस्थांविरुद्ध, विशिष्ट कक्षांमधील नोकरांविरुद्ध आणि काही व्यवसायांतील व्यक्तीविरुद्ध, भांडवलदारी लोकशाहीला सुरुंग लावण्यासाठी ज्यांना अवश्यमेव नष्ट केले पाहिजे असे निर्णायक लागेबांधे म्हणून मानलेल्या (म्हणजे ब्रिगेड्सनी–अ. हे.) या सगळ्यांविरुद्ध रोख असलेल्या 'विघातक मोहिमांच्या' संपूर्ण निरर्थकपणावर या इटालियन कम्युनिस्ट नियतकालिकाने भर दिला. त्याने पुढे असे सांगितले आहे की "याचा अर्थ म्हणजे देशाचे रूपांतर फॅसिस्ट राज्यात करणे हा विचार आहे आणि याची अंमलबजावणी करायचा मार्ग म्हणजे खाटकांच्या टोळीच्या कृत्यांची आपल्याला आठवण क न देणारा आहे."

त्याचवेळी–आणि आमच्यामते इटालियन कम्युनिस्टांनी दिलेला सगळ्यात जास्त महत्त्वाचा असा हा अभिप्राय आहे– " देशांतील कारखान्यांतून व इतरत्र दहशतवादी कृत्यांच्या बाबतीत जराशी तटस्थ वृत्ती धारण करत असलेल्या "अडाणी बहुजनसमाजाचे " आकारमान घटत असल्याचे निदर्शनास येत आहे आणि सशस्त्र (दहशतवादी–अ. हे.) लढा हा " क्रांतिकारक " उद्दिष्टे साधायचा अचूक व सगळ्यात जास्त जवळचा मार्ग या दृष्टीने त्याच्याकडे पाहायला नकार द्यायचे काम युवक वाढत्या निर्धाराने करत आहेत आणि ही उद्दिष्टे अन्य सगळ्या गोष्टींच्या जोडीला सतत अधिकाधिक वादग्रस्त व अनाकर्षक वाटत आहेत. ' पश्चात्रप्त दहशतवादी " यासारख्या घटिताचा उलगडा गुंतागुंतीची परिस्थिती योग्य रीतीने हिशेबात घेतली तरच होऊ शकतो.' (**रिनासिता** अंक ४ था, तारीख २३ जानेवारी १९८१, पृष्ठ ६).

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे रेड ब्रिगेडसला पाठिंबा देणाऱ्या सामाजिक थरांच्या एका विभागावरील–यातील उघड दिसणारी गोष्ट म्हणजे लुम्पेन प्रोलेतारियतवरील नसला तरी युवकांवरील व बुद्धिजीवी लोकांवरील–त्यांचा प्रभाव घटत असल्याचे दिसते. असे जर असेल तर अधिक दीर्घ मुदतीत ही मुख्य गोष्ट ठरते. अति–डावे हे इटलीमध्ये दहा वर्षांहून अधिक काळ क्रियाशील आहेत, इथेच अति-डाव्या दहशतवादाचे केन्द्र, त्याचे ' वैचारिक नेतृत्व ' आढळते. सत्य घटना हे दाखवून देतात की याने इटालिन कामगारवर्गीय चळवळीच्या वाटचाला मोठचा हानीखेरीज अन्य काहीही आणलेले नाही आणि हा अन्य काहीही आणूच शकत नाही. इतिहासाने रेड ब्रिगेडसला आणखी अधिक उसंत किती दिलेली आहे ?

प्रकरण पाचवे

अति–उजव्यांची धमाल

१.

भांडवलदारी जगामध्ये कोणत्या दहशतवादी संघटना अधिक क्रियाशील आहेत ?–फॅसिस्ट का अति–डाव्या ? इटलीमध्ये आजच्या घडीला अति–डावे अधिक क्रियाशील आहेत. अधिकृत आकडेवारीनुसार १९८० च्या अखेरीपर्यंत तिथे १,०८७ डाव्या अतिरेक्यांना अटक झालेली होती आणि अधिकाऱ्यांना १७० हवे होते. याच्या उलट २६७ फॅसिस्ट दहशतवाद्यांना अटक झालेली होती आणि ६८ हवे होते (**ले नूवेल ऑब्झव्हत्यिूर,** तारीख १२–१८ जानेवारी १९८१, पृष्ठ ३१).

अतिडाव्यांचे संख्याबळ अति–उजव्यांच्यापेक्षा किंवा फॅसिस्टांच्यापेक्षा अधिक भरणे असेच चालू राहील किंवा नाही हे सांगणे कठीण आहे. बहुतेक इतर पश्चिम युरोपीयन देशांमध्ये अति–उजव्या दहशतवाद्यांचे संख्याबळ अधिक आहे. परंतु आता एक गोष्ट स्पष्ट झालेली आहे: दहशतवाद हा नवफॅसिस्टांच्या एकंदर धोरणाची प्रमुख प्रवृती होत आहे. त्यांचे नेते आता मुख्यत्वेकरुन दहशतवादावर भिस्त का ठेवतात ?

नवा फॅसिझम हा विसाव्या शतकाच्या शेवटच्या काही दशकांमध्ये तग धरुन राहील किंवा नाही याविषयी दीर्घकाळ चर्चा चालू आहेत. १९४५ चा सूड घेण्यासाठी तो खरोखरीची चढाई करील काय ? का त्याच्या अंतकाळच्या प्रदीर्घ वेदनांचेच आपण साक्षी होऊन राहू ? या प्रश्नाचे उत्तर बऱ्याच मोठ्या प्रमाणात मानवजातीचे, त्यातल्यात्यात युरोपियनांचे, भवितव्य निश्चित करील हे समजण्याजोगे आहे.

सगळचा युद्धोत्तर कालखंडामध्ये या विषयावर चर्चा चाललेली आहे. विविध मते प्रदर्शित झाली आहेत. अनेकांचे असे ठाम मत झाले आहे की महायुद्धाच्या परिणामी फॅसिझम सपशेल ठार झालेला नसला तरी त्याला इतके जबरदस्त पंगू करण्यात आले आहे की आजच्या घडीला आन्तरराष्ट्रीय रंगमंचावर तो लटपटू शकतो व धडपडू शकतो, परंतु त्याला मोठी चढाई करता येणार नाही.

उदाहरणार्थ हे तर खरेच आहे की आजच्या भांडवलदारी जगामध्ये इटली-खेरीज कोणत्याही देशामध्ये सामुदायिक फॅसिस्ट पक्ष नाही, आणि पिरिनीज पर्वताच्या द्वीपकल्पामध्ये, स्पेनमध्ये व पोर्तुगालमध्ये, जो फॅसिझम युद्धानंतर नांदत होता त्याची लाजिरवाणी इतिश्री १९७० च्या दशकातच झाली. त्याचप्रमाणे हेही खरेच आहे की एकाकाळी फॅसिस्ट संघटनांमध्ये गर्दी करत असलेले मध्यमवर्गीय हे एकतर उजवीकडे झुकण्यापेक्षा डावीकडे झुकत आहेत, शांततेच्या पुरस्कर्त्यांकडे झुकत आहेत, किंवा नुसतेच उदासीन राहत आहेत. शेवटची गोष्ट म्हणजे मक्तेदारी भांडवलशाही ही देखील याचप्रमाणे भूतकाळाची नोंद घेत असलेली दिसते आणि आज तिचा कल फॅसिस्ट गळेकापूंना पाठिंबा देण्यापेक्षा प्रमुख शांतताप्रेमी भांडवलदारी पक्षांना पाठिंबा देण्याकडे अधिक झुकत आहे.

हे सगळे खरे आहे. तरी देखील आजच्या घडीला आपल्या पुढ्यात एक गोष्ट उभी आहे ती म्हणजे ही की फॅसिझम हा बऱ्याच दीर्घकालीन पीछेहाटीनंतर पुन्हा डोके वर काढून उभा राहू लागलेला आहे. आणि उद्या नव्हे तरी चाल पिढीच्या हयातीत मानवजातीवर नवी चढाई करायची त्याची तयारी चाललेली आहे असे मानायला आधार आहेत. फॅसिस्टांचा खरा उद्देश काय आहे ?

आजच्या घडीला फॅसिझमचे मुख्य अड्डे युद्धापूर्वी होते तिथेच नेमके आहेत –म्हणजे भांडवलदारी जर्मनीत व इटालीत आहेत. हा योगायोग मुळीच नव्हे. हिटलर आणि मुसोलिनी यांचे वंशज स्वतःला त्यांच्या कामगिरीचे कायदेशीर वारसदार समजतात.

मुसोलिनीने त्याला अटक होण्याच्या आणि तो फाशी जाण्याच्या काही दिवस अगोदर **इल् पोपोला दी आलेसान्द्रीया** या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते : " फॅसिझमची वीस वर्षे (म्हणजे इटलीतली –अ. हे.) ही भलतीच अल्प मुदत होती... माझ्यापेक्षा मोठा माणूस एखाद्या दिवशी फॅसिस्ट ध्येयाला विजय मिळवून देईल. दोस्त राष्ट्रे (म्हणजे युद्धकाळातील हिटलरविरोधी दोस्ताना–अ. हे.) जर विजयी झाली तर तिसरे जागतिक महायुद्ध अपरिहाय ठरेल. आणि इटलीला जर हुकुमी पत्ते खेळणारा माणूस सापडला तर, इटली वजयी होईल." (पाहा **डायगेंन्वार्ट**, १ डिसेंबर १९४८, पृष्ठ १०). आजच्या घडीला मुसोलिनीचे हे उद्गार इटालियन काळे डगलेवाल्यांनी लक्षांत ठेवले आहेत.

सगळ्या देशांतल्या प्रतिगाम्यांचा आवडता तत्वज्ञ फ्रेडरिख नीत्शे म्हणाला : " मसणवटी ही पुनरुद्धारासाठीची आवश्यक अट आहे " १९१९ साली इटालियन काळ्या डगलेवाल्यांचा नेता असलेला साहजबाज फासावर लटकण्यापूर्वी अशी आशा प्रदर्शित करून राहिला की दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर भांडवलदारी समाजपद्धतीच्या ऱ्हासाच्या प्रक्रियेत नव–फॅसिष्ट सूक्ष्मजंतू उदयास येतील आणि ते पुन्हा एकदा जनतेला विषबाधा करतील. हिटलरने आपल्या

मृत्यूपूर्वी तीच आशा प्रदर्शित केली. या बाबतीत दोघांचे म्हणणे खरे ठरले. जुना फॅसिझम विलयाला गेला, परंतु एक नवा फॅसिझम उदयास येत आहे.

इटलीतल्या ३०,००० क्रियाशील दहशतवाद्यांपैकी डावे अतिरेकी किती आहेत आणि फॅसिस्ट किती आहेत याचा अंदाज घेणे कठीण आहे. दोघाच्यांपैकी एकाच्याहीकडे ओळखपत्रे नाहीत. वृत्तपत्रातील बातम्यानुसार वीस पेक्षा अधिक इतक्या उजव्या गटाच्या टोळ्या देशामध्ये क्रियाशील आहेत. त्यांच्यातली मोठ्यात मोठी टोळी म्हणजे न्यू ऑर्डर ही असल्याचे मानतात. माजी एस्एस्वाले आणि फेंच ब्लॅक हंड्रेड्स (या संघटनेचा विचार पुढे करण्यात येईल) यांनी अनेक वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या याच नावाच्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेची ही शाखा आहे. १९७४ साली या टोळीने आपले इटालीतले नाव बदलून ब्लँक ऑर्डर हे नाव धारण केले ते हे दर्शविण्यासाठी धारण केलेले दिसते की हिची मते मुसोलिनीच्या काळातील काळे डगलेवाल्यांकडून घेतलेली आहेत.

ब्लॅक ऑर्डरने (बीओने) "क्रांतिकारकांशी उघड संघर्ष" करायचे आवाहन केले आहे. या टोळीचा नेता पिनो राउनी हा खासदार असून रोमचे प्रतिगामी वृत्तपत्र **इल् टेम्पो** याचा माजी नोकर आहे आणि लोकशाहीचे वर्णन "आत्म्याला झालेला सांसर्गिक रोग" असे केल्याबद्दल कुप्रसिद्ध आहे. तारीख २ ऑगस्ट १९८० रोजी बोलोग्ना रेल्वे स्टेशनांत खळबळजनक बाँबस्फोट होऊन त्यांत ८५ माणसे ठार व २०० जखमी झाली आणि हा स्फोट हे या टोळीचेच कृत्य होते राउनी अजून फरारी आहे. गियोर्गियो आत्मिरानो हा इटालियन सोशल मूव्हमेंट (आयएसएम) या नव–फॅसिस्ट पक्षाचा प्रमुख १९८१ च्या जुलै महिन्यात कोर्टात हजर करण्यात आला आणि १९७२ साली तीन पोलिसांना ठार करणाऱ्या दहशतवाद्यांना आर्थिक मदत दिल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला. त्याला दहा वर्षे मोकाट सोडण्यात आले होते.

नोंद घेण्याजोगी गोष्ट अशी आहे की ब्लॅक ऑर्डरच्या "तत्वविशारदां"मध्ये आणि बहुधा ज्यांनी बोलोग्नाच्या स्फोटाचा कट रचला त्यांच्यामध्ये, कित्येक इटालियन आकादेमीशियन आहेत : रोम विद्यापीठातील गुन्हेविषयक मानवंशशास्त्राच्या अध्यासनाचे प्रमुख प्रोफेसर आल्दो सेमेरारी, इतिहासाचे व तत्वज्ञानाचे शिक्षक पाओलो सिग्नोरेल्ली, आणि पार्मा विद्यापीठातील साहित्याचे शिक्षक क्लॉदियो मुत्ती (**द इकॉनॉमिस्ट**, तारीख ६ सप्टेंबर १९८०, पृष्ठ ४१). नव-फॅसिस्टांमध्ये ज्युलियस एवोला या "मुसोलीनीच्या अमदानीतला" माजी "तत्वज्ञ" आहे, युद्धापूर्वी इटलीत व हिटलरी जर्मनीत प्रसिद्ध झालेल्या **रिवोल्ता कॉन्यो इल् मोन्दो मॉदर्नो** (आधुनिक जगाविरूध्द उठाव) या ग्रंथाचा हा लेखक आहे. अशा प्रकारे या नव–फॅसिस्ट मारेकऱ्यांना विध्वंसनांच्या वर्तुळात देखील साक्षीदार सापडतात म्हणायचे. यावरून उजव्या गटाचे इटालियन भांडवलदार व त्यांचे "बुद्धीजीवी लोक" हे किती सडलेले आहेत हे पुन्हा एकदा दिसून येते.

ब्लॅक ऑर्डर ही नव-फॅसिस्ट दहशतवादी टोळ्यांपैकी केवळ एक टोळी आहे. इटलीतील इतर टोळ्यांमध्ये नॅशनल व्हॅन्गार्ड, युरोपा सिविल्ता, मुसोलिनी ॲक्शन ग्रुप, ॲडॉल्फ हिटलर डिटॅचमेंट आणि क्लान्देस्तिनो ॲन्टी-कम्युनिस्ट आर्मी यांचा समावेश आहे. त्यांचे सगळे सदस्य धंदेवाईक मारेकरी आहेत. ते काळे डगले अंगात घालत नसतात, "फॅसिझम" या शब्दाचा उच्चार क्वचितच करतात आणि आपल्या संघटनांचे मुखवटे बदलत राहतात. परंतु अलिकडील काही वर्षाच्या अवधीत ते या अगर त्या शहरात जवळ जवळ दररोजच अत्त्याचारांची यंत्रणा रचत आहेत आणि अत्याचार करत आहेत.

नव-फॅसिस्ट दहशतवादी टोळ्या शहरी ब्लॉक्स ताब्यात घेण्याच्या योजना आखतात, मोक्याच्या जागा ताब्यात घेतात, लोकशाहीवादी संघटनांच्या कार्यालयावर पद्धतशीर हल्ले चढवितात आणि कायद्यावर अतिक्रमणे करतात आणि याच्या योगाने यादवी युद्धाचा भडका उडण्याचे वातावरण निर्माण होते. इटालियन सेनेटर उगो पेल्चिओली म्हणाले की हिंसाचाराच्या या सगळ्या कृतींचा उद्देश "सावळ्या गोंधळाची परिस्थिती" निर्माण करणे हा असतो. ही "तणावाची व्यूहरचना" इतर देशांतल्या नव-फॅसिस्ट दहशतवाद्यांनी देखील पद्धतीरपणे अमलात आणण्याचा उद्योग चालविलेला आहे हे आपण पाहणार आहोतच.

ही व्यूहरचना कशी अमलात आणण्यात येते याचे हे एक उदाहरण.

अगदी अलिकडेच "एक्झिक्यूशनर्स ऑफ इटली" असे नांव धारण केलेल्या एका टोळीच्या कृत्यांबाबत इटलीमध्ये खूपच ओरडा आरडा झाला. "प्रॉफेट्स ऑफ टेरर", 'ब्लॅक हँड," "ॲव्हेन्जिंग एन्जल्स," आणि "नॅशनल कमिटी फॉर द प्यूरिफिकेशन ऑफ इटली" ही नावे धारण करून देखील ही टोळी कृत्ये करत होती ही सगळी नावे मुलांसाठी लिहिलेल्या स्वस्त कादंबऱ्यांसारखी वाटतात. परंतु पोलिसांनी पुराव्यानिशी सिध्द केल्यानुसार असली संघटना वस्तुतः अस्तित्वात होती. तिची खास कामगिरी म्हणजे पुरोगामी व्यक्तींना ती "प्राणदंडाच्या शिक्षा" धाडत असे. या संदेशापैकी एक पुढील प्रमाणे होता :

"इटलीला तुमचो मुळीच जरूरी नाही. तुम्ही सगळे नीच प्राणी आम्हाला ठाऊक झालेले आहात, तेव्हा आम्ही तुमचा छळवाद करू- उक्तीने नव्हे तर कृतीने. आम्ही तुम्हाला नुसत्याच धमक्या देणार आहोत इतकेच नव्हे तर तुम्ही रस्त्यांतून चालत असताना देखील तुम्हाला भयभीतपणे मागे वळून बघायला लावतील अशा कृतींची संबंध मालिकाची मालिकाच आम्ही अंमलात आणणार आहोत. आणि हे अधिकाऱ्यांना कळवायचा विचार तुम्ही मनात आणू नका. तुम्हाला कुणीही वाचवणार नाही. तुमचे आईवडील आहेत, तुमच्या पत्नी आहेत, मुळेबाळे आहेत, वधू आहेत; तुम्हाला जिवानिशी नष्ट करण्यापूर्वी यांच्याविरुद्ध कृती करायला आम्ही मागेपुढे पाहणार नाही... तुम्ही कुठेही असलात तरी आम्ही तुम्हाला

काढूच काढू." आणखी एका पत्रांतले हे वाक्य वाचा : "होय. आम्ही पणे कृती आरंभलेले पहिलेच आहोत. परंतु तुम्हा सगळ्यांचे गळे दाबून करू पाहणारे आम्ही शेवटचे नक्कीच नव्हेत"

ही मूर्ख तरुणांची लेखनकामाठी नव्हे. हे इशारे आहेत आणि भांडवलदारी
२. जगातल्या अत्यंत सुधारलेल्या देशांपैकी एका देशातल्या सार्वजनिक व्यक्तींना टपाल-सेवा हे इशारे सतत आणून देत आहेत. इटालियन गृहखात्याने पत्रकारांना २२३ व्यक्तींच्या नांवांची यादी दाखविली. एक्झिक्यूशनर्स ऑफ इटली या संस्थेने यांना प्राणदंडाची शिक्षा दिलेली होती. यांच्यामध्ये कम्युनिस्ट पक्षाचे नेते लुइगी लोंगो, एन्रिको बेर्लिन्वेर आणि उम्बर्तो तेर्रासिनी, सोशालिस्ट नेते पिएत्रो नेन्नी, फ्रान्सेस्को दे मार्तिनो आणि आर्. लोम्बार्दी, पुरोगामी पत्रकार, लोकशाहीवादी न्यायाधिश, ट्रेड युनियन कार्यकर्ते, डाव्या गटाचे महापौर आणि कलेच्या दुनियेतील व्यक्ती यांचा समावेश होता. गृहखात्याकडूनच कळलेल्या माहितीनुसार या एक्झिक्यूशनर्सनी एकंदर १००० देहान्त शिक्षा सुनावलेल्या होत्या.

प्राणदंडाची शिक्षा मिळालेल्यांना पत्रांतून व पार्सलांतून बाँब धाडले जात असत, तसेच पाकिटांतून काडतुसांच्या माळा, सुऱ्यांची पाती आणि फासावर लटकलेल्या माणसांची चित्रे धाडली जात असत. ला कम्यून कंपनी या नाटक कंपनीतल्या नटांना धाडलेल्या पत्रांत म्हटले होते की "आम्ही तुमच्या घरांना आणि मोटारींना आगी लावू. तुमच्या घाणेरड्या नाटकांतून जी दृश्ये तुम्ही दाखवता त्यांचा अनुभव तुम्हाला स्वतःला घ्यायला आम्ही भाग पाडू." मिलान येथील प्रख्यात नटी फ्रान्सा रामी हिला एक्झिक्यूशनर्सच्या गुंडांनी राक्षसी मारहाण केली आणि तिच्याच रक्ताच्या थारोळ्यात तिला फूटपाथवर फेकून दिले.

शांततेचा आणि प्रगतीचा पुरस्कार करणाऱ्यांना दमदाटी देणे, काय वाटेल ते करुन त्यांना सार्वजनिक जीवनाचा त्याग करायला भाग पाडणे, आणि त्यांच्या प्रिय व्यक्तींना जीवन भयंकर भयदायक करुन ठेवणे – हा या आजच्या एसएस-वाल्यांच्या ऑस्नीसिमच्या छळछावण्यांत आपली कारकीर्द ज्यांनी गाजविली त्यांच्या पट्टशिष्यांचा आद्य व तात्कालीक उद्देश असतो. रोममधील एका वृत्तपत्राने अशी बातमी दिली की एक्झिक्यूशनर्स ऑफ इटलीवाल्यांनी आपले जाळे सगळ्या ॲपेनाईन द्वीपकल्पावर पसरुन ठेवले आहे. या संघटनेने २० ते २६ वर्षे वयाच्या युवकांना निर्ढावलेल्या नव–फॅसिस्तांतून निवडून काढून आपल्यात दाखल करुन घेतले आणि प्रत्येकी सहा सहा माणसांच्या सेल्समध्ये संघटित केले. प्रत्येक सेलमध्ये रस्त्यांत चिथावणूक करण्यातले दोन दोन "विशेषज्ञ" असत, दोन दोन "हाणामारी करणारे" (म्हणजे खून करणारे) आणि दोन दोन "मोटारवाले" असत; त्यांच्यापैकी एकजण अमलबजावणी करणारांकडे हुकूम पोचवत असे आणि "गरम स्थळांवर" लक्ष ठेवत असे आणि दुसरा सेलच्या प्रमुख पदावर असे आणि जिल्ह्याच्या नेत्याशी संपर्क ठेवत असे.

उदाहरणार्थ हे तर खरेच आहे की आजच्या भांडवलदारी जगामध्ये इटली-खेरीज कोणत्याही देशामध्ये सामुदायिक फॅसिस्ट पक्ष नाही, आणि पिरिनीज पर्वताच्या द्वीपकल्पामध्ये, स्पेनमध्ये व पोर्तुगालमध्ये, जो फॅसिझम युद्धानंतर नांदत होता त्याची लाजिरवाणी इतिश्री १९७० च्या दशकातच झाली. त्याचप्रमाणे हेही खरेच आहे की एकाकाळी फॅसिस्ट संघटनांमध्ये गर्दी करत असलेले मध्यमवर्गीय हे एकतर उजवीकडे झुकण्यापेक्षा डावीकडे झुकत आहेत, शांततेच्या पुरस्कर्त्यांकडे झुकत आहेत, किंवा नुसतेच उदासीन राहत आहेत. शेवटची गोष्ट म्हणजे मक्तेदारी भांडवलशाही ही देखील याचप्रमाणे भूतकाळाची नोंद घेत असलेली दिसते आणि आज तिचा कल फॅसिस्ट गळेकापूंना पाठिंबा देण्यापेक्षा प्रमुख शांतताप्रेमी भांडवलदारी पक्षांना पाठिंबा देण्याकडे अधिक झुकत आहे.

हे सगळे खरे आहे. तरी देखील आजच्या घडीला आपल्या पुढ्यात एक गोष्ट उभी आहे ती म्हणजे ही की फॅसिझम हा बऱ्याच दीर्घकालीन पीछेहाटीनंतर पुन्हा डोके वर काढून उभा राहू लागलेला आहे. आणि उद्या नव्हे तरी चाल पिढीच्या हयातीत मानवजातीवर नवी चढाई करायची त्याची तयारी चाललेली आहे असे मानायला आधार आहेत. फॅसिस्टांचा खरा उद्देश काय आहे ?

आजच्या घडीला फॅसिझमचे मुख्य अड्डे युद्धापूर्वी होते तिथेच नेमके आहेत –म्हणजे भांडवलदारी जर्मनीत व इटालीत आहेत. हा योगायोग मुळीच नव्हे. हिटलर आणि मुसोलिनी यांचे वंशज स्वतःला त्यांच्या कामगिरीचे कायदेशीर वारसदार समजतात.

मुसोलिनीने त्याला अटक होण्याच्या आणि तो फाशी जाण्याच्या काही दिवस अगोदर **इल् पोपोला दी आलेसान्द्रीया** या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते : " फॅसिझमची वीस वर्षे (म्हणजे इटलीतली –अ. हे.) ही भलतीच अल्प मुदत होती... माझ्यापेक्षा मोठा माणूस एखाद्या दिवशी फॅसिस्ट ध्येयाला विजय मिळवून देईल. दोस्त राष्ट्रे (म्हणजे युद्धकाळातील हिटलरविरोधी दोस्ताना–अ. हे.) जर विजयी झाली तर तिसरे जागतिक महायुद्ध अपरिहार्य ठरेल. आणि इटलीला जर हुकुमी पत्ते खेळणारा माणूस सापडला तर, इटली विजयी होईल." (पाहा **डायगेंन्वार्ट**, १ डिसेंबर १९४८, पृष्ठ १०). आजच्या घडीला मुसोलिनीचे हे उद्‌गार इटालियन काळे डगलेवाल्यांनी लक्षांत ठेवले आहेत.

सगळ्या देशांतल्या प्रतिगाम्यांचा आवडता तत्वज्ञ फ्रेडरिख नीत्शे म्हणाला : " मसणवटी ही पुनरुद्धारासाठीची आवश्यक अट आहे " १९१९ साली इटालियन काळ्या डगलेवाल्यांचा नेता असलेला साहजबाज फासावर लटकण्यापूर्वी अशी आशा प्रदर्शित करून राहिला की दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर भांडवलदारी समाजपद्धतीच्या ऱ्हासाच्या प्रक्रियेत नव–फॅसिष्ट सूक्ष्मजंतू उदयास येतील आणि ते पुन्हा एकदा जनतेला विषबाधा करतील. हिटलरने आपल्या

मृत्यूपूर्वी तीच आशा प्रदर्शित केली. या बाबतीत दोघांचे म्हणणे खरे ठरले. जुना फॅसिझम विलयाला गेला, परंतु एक नवा फॅसिझम उदयास येत आहे.

इटलीतल्या ३०,००० क्रियाशील दहशतवाद्यांपैकी डावे अतिरेकी किती आहेत आणि फॅसिस्ट किती आहेत याचा अंदाज घेणे कठीण आहे. दोघाच्यांपैकी एकाच्याहीकडे ओळखपत्रे नाहीत. वृत्तपत्रातील बातम्यानुसार वीस पेक्षा अधिक इतक्या उजव्या गटाच्या टोळचा देशामध्ये क्रियाशील आहेत. त्यांच्यातली मोठ्यात मोठी टोळी म्हणजे न्यू ऑर्डर ही असल्याचे मानतात. माजी एस्एस्वाले आणि फेंच ब्लॅक हंड्रेड्स (या संघटनेचा विचार पुढे करण्यात येईल) यांनी अनेक वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या याच नावाच्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेची ही शाखा आहे. १९७४ साली या टोळीने आपले इटालीतले नाव बदलून ब्लॅक ऑर्डर हे नाव धारण केले ते हे दर्शविण्यासाठी धारण केलेले दिसते की हिची मते मुसोलिनीच्या काळातील काळे डगलेवाल्यांकडून घेतलेली आहेत.

ब्लॅक ऑर्डरने (बीओने) "क्रांतिकारकांशी उघड संघर्ष" करायचे आवाहन केले आहे. या टोळीचा नेता पिनो राउनी हा खासदार असून रोमचे प्रतिगामी वृत्तपत्र **इल् टेम्पो** याचा माजी नोकर आहे आणि लोकशाहीचे वर्णन "आत्म्याला झालेला सांसर्गिक रोग" असे केल्याबद्दल कुप्रसिद्ध आहे. तारीख २ ऑगस्ट १९८० रोजी बोलोग्ना रेल्वे स्टेशनांत खळबळजनक बाँबस्फोट होऊन त्यांत ८५ माणसे ठार व २०० जखम झाली आणि हा स्फोट हे या टोळीचेच कृत्य होते राउनी अजून फरारी आहे. गियोगियो आत्मिरानो हा इटालियन सोशल मूव्हमेंट (आयएसएम) या नव–फॅसिस्ट पक्षाचा प्रमुख १९८१ च्या जुलै महिन्यात कोर्टात हजर करण्यात आला आणि १९७२ साली तीन पोलिसांना ठार करणाऱ्या दहशतवाद्यांना आर्थिक मदत दिल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला. त्याला दहा वर्षे मोकाट सोडण्यात आले होते.

नोंद घेण्याजोगी गोष्ट अशी आहे की ब्लॅक ऑर्डरच्या "तत्वविशारदां"मध्ये आणि बहुधा ज्यांनी बोलोग्नाच्या स्फोटाचा कट रचला त्यांच्यामध्ये, कित्येक इटालियन आकादेमीशियन आहेत: रोम विद्यापीठातील गुन्हेविषयक मानवंशशास्त्राच्या अध्यासनाचे प्रमुख प्रोफेसर आल्दो सेमेरारी, इतिहासाचे व तत्वज्ञानाचे शिक्षक पाओलो सिग्नोरेल्ली, आणि पार्मा विद्यापीठातील साहित्याचे शिक्षक क्लॉदियो मुत्ती (**द इकॉनॉमिस्ट**, तारीख ६ सप्टेंबर १९८०, पृष्ठ ४१). नव-फॅसिस्टांमध्ये ज्युलियस एवोला या "मुसोलीनीच्या अमदानीतला" माजी "तत्वज्ञ" आहे, युद्धापूर्वी इटलीत व हिटलरी जर्मनीत प्रसिद्ध झालेल्या **रिवोल्ता कॉन्यो इल् मोन्दो मॉदर्नो** (आधुनिक जगाविरूध्द उठाव) या ग्रंथाचा हा लेखक आहे. अशा प्रकारे या नव–फॅसिस्ट मारेकऱ्यांना विव्दानांच्या वर्तुळात देखील साक्षीदार सापडतात म्हणायचे. यावरून उजव्या गटाचे इटालियन भांडवलदार व त्यांचे "बुद्धीजीवी लोक" हे किती सडलेले आहेत हे पुन्हा एकदा दिसून येते.

ब्लॅक ऑर्डर ही नव-फॅसिस्ट दहशतवादी टोळ्यांपैकी केवळ एक टोळी आहे. इटलीतील इतर टोळ्यांमध्ये नॅशनल व्हॅन्गार्ड, युरोपा सिविल्ता, मुसोलिनी ॲक्शन ग्रुप, ॲडॉल्फ हिटलर डिटॅचमेंट आणि क्लान्देस्तिनो ॲन्टी-कम्युनिस्ट आर्मी यांचा समावेश आहे. त्यांचे सगळे सदस्य धंदेवाईक मारेकरी आहेत. ते काळे डगले अंगात घालत नसतात, "फॅसिझम" या शब्दाचा उच्चार क्वचितच करतात आणि आपल्या संघटनांचे मुखवटे बदलत राहतात. परंतु अलिकडील काही वर्षांच्या अवधीत ते या अगर त्या शहरात जवळ जवळ दररोजच अत्त्याचारांची यंत्रणा रचत आहेत आणि अत्याचार करत आहेत.

नव-फॅसिस्ट दहशतवादी टोळ्या शहरी ब्लॉक्स ताब्यात घेण्याच्या योजना आखतात, मोक्याच्या जागा ताब्यात घेतात, लोकशाहीवादी संघटनांच्या कार्यालयावर पद्धतशीर हल्ले चढवितात आणि कायद्यावर अतिक्रमणे करतात आणि याच्या योगाने यादवी युद्धाचा भडका उडण्याचे वातावरण निर्माण होते. इटालियन सेनेटर उगो पेल्चिओली म्हणाले की हिंसाचाराच्या या सगळ्या कृतींचा उद्देश "सावळ्या गोंधळाची परिस्थिती" निर्माण करणे हा असतो. ही "तणावाची व्यूहरचना" इतर देशांतल्या नव-फॅसिस्ट दहशतवाद्यांनी देखील पद्धतीरपणे अमलात आणण्याचा उद्योग चालविलेला आहे हे आपण पाहणार आहोतच.

ही व्यूहरचना कशी अमलात आणण्यात येते याचे हे एक उदाहरण.

अगदी अलिकडेच "एक्झिक्यूशनर्स ऑफ इटली" असे नांव धारण केलेल्या एका टोळीच्या कृत्यांबाबत इटलीमध्ये खूपच ओरडा आरडा झाला. "प्रॉफेट्स ऑफ टेरर", 'ब्लॅक हँड," "ॲव्हेन्जिंग एन्जल्स," आणि "नॅशनल कमिटी फॉर द प्यूरिफिकेशन ऑफ इटली" ही नावे धारण करून देखील ही टोळी कृत्ये करत होती ही सगळी नावे मुलांसाठी लिहिलेल्या स्वस्त कादंबऱ्यांसारखी वाटतात. परंतु पोलिसांनी पुराव्यानिशी सिध्द केल्यानुसार असली संघटना वस्तुतः अस्तित्वात होती. तिची खास कामगिरी म्हणजे पुरोगामी व्यक्तींना ती "प्राणदंडाच्या शिक्षा" धाडत असे. या संदेशांपैकी एक पुढील प्रमाणे होता :

"इटलीला तुमचो मुळीच जरूरी नाही. तुम्ही सगळे नीच प्राणी आम्हाला ठाऊक झालेले आहात, तेव्हा आम्ही तुमचा छळवाद करू– उक्तीने नव्हे तर कृतीने. आम्ही तुम्हाला नुसत्याच धमक्या देणार आहोत इतकेच नव्हे तर तुम्ही रस्त्यांतून चालत असताना देखील तुम्हाला भयभीतपणे मागे वळून बघायला लावतील अशा कृतींची संबंध मालिकाची मालिकाच आम्ही अंमलात आणणार आहोत. आणि हे अधिकाऱ्यांना कळवायचा विचार तुम्ही मनात आणू नका. तुम्हाला कुणीही वाचवणार नाही. तुमचे आईवडील आहेत, तुमच्या पत्नी आहेत, मुळेबाळे आहेत, वधू आहेत; तुम्हाला जिवानिशी नष्ट करण्यापूर्वी यांच्याविरुद्ध कृती करायला आम्ही मागेपुढे पाहणार नाही... तुम्ही कुठेही असलात तरी आम्ही तुम्हाला

काढूच काढू." आणखी एका पत्रांतले हे वाक्य वाचा : "होय. आम्ही पणे कृती आरंभलेले पहिलेच आहोत. परंतु तुम्हा सगळ्यांचे गळे दाबून करू पाहणारे आम्ही शेवटचे नक्कीच नव्हेत"

ही मूर्ख तरुणांची लेखनकामाठी नव्हे. हे इशारे आहेत आणि भांडवलदारी
२. गातल्या अत्यंत सुधारलेल्या देशांपैकी एका देशातल्या सार्वजनिक व्यक्तींना टपाल· सेवा हे इशारे सतत आणून देत आहेत. इटालियन गृहखात्याने पत्रकारांना २२३ व्यक्तींच्या नांवांची यादी दाखविली. एक्झिक्यूशनर्स ऑफ इटली या संस्थेने यांना प्राणदंडाची शिक्षा दिलेली होती. यांच्यामध्ये कम्युनिस्ट पक्षाचे नेते लुइगी लोंगो, एन्रिको बेर्लिन्वेर आणि उम्बर्तो तेरासिनी, सोशालिस्ट नेते पिएत्रो नेन्नी, फ्रान्सेस्को दे मार्तिनो आणि आर्. लोम्बार्दी, पुरोगामी पत्रकार, लोकशाहीवादी न्यायाधिश, ट्रेड युनियन कार्यकर्ते, डाव्या गटाचे महापौर आणि कलेच्या दुनियेतील व्यक्ती यांचा समावेश होता. गृहखात्याकडूनच कळलेल्या माहितीनुसार या एक्झिक्यूशनर्सनी एकंदर १००० देहान्त शिक्षा सुनावलेल्या होत्या.

प्राणदंडाची शिक्षा मिळालेल्यांना पत्रांतून व पार्सलांतून बाँब धाडले जात असत, तसेच पाकिटांतून काडतुसांच्या माळा, सुऱ्यांची पाती आणि फासावर लटकलेल्या माणसांची चित्रे धाडली जात असत. ला कम्यून कंपनी या नाटक कंपनीतल्या नटांना धाडलेल्या पत्रांत म्हटले होते की "आम्ही तुमच्या घरांना आणि मोटारींना आगी लावू. तुमच्या घाणेरड्या नाटकांतून जी दृश्ये तुम्ही दाखवता त्यांचा अनुभव तुम्हाला स्वतःला घ्यायला आम्ही भाग पाडू." मिलान येथील प्रख्यात नटी फ्रान्सा रामी हिला एक्झिक्यूशनर्सच्या गुंडांनी राक्षसी मारहाण केली आणि तिच्याच रक्ताच्या थारोळ्यात तिला फूटपाथवर फेकून दिले.

शांततेचा आणि प्रगतीचा पुरस्कार करणाऱ्यांना दमदाटी देणे, काय वाटेल ते करुन त्यांना सार्वजनिक जीवनाचा त्याग करायला भाग पाडणे, आणि त्यांच्या प्रिय व्यक्तींना जीवन भयंकर भयदायक करुन ठेवणे – हा या आजच्या एसएस-वाल्यांच्या ऑस्नीसिमच्या छळछावण्यांत आपली कारकीर्द ज्यांनी गाजविली त्यांच्या पट्टशिष्यांचा आद्य व तात्कालीक उद्देश असतो. रोममधील एका वृत्तपत्राने अशी बातमी दिली की एक्झिक्यूशनर्स ऑफ इटलीवाल्यांनी आपले जाळे सगळ्या ॲपेनाईन द्वीपकल्पावर पसरुन ठेवले आहे. या संघटनेने २० ते २६ वर्षे वयाच्या युवकांना निर्ढावलेल्या नव–फॅसिस्टांतून निवडून काढून आपल्यात दाखल करुन घेतले आणि प्रत्येकी सहा सहा माणसांच्या सेल्समध्ये संघरित केले. प्रत्येक सेलमध्ये रस्त्यांत चिथावणूक करण्यातले दोन दोन "विशेषज्ञ" असत, दोन दोन "हाणामारी करणारे" (म्हणजे खून करणारे) आणि दोन दोन "मोटारवाले" असत; त्यांच्यापैकी एकजण अमलबजावणी करणारांकडे हुकूम पोचवत असे आणि "गरम स्थळांवर" लक्ष ठेवत असे आणि दुसरा सेलच्या प्रमुख पदावर असे आणि जिल्ह्याच्या नेत्याशी संपर्क ठेवत असे.

हे योगायोगाच्या परिस्थितीवर अवलंबून असणारे साध्यासुध्या रस्त्यावरील टोळी चिथावणूकीचे डावपेच नव्हेत. जुन्या एसएसवाल्यांच्या अनुभवाची सांगड मुसोलिनी रिकन गुंडांच्या व्यवहाराशी व गुप्तपणे गुंडगिरी करणाऱ्या टोळ्यांच्या पध्दतीशी फॅसिस्ट घालणारी अशी ही सामुदायिक दहशतीची सुव्यवस्थित पध्दती आहे. पराभूत झालेले जर्मनीतून पळून गेलेले जुने हिटलरवादी ऑट्टो स्कोर्झेनी व लिऑन देग्रेदके यांच्या शाळा अलीकडील काही वर्षांत अगदी यशस्वीपणे कामगिरी बजावत आहेत हे उघड दिसते. इटलीतल्या डोंगराळ व ओसाड प्रदेशात कँप भरविण्यात आले तिथे लष्करी विशेषज्ञांनी, बहुतांश छत्रीधारी सैनिकांनी तरूण फॅसिस्टाना दहशतवादी व्हायचे शिक्षण दिले ही गोष्ट पुराव्याने प्रस्थापित झाली आहे. प्रशिक्षणार्थीमध्ये स्त्रियांचा समावेश होता.

इटालियन सोशल मूव्हमेंट हा कायदेशीर नव–फॅसिष्ट पक्ष आपला एक्झिक्यूशनर्स ऑफ इटली आणि तत्सम संघटनांशी कसलाही संबंध असल्याचे नाकारतो. परंतु या आयएस्एम् पक्षाचा खुद्द नेताच म्हणजे ज्योर्जियो आल्मिरानो हा नवा द्यूचे उघडपणे आपल्या तरुण पाठीराख्यांना अशी हाक देतो की " शूरांच्या तुकड्या स्थापन करा;" "कारखान्यांच्या व शाळांच्या गेटासमोर कृती करा"; कम्युनिस्टांशी व डेमोक्रॅटांशी समोरासमोर " शारीरिक झटापटीला " भिऊ नका.

मुसोलिनीचा उच्छेद झाल्यानंतर सदतीस वर्षांनी इटालियन डाव्या गटाच्या शक्तींना बार्टोलोम्यूच्या रात्रीच्या कत्तलीच्या धमक्या देण्यात येत आहेत. आणि ही गोष्ट तीव्र आन्तरराष्ट्रीय अरिष्टाच्या कालखंडात घडत नसून शान्ततेच्या काळात घडत आहे.

२.

पश्चिम जर्मनीत वार्टोलोम्यूच्या रात्रीच्या कत्तलीची तयारी आतापर्यंत इटलींतल्या पेक्षा बऱ्याच अधिक लहान प्रमाणावर कमी राजरोसपणे करण्यात येत होती. प्रथमदर्शनी हे विचित्र दिसायचा संभव आहे. कारण प्रथा याच्या उलट होती. १९३० च्या व १९४० च्या दशकात मुसोलिनीच्या खाटकांना हिटलरवाल्यांशी स्पर्धा करायचा विचार कधीही सुचला नाही. एस्एस्वाले हे जगाच्या इतिहासातील सगळ्यात जास्त भीतिदायक दहशतवादी होते. ते लोकांचे खून करणे व त्यांना पंगू करणे हजारोच्या प्रमाणात करत नव्हते तर लाखोंच्या प्रमाणात करत होते; त्यांनी हे बहुतेक सगळ्या युरोपियन देशांमध्ये केले आणि सबंध राष्ट्रेच्या राष्ट्रे नेस्तनाबूत करायची ते तयारी करीत होते. आजच्या घडीला इटालियन फॅसिस्ट त्यांच्या जर्मन समानधर्म्यांना मागे टाकायचा प्रयत्न करीत आहेत.

याचे मुख्य कारण म्हणजे आजच्या इटलीत एक सामुदायिक फॅसिस्ट पक्ष आहे; त्याचे कित्येक लाख सदस्य आहेत –या पक्षाला निवडणुकीत २० लाख मते मिळतात (एका इटालियन मंत्र्याने **एक्प्रेस्सो** वृत्तपत्राला १९७८ च्या मार्च महिन्यांत सांगितले : " राजकीय आणि इतर गुन्ह्याच्या क्षेत्रात इटलीचा दुर्दैवाने जगात पहिला क्रमांक आहे, किंवा किमानपक्षी युरोपात तर आहेच.") तर याच्या उलट पश्चिम जर्मनीत याच्या सारख्या कसलाच प्रकार नाही. नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टी (एन. डी. पी.) या नवनाझी पक्षाचे सदस्य १९७७ साली ९००० होते आणि बुन्डेस्टागमध्ये एकही जागा मिळवायच्या बाबतीत तो अपेशी ठरला. मात्र इतर पक्षांच्याप्रमाणे त्याला कोटचावधींचे सरकारी अनुदान मिळाले असून देखील तो अपेशी ठरला.

एन्डीपी अजून देखील उघडपणे दहशतवादी कृती करायला चाचरतो. ज्या देशाला नाझीवादाच्या भयानक प्रकारांची आठवण आहे त्यांतील शक्तींची वाटणी एन्डीपीला अनुकुल नाही. जनतेला भिऊन बहुतेक नवे हिटलरवादी आताच्या घडीला नुसतीच चाचपणी करत आहेत आणि " शिकत आहेत." परंतु असल्या कामगिऱ्या करायची तयारी त्यांनी अगोदरच चालविलेली आहे आणि ते आपल्या योग्य अशा वेळची वाट बघत आहेत. ते नेमक्या कोणत्या गोष्टीची वाट बघत आहेत त्याचा पुढे आम्ही विचार करणार आहोतच.

पश्चिम जर्मनीतले उजवे अतिरेकी दहशतवादी आपल्या इटालियन समान-धर्मांच्या मागेका " रेंगाळत आहेत " याचे आणखी एक उघड दिसणारे कारण आहे. इटालियन कम्युनिस्ट पक्ष हा पाश्चात्य जगातील सगळ्यात जास्त सामर्थ्यशाली पक्ष आहे. त्याचे १७,६०,००० पेक्षा अधिकसदस्य आहेत. तो देशातला दुसऱ्या क्रमांकाचा मोठ्यात मोठा पक्ष आहे आणि कित्येक वर्षे श्रमिक बहुजनसमाज अशी मागणी करतो आहे की पक्षाने सरकारात भाग घ्यायला हवा. याच्यामुळे स्थानिक नाटो सेनापतींसह प्रभावशाली प्रतिगामी वर्तुळांना विशेषेकरुन धास्ती वाटत आहे आणि फॅसिस्ट दहशतवाद्यांना पाठिंबा द्यायची प्रेरणा त्यांना मिळत आहे.

पश्चिम जर्मनीतील परिस्थिती वेगळी आहे. असे असूनही तिथे देखील तीन अगर चार पिसाट नवनाझी गट अगोदरच अस्तित्वात आहेत आणि संधि मिळाल्यास एखाद्या मोठ्या दहशतवादी संघटनेचे केंद्र व्हायला ते चांगलेच समर्थ आहेत. यासाठीच तर त्यांनी आपल्या तरुण सदस्यांना दहशतवादी डावपेच शिकविण्याच्या योगाने तयारी चालविली आहे.

पश्चिम जर्मनीत "स्वयंस्फूर्त" फॅसिस्ट अतिरेकी प्रकार अधिकाधिक वेळा घडत आहेत. फॅसिस्ट चियावणीखोरीच्या प्रकारांचे संख्याबळ १९७७ साली दुप्पट झाल्याची नोंद अधिकाऱ्यांनी घेतलेली आहे. गळेकापूंच्या टोळ्यांनी शस्त्रे, दारूगोळा आणि स्फोटक द्रव्ये एकत्र करायचे काम चालविले आहे आणि ती मिळवायला त्या लष्करी ठाण्यावर देखील हल्ले चढवित आहेत ही गोष्ट पुराव्यानिशी प्रस्थापित झाली आहे. जाळपोळ आणि कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयावर बाँब फेकणे हे प्रकार वाढत्या प्रमाणात होत आहेत. १९८१ च्या एप्रिल महिन्यात कित्येक जर्मन शहरातून बॉब स्फोटाचे प्रकार एकामागून एक घडले.

पश्चिम जर्मनीत ज्यू लोक जेमतेम २५००० पेक्षा किंचित अधिक शिल्लक राहिलेले असले तरी देखील ज्यूविरोधी भावना पुन्हा चेतविण्यात येत आहेत. ज्यू लोकांच्या स्मशानाचे पावित्र्य भ्रष्ट करण्याचे प्रकार पुन्हा चालू झाल्याच्या बातम्या येत आहेत. फॅसिस्टविरोधी प्रसारणे चालू असताना टेलीव्हिजन मनोऱ्यांची मोडतोड करण्यांत येते. ज्यू लोकांचा संपूर्ण उच्छेद करण्याबाबत हिटलरने आखलेल्या योजनेच्या एका चित्रपटाचा कार्यक्रम चालू असताना बाँबस्फोट झाले. **न्युए रुहर झायटूंग** या सोशल डेमॉक्रॅटिक वृत्तपत्राने लिहिले : "जुने व नवे नाझी हे कुतूहलाचे विषय आहेत किंवा क्वचित दिसणारा सांसर्गिक रोग आहेत आणि त्रासदायक असले तरी बहुपक्षीय समाजाला झेपण्याजोगे आहेत, असे या स्फोटानंतर कुणीही म्हणू शकत नाही."

तारीख २६ सप्टेंबर १९८० रोजी म्यूनिक शहराच्या ज्या भागात नेहमी उत्सव समारंभ चाललेले असतात आणि जिथे जवळपासच ज्यू लोकांचे एक प्रार्थनामंदिर आहे, त्या भागामध्ये हजारो लोकांची वर्दळ चालू असताना एक बाँबस्फोट

झाला, आणि त्यात १३ लोक ठार झाले आणि २१५ लोक जखमी झाले. हा नमुनेदार नाझी अत्त्याचार होता. या प्रकरणी नव–नाझी आपल्या इटालियन समान धर्मीयांचा कित्ता गिरवत होते असे वाटण्याचा संभव आहे. ते कसेबसे "शिकत" तर आहेतच. ते उद्या काय करतील हे पश्चिम जर्मनीतल्या कोणालाही नक्की सांगता येत नाही.

म्यूनिक येथील बाँब हा तथाकथित मिलिटरी स्पोर्टस् ग्रूपच्या (एम्एस-जीच्या) सदस्याने फेकला. हा गट बव्हेरियात कारवाया करत असतो आणि याचा नेता आहे कार्ल–हाड्रन्झ हॉफमान्न. कोण आहे हा ? सर्वप्रथम गोष्ट म्हणजे न्यूरेन्बर्ग येथे याच्या मालकीचा एक गुत्ता आहे. तो आपली कामगिरी खऱ्याखुऱ्या हिटलरी शैलीत बजावत असतो. हा गट गेली आठ वर्षे अप्रतिहतपणे कामगिरी करुन राहिला आहे असे दिसते. याच्या पुढाऱ्याला "स्टील हेल्मेट हॉफमान्न" या नावाने संबोधतात आणि याचे पाठिराखे याला "हेल् हॉफमान्न !" अशा घोषणेनिशी अभिवादन करतात. हा त्यांना विचारतो: "आपण कोण आहोत ?" ते उत्तरतात : "युरोप खंडाचे रक्षक सैनिक" "आपण कशासाठी लढतो आहोत ?" "चळवळीच्या विजयासाठी !' "तुमचे वैरी कोण आहेत ?", "बोल्शेनिझम आणि भांडवलदार !"

मिलिटरी स्पोर्टस ग्रुप ही दहशतवादाची खरीखुरी शाळा आहे. त्या तरुण सदस्यांची कवायत घेण्यात येते, त्यांना शस्त्रांचा वापर करायला व लष्करी वाहने चालवायला शिकविण्यात येते, आणि निदर्शनांच्या ठिकाणी नेण्यात येते. त्यांच्या मालकीच्या जीप गाड्या, चिलखती मोटारी, तोफा, अडचणीच्या प्रदेशात चालविता येणारी वाहने, रबरी नळ्यात हवा भरून चालवायच्या होड्या, रणांगणावर वापरायचे कपडे, हात बाँब–म्हणजे यादवी युद्ध चालवायला लागणारा सगळा सरंजाम आहे.

त्यांच्या हेल्मेट्सवर एसएसच्या निशाण्या असतात. ते आठवड्याच्या सुटीच्या दिवशी बव्हेरियन जंगलामध्ये शिक्षण घेतात. अनेक चकमकीत व मारहाणीत ते भाग घेतात आणि इतरांना त्यांचा धाक बसलेला असतो. "हा संपूर्ण संसदवाद संपवायची वेळ परिपक्व झालेली आहे !" ही त्यांची घोषणा असते." त्यांचे पुढारी सांगतात की देशात लोखंडी हुकमत आणली पाहिजे. नकलडस्टर्स, पोलादी तारांना लटकावलेली वजने आणि लाकडी मुदुल यांनी ते फॅझिस्ट–विरोधकांना ठोकून काढतात. त्यांच्या "कामगिऱ्यांपैकी" एक म्हणजे किएल येथील कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयामध्ये स्फोट घडवून आणण्याचा प्रयत्न ही ह ती. या गटाला पैशाचा पुरवठा म्यूनिक येथील नव–नाझी वृत्तपत्र **डॉयश्चे नाशियोनल झाय्टुग** याचा श्रीमंत प्रकाशक गेरहार्ड फ्रे याजकडून होत असतो.

पश्चिम जर्मन दहशतवाद्यांचे आणखी एक केन्द्र हॅम्बर्ग शहरी म्हणजे या राज्याच्या दुसऱ्या टोकाला आहे. त्याला म्हणतात. ॲक्शन फ्रंट ऑफ नॅशनल

सोशालिस्ट्स (**आक्शियोन कोन्ट नाशियोनालेर सोझियालिस्टेन**), याच्या अगोदर याने असा बहाणा केलेला होता की हन्सा युनियन फॉर द कॉंडक्ट ऑफ लीझर (**फ्राइझ ट्व्हेरौन हन्सा**) ही ती संस्था आहे. सदस्यांचा पोशाख काळा असतो (म्हणजे जुन्या एस्एस् गणवेशाचा रंग); त्यांच्याकडेही शस्त्रे व स्टील हेल्मेट्स असतात आणि ते बँकांवर दरोडे घालण्यात गुंतलेले असतात. त्यांच्या घोषणा व त्यांची गाणी म्हणजे "ऑस्वीसिम मुक्तता करते," "ज्यू लोकांची डोकी दिव्यांच्या शेड्साठी चामडी उपलब्ध करून देतात," "ऑस्वीसिम येथील आनंदाचे प्रसंग बंद पडत नाहीत, तिथल्या भट्ट्या लवकरच पेटायला लागतील." त्यांचा पुढारी मायकेल कूहनेन हा बुन्डेस्वेहरमधील माजी सैनिक आहे (१९७९ च्या नोव्हेंबर महिन्यात त्याला तुरुंगवास घडलेला होता).

ॲक्शन फ्रंटच्या मुख्य कार्यालयात एक "सुरक्षासेवा" आहे, ती कम्युनिस्ट नेते, लोकशाहीवादी मनोवृत्तीचे पोलिस अधिकारी व न्यायाधीश यांच्या याद्या तयार करते. कूहनेन एका खासगी संभाषणात म्हणाला की "या याद्या भविष्यकाळी आम्हाला निःसंशयपणे उपयोगी पडतील. आम्हाला लवकरच एक मोठे लढाऊ पथक तयार करता येईल. आम्हाला जरासा अवधी द्या." (जे. पोमोरिन आणि आर. जुंगे, **डायनिओनाझीज**, वेल्टक्रीस–व्हेर्लाग, डॉर्टमून्ड, १९७८, पृष्ठ ५७).

याच नमुन्याची तिसरी संघटना म्हणजे व्हीकिंग. ही वस्तुतः हिटलर यूथचे (**हिटलर जुगेन्डचे**) पुनरुज्जीवन आहे. हिचे सदस्य हिटलर जुगेन्डच्या वापरात होते त्यांच्यासारखेच करडे-हिरवे किंवा पिंगट अर्ध-लष्करी गणवेश वापरतात. त्यांनाही लष्करी शिक्षण मिळते आणि फॅसिस्ट-विरोधकांवरील हल्ल्यांमध्ये ते भाग घेतात. व्हीकिंगचे खास वैशिष्ट्य म्हणजे तरुण लोकांच्या मनांत किंबहुना लहान मुलांच्याही मनांत निर्घृणपणा बिंबवणे हे आहे. त्याची ब्रीदवाक्ये अशी आहेत: "जो नाश करतो त्याचा गौरव करा!" "सुरे लखलखू देत!" "रक्ताचे पाट धो धो वाहू देत!" "विली ब्रॅन्ड्टला ठार करा!" (विली ब्रॅन्ड्ट हा पश्चिम जर्मनीच्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष आहे.)

नव–नाझी युवक संघाकडून प्रसिद्ध होत असलेले मुखपत्र **मॅड्लर-जुगेन्ड** पुढील प्रकारची विधाने प्रसिद्ध करते: "जगाच्या पार्लमेंटामधून ते जी बडबड करत असतात ती म्हणजे पिंजऱ्यातली बदके कापली जाण्यापूर्वी आवाज करतात तशी असते."

पश्चिम जर्मनीतील अशाच प्रकारच्या संघटनांची यादी अशीच चालू ठेवता येईल, परंतु त्यांचे चित्र अगोदरच स्पष्ट झालेले आहे. ते सगळे गर्भावस्थेतले नवे गेस्टापो युनिट्स आहेत. हे तर खरेच आहे की एक दृष्टिकोन या नात्याने पश्चिम जर्मनीतील जनतेत आताच्या घडीला फॅसिझम जेवढा दुर्बल आहे तेवढा तो कधीच नव्हता. परंतु राष्ट्राच्या मनःशांतीमध्ये बिघाड घडवून आणणे आणि त्याचे आन्तर

राष्ट्रीय संबंध नेहमीसारखे व्हायला प्रतिबंध करणे याच नेमक्या उद्देशाने एस्एस् चे पुनरुज्जीवन करायचे आणि हिम्मलर्स व काल्टेन्ब्रुन्नर्स यांना पुन्हा जिवंत करायचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

पश्चिम जर्मनीतल्या या सगळ्या टोळ्या म्हणजे सध्याचे **संभाव्य** दहशतवादी गट आहेत असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्या पुढाऱ्यांना अशी उघडउघड खात्री वाटते की आपण आपल्या इटालियन समानधर्म्यांना मागे टाकून पुढे जाण्याची वेळ नक्कीच येणार आहे.

शिक्षा होण्यातून वाचलेल्या जुन्या एस्एस्वाल्यांविषयी म्हणाल तर आता ते आपले उर्वरित दिवस घालवत आहेत. तरी याच्याही अगोदर त्यांनी नाझींच्या पुनरुज्जीवनाला आपला हातभार लावलेला आहे.

युद्धानंतरच्या पश्चिम जर्मनीत त्यांना आपल्या जुन्या व्यवसायात व्यक्तिश: स्वत:ला गुंतवून घ्यायची हिंमत झाली नाही, याचे विशेष कारण म्हणजे त्यांच्यापैकी बहुतेकांना सरकारी पेन्शने मिळत होती. म्हणून त्यांना काय करता येत होते ? त्यांना एक पर्याय होता : एकतर राजकारण करायचे सोडून देणे, कुक्कुटपालनासारखा कसला तरी उद्योग पतकरणे आणि आपली दिवाळखोरी मान्य करणे (हे करण्यापेक्षा त्यानी स्वत:ला गळफास लावून घेणे अधिक पसंत केले असते), किंवा त्यांच्यापैकी अनेकजण जे करायला अजून समर्थ होते, त्याच्यावर लक्ष केंद्रित करणे–म्हणजे दहशतवादावर लक्ष केन्द्रित करणे, परंतु ते सुद्धा पश्चिम जर्मनीपासून शक्य तितक्या दूर अशा कुठल्यातरी ठिकाणी.

त्यावेळी, युद्धानंतर लवकरच, त्यांच्या नेत्यांपैकी एका गटाने (हिम्लरने रिक्रूट भरती केलेल्या काही बिनजर्मन राष्ट्रगटांतल्या लोकांचाही त्यात समावेश होता) एक खळबळ उडविणारी शक्कल काढली– **ती म्हणजे एस्एस्वाल्यांची निर्यात करणे**. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे इतर देशात आश्रय घेणे आणि साऱ्या युरोपखंडभर नव-फॅसिस्ट दहशतवादी शिकवून तयार करणे.

१९५३ सालाइतक्या मागच्या काळात लॉसेन येथील एका गुप्त अधिवेशनात त्यांनी न्यू ऑर्डर (एन्ओ) नामक मोठी आणि फारच क्रियाशील अशी आन्तरराष्ट्रीय संघटना स्थापन केली. मागाहून असे कळले की हिचे सदस्य हिटलर आणि मुसोलिनी यांना आपले संस्थापक पितामह मानत असत आणि कडवा वर्णद्वेष पुरस्कारत असत आणि कम्युनिझमचा नायनाट करायची हाक देत असत. न्यू ऑर्डरचे लढाऊ गट यंग युरोपियन लेजन या नावाने आपली कामगिरी करू लागले. यांच्या एकामागून एक काँग्रेसा विविध पश्चिम युरोपियन शहरांमध्ये भरविण्यात आल्या. पॅरिस येथे भरलेल्या काँग्रेसमध्ये भाग घेतलेल्या सगळ्यांनी मिळून "हॉर्स्ट वेस्सेल" हे नाझी राष्ट्रगीत म्हटले.

वृत्तपत्रांनी अशी बातमी दिली की संघटनेचा नेता गॅस्टन आमौद्रूझ हा स्विस

फॅसिस्ट होता. पण तो केवळ नाममात्र नेता होता. खरे संस्थापक व नेते हे अजून हयात असलेले हिम्मलरचे व हिटलरच्या लाडक्या ऑट्टो स्कोर्झेनीचे प्रमुख सहकारी होते.

न्यू ऑर्डरच्या गुप्त नेत्यांपैकी एकजण, किमानपक्षी प्रथम प्रथम तरी सुप्रसिद्ध बेल्जियन फॅसिस्ट खाटिक लिआँ देग्रेल्ले हाचा होता. सोविएत, जर्मन आघाडीवर कार्यरत असलेली एस्एस् मोटराइझ्ड ब्रिगेड **वालोनिएचे लेजन** हिचा हा कमांडर होता. जुन्या पिढीतल्या लोकांना हे आठवत असेल की देग्रेल्ले हा अशा एस्एस् राक्षसांपैकी होता की ज्यांना जीवनाचा सर्वोच्च अर्थ पाशवीपणातच दिसत होता. युद्धानंतर बेल्जियममध्ये त्याला प्राणदंडाची शिक्षा झाली आणि तो स्पेनमध्ये पळून गेला. तिथे त्याचा दोस्त आणि सहकारी ऑट्टो स्कोर्झेनी याच्या प्रमाणे फ्रँकोच्या पंखाखाली त्याने एक व्यापारी संस्था स्थापन केली. त्याचे वय बरेच झालेले होते तरी देखील ताज्या रक्ताच्या वासाशिवाय त्याला जगता येत नव्हते.

तेव्हापासून न्यू ऑर्डरमधील जुन्या एस्एस् वाल्यांनी आणि तत्सम संघटनांनी शिष्यांचा मोठा समुदाय शिकवून तयार केला. हा शिष्यगण त्याच्या गुरुंपेक्षा कोणत्याही बाबतीत वेगळा नव्हता. अपवाद फार तर त्यांच्या नव्या फॅसिस्ट शब्द-बंबाळपणात असेल. न्यू ऑर्डरच्या एका आंतरराष्ट्रीय मेळाव्यामध्ये पश्चिम जर्मनीतील नव-नाझी पक्ष हा त्या देशाचे आशास्थान म्हणून गौरविण्यात आला त्याला आर्य वंशाचे केंद्र व बालेकिल्ला असे संबोधण्यात आले. सडका भूतकाळ मरता मरत नाही.

न्यू ऑर्डरच्या शाखा अजूनही बेल्जियम, ऑस्ट्रिया व ग्रीस या देशांसकट विविध देशांमध्ये कार्यरत आहेत. फ्रान्समध्ये या संघटनेच्या सदस्यांनी केलेल्या अत्याचारां-नंतर हिच्यावर बंदी घालण्यात आली. इटलीमध्ये हिने बोलोग्ना येथे दहशत-वादाच्या रानटी कृत्यांमध्ये भाग घेतला. तिच्या सहकाऱ्यांमध्ये एक गुन्हेगार होता, तो खटला करून घ्यायचे टाळत असे. दुसरा पिनो राऊती हा खासदार होता. कित्येकदा माघारी घ्याव्या लागल्यानंतर न्यू ऑर्डरच्या इटालियन शाखेने, याच्या अगोदरच सांगितले आहे तदनुसार, आपले नांव "ब्लॅक ऑर्डर" असे बदलून घेतले.

अशा प्रकारे थर्ड राइशच्या एस्एस्वाल्यांनी आधुनिक पश्चिम युरोपमध्ये दह-शतवादाचा प्रसार करायला हातभार लावला. खुद्द पश्चिम जर्मनीत, जिथे कसलेल्या ब्लॅकशर्टसचे संख्याबळ ३,००,००० ते ४,००,००० आहे, तिथे ते सावधपणाने कार्यरत असतात. मात्र काहीजण तरुण लोकांना शिकून तयार व्हायला मदत करीत आहेत आणि ते "आपल्या कुशलतेचे त्यांच्याकडे हस्तांतर" करीत आहेत हे सर्वश्रुत आहे. कधी काळी जर पाश्चात्य साम्राज्यवादी शक्तींनी शांततेच्या व प्रगतीच्या शक्तींवर हल्ला करायचे धाडस केले, तर हे वयोवृद्ध लोक आपल्या

दहशतवादी सेवा खुद्द पश्चिम जर्मनीलाच देऊ करतील. दहशतवाद त्यांच्या रक्तातच आहे.

वायमार प्रजासत्ताकाच्या कालखंडामध्ये व्हर्सायच्या तहनाम्याच्या शर्तींनुसार जर्मनीचे लष्कर अगदीच लहान होते– १,००,००० मनुष्यबळ असलेले राईश्वेहर. परंतु त्याचवेळी एक बेकायदेशीर "ब्लॅक राईश्वेहर" तिथे अस्तित्वांत होते, त्याचे नेतृत्व चोरटचा जनरल हेड क्वार्टर्सकडे होते आणि त्याच्याच आधारावर हिटलरने मागाहून आपले प्रचंड वेहर माल्टर उभारले. याचसारखे काहीतरी पश्चिम जर्मनीतील नवनाझीवादाच्या संबंधात आजच्या घडीला घडत असलेले दिसते. अधिकृतरीत्या केवळ लहानशाच नव-नाझी संघटना अस्तित्वात आहेत. परंतु तीव्र राजकीय अरिष्ट कोसळल्यास साम्राज्यवादी नव-नाझींची खरीखुरी प्रचंड दहशतवादी संघटना उघडचावर आणू शकतील असे समजायला भरपूर कारणे आहेत.

३

ऱ्हाइन नदीच्या पैलतीरावर देखील काहीतरी शिजते आहे. नाझींनी युद्धकाळात चिरडून टाकलेल्या व छळवाद केलेल्या अनेक राष्ट्रांपैकी फ्रान्स हे एक राष्ट्र होते. याची आठवण अजूनही फ्रेंच जनतेच्या मनांत जिवंत आहे. असे असूनही फॅसिस्ट दहशतवादी तिथे देखील गुप्तपणे कामगिरी करीत आहेतच.

वीस वर्षांपूर्वी या देशाला ओएएसने (सीक्रेट आर्मी ऑर्गनायझेशनने) बंदुकीच्या धाकात ठेवलेले होते. ही लष्करी दहशतवादी संघटना फ्रेंच सेनापतींनी स्थापन केलेली होती. त्यांना काय वाटेल ते झाले तरी आल्जेरियावरील फ्रान्सचे वसाहती वर्चस्व कायम ठेवायला हवे होते. त्यांना सर्व रंगाचे ब्लॅक हंड्रेड ठग सामील झालेले होते– म्हणजे फॉरेन लेजनचे भाडोत्री सैनिक, काय वाटेल ते करायला तयार असलेले छत्रीधारी सैनिक, लष्करांतून पळून आलेले, आणि दारूगुत्तेवाले व कुंटणखाने चालविणारे. या ओएएसच्या पाठीशी स्थानिक प्रतिगामी भांडवलदार उभे होते– म्हणजे आल्जेरियांतून शक्य असेल तेवढे सगळे सुमारे शंभर वर्षे पिळून काढत असलेले उद्योगपती, जमीनदार व बँकर्स.

ओएएसने बाँबस्फोट, खुनाचे प्रयत्न, खून व बंडाळ्या घडवून आणण्यासाठी कट रचले. तिने आल्जेरियात वसाहत करून राहिलेल्या फ्रेंचांना जबरदस्तीने सत्ता बळकावायची हाक दिली. ते रस्त्यावर आले, त्यातले काहीजण शस्त्रसज्ज होते. "डि गॉलला फाशी द्या !" अशा घोषणा ते देत होते. (त्या वेळी जनरल डि गॉल राष्ट्रीय बंध विमोचन चळवळीबरोबर वाटाघाटी करत होते.) परंतु अवघ्या अर्ध्या तासानंतरच हा बंडावा फसला.

नंतरच्या काही दिवसांत आल्जेरियाच्या राजधानीत भर मध्यभागी मोठमोठ्या बाँबचे स्फोट झाले. भिंतीवर जाहीर पत्रके लावण्यात आली. त्यात म्हटले होते : "आम्हाला भूमिगत जाणे भाग पडले आहे...आल्जेरियांतील सगळ्या डि गॉल-वाद्यांच्या मध्ये आपण भयंकर भीति निर्माण केली पाहिजे. जिथे जिथे आम्ही त्यांचा नायनाट करू शकतो तिथे तिथे दयामाया न दाखवता आम्ही त्यांचा नायनाट करू."

हा कट फार काळ टिकला नाही. ओएएसवाल्यांनी हजारापेक्षा अधिक माणसे ठार मारली. खुद्द फ्रान्समध्ये जनरल डि गॉल यांच्या खुनाचे प्रयत्न तीस वेळा करण्यात आले. १९६२ साली ओएएसची वाताहत झाली. परंतु फॅसिस्ट दहशत-वाद संपला असा याचा अर्थ झाला काय ? अजिबात नाही.

ओएएसचे कार्यकर्ते फ्रेंच शहरांतून नाहीसे झाले नाहीत किंवा झोपीही गेले नाहीत. यानंतर लवकरच एक नवी दहशतवादी टोळी उदयास आली–माजी एस्एस्वाल्यांनी स्थापन केलेल्या न्यू ऑर्डर या आन्तरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेची ही शाखा होती. उरलेसुरले ओएएसवाले क्रियाशील कार्यकर्ते या टोळीत सामील झाले. रस्तोरस्ती चिथावणुकी, छापे, जाळपोळ, ज्यू विरोधी प्रचार –हे सगळे उपद्व्याप पुन्हा सुरू झाले. न्यू ऑर्डरच्या सदस्यांकडे लांबलचक लोखंडी ढाली होत्या, त्यानी भुवयांपर्यंत पोचणारी स्टील हेल्मेट्स घातलेली होती, आणि रस्तो-रस्ती मारामाऱ्या कशा करायच्या याचे डावपेंच शिकवून त्यांना तरबेज करण्यात आलेले होते. पुन्हा या दहशतीच्या मोहिमेसाठी कुणाकडून तरी पैशाची तरतूद होत होती.

फ्रान्समध्ये देखील तरूण लोकांना या मोहिमेत खेचून आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. भूमध्य समुद्रकाठचे शहर नाइस येथे " ज्यू लोकांना साबणाच्या धंद्यात धाडून द्या ! " ही घोषणा एका स्थानिक सभागृहात भिंतींवर दिसायला लागली. पॅरिस शहरी न्यू ऑर्डरने चिथावलेल्या एका चकमकीत कमीत कमी शंभर लोक जखमी झाले. १९७३ च्या जून महिन्यात सरकारने या संघटनेवर बंदी घातली. परंतु लगेच इतर संघटना उदयास आल्या.

१९७७ च्या सप्टेंबर महिन्यात पॅरिस शहरातील कम्युनिस्ट व सोशालिस्ट पक्षांच्या शालोन–सू–साओने व निप्रेस या ठिकाणांवर बाँब फेकण्यात आले. त्याचवेळी राजधानींत आगलावी हस्तपत्रके वाटण्यात येऊ लागली आणि नव-फॅसिस्टांचा जाहीरपणे धिक्कार ज्या लोकांनी केला त्यांना धमक्या देणारी पत्रे आली. हे सगळे काम अशा एका संघटनेचे असल्याचा पत्ता लागला, की जिने ओएएसच्या " विचारांचा " वारसा चालविलेला होता. ही संघटना म्हणजे पेइपर्स ब्रिगेड ही होती. युद्धकाळात फ्रान्समध्ये क्रियाशील असलेल्या एका एसएसवाल्या कर्नलचे नांव दिलेला हा गुप्त गट होता.

इतरही गट होते. त्यात फेडरेशन फॉर युरोपियन नॅशनल ॲक्शन (एफ्एएन्ई) याचा समावेश होता. तारीख ३ ऑक्टोबर १९८० रोजी पॅरिस शहरी रुए कोर्पनिकसवर एका बाँबचा स्फोट झाला, त्यात चार लोक ठार झाले आणि १५ जखमी झाले. त्या महिन्याच्या सुरुवातीला लागोपाठ तीन दिवस मार्सेलिस, नाइस व मॉन्त पॅलियेर या शहरी देखील दहशतवादी कृत्ये करण्यात आली. **ल ' हचूमानिते** या वृत्तपत्राने एक लांबलचक यादीच प्रसिद्ध केली. स्फोट, आगी लावण्याचे प्रकार आणि पुरोगामी संघटनांच्या कार्यालयांची आणि डाव्या गटाच्या राजकारण्यांच्या घरांची नासधूस हे अत्याचार या यादीत होते आणि हे सत्र कित्येक महिने चाललेले होते आणि करणाऱ्यांना शिक्षा मुळीच होत नाहीत. त्याच गोष्टीची पुन्हा

पुनरावृत्ती झाली. परंतु हे देखील पाण्यात बुडालेल्या बर्फाच्या डोंगरांचे नुसतेच वरचे टोक होते.

ओएएस व न्यू ऑर्डर यांच्या वारसदारांनी मोठ्या प्रमाणावर कामगिऱ्या करायची तयारी चालविलेली आहे आणि ते आपली वेळ यायची वाट बघत आहेत. त्यांच्या लेखी अंतःपर वसाहतवाद टिकवून ठेवण्याचा प्रश्न राहिलेला नाही. इंडो-चायना व उत्तर आफ्रिका या अतःपर फ्रेंच राजवटी राहिलेल्या नाहीत. परंतु फ्रान्समधील अति-उजवे लष्करवादी हे पडद्याआड राहिलेले आहेत. ते कामगार वर्गाचा आणि डाव्या गटाच्या बुद्धीजीवी वर्गाचा द्वेष करतात आणि त्यांना भितात. एखाद्या छान मुहूर्तावर ते खरोखरीची सत्ता बळकावण्याचा प्रयत्न कदाचित करतीलही. म्हणजे, उदाहरणार्थ, या दोहोपैकी एका परिस्थितीत. साम्राज्यवाद्यांनी जर आन्तरराष्ट्रीय परिस्थिती निकरावर आणली तर, किंवा संयुक्त डाव्या शक्तींनी जर प्रमुख सामाजिक व राजकीय सुधारणा अमलात आणल्या तर.

आजच्या घडीला फ्रान्समधील दहशतवादी पूर्वीइतक्या धीटपणाने आपल्या गुप्त स्थळांतून बाहेर येत नसतात, मात्र त्यांची सेल्स साऱ्या देशभर पसरलेली आहेत. त्याचप्रमाणे त्या अजब आणि दीर्घकाल हाल भोगत असलेल्या देशांतून "शुभ्र घोड्यांवर स्वार झालेले सेनापती" विलयालाही गेलेले नाहीत. उलटपक्षी फ्रान्समधील जनता आपला क्रांतिकारक भूतकाळ विसरलेली नाही. दहशतवाद्यांना तिचा हिशेब चुकता करणे टाळता येत नाही.

आता आपण जरा आणखी दूरवर पश्चिमेकडे, अटलांटिक महासागराच्या पलीकडे नजर टाकू या. अमेरिकन नेते असे दावे करतात की अमेरिकेत सामर्थ्यवान कम्युनिस्टविरोधी संघटना मुळी अस्तित्वातच नाहीत, आणि हे त्यांचे दावे सपशेल खोटे आहेत. त्या जरूर अस्तित्वात आहेत आणि मुख्य दहशतवादी संघटना, कु क्लक्स क्लान (केकेके) हिचे आता सुमारे ५०००० सदस्य आहेत –आणि ते सगळे शस्त्रसज्ज आहेत. (**हॉरिझोन्ट**, बर्लिन, अंक ५ वा, १९७९, पृष्ठ २५).

या क्लान संघटनेचा मेरीलँड येथील एक नेता १९७९ च्या सप्टेंबर महिन्यात एका सोविएत वृत्तपत्र प्रतिनिधीला म्हणाला की एक वांशिक युद्ध होणार आहे आणि त्यात काळचा लोकांचा नायनाट व्हायला हवा, कारण ते आफ्रिकेला परत जाऊ इच्छिणार नाहीत. ज्यू आणि कम्युनिस्ट यांचा देखील नायनाट केला पाहिजे, असे या नेत्याचे मत आहे.

क्लानकडे स्वतःचे लढवय्ये गट आहेत, त्याना गोळीबाराचे व स्फोटक पदार्थांचा वापर करायचे शिक्षण देण्यात आलेले आहे असे वृत्तपत्रे लिहितात. त्यांचे हे म्हणणे बरोबर आहे काय ? असा प्रश्न या वृत्तपत्र प्रतिनिधीने विचारला आणि यावर हा नेता उत्तरला: "आम्ही त्यांना शिकवून कशाला तयार करायचे ? पोलिसांना गोळीबार कसा करावा हे ठाऊकच असते आणि सैनिक स्फोटक पदार्थ हाताळू

शकतात. आणि हे दोघेही क्लान्समेनमध्ये असतात. अचूक गोळीवार करणारेही आमच्याकडे आहेत–ते म्हणजे विएतनाम युद्धातले अनुभवी सेवानिवृत्त सैनिक. होय, आमच्याकडे 'शॉक' गट आहेत." आणि यात भर म्हणून त्याने सांगितले: "आणि तुम्हाला मी एक सांगतो, आम्ही स्वस्थ बसत नसतो, आम्ही शस्त्रास्त्रांचा साठा करतो आहोत. रोजच्या रोज आम्ही नव्या सदस्यांची रिक्रूटभरती करतो आहोत. आमचे सदस्य संख्याबळे दरसाल दुप्पट होत आहे. आमचे सदस्य किती आहेत? हे मी तुम्हाला सांगू शकत नाही. ती गुप्त गोष्ट आहे. जीवनाच्या सगळ्या क्षेत्रातले लोक–अंगमेहनत करणाऱ्यांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत–आमचे सदस्य आहेत. त्यात व्यापारी आहेत, विद्यार्थी आहेत, वकील आहेत आणि डॉक्टर आहेत."

ही उर्मट खरीखुरी दहशतवादी संघटना नसेल तर दुसरे काय आहे?

क्लानची स्थापना १८६६ साली, म्हणजे जर्मनीत हिटलरचा पक्ष उदयास यायच्या अर्धे शतक अगोदर झाली, आणि म्हणून याची पाळेमुळे शुद्ध अमेरिकन आहेत. त्याकाळात नीग्रोंच्या विरुद्ध कत्तलखोर दंगली करणे हे या संघटनेचे खास वैशिष्टच होते. क्लानच्या सदस्यांच्या गुन्ह्यांचे राक्षसी स्वरूप –म्हणजे नीग्रोंचे खून करणे किंवा त्यांना मरेमरेतो मारहाण करणे– ध्यानात घेऊन क्लानवर कित्येकवेळा बंदी घालण्यात आली, परंतु शेवटी त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. एका प्रकारणी व्हिक्सबर्ग या शहरात क्लानवाल्यांनी २०० नीग्रोंची कत्तल केली. १९८० च्या डिसेंबर महिन्यात त्यांनी चिकागो येथे "कवाइती" केल्या, त्यात विद्यार्थ्यांवर हल्ले करायच्या आपल्या पद्धतींना त्यांनी परिपूर्णता आणली. लॉस एन्जेलीस शहरी त्यांनी ज्यू लोकांच्या एका स्मशानभूमीचा पावित्र्यभंग केला आणि ३०० पेक्षा स्मारक शिलांची विटंबना केली.

अलीकडील काही वर्षांमध्ये क्लानवाल्यांनी आपल्या वर्णद्वेषाला पिसाट कम्युनिस्टविरोधाची जोड दिली आहे, आणि अमेरिकन नाझी पक्षाशी ते संगनमताने कार्य करीत आहेत. क्लानवाल्यांची नावे गुप्त ठेवण्यात येतात, कारण त्यांच्यात अनेक सरकारी अधिकारी, लष्करी लोक, आणि तुरुंगाचे वॉर्डर्स यांचा समावेश आहे. अलीकडेच क्लानने अमेरिकन सेनादलांमध्ये शिरकाव केल्याचा बभ्रा झाला. उदाहरणार्थ, विमानवाहू युद्धनौका इंडिपेन्डन्स, कोलोरॅडो येथील लष्करी तळ, आणि "नमुनेदार आधिकारी" शिकवून तयार करणारी सुप्रसिद्ध वेस्ट पॉइंट मिलिटरी आकादेमी यांच्यामध्ये क्लानच्या शाखा आहेत.

तरुण लोकांमध्ये एक विस्तृत मोहीम देखील चालविण्यात येत आहे. **न्यूजवीक** या वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार १० ते १७ या वयोगटांतील मुलांच्यासाठी क्लानने खास शिबिरे प्रस्थापित केली आहेत आणि तिथे त्यांना क्लानचे "विचार" शिकविण्यात येतात आणि शस्त्रास्त्रांच्या वापराचे शिक्षण देण्यात येते. "आमची

शस्त्रे सशांची शिकार करण्यासाठी नाहीत, तर ती लोकांचा निकाल लावण्यासाठी आहेत" असे क्लानचा सर्वोच्च नेता बिल विल्किन्सन याने जाहीरपणे घोषित केले आहे. आजच्या घटकेपर्यंत तो फरारी आहे.

ज्यूडी एल्. पॉवेल हे ज्यावेळी अध्यक्ष कार्टर याचे प्रेस सेक्रेटरी होते त्यावेळी त्यांनी सांगितले की दक्षिण भागात त्याचप्रमाणे देशाच्या इतर भागांमध्ये क्लानचे पुनरुज्जीवन होत असलेले बघून अध्यक्षांना व अमेरिकन सरकारला चिंता वाटत आहे. परंतु या बाबतीत काहीतरी केले आहे काय ?

परलोकवासी मार्टिन लूथर किंग यांचे चळवळीतले एक सहकारी पॅस्टर सी. टी. व्हीव्हन यांनी असे विधान केले आहे, क्लान जिवंत आहे आणि मॅसेचुसेट्सपासून कॅलिफोर्नियापर्यंत अमेरिकेच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत त्याची भरभराट होत आहे आणि आपण खुशाल गुन्हे करू शकतो हे या गोऱ्या फॅसिस्ट गटाला ठाऊक आहे.

भांडवलदारी जगातल्या प्रमुख "लोकशाहीवादी" देशाच्या थेट बालेकिल्ल्यात कार्यरत असलेली ही नमुनेदार फॅसिस्ट संघटना नसेल तर ही काय आहे ?

अमेरिकेत आणखी एक कट्टर आतिउजवी संघटना आहे– ती म्हणजे जॉन बर्च सोसायटी. हिचे १,००,००० सदस्य आहेत असे म्हणतात. हिचा दबदबा कु क्लक्स क्लानपेक्षा किंचित "अधिक" आहे आणि बडचा धंदेवाल्यांवर व लष्करी वर्तुळावर हिचा प्रभाव आहे. "मोक्याच्या क्षणी" अमेरिकेत कडवी प्रतिगामी हुकुमशाही प्रस्थापित करण्याचा मार्ग मोकळा करणे असा या सोसायटीचा उद्देश असल्याचे उघड दिसते.

वर्णद्वेषाचा एक प्रकार या स्वरुपात फॅसिझमला अमेरिकेत खरीखुरी ऐतिहासिक पाळेमुळे होती. इंग्लंड हा देखील अँग्लो-सॅक्सन देश आहे, परंतु त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमि वेगळी आहे, आणि तिथली परिस्थिती सर्वस्वी वेगळी आहे. आपल्या "शांततापूर्ण" व सुस्थिर देशात दहशतवादी तर राहूदेतच पण बेतशीर आकाराच्या फॅसिस्ट संघटना एखाद्या दिवशी डोके वर काढतील या गोष्टीवर इंग्लंडातील फारच थोडचा लोकांचा विश्वास बसू शकेल. ऑस्वाल्ड मॉस्लेच्या गटाला त्याच्या काळात इंग्लंडमध्ये खोल पाळेमुळे रुजविण्यात अपयश आले. आज घडीला परिस्थिती अगदी वेगळेच वळण घेऊ लागली आहे.

उत्तर आर्यलंडमधील सरकारच्या निर्घृण दडपशाहीच्या इलाजांचा विचार बाजूला ठेवल्यास उघड दहशतवाद अजून इंग्लंडमध्ये बोकाळलेला नाही, परंतु तो लवकरच तसा होऊ शकेल. तशी अशुभ चिन्हे अगोदरच दिसत आहेत. दोन नव-फॅसिस्ट संघटना, ठसठशीत दहशतवादी प्रवृत्ती असलेल्या, जोडीजोडीने कार्यरत झालेल्या आहेत.

"नॅशनल सोशालिस्ट मूव्हमेंट" या नांवाच्या छोटचाशा गटातून उदयास

येऊन हा वर्णद्वेष्टा कम्युनिस्ट–विरोधी नॅशनल फ्रंट पक्ष इंग्लंडमधील शहरांच्या रस्तोरस्ती जबरदस्तीने पुढे सरसावत आहे, मात्र त्याला कॉमन्स सभेत शिरकाव करून घेण्यात अपयशच आलेले आहे. बिनगोऱ्या लोकांविरुद्ध कडाक्याची मोहीम हा फ्रंट चालवित असून साऱ्या देशभर हल्ले करायचा व चिथावणीखोर मोर्चे हा संघटित करीत आहे. १९८१ च्या मार्च महिन्यात या फ्रंटच्या सदस्यांनी लंडन येथील मार्क्सच्या स्मारकाची एका आठवड्यांत दोनदा विटंबना केली.

नॅशनल फ्रंटच्या बुलेटिन्समधून लोकशाही चळवळीत क्रियाशील असलेल्यांच्या, मुख्यत्वेकरून कम्युनिस्टांच्या, नावाच्या याद्या त्यांच्या पत्त्यांसह व टेलिफोन नंबरांसह प्रसिद्ध होतात. त्याचप्रमाणे कम्युनिस्टांविषयीची "माहिती" अगर त्यांचे फोटो पाठवा असे अवाहन ही बुलेटिन्स वाचकांना उद्देशून करतात. याच रीतीने हिटलरवाल्यांनी सत्तेवर यायच्या खूपच अगोदर आपल्या संभाव्य बळींची यादी केलेली असे.

नॅशनल फ्रंटचा नेता जॉन टिन्डाल हा आपण हिटलरचे अनुयायी असल्याची वस्तुस्थिती मुळीच गुप्त ठेवत नसतो. लंडनच्या **सन्डे मिरर** या वृत्तपत्राने लिहिले की नाझींच्या नव्या पिढीपासून इंग्लंड वाढत्या धोक्याला तोंड देत आहे. १९३० च्या दशकात हिटलर जसा सत्तेवर आला तशाच रीतीने नॅशनल फ्रंट सत्तेवर यायचा विचार करीत आहे. मजूर पक्षाचा प्रमुख सदस्य जॅक जोन्स याने म्हटलेच आहे की आजच्या घडीला नॅशनल फ्रंट हा इंग्रज फॅसिझमचा एक प्रकार आहे.

आणखी एक तितकाच आक्रमक गट म्हणजे "ब्रिटिश मूव्हमेंट" असे स्वतःला म्हणवणारा गट आहे. १९८१ च्या फेब्रुवारी महिन्यात अधिकृत **पोलीस रिव्हयू** मध्ये वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मदतीने मूव्हमेंटविषयी लिहिलेला एक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालाच्या लेखकांनी असा निष्कर्ष काढला की मूव्हमेंटच्या सदस्यांविषयी पोलिस स्टेशनामध्ये "नाझी म्हणून खेळ खेळणारी केवळ मुले" अशी जी विशिष्ट प्रतिक्रिया झालेली आहे ती चुकीची आहे आणि ती दुरुस्त करायला हवी (पाहा, **मॉर्निंग स्टार**, तारीख ६ फेब्रुवारी, १९८१, पृष्ठ १).

आपल्या सदस्यांनी गुप्तपणे शस्त्रसज्ज व्हावे, गणवेश वापरावेत, आणि इंग्रजांच्या प्रादेशिक सेनेमध्ये दाखल व्हावे हे या मूव्हमेंटला हवे आहे. पोलिसांनी दिलेल्या आकडेवार माहितीनुसार मूव्हमेंटचे सदस्य २,५०० ते ४,००० आहेत, तर तिचे मासिक **फिनिक्स** याने आपले ५०,००० वाचक असल्याचा दावा केला आहे. कु क्लक्स क्लानचा कित्ता गिरवून मुव्हमेंटचे गुंड बिनगोऱ्या लोकांवर हल्ले चढवितात. ब्रिटिश मुव्हमेंटचा सध्याचा प्रमुख डेरमॉट मायकेल मॅककाफ्लिन हा वांशिक द्वेषाला चिथावणी दिल्याबद्दल तुरुंगवास भोगलेला दाखलेवाला आहे.

शेवटची गोष्ट म्हणजे इंग्लंडमध्ये स्वत:ला "एसएस वोतान १८" असे म्हणवून घेणारा एक गट आहे आणि हा देखील बाँब हल्ले करतो इंग्रज एसएस वाल्यांनो ! ओसवाल्ड मॉस्लेला असली गोष्ट स्वप्नात देखील येऊ शकली नाही.

पूर्वीच्या काळी अनेक वेळा आणि अगदी अलीकडे देखील जवळ जवळ सगळे इंग्रज मजूर पक्षीय व हुजूर पक्षीय राजकारणी लोक आत्मसंतुष्टपणे असा दावा करीत असत की भले जुने इंग्लंड हे फॅसिझमसारख्या निंदास्पद घटितांचे साक्षी कधीही होणार नाही. इतिहास आपल्याला बरेच काही शिकवतो मात्र प्रत्येकजण त्याच्यापासून धडे घेतोच असे नाही, त्याचप्रमाणे ते हे धडे तावडतोब शिकत नाहीत. परंतु कधी कधी इतिहास हा निर्घृण शिक्षक असतो.

स्पॅनिश, पोर्तुगीज आणि ग्रीक फॅसिस्ट हे पुन्हा सामर्थ्य मिळवायला असमर्थ ठरतील असे समजले जात होते. आणि त्यांनीच अलीकडे हालचाल सुरु केली आहे. इतर ठिकाणातल्या प्रमाणेच स्पेन, पोर्तुगाल व ग्रीस या देशांतील नव-फॅसिस्ट संघटनांचे डावपेंच, सगळ्यात जास्त महत्वाची गोष्ट म्हणजे स्थानिक परिस्थिती नुसार निश्चित होतात, परंतु जवळ जवळ सर्वत्रच ते दहशतीचा अवलंब करतात.

१९८१ च्या फेब्रुवारी महिन्यात स्पेनमधील नवफॅसिस्टांचा संपूर्ण फजीतवाडा झाला. द न्यू फोर्स या त्यांच्या संघटनेचे निकटवर्ती असलेल्या लष्करवाद्यांनी केलेला कट इतक्या झटपट उघडकीस आला की पार्लमेंटची इमारत जरी ताब्यात घेण्यात आली होती तरी देखील दहशतवाद्यांना कसल्याही कत्तली करणे जमलेच नाही. मागाहून असे उघडकीस आले की कटाच्या अगोदर न्यू फोर्सचा नेता ब्लास पिनार याच्या नेतृत्वाखालील अति-उजव्याची एक सभा झालेली होती आणि तीत कृतीची तपशीलवार योजना आखलेली होती. त्याचवेळी सेनादलांनी एक गुप्त मिलिटरी पॅट्रिऑटिक अलायन्स स्थापन केलेली होती. राजाने जर पार्लमेंट बरखास्त करायला आणि "सेनापतींचे सरकार" स्थापन करायला नकार दिला, तर कटवाल्यांनी शस्त्रे हाती घ्यायची होती. १९७८ साली सत्ता बळकावणाऱ्यांचा नेता कर्नल तेजेरो मोलिना याने सरकारच्या प्रमुखाला पळवून न्यायच्या कटात भाग घेतलेला होता. त्याला शिक्षा झाली नाही. पुराव्यानिशी असे सिद्ध झाले की १९८१ च्या फेब्रुवारी महिन्यांत घडलेल्या सत्ता बळकावण्याच्या प्रकारांत भाग घेतलेली आणखी एक प्रमुख व्यक्ती म्हणजे लेफ्टनंट-जनरल जायमे मिलान्स डेल ब्रॉश्च, फ्रँकोच्या ब्ल्यूडिव्हिजनमध्ये व्हॉलंटियर म्हणून सामील होऊन दुसऱ्या जागतिक महायुद्धात सोविएत-जर्मन आघाडीवर लढलेला होता आणि त्याला नाझींचा आयर्न क्रॉस हा बहुमान मिळालेला होता.

माद्रिदचा सत्ता बळकावण्याचा प्रकार चिरडून टाकण्यात आला. परंतु आणखी तीन महिन्यांनी नव-फॅसिस्टानी आणखी एक हल्ला चढविला. त्यांच्या

एका टोळीने बार्सिलोना येथील सेंट्रल बँक ऑफ स्पेनच्या कार्यालयाचा ताबा घेतला आणि २०० हून अधिक लोकाना ३६ तास ओलीस ठेवून घेतले. माद्रिदच्या कटवाल्यांच्या मुक्ततेची त्यांनी मागणी केली. हा प्रयत्नही अपेशी ठरला. परंतु उद्या ते आणखी काय करतील हे कुणास ठाऊक ?

मागाहून असे माहीत झाले की लिबरेशन आर्मी ऑफ पोर्तुगाल (एल्एपी) आणि डेमोक्रॅटिक मूव्हमेंट फॉर द लिबरेशन ऑफ पोर्तुगाल या पोर्तुगीज वसाहतीतील लष्करात सैनिक व अधिकारी बहुतांशाने असलेल्या दहशतवादी संघटनांच्या पोर्तुगीज नवफॅसिस्टांनी स्पॅनिश कटवाल्यांशी संगनमत करायचे होते. माद्रिदचा कटाचा प्रकार जर यशस्वी झाला तर पोर्तुगालमध्ये उठाव करायची योजना आखलेली होती हा प्रयत्नही लांबणीवर टाकणे भाग पडले.

ऑर्गनायझेशन ऑफ नॅशनल रिव्हायव्हल ही संघटना ग्रीसमध्ये उदयास आली होती. दोन वर्षांच्या अवधीत हिने अथेन्स शहरात ७० बाँबस्फोट घडवून आणले आणि " ब्लॅक कर्नलत्सची " राजवट पूर्वपदावर आणायचा प्रयत्न केला.

ऑस्ट्रियासारख्या छोट्या व वरकरणी शान्ततापूर्ण देशामध्ये देखील सोशालिस्ट नियतकालिक **झुकून्फ्ट** यांत आलेल्या बातमीनुसार स्थानिक नक्ताझींनी ऑस्ट्रियन पंतप्रधान व राष्ट्रप्रमुख यांचे खून करायची धमकी दिली. कारण शीतयुद्धाला त्यांचा विरोध होता आणि त्यांनी आपल्या भाषणांत युरोपियन सुरक्षिततेला अनुकूलता दर्शविली होती. त्यांचा धिक्कार करायला नव–नाझींना ही कारणे पुरेशी होती. ऑस्ट्रियातल्या नव–नाझींनी फेडरल जिम्नास्टिक अलायन्स (ओस्टरएइखिश्चेर टूर्ने बुंन्ड) ह्या निरुपद्रवी संस्थेच्या नांवाने अलिकडेच कसल्यातरी उपद्व्यापाची तयारी चालविलेली होती.

नॉर्वेमध्ये एकाकाळी क्विस्लिंगने बराच गदारोळ माजवला होता. त्या देशांत १९८१ च्या वसंत ऋतूत एक गुप्त दहशतवादी संघटना उघडकीस आली. तिने लोकशाहीवाद्यांना ठार मारायसाठी त्यांची एक यादी तयार केलेली होती आणि विश्वासघाताच्या संशयावरुन तिने स्वतःच्याच दोन सदस्यांना गोळ्या घालून ठार मारले. बेल्जियमच्या नव–नाझी संघटनेचे नाव आहे फ्लेमिश मिलिटरी ऑर्डर तिच्या नेतृत्वपदी "फूहरेर" बी. एरिक्सन हा आहे. तिचे सदस्य काळा गणवेश वापरतात, हिंसाचारी कृतीचा अवलंब करतात. आणि इतर देशांतल्या नव-फॅसिस्ट संघटनांशी निकटचे लागेबांधे ठेवतात. १९८१ च्या मे महिन्यात ऑर्डरच्या सदस्यांना कोर्टात खेचण्यात आले, परंतु त्यांना शिक्षा देण्यात आल्या नाहीत.

अलिकडेपर्यंत टर्कीतील परिस्थिती कितीतरी अधिक गंभीर होती. १९८० च्या दशकारंभी तिथल्या बेकारांचे संख्याबळ पन्नास लाख होते. आशियाई लुम्पेन प्रोलेतारियन्सच्या सेवा नव-फॅसिस्ट आणि पॅन–टर्किश नॅशनॅलिस्ट ॲक्शन पार्टी (एन. ए. पी.) उपयोगात आणत असत. यांनी काही थोड्या वर्षांच्या

अवधीत सुमारे ७०० राजकीय खून केले. त्यांत प्रमुख ट्रेड युनियन नेता केमाल त्यूएक्लेर हाही वळी पडला. या संघटनेचा उद्देश अचानक सत्ता बळकावणे आणि आपला फ्हरेर कर्नल तुर्कस याला हुकुमशहा करणे हा होता. पूर्वीच्या काळात त्याची हिटलरवाद्यांशी दोस्ती होती. हा प्रयत्न यशस्वी झाला असता तर काळा समुद्र व भुमध्यसमुद्र यांच्या किनाऱ्यांवर एक फॅसिस्ट बालेकिल्ला निर्माण झाला असता. ब्लँक इंटरनॅशनलच्या वर्तुळात या साहसाला आत्यंतिक महत्व देण्यात आले होते. आपण पाहिले आहे तदनुसार यांचा बेत भूमध्य समुद्राच्या प्रदेशाच्या इतर भागांमध्ये देखील अशाच प्रकारचे बालेकिल्ले निर्माण करणे हा होता.

नॅशनॅलिस्ट ॲक्शन पार्टीचे लोक वेगवेगळ्या सरकारी खात्यांमध्ये, पोलिसांत, लष्करांत आणि कोर्टांतून होते. तिने व्यापारी जगाशीही संपर्क ठेवला होता. तसाच इतर देशांतल्या नव–फॅसिस्ट संघटनांशी आणि अमेरिकन सीआयएशी या संस्थेचा संपर्क होता. तिने युवकाना सशस्त्र चिथावणुकीची कृत्ये करण्यासाठी भडकावले आणि खून करायच्या व्यक्तींच्या याद्या तयार केल्या. टर्किश लष्कराने हस्तक्षेप करुन सत्ताधारी झाल्यावर उजव्या व डाव्या अशा दोन्ही अतिरेकी संघटनांवर बंदी घातली आणि त्यामुळेच आन्तरराष्ट्रीय फॅसिस्ट कार्यालयाच्या काळ्या समुद्राबाबतच्या योजना अमलात आणायला प्रतिबंध झाला.

तारीख १३ मे १९८१ रोजी एन्. ए. पी. चा सदस्य मेहमेत अली आग्सा याने पोप जॉन पॉल दुसरे यांचा खून करायचा प्रयत्न केला. याच्या पूर्वी १९७१ च्या फेब्रुवारी महिन्यात त्याने उदारमतवादी वृत्तपत्र **मिल्लियत** याचे संपादक अबदी इपेक्सी यांचा खून केला होता आणि त्याबद्दल त्याला प्राणदंडाची शिक्षा झालेली होती. परंतु शिक्षेची अंमलबजावणी व्हायच्या कित्येक दिवस अगोदर तो इस्तंबूलच्या तुरुंगातून ' रहस्यमय " स्थितीत पळून गेला. त्याचा मागमूस पुढे स्पेन, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, डेन्मार्क, बेल्जियम या देशांत लागला होता. इटलीत तो–नवफॅसिस्ट दहशतवादी संघटनांच्या काही सदस्यांना भेटला. तो जिथे जायचा तिथे भरमसाट पैसे खर्चायचा.

अरब देशांमध्ये पुरोगाम्यांवर मॉस्लेम ब्रदर्स संघटनेकडून दहशती घालायचे प्रकार चालू आहेत. मध्यपूर्वेत दहशतवादाचा जो उद्रेक होतोय तो योगायोगाचा प्रकार नव्हे त्याला सातासमुद्रापलीकडून उत्तेजन मिळत आहे.

आशिया खंडाच्या दुसऱ्या टोकाला, जपानमध्ये, नव–फॅसिस्ट हे " लढाऊ " वाहनातून राजधानीच्या रस्तोरस्ती रपेट करतात आणि सोविएत संघराज्याविरुद्ध देशाला ताबडतोब शस्त्रसज्ज केले पाहिजे अशी मागणी करतात. या कामगिरीसाठी जपानच्या या भावी एसएसवाल्यांना तासावर मजुरी मिळते. त्यांच्या संघटनांचे ३०,००० सदस्य आहेत आणि त्यांतले अनेक लुम्पेन प्रोलेतारियन्स आहेत. जगाच्या त्या भागातील घडामोडीमध्ये आशियाई लुम्पेन प्रोलेतारियतच्या भूमिकेचा आणखी अधिक अभ्यास व्हायला हवा.

आणि आफ्रिका देखील नव–फॅसिस्ट दहशतवादाच्या तावडीतून सुटलेली नाही. आफ्रिकेतील नव–फॅसिस्टांचे केन्द्र दक्षिण आफ्रिकेच्या प्रजासत्ताकात आहे ही गोष्ट सर्वश्रुत आहे. त्यांच्या सगळ्या कृतीवर ब्रोएडेरबाँड या संस्थेचे नियंत्रण असते. ही सँस्था सरकारशी निकटपणे संबंधित आहे आणि ही हिटलरवाद्यांशी निकटपणे संबंधित होती, हिची सध्याची घोषणा म्हणजे " दक्षिण आफ्रिकेला उदारमतवादापासून व कम्युनिझमपासून वाचवा" ही आहे. ब्रोएडरबाँडचा संबंध विट कमांडो या गुप्त दहशतवादी गटाशी आहे. या गटानेच वंशवादाविरुद्ध उघडपणे बोलणाऱ्या वाय. लॉम्बर्डी या शिक्षकाला ठार मारायच्या उद्देशाने १९८० च्या सप्टेंबर महिन्यात प्रिटोरिया विद्यापीठात एका टाईम वॉम्बचा स्फोट केला होता.

या खुनाच्या प्रयत्नानंतर या टोळीच्या नेत्यांनी वृत्तपत्राच्या कार्यालयाकडे जे पत्र धाडले त्यात "वांशिक एकात्मतेला उत्तेजन देऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींच्या व संस्थांच्या" कामगिरीला आळा घालण्याचा आणि "आवश्यक वाटल्यास त्यांचा नायनाट करण्याचा" आपला उद्देश त्यांनी मनमोकळेपणाने सांगितलेला होता. पश्चिम युरोपातील ब्लॅक इंटरनॅशनलवाल्या दहतवाद्यांच्या वापरातलीच ही भाषा आहे आणि यांच्याशी ब्रोएडेरबाँडचे फार पूर्वीपासूनच थेट संपर्क चालत आले आहेत.

१९८० सालापर्यंत वंशवाद्यांना विरोध करणाऱ्यांना ठार मारण्याची आणि त्यांची घरे पेटवून देण्याची १००० पेक्षा अधिक प्रकरणे दक्षिण आफ्रिकेत नोंदविण्यात आली होती. अमेरिकेच्या नॅशनल लॉयर्स गिल्डच्या आन्तरराष्ट्रीय कमिशनचे सदस्य जॉर्जश्वेर यांनी अलीकडेच असे जाहीर केले की अमेरिकेच्या आफ्रिकेतील धोरणाचा उद्देश " दहशतवाद भडकावणे " हा आहे. याच्या भरीला त्यानी असे सांगितले की अमेरिकेत व पश्चिम युरोपात भाडयाने कामाला लावलेले मारेकरी हे जगण्याचा हक्क या प्रमुख मानवी हक्काची पायमल्ली करीत आहेत.

पश्चिम युरोप, उत्तर अमेरिका, आशिया आणि आफ्रिका या खंडातील रक्तपाताविषयी आपण सांगितले आहे. परंतु अलीकडील काही वर्षांच्या अवधीत नव-फॅसिस्ट दहशतवाद्यांनी लॅटिन अमेरिकेत जेवढे रक्त सांडले आहे तेवढे त्यानी बहुधा जगात अन्यत्र कुठेही सांडलेले नाही. तिकडून आलेले अहवाल गात्रे बधिर करणारे आहेत ह्या उपखंडात सर्वत्र सतत तडाखे देण्याचे सत्र चाललेले आहे. क्यूबा हा आपल्या स्वतःच्या समाजसत्तावादी समाजपद्धतीचे रक्षण करीत आलेला अपवाद म्हणून वगळल्यास लॅटिन अमेरिकेचे सगळे देश कटकारस्थाने, खून आणि चिथावणुकी या प्रकारांचे साक्षी झालेले आहेत. हे सत्र अनेक वर्षे चालू आहे.

चिलीमध्ये **पॅत्रिया उलिबेर्ताद** या दहशतवादी संघटनेने पिनोशेतसाठी मार्ग मोकळा करुन दिला. अगदी अलिकडेच पिनोशेत म्हणाला : "घातपाती कामगिऱ्यांचा नायनाट करण्यासाठी कोणत्याही इलाजांचा अवलंब करण्याची आमची तयारी आहे." इथे "घातपाती कामगिऱ्या " म्हणजे "फॅसिस्टविरोधी कामगिऱ्या'

असा अर्थ घ्यायचा. "कोणतेही इलाज" याचा अर्थ पिनोशेत काम करतो हे प्रत्येक चिलियन नागरिकाला ठाऊक आहे.

याच्याच सारखे काहीतरी साल्वादोरमध्ये घडत आहे. हा जेमतेम चाळीस लाखाहून अधिक येवढी लोकसंख्या असलेला छोटा देश आहे. तिच्यातले ९९ टक्के मेती व इटालीयन आहेत. त्यातले गोरे केवळ एक टक्का आहेत. इथे देखील क्रियाशील दहशतवादी संघटना आहेत–त्या म्हणजे डेथ स्क्वाड्स, नॅशनॅलिस्ट डेमोक्रॅटिक ऑर्गनायझेशन (ओआरडीईएन), व्हाइटहॅंड, आणि अँव्हेन्जिंग एन्जल्स १९८० साली व्हाइटहँडचा नेता रॉबेर्टो द' ऑबुइस्सॉन याने साल्वादोरन धर्मपीठाचे प्रमुख आर्चबिशप ऑस्कर आर्नुल्फो रोमेरो यांना मानवी हक्कांचा पुरस्कार केल्याबद्दल ठार मारले. १९८० च्या डिसेंबर महिन्यांत एका 'अँव्हेंजिंग एन्जल'ने **न्यूजवीकच्या** प्रतिनिधीला सांगितले की " इतिहासावरून आम्हाला जे ठाऊक झाले आहे ते म्हणजे, डाव्यांवर नियंत्रण ठेवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांचा नायनाट करणे हाच आहे"(**न्यूजवीक** तारीख ५ जानेवारी १९८१, पृष्ठ ४१). या प्रतिनिधीने लिहिले आहे की एकटचा १९८० साली " रानटी आणि बेलगाम दहशतवादाने" १०,००० साल्वादोरन लोकांचे प्राण घेतले. **वॉशिंग्टन पोस्टने** अशी खातरजमा करुन दिली की साल्वादोरमध्ये राजकीय खुनांचे सत्र "नेहमीच्या पातळीवर" म्हणजे सालिना १०,००० या प्रमाणात चालू आहे आणि रोजच्या रोज अमेरिकनधार्जिण्या टोळक्याचे सैनिक व पोलीस यांच्याकडून सरासरी १० ते १५ लोक ठार होतात. द ऑबुईस्सॉन याच्या दहशतवादी टोळचांच्या एका प्रमुखाने असे जाहीर केले की " १९३२ साली जर ३२,००० शेतकऱ्यांचा नायनाट करुन आम्हाला एक उठाव दडपून टाकता आला, तर आज देखील आम्ही हे करू शकतो, मग त्यासाठी आम्हाला १,००,००० चा नायनाट करावा लागला तरी चालेल."

शेजारच्या ग्वाटेमालामध्यें देखील असेच अत्याचार करण्यात येत आहेत. **चिकागो ट्रिब्यूनच्या** म्हणण्यानुसार १९८० साली अमेरिका–धार्जिणा हुकमशहा जनरल लुकास गार्सिया यांच्या टोळचांनी ३११ शेतकरी नेते, १०० ट्रेड युनियन कार्यकर्ते, २२१ शालेय शिक्षक, ८९ उच्च शैक्षणिक संस्थाचे शिक्षक, ३८९ विद्यार्थी, १८ पत्रकार आणि चार धर्मगुरु ठार केले. ज्यांना अटक झाली त्यांच्यापैकी एकही कधीही परत आला नाही. १९८१ साली डझनावारी देशभक्त तुरुंगात नष्ट होत राहिले. मारेकरी हे व्हाइट हँड संघटनेचे फॅसिस्ट आहेत. ज्यांना ते पकडतात, त्यांचे ते हाल हाल करतात आणि त्यांची प्रेते गटारात फेकून देतात किंवा शांत झालेल्या ज्वालामुखीच्या खड्डचामध्ये फेकून देतात. युरुग्वेमध्ये खुनाखुनी करण्याचे काम नॅशनल रिस्टोरेशन मुव्हमेंटच्या गळेकापूंकडून होत असते. आर्जेन्टिनामध्ये हजारो लोकांना ठार करण्यात आले आहे किंवा ते " नाहीसे झाले "

आहेत. ब्राझीलमध्ये अति-उजव्या दहशतवादी टोळ्या पुरोगामी वृत्तपत्रांच्या कार्यालयात आणि सार्वजनिक ठिकाणी बाँब-स्फोट करतात.

पश्चिम युरोपातील नव-फॅसिस्ट दहशतवाद्यांना बहुधा आपल्या लॅटिन अमेरिकन कॉमरेड्सचा हेवा वाटत असावा. "अॅव्हेन्जिंग एन्जल्स," "डेथ स्क्वाड्स" आणि "व्हाइट हँड" यांसारखी नावे हताश युवकांना आकर्षक वाटत असली तरी ही नावे स्वतःसाठी घ्यायची त्यांना हिंमत होत नाही. आपण घेतलेल्या बळींची प्रेते फेकून द्यायला शान्त झालेले ज्वालामुखी त्यांच्याकडे गुळीच नाहीत. फॅसिस्ट दहशतवाद हा लॅटिन अमेरिकेत येवढा का बोकाळलेला आहे हे विचारणे योग्य ठरावे.

मुख्य कारण उघड उघड हे आहे की आपल्या शेजारचे उपखंड डावीकडे झुकत असल्याच्या संभाव्यता बघून अमेरिकन साम्राज्यशाही घाबरली आहे आणि तिच्या हस्तकांचा येट पाठिंबा असल्या दहशतवादाला मिळालेला आहे. अलीकडील काही वर्षांच्या अवधीत अवघी लॅटिन अमेरिका सत्ता बळकावून राहिलेल्या किंवा सत्ता बळकावयाच्या तयारीत असलेल्या लष्करी हुकुमशहाच्या विरुद्ध जनतेच्या चळवळी फोफावत असलेली पाहत आहे आणि सीआयएला या गोष्टीला तोंड देणे भाग पडत आहे. या कारणास्तव जी योजना अंमलात आणली जात आहे ती ही आहे : हुकुमशहांच्या व दहशतवाद्यांच्या मदतीने सगळ्या दक्षिण अमेरिकाभर काळीकुट्ट प्रतिगामी सत्ता प्रस्थापित करायची आणि आवश्यक वाटल्यास अमेरिकेच्या जोडीला ती इतर खंडाच्या विरोधात उभी करायची.

असे असूनही नवफॅसिस्ट दहशतवाद्यांचे मुख्य कार्यक्षेत्र युरोपमध्ये आहे. याच खंडात सोविएत संघराज्याच्या नेतृत्वाखालील समाजसत्तावादी राष्ट्रकुटुंबातील प्रमुख राज्ये वास्तव्य करून आहेत आणि याच खंडाच्या हाती आज जागतिक इतिहासाची गुरुकिल्ली आहे.

आमच्या यादीत इतर कित्येक दहशतवादी संघटनांची भर आम्ही घालू शकतो. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियामध्ये क्रोएशियन उस्ताची (लुटारू) यांनी खून करायच्या योजना तयार करणे चालू ठेवले आहे. यांचा माजी फूहरेर आन्ते पावेलिक हा आपल्या अपूर्व "ठेव्याच्या" बढाया मारत असे. हा 'ठेवा" म्हणजे छळछावण्यातील कैद्यांच्या डोळ्यांचा चेंडू तयार केलेला होता.

आणखी एक मुद्दा आम्ही सांगायला हवा. वेगवेगळ्या देशांमध्ये कार्यरत असलेल्या दहशतवादी फॅसिस्ट टोळ्यांचे एकमेकीशी लागेबांधे निःसंशयपणे आहेत. १९६९ च्या उत्तरार्धात युरोपमधील दोन प्रमुख नव-फॅसिस्ट संघटनांनी- म्हणजे इटालियन सोशल मूव्हमेंट (आयएसएम) आणि नव-नाझी न्यू ऑर्डर यांनी आपसात समझोता घडवून आणला. या संयुक्त संघात ग्रीसमधील फॅसिस्ट संघटना (या साखळीतला आणखी एक प्रमुख दुवा) आणि इतर काही देशातल्या फॅसिस्ट संघटना सामील झाल्या. हिटलर आणि मुसोलिनी यांचे वारसदार हे आंतरराष्ट्रीय

नव–फॅसिझमचा प्रमुख कोण व्हावा याविषयी बराच काळ मतभेद दर्शवित होते. त्यांनी आता हातमिळवणी केली आहे. अशा प्रकारे आक्रमक ब्लॅक इंटरनॅशनलचा पाया घालण्यात आला

न्यू ऑर्डरचे फ्रेंच मुखपत्र **इलाइते युरोपियेन्ने** याने याविषयी लिहिले : "उद्याची मातृभूमी म्हणजे अटलांटिक महासागरापासून पूर्वेच्या उंबरठ्यापर्यंतचा पश्चिम युरोप ही आहे. इटालियन सोशल मुव्हमेंटचे सदस्य, स्पॅनिश फॅलॅन्जिस्ट, ग्रीक कर्नल्स आणि एन्डीपीचे सदस्य असलेले जर्मन विद्यार्थी हे आम्ही घेतो तीच भूमिका घेतात." तेव्हांपासून दहशतवादी कृतीचा एकसूत्री कार्यक्रम आखण्यासाठी कित्येक आन्तरराष्ट्रीय फॅसिस्ट परिषदा भरविण्यात आल्या. आजच्या घडीला रक्तपाती ब्लॅक इंटरनॅशनल निश्चितपणे वास्तवात आली आहे. आणि सनसनाटी बातम्या शोधणाऱ्या पत्रकारांच्या कल्पनेतली कसलीतरी गोष्ट ती राहिलेली नाही.

आजच्या घडीच्या फॅसिझमच्या भयानक कृत्यांच्या व कारवायांच्या या हकीकती काही लोकाना बहुधा वाचायला जड जाण्याचा संभव आहे. परंतु हे सत्य आहे आणि प्रत्येकाने याची माहिती घ्यायला हवी. आपल्या पुढ्यांत कोणता धोका वाढून ठेवलेला आहे हे जनतेला माहीत व्हायला हवे. १९३० च्या व १९४० च्या दशकांतल्या शोकांतिकांची पुनरावृत्ती आजच्या काळात आपण होऊ देता कामा नये.

अति–उजवे धमाल उडवून राहिले आहेत. नव-फॅसिस्ट दहशतवाद हा साऱ्या भांडवलदारी जगामध्ये अतिडाव्या दहशतवादाच्यापेक्षा अधिक झपाट्याने पसरत असलेला आपण बघतो आहोत. परंतु सध्याच्या घडीला दोहोंचीही वाढ होत आहे आणि दोहोनाही अनेक बाबतीत सारखेच असे सामाजिक आधार आहेत हे मुळीच नाकारता येत नाही.

प्रकरण सहावे

शुभ्र घोड्यांवर स्वार झालेले सेनापती

१.

पाचव्या प्रकरणात आम्ही असा प्रश्न उपस्थित केला की आजचे फॅसिस्ट वाढत्या प्रमाणात दहशतवादी कामगिऱ्यामध्यें कां गुंतून राहिले आहेत. आम्ही असे दाखवून दिले की त्यांचे कत्तलखोर गट भांडवलदारी जगामध्ये जवळ जवळ सर्वत्र क्रियाशील आहेत किंवा नवें तयार करण्यात येत आहेत खास करून दहशतवादावर ते आपल्या आशांची मदार कां ठेवतात?

आम्ही या प्रश्नाचे उत्तर द्यायच्या नजीक येऊन ठेपलो आहोत. मुख्य गोष्ट ही आहे की हिटलर आणि मुसोलिनी यांच्या अमदानीत फॅसिझम ज्या स्वरुपात अस्तित्वात होता त्या स्वरूपात बदल व्हायच्या आणि **लष्करी फॅसिझम** व्हायच्या अवस्थेतून फॅसिझम आमच्या काळात जात आहे. टिकून राहण्यासाठी त्याला पतकरता येण्याजोगा हाच एकमेव मार्ग आहे.

नव्या फॅसिस्टांचे ध्येय जे जुन्या फॅसिस्टांचे होते तेच आहे. ते म्हणजे जिथे तिथे सत्ता बळकावणे. परंतु युद्धापूर्वी आणि युद्धाच्या काळात जसे सामुदायिक फॅसिस्ट पक्ष होते तसे आज मुळीच नाहीत. आणि इटलीमध्ये देखील, जिथे, विशेषत: देशाच्या मागासलेल्या दक्षिण भागात, प्रभावशाली असलेला मोठा फॅसिस्ट पक्ष आहे, तिथे देखील कम्युनिस्ट पक्ष हा मनुष्यबळात सहापट मोठा आहे आणि फॅटिस्ट हे जाणून आहेत की आपण जर बाहेरच्या मदतीशिवाय एकट्यानेच कृती केली तर आपल्यावर भलताच प्रसंग येऊ शकेल.

इतर देशांमध्ये नव–फॅसिस्ट भलतेच दुर्बल आहेत. पश्चिम जर्मनीत गेल्या पार्लमेंटरी निवडणुकीत नव–नाझी एन्डीपीला अवघी ०.६ टक्के मते पडली. फ्रान्समधील अति–उजव्या नॅशनल फ्रंटने १९७८ च्या निवडणुकीत एक टक्क्यापेक्षा कमी मते गोळा केली. इंग्लंडच्या त्याच नावाच्या वर्णद्वेष्टचा पक्षाचे ४०,००० ते ५०,००० सदस्य आहेत; अमेरिकेतल्या कु क्लुक्स क्लानचे जवळ जवळ तितकेच सदस्य आहेत, तर अमेरिकन नॅशनल सोशालिस्ट व्हाईट पीपल्स पार्टीचे अवघे काही शेकडे सदस्य आहेत.

हे पक्ष स्वतःच्या हिंमतीवर सत्ता जिंकू शकत नाहीत. भांडवलदारी जगामध्ये अधिक सामर्थ्यशाली पदांवर असलेल्या व चैतन्य आणि महत्त्वाकांक्षा या बाबतीत त्यांच्या निकटवर्ती असलेल्या इतर शक्तींच्या कर्तृत्वामार्फतच ते सत्तेवर येऊ शकतात.

या शक्ती म्हणजे तथाकथित "शुभ्र घोड्यांवर स्वार झालेले सेनापती"– उच्च पदस्थ लष्करी अधिकारी, सशस्त्र फौजांच्या मदतीने स्वतःची हुकुमशाही प्रस्थापित करायच्या संधीची वाट बघत असलेले; अरिष्टाने हैराण झालेल्य भांडवलदारी देशांना "सुव्यवस्था आणून द्यायला" आणि राज्य यंत्रणेत सगळ्या मोक्याच्या जागा बळकावायला ते टपलेले आहेत. आणि अशा प्रकारे ते लष्करी फॅसिझमचे प्रणेते होत.

या लष्करी गटांवर आपण नीट नजर ठेवली पाहिजे. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर यांचा प्रभाव बराच वाढलेला आहे आणि तो बहुधा वाढतच राहील.

असले गट जिथे वर्गलढा तीव्रतेची उच्च पातळी गाठून राहिलेला आहे अशा सगळ्या भांडवलदारी देशांमध्ये अस्तित्वात आहेत. आत्यंतिक उजव्या गटाचा मतांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा त्यांच्यामध्ये भरणा असतो. स्थानिक परिस्थितीनुसार त्यांनी वेगवेगळे ध्वज धारण केलेले असतात. कधी कधी लष्करी अधिकाऱ्यांचा हा विभाग सखोल पाळेमुळे असलेल्या भांडवलदारी राजवटीपासून उघडपणे फटकून दूर होतो आणि बंडाचा मार्ग अंगिकारतो. फ्रान्समध्ये ओएएसने केले, ग्रीसमध्ये 'ब्लॅक कर्नल्सनी' केले, चिलीमध्ये पिनोशेत टोळक्याने केले, पाकिस्तानात जनरल झिया उल हक याच्या गटाने केले, आणि स्पेनमध्ये जनरल्स डेल बॉश्च आणि आरमाडा यांच्या टोळक्याने केले त्याप्रमाणे. तथापि अनेकदा आपले लष्करी गट त्या त्या देशातल्या जनरल हेड क्वार्टरच्या आसपास कुठेतरी दबा धरुन असतात आणि भांडवलदारी लोकशाही राजवटीपासून संपूर्णपणे फटकून निघण्याच्या क्षणापर्यन्त सावधपणे वर्तन ठेवतात.

दोन्ही बाबतीत प्रमुख इसम हे कडवे कम्युनिस्ट–विरोधक असलेले जनरल्स आणि कर्नल्स, सेवानिवृत्त गुप्तहेर, विमानदलातले वरिष्ठ अधिकारी, वसाहती फौजांतले माजी कमांडर्स (राऊल, सालन, पिनोला,) आणि युद्धविषयक उद्योगधंद्यातील मक्तेदाऱ्यांशी संबंधित असे जनरल्स असतात.

अनेकदा छत्रीदारी दलांचे अधिकारी खास भूमिका बजावतात. उदाहरणार्थ इटलीमध्ये १९७२ इतक्या मागच्या काळात असे प्रस्थापित झाले की छत्रीधारी युनिट्समध्ये असलेल्या सैनिकांपैकी ९० टक्के लोकांनी निवडणुकीमध्ये नव–फॅसिस्टांना मते दिली. या युनिट्सचे–आणि केवळ इटलीमधल्याच नव्हे–विशेषे करुन कसोशीने कम्युनिस्ट–विरोधी "ब्रेन–वॉशिंग" होत असते. हीच गोष्ट "कमान्डो" दलाना लागू पडते.

अचानक हल्ले करायच्या छत्रीधारी सैनिकांच्या पात्रतेमुळे लष्करी बळावर सत्ता बळकावायच्या कामगिऱ्यांमध्ये त्यांच्याकडे नेमून दिलेली भूमिका आम्हाला ठाऊक आहे. म्हणून डाव्या गटाच्या शक्तींना पहिला तडाखा हाणायचा हुकूम त्यांना आणि फॅसिस्टांनाच देण्यात येत असतो. त्यांच्या पाठोपाठ पूर्वीच्या काळातल्या घोडदळाची कामगिरी करणाऱ्या रणगाडचांना हल्ला करायचा हुकूम मिळतो. आजच्या काळातील प्रतिक्रांतीच्या डावपेचांचे हे एक आवश्यक उपलक्षण आहे. आणि म्हणूनच विविध देशांतल्या काही नव–फॅसिस्ट संघटनांच्या प्रमुखपदी मार्जी छत्रीधारी असतात.

अनेकदा असल्या लष्करी टोळक्यांचे नेते म्हणजे असे सेनापती असतात की जे वरकरणी कायदेशीर सरकारशी इमानदारी चालू ठेवतात, परंतु गुप्तपणे अति–उजव्या गटाच्या संघटनांशी त्यांचा संपर्क असतो. आजच्या घडीला ते प्रजासत्ताकाच्या "रक्षणार्थ खडे" असतात, आणि "राजकीय पक्षाच्या वरच्या पातळीवर" असतात, उद्या ते कटवाल्यांशी हातमिळवणी करतात. कितीदा तरी त्यांचा प्रमुख हा प्रतिगामी वर्तुळांनी फार पूर्वीपासून भावी हुकूमशहा अशी पदवी दिलेला जनरल असतो.

या लष्करी टोळ्यांची धोरणे मूलतः सर्वत्र तीच असतात "दंगली" दडपून टाकून "देशाला कम्युनिझमपासून वाचविणाऱ्या" "पोलादी पंजाच्या" लष्करी नेत्याच्या कल्पनेवर ती आधारलेली असतात. असल्या व्यक्ती आणि त्यांचा परिवार हे अनेकदा प्रतिगामी शक्तींचे केन्द्र होतात. "अरेरावी" राज्य स्थापन करा आणि अमेरिका व नाटो यांच्या दोस्तीनिशी सोविएत संघराज्याविरुद्ध युद्ध करायच्या तयारीला जोरात लागा, अशी या व्यक्तींची मागणी असते. त्यांच्या अनुयायांमध्ये व गुप्त मदतनिसामध्ये सेनादलाच्या वरिष्ठ वर्तुळातील उच्चपदस्थ व्यक्ती असतात. वेळ पडल्यास "विजेच्या वेगाने" त्यांना आपला कार्यभाग उरकता येतो याचे एक मुख्य कारण हे असते.

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे सेनापतींची असली टोळकी म्हणजे अचानक हल्ला करून सत्ता बळकावायच्या कामगिरीचे हे संभाव्य मुख्य कार्यालय असते आणि म्हणून कडव्या प्रतिगाम्यांच्या कारवायांमध्ये त्यांना खास भूमिका नेमून दिलेली असते. आपल्या शतकाच्या उत्तरार्धात प्रतिगाम्यांना सत्ता हाती घ्यायची कामगिरी उरकता यावी म्हणून हे अत्यंत सोईस्कर असे राजकीय व कार्यकारी हत्यार तयार करण्यात आलेले आहे.

आजच्या घडीला जगामध्ये असले संभाव्य लष्करी हुकुमशहा डझनावारी आहेत. त्यातल्या काही जणांनी तर आपले स्वतःचे संपूर्ण तत्त्वविचार उत्क्रांत केले आहेत.

उदाहरणार्थ, अर्जेंटिनाच्या उच्चतर लष्करी अकादेमीचा त्याच्या काळातला प्रमुख जनरल मॅन्युएल आल्वारादो. याने "कायमच्या अन्तर्गत आघाडीचा

सिद्धांत" सादर केला. "संरक्षणाची कामगिरी केवळ सदरहद्दीच्या रक्षणापुरतीच मर्यादित करण्याची जराशी सर्वत्र प्रसृत असलेली प्रवृत्ती" त्याने खोडून काढली. आल्वारादोने असे दाखवून दिले की "लोकशाहीवादी संस्थांचे खुद्द अस्तित्वच अंतर्गत आघाडीच्या रक्षणासाठी अपुरे असते." त्याच्या म्हणण्याचा अर्थ हा होता की लष्कराला जेव्हा जेव्हा आवश्यक वाटत असेल तेव्हा तेव्हा "अन्तर्गत आघाडीवर" सरकारच्या द्वारा कामगिरी बजावायचा हक्क लष्कराला बहाल करण्यात यावा.

आल्जेरियन समस्या : फ्रेंच सोडवणूक या आपल्या पुस्तिकेत १९६० च्या दशकातील ओएएस्च्या कटकारस्थानी टोळक्याच्या नेत्यांपैकी एक असलेला कर्नल आगाँद याने असे जाहीर केले: "लष्कराने आमची स्वत.ची अन्तर्गत सुव्यवस्था राखली पाहिजे." आल्वारादो व आगाँद यांची मते लान्दा या आणखी एका आर्जेन्टियन जनरल मतांशी मिळती जुळती आहेत. या लान्दाने म्हटले आहे : "सेनादलांच्या लेखी कम्युनिझम विरुद्धचा लढा, मग सरकारच्या पाठिंब्यानिशी असो अथवा पाठिंब्याशिवाय असो, हा जीवनमरणाचा लढा आहे." इथे देखील गर्भितार्थ हा आहे की असल्या बाबतीत सरकारला काहीच म्हणायचा अधिकार असू नये.

१९७७ च्या नोव्हेंबर महिन्यात बुन्डेश्वेहर कमांडचा पश्चिम जर्मन सूडवादी फ्रॅन्झ जोसेफ स्ट्राऊस याने चिली देशाला भेट देऊन आल्यानंतर असे जाहीर केले की पिनोशेतच्या सेनापतीचा कित्ता घेण्याजोगा आहे–त्यांनी जो सत्ता बळकावण्याचा प्रकार अंमलात आणला होता तो "कम्युनिस्टांच्या विजयावर नियंत्रण" कसे घालावे याचा आदर्श नमुना मानायला हवा, असे तो म्हणाला.

या संबंधात हे लक्षात ठेवायला हवे की पश्चिम जर्मनीतील लहानसहान नव–नाझी संघटनांपैकी कोणत्याही एकीचा सदस्य उघडपणे असायला स्ट्राऊस भलताच सावध असला तरी ऱ्हाईन नदीकाठी पिनोशेत धर्तीचा सत्ता बळकावण्याचा प्रकार जर घडलाच तर हिटलरच्या लष्करातल्या या माजी अधिकाऱ्याला पश्चिम जर्मनीचा पंतप्रधान व्हायला कसलीच हरकत असणार नाही हे अगदी स्पष्ट आहे.

जवळ जवळ सगळ्याच भांडवलदारी राज्यांच्या संरक्षण प्रमुखांच्या कार्यालयांमध्ये कडव्या प्रतिगामी लष्करी अधिकाऱ्यांना सरकारला हुकूम फर्मावायच्या "हक्का" विषयीचे सिद्धान्त आज विस्तृत प्रमाणात प्रसृत झालेले आहेत. हा योगायोग मुळीच नव्हे. कारण हे सगळे सिद्धान्त एकाच उगमस्थानातून येतात–ते म्हणजे अमेरिकेतले कडवे लष्करी अधिकरी. तेच "कम्युनिझम विरुद्ध" विश्वव्यापी युद्धाच्या योजना रोजच्या रोज आखत आहेत आणि जगाच्या विविध भागांमध्ये अद्दल घडविणाऱ्या व घातपाती मोहिमा चालवण्यासाठी पलटण तयार करायचे मनसुबे रचत आहेत.

१९५० च्या दशकाइतक्या अगोदरच्या काळात नंतर १९६० च्या दशकात नाटो मुख्य कचेरीने ओप्लान क्रमांक १००-१, प्रॉमिथ्यूस योजना, डॉक्यूमेंट क्रमांक ७०/५ वगैरे वगैरे सांकेतिक नावे असलेल्या कित्येक प्रासंगिक योजनांचे मसुदे तयार केल्याचे सर्वश्रुत आहे. या "योजनांपैकी" प्रत्येकीने प्रत्येक पश्चिम युरोपियन देशात पोलीस, अति-उजव्या टोळ्या आणि, तशीच जरुरी उद्भवल्यास मुद्दाम रवाना केलेले नाटो युनिटस् यांच्या पाठिंब्यानिशी लष्कराने अचानक व झटपट सत्ता बळकावणे संकल्पिलेले आहे. प्रत्येक गोष्ट अत्यंत बारीक सारीक तपशिलानिशी आखणी करुन ठेवलेली होती- केव्हा, कशी, कुणाबरोबर आणि कुठे. काही मुद्दे नाझींच्या व्यवहारातून उसने घेतलेले उघड दिसत होते. ओप्लान क्रमांक १००-१ मध्ये अशी तरतूद होती की एखाद्या पश्चिम युरोपियन देशात "अरिष्टाची परिस्थिती" उद्भल्यास अमेरिकेने हस्तक्षेप करायचा.

प्रॉमिथ्यूस योजनेमध्ये डाव्या गटाच्या शक्तींकडून योग्य वेळी पुढाकार हिसकावून घेण्यासाठी स्थानिक लष्कराने कसकशी कृती करावी याचे तपशीलवार आदेश समाविष्ट केलेले होते. इराणमध्ये शहाच्या सेनापतींचा व पोर्तुगालमध्ये जनरल स्पिनोलाच्या टोळक्याचा अधःपात झाल्यावर असल्या योजनांचा विस्तार करुन त्यांना "परिपूर्णता" आणण्यात आली आहे यात मुळीच शंका नाही. तसेच स्पेनमध्ये लष्करी फॅसिस्ट टोळक्याला सत्ता बळकवण्यात अपयश आल्यानंतर नाटोच्या मुख्य कचेरीने असल्या प्रकरणांमध्ये लक्ष घालणारे आणि विविध लष्करी टोळक्यांच्या कामगिऱ्यामध्ये एकसूत्रीपणा आणणारे एका खास "राजकीय" खात्याची तरतूद केली आहे.

" लष्कराने सत्ता हस्तगत करणे ! " हाच पेंटॅगॉनचा आग्रह गुप्तपणे चालत असतो. " फौजेने सत्ता हस्तगत करणे ! ", " हुकूमशाही आलीच पाहिजे ! ' या घोषणा फॅलँन्जिस्टांनी माद्रिदच्या रस्तोरस्ती प्रतिध्वनित केल्या. १९५८ च्या नोव्हेंबर महिन्या इतक्या मागच्या काळात, शीतयुद्ध शिगेला पोचलेले असताना, भरपूर माहिती असलेल्या **न्यूयॉर्क टाइम्सने** लिहिले की अमेरिकन सरकारला ज्या स्थिरतेची आस्था आहे ती लष्कर सत्ताधारी होण्याच्या योगाने साधते.

त्यानंतर लोटलेल्या वीस अधिक वर्षांनी वॉशिंग्टनच्या या महत्वाकांक्षांमध्ये बदल घडवून आणणे तर दूरच राहिले, उलट त्यात वाढच झाली आहे. वॉशिंग्टनच्या हिशेबी "स्थिरता" म्हणजेच "हुकूमशाही". याची खातरजमा डझनावारी हुकूमशहा असलेल्या अनेक लॅटिन अमेरिकन देशाच्या अनुभवाने करून दिली आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जनरल अलेक्झांडर हेग पूर्वी युरोपात नाटोचे सरसेनापती होते ही वस्तुस्थिती सूचकच म्हटली पाहिजे.

याला ऐतिहासिक दाखले आहेत. हिटलरला फिल्ड मार्शल पॉल हिंडेनबुर्ग यांच्या हातून सत्ता मिळाली. " कॉडिल्लो " जनरल फ्रँको यानेच स्पेनमध्ये फॅसिस्ट

फॅलेन्जला सत्तेवर आणले. जनरल मान्नरहीम हाच फिन्निश लापुअनजोकी फॅसिस्टांचा आश्रयदाता झाला. पोर्तुगालमध्ये १९२६ साली जनरल कार्मोनाच्या नेतृत्वाखालील लष्करी त्रिकूटाने सत्ता बळकावली आणि त्याने लगेच राज्यघटना तहकूब केली आणि फॅसिस्ट धर्तीवर देशाची फेररचना आरंभली. १९२० च्या शतकात राजाला घेरणाऱ्या लष्करी टोळक्याचा पाठिंबा जर मुसोलिनीला मिळाला नसता तर तो इटालियन कामगारवर्गाच्या प्रतिकारावर मात करायला असमर्थ ठरला असता.

आजच्या घडीला हा मार्ग अंगिकारण्याकडे उजव्या गटाच्या लष्करवाल्यांचा कल कितीतरी अधिक प्रमाणात आहे. समाजसत्तावादाच्या धास्तीने त्यांचा घबराट उडालेला आहे. त्यांत आणि एका "धास्तीची" भर पडली आहे.–ती म्हणजे शस्त्रास्त्रांवर मर्यादा घालण्याची आणि निःशस्त्रीकरणाला आरंभ होण्याची.

सर्व ठिकाणच्या नवफॅसिस्टांना हे ठाऊक आहे आणि तद्नुसार त्यांची प्रतिक्रिया होत आहे.

२.

अगोदरच सत्ताधारी असलेल्या जनरलांची नावे जनतेला ठाऊक आहेत कित्येक लॅटिन अमेरिकन देशातल्या राज्यकर्त्यांची किंवा दक्षिण कोरिया, पाकिस्तान, इंडोनेशिया आणि इतर काही राज्यातल्या राज्यकर्त्यांची नावेच तेवढी आपण स्मरणात आणली म्हणजे झाले. भांडवलदारी वृत्तपत्रे हुकूमशाहीविषयी किंवा भावी हुकुमशहाविषयी सदैव लिहित असतात, अनेकदा अशा माणसाभोवती रहस्याचे वलय निर्माण करतात. परंतु त्याच प्रकारची लष्करवादी टोळकी अगोदरच पश्चिम युरोपात तयार करण्यात आली आहेत आणि ती सज्ज राहिलेली आहेत या वस्तुस्थितीविषयी मात्र ही वृत्तपत्रे नेहमीच मूग गिळून बसलेली असतात.

पिनोशेतने साऱ्या जगातल्या आपल्या सहकाऱ्यांना एक व्यवहारिक वस्तुपाठ दिलेला आहे आणि पाश्चात्य देशामध्ये याचे श्रेय त्याला देण्यात आले आहे. चिलीमधील लष्करी टोळक्याला एखाद्या सामुदायिक फॅसिस्ट पक्षाची उणीव होती तरी देखील त्याने लष्करवाद्यांच्या "सिद्धान्ताना" जुळेल अशा रीतीने विजेच्या वेगाने अचानक सत्ता बळकावली. आजच्या घडीला हा "पिनोचेत अनुभव" भावी काळात अमलात आणता यावा म्हणून पाश्चात्य देशातील उजव्या गटाच्या जनरल्सकडून आणि वरिष्ठ अधिकाऱ्याकडून कष्टपूर्वक अभ्यासला जात आहे. याबाबत पुन्हा इथे काही सत्य घटना सादर करतो.

इटलीमध्ये फॅसिस्ट दहशतवाद विशेषेकरुन विस्तृत प्रमाणात प्रसृत झालेला आहे. त्या देशामध्ये अनेक वर्षे एक क्रियाशील व प्रभावशाली लष्करी टोळके होते. त्यात दक्षिण भागांतील नाटोच्या मुख्य कचेरीतले जनरल्स व ॲडमिरल्स सामील होते. नव–फॅसिस्ट आयएसएमच्या (इटालियन शोशल मूव्हमेंटच्या) पहिल्या नेत्यापैकी एकजण मुसोलिनीचा शेवटचा युद्धमंत्री मार्शल ग्राझियानी हा होता. ग्राझियानीच्या नंतर आयएसएमच्या प्रमुखपदी प्रिन्स ज्युनियो व्हॅलेरियो बोर्गीस हा आला. हा आरमारी अधिकारी आणि माजी सैनिकांच्या प्रतिगामी संघाचा प्रमुख होता.

१९७० च्या दशकात आयएसएमच्या उपाध्यक्षपदी ॲडमिरल जिनो बिरिन्डेल्ली हा होता. हा निवृत्त होण्यापूर्वी नाटोच्या दक्षिण युरोपातील आरमाराचा

सरसेनापती होता. जनरल लोरेन्झो हा कार्बानियेरीचा (लष्करी पोलीसदलाचा) माजी चीफ ऑफ स्टॉफ. याने 'सिफार प्लॉट' या नावाने प्रसिद्ध असलेल्या फॅसिस्ट कटकारस्थानावर देखरेख केलेली होती. जनरल मिसेली हा इटालियन लष्करी हेरखात्याचा माजी प्रमुख, त्याचप्रमाणे जनरल रिवती हा चिलखती सेनादलाचा कमांडर, हे दोघेही असल्या कटकारस्थानांमध्ये सामील झालेले होते.

'सगळचा गोष्टी सुव्यवस्थित करण्याच्या' उद्देशाने इटलीत अचानक हल्ला करून सत्ता बळकावण्याचे प्रयत्न या लष्करी वर्तुळानी नव–फॅसिस्टांच्या संगनमताने अनेकदा केलेले आहेत. उदाहरणार्थ, १९७० च्या दशकाच्या केवळ पूर्वार्धातच पाच वेळा केलेले आहेत (पाहा **एक्प्रेस्सो** तारीख १५ मार्च १९८१.) परंतु सावध लोकशाहीवादी शक्तींनी हे सगळे प्रयत्न हाणून पाडले. अगदी अलीकडेच "अन्तार्तिक" हे सांकेतिक नाव असलेली अचानक हल्ला करून सत्ता बळकावयाची लष्करी कटाची योजना उघडकीस आली. या योजनेनुसार सत्ता बळकावायची आणि देशातले "लाल टापू" चिरडून टाकायची एकंदर कामगिरी ३६ तासांत पूर्ण करायची होती. नाटोच्या मदतीने अचानक हल्ला करून रोम ताब्यात घ्यायचे, फॅसिस्टांची रिक्रूट भरती आपले पोलिसदल म्हणून करायची, आणि कामगार चळवळ रक्तात बुडवायची, अशी संधी मिळवायसाठी इटलीतील उजव्या गटाचे जनरल्स अजूनही वाट बघत आहेत, यात मुळीच शंका नाही.

असल्या शक्ती स्पेनमध्येही क्रियाशील आहेत, आणि १९८१ च्या फेब्रुवारी महिन्यातील घडामोडीनी हे सिद्ध केलेले आहे. फ्रँकोच्या हाताखाली ज्या जनरल्सनी सेवाचाकरी बजावली, ते अजूनही नव्या राजेशाहीकडे आशेने डोळे लावून राहिले आहेत. फेब्रुवारी महिन्यात त्यांनी आपला सपशेल फजेतवाडा करून घेतला असला तरी देखील त्यांनी ही आशा धरलेली आहे. स्पेनमध्ये मोठा फॅसिस्ट पक्ष मुळीच नाही; फ्रँकोच्या राजवटीतील निर्जीव झालेला फॅलॅन्ज पक्ष आणि न्यू फोर्स ही दहशतवादी टोळी यांची जनतेविरुद्ध डाळ शिजत नाही. जनतेला आपल्या सामर्थ्याची जाणीव आलेली आहे. परंतु असे दिसून येते की लष्करी टोळक्याला मात्र खुद्द राजाविषयी देखील मुळीच आदर राहिलेला नाही.

१९८१ च्या फेब्रुवारी महिन्यात स्पेनमध्ये ज्या घडामोडी घडल्या त्यांनी, भावी लष्करी हुकुमशहा हे अचानक सत्ता बळकावल्यानंतर "सगळचा गोष्टी सुव्यवस्थित करण्याचा" बेत कसा करत होते या गोष्टीवर थोडासा प्रकाश टाकला आहे. पार्लमेंटच्या इमारतीचा ताबा घेतल्यानंतर आणि आपले रिव्हॉल्व्हर व मशीनगन यांचा मारा केल्यानंतर कटवाल्यांनी जमलेल्या खासदारांना जमिनीवर पडून रहायला फर्मावायचे, त्यानंतर त्यांच्या योजनेनुसार लष्करी सरकार स्थापन

करायचे, आणीबाणी जाहीर करायची, राज्यघटना रद्द करायची, फाशीची शिक्षा पुन्हा चालू करायची, तुरुंगांतल्या अतिरेकी उजव्यांना माफी जाहीर करायची आणि राजकीय पक्षांच्या व ट्रेड युनियन्सच्या नेत्यांवर खटले भरायचे.

हुकुमशाही लष्करी टोळक्याला भांडवलदारी लोकशाही अशा रीतीने रद्द करायला हवी होती. त्यांच्यामते देश आणि त्याची सगळी जनता म्हणजे लष्करी बराकींचा एक भागच होती आणि "कायदा आणि सुव्यवस्था" याचा अर्थ फाशीची शिक्षा लादणे हा होता. काय शिजत होते याची कुणकुण कायदेशीर सरकारला जवळजवळ मुळीच लागलेली नव्हती हे ज्या वस्तुस्थितीवरुन दिसून येते ती म्हणजे ही की हल्लेखोरांनी स्पॅनिश पार्लमेंटचा तावा घेतल्यानंतर पहिल्या काही तासांच्या अवधीत सरकारने लष्कराचा डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ जनरल आर्माडा यालाच आपल्या वतीने वाटाघाटी करायला सांगितले आणि हा आर्माडा स्वतःच या कटाच्या प्रमुख नेत्यांपैकी एक होता हे सरकारला ठाऊक नव्हते. स्पेनमधील सत्ता बळकावयाच्या प्रयत्नाचा शेवटी फजीतवाडाच झाला. परंतु याची पुनरावृत्ती मुळी होणारच नाही याची हमी कोण देऊ शकतो ?

स्पेनमधील या घडामोडींनंतर काही आठवड्यानी ११८१ च्या मार्चमध्ये शेजारच्या पोर्तुगालमध्ये असे उघडकीस आले की तिथे एक लष्करी टोळके क्रियाशील आहे. त्यात आफ्रिकेतील वसाहती लष्करात कामगिरी केलेले सैनिक व अधिकारी सामील होते. ते आता दोन कम्युनिस्टविरोधी दहशतवादी संघटनांचे सदस्य होते–आर्मी फॉर द लिबरेशन ऑफ पोर्तुगाल (ईएलपी) आणि डेमोक्रॅटिक मूव्हमेंट फॉर द लिबरेशन ऑफ पोर्तुगाल (एमडीएलपी) या त्या दोन संघटना होत. स्पॅनिश हल्ल्याच्या दिवशी या संघटनांनी आकाशवाणीवरून पोर्तुगीज सेनादलांना सरकारविरूद्ध उठाव करायचे आवाहन करायचा बेत केलेला होता मग हा हल्ला नुसताच लांबणीवर टाकण्यात आलेला आहे काय ?

आता आपण फ्रान्सवर नजर टाकू या. जनरल्सचे टोळके कशी कामगिरी करते याचे अभिजात उदाहरणच १९६० च्या दशकात फ्रान्सने उपलब्ध करून दिले जनरल डिगॉल यांना उलथून पाडून ठार मारायचा प्रयत्न ज्याने केला ते दहशतवादी ओएएस अशा प्रकारचे वसाहतवादी कल असलेले टोळके होते. ओएएसचा नेता जनरल राऊल सालान हा प्रथम इंडोचायनामध्ये आणि मागाहून आल्जेरियामध्ये फ्रेंच लष्कराचा सरसेनापती होता. १९६२ साली सालानला अटक झाली तोपर्यंत त्याचा दुय्यम असलेला जनरल एडमंड जौहौद हा विमान दलाचा इन्स्पेक्टर जनरल होता. सालानच्या नंतर ओएएसच्या प्रमुख पदावर आलेला कर्नल गोदार्द हा होता. त्याचा चीफ ऑफ स्टाफ होता जनरल गार्दी. संघटना शाखेचा प्रमुख होता कर्नल गार्देझ. हेरखात्याचा प्रमुख होता कर्नल पेरेझ, वगैरे वगैरे. सालानचे अत्यंत निकटचे सहकारी म्हणजे फ्रेंच जनरल स्टाफचा माजी

चीफ जनरल जुइन आणि आल्जेरियातील फ्रेंच फौजेचा माजी सरसेनापती जनरल चाल्ले हे होते. म्हणजे हा संपूर्ण लष्करी सरंजाम होता.

गेल्या शतकापासूनच फ्रान्समधील प्रतिगामी लष्करी टोळकी कट कारस्थानात गुंतलेली असत. १९४० च्या दशकात जर्मनीचा तावा बसल्याच्या काळात हिटलर-धार्जिण्या विची राजवटीचा प्रमुख मार्शल फिलिप पेताँ हा लष्करी टोळक्याचे दैवत होता. परंतु केवळ अलीकडील काही वर्षांच्या अवधीतच लष्करी टोळक्याच्या सिद्धान्ताचा संपूर्ण एकजीव फॅसिस्ट विचारांशी झाला. संयुक्त डाव्या शक्तींच्या वाढत्या सामर्थ्याचे भय या वर्तुळांना अन्य कशापेक्षाही अधिक वाटत असल्यामुळे नीच साहसी कारवाया अंगिकारायची या वर्तुळांची तयारी चालूच रहाणार.

इंग्लंड म्हणजे "अभिजात" भांडवलदारी लोकशाहीचा देश. तिथल्या सरकारने आपल्याला फॅसिझमची "बाधा होणार नाही" अशा बढाया सदैव मारलेल्या आहेत; तिथे सेनापतींकडून सत्ता बळकावण्याचा अरेरावी प्रकार घडण्याचा कसलाही धोका कधीच असणार नाही असे वाटायचा संभव आहे. त्यातल्या त्यात याचे कारण म्हणजे महायुद्धानंतर ज्या नव-फॅसिस्ट संघटना उदयास आल्या त्या कामगारांच्या संघटनांच्या मानाने तुलनात्मक दृष्ट्या अत्यंत दुर्बल होत्या. परंतु १९७४ च्या ऑगस्ट महिन्यात परराष्ट्रीय व राष्ट्रकुल खात्याचे राज्यमंत्री व तणाव-शमनाचे कडवे विरोधक लॉर्ड चॅल्फॉन्ट यांनी **लंडन टाइम्समधून** अशी विचारणा केली की लष्कराकडून सत्तेची बळकावणूक इंग्लंडमध्ये व्यवहार्य आहे किंवा नाही? आणि याचे उत्तर त्यांनी होकारार्थी दिले.

त्यांनी असे लिहिले आहे की इंग्लंडमध्ये अरेरावी सरकार स्थापन करायच्या शक्यतेचा विचार इंग्लंडमधील अधिकाधिक लोक गंभीरपणे व आवडीने करू लागले आहेत.

हे एखाद्या इंग्रज नाझीचे किंवा वर्णद्वेष्ट्याचे विधान नाही. तर "नेमस्त" मताच्या एका भांडवलदारी राजकारण्याचे हे विधान आहे. म्हणजे आपण कशाविषयी बोलतो आहोत याची त्याना संपूर्ण जाण होती हे उघड आहे. पिनोचेतच्या डावपेचांचे कौतुक करणारे लोक टेम्स नदीकाठी देखील वास्तव्य करून आहेत म्हणायचे.

ऱ्हाइन नदी काठचे उजव्या गटाचे सेनापती देखील "अरेरावी" च्या मनःस्थितीमध्ये आहेत ही गुप्त गोष्ट मुळीच राहिलेली नाही. हिटलरच्या हेरमाहटमधील उर्वरित जनरल्स निवृत्त झालेले असले तरी अनेक नाझी कर्नल्स, मेजर्स आणि लेफ्टनंट्स अजूनही बुन्डेश्वेहरमध्ये चाकरी बजावत आहेत. १९६० च्या दशकाइतक्या मागच्या काळात बुन्डेश्वहेरमध्ये चाकरी करत असलेल्या सैनिकांपैकी पाव हिस्सा लोक नव–नाझींना सहानुभूती दर्शविणारे होते असा अंदाज करण्यात आला.

तरुण अधिकाऱ्यांना पारंपरिक धोरणानुसार शिकवून तयार करण्यात येते. म्हणजे जवळ जवळ जुन्या फॅसिस्ट बाण्यानुसार त्यांना सोविएत संघराज्याचा व पूर्व जर्मनीचा द्वेष करायला शिकविण्यात येते इतकेच नव्हे तर आपल्या स्वतःच्या देशातल्या "डाव्या गटाच्या लोकांचा" देखील द्वेष करण्यास शिकविण्यात येते. आज नाटोच्या मुख्य कार्यालयात पश्चिम जर्मन जनरल्स व कर्नल्स हेच आपल्या अमेरिकन आश्रयदात्यांसमवेत मोठ्या जागांवर आहेत आणि सगळ्या पश्चिम युरोपमधील लष्करी लोकांना आदेश देत आहेत.

१९६७ साली ग्रीसमध्ये "ब्लॅक कर्नलसनी" अचानक हल्ला करून सत्ता बळकावली आणि तिथे लष्करी–फॅसिस्ट हुकुमशाही प्रस्थापित केली त्या वेळी एका चौकशीत असे सिद्ध झाले की सीआयएने आणि दक्षिण भागातील नाटोच्या मुख्य कार्यालयाने पूर्व भूमध्य समुद्राच्या प्रदेशांतील अटलांटिक गटाच्या हितसंबंधाना पुढे रेटण्यासाठी आखून दिलेल्या तपशीलवार आदेशानुसार या कटवाल्यांनी कामगिरी बजावलेली होती.

१९८१ च्या फेब्रुवारी महिन्यात वर सांगितलेला जनरल्सचा अचानक हल्ला स्पेनला बघायला मिळाला. त्यानंतर कित्येक आठवड्यांनी स्पॅनिश सोशालिस्ट वर्कर्स पार्टी (पीएसओई) या पक्षाचे सरचिटणीस फेलिपे गोन्झालेझ मार्क्वेझ यांनी अशी बातमी दिली की आपल्या पक्षाकडे असलेल्या माहितीनुसार या हल्लेखोरांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रीगन यांच्या परिवाराशी प्रास्ताविक संपर्क साधलेले होते. त्यांची अशी समजूत करून देण्यात आली की अमेरिका त्यांच्या अचानक सत्ता बळावणुकीला विरोधही करणार नाही आणि हातभारही लावणार नाही.

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे **साम्राज्यशाहीची व्यूहरचना ही नव-फॅसिझमच्या व्यूहरचनेशी एकजीव होत आहे**. हे जर आपण ध्यानात घेतले तर अनेक गोष्टी स्पष्ट होतात. अशा स्वरूपाचे विचार हे काही प्रसंगी जगाच्या विविध भागात फॅसिस्टधार्जिण्या कृती करायचो प्रेरणा नाटोच्या व्यूहरचनाकारांना देऊ शकतात.

अर्थात अमेरिकन जनरल्ससकट नाटो जनरल्स हे अधिकाराच्या जागांवर असतात तोपर्यंत फॅसिझमविषयी कसलीही सहानुभूती कधीही दर्शवित नसतात. असे करायला वॉशिंग्टनमधील त्यांच्या वरिष्ठांकडून त्यांना सक्त मनाई करण्यात आलेली असते, कारण त्यांना अशी धास्ती वाटते की न जाणो या जनरल्सची जागतिक लोकमताच्या दृष्टिकोनातून छीः थूः तर नाही ना होणार! अधिकृत नाटो नेते नेहमीच "लोकशाहीशी आपली इमानदारी" भर देऊन जाहीर करत असतात, मात्र असे असूनही सामर्थ्यशाली कम्युनिस्ट चळवळ ज्या देशांमध्ये असते त्यांना दमदाटी देण्याच्या बाबतीत ते मागेपुढे मुळीच बघत नसतात.

काहीही झाले तरी एक गोष्ट स्पष्ट आहे. विविध देशांतल्या नव-फॅसिस्टांची आज अशी पक्की खात्री पटलेली असते की पश्चिम युरोपात डाव्या गटाच्या विजयाला अटकाव करण्यासाठी पेन्टॅगॉन आणि नाटो हे लष्कराची जमवा-जमव करुन किंबहुना राजरोस कत्तलखोरांची जमवाजमव करुन वाटेल ती मजल गाठतील. हाच पश्चिम युरोपातल्या पिनोचेतांचा व भावी पिनोचेतांचा हिशेब आहे. सबब म्हणून कम्युनिस्टांनी एखाद्या प्रमुख देशांत सरकारात सामील होणे पुरेसे आहे. अलीकडेच एका पेन्टागॉन तज्ज्ञाने खातरजमा करुन दिली की इटालियन कम्युनिस्ट जर सरकारात सामील झाले तर काय करायचे या बाबतच्या "संकलित योजना" अस्तित्वात आहेत.

हे सगळे केवळ युरोपलाच लागू पडते काय? नाही. जिथे प्रतिगामी शक्ती क्रियाशील आहेत अशा जगाच्या कोणत्याही भागाला हे लागू पडते. उदाहरणार्थ, आपण जपानचीच गोष्ट घेऊ या.

जपानच्या युद्धोत्तर राज्यघटनेने अशी अट घातलेली आहे की जपान कधीही युद्ध करणार नाही आणि "लहानशा स्वसंरक्षणाच्या फौजेखेरीज" खडे सैन्य ठेवणार नाही. परंतू आजच्या जपानमध्ये अगदीच वेगळी परिस्थिती अस्तित्वात आहे. राज्यघटनेला धाब्यावर बसवून जपानने आज सामर्थ्यशाली नवे लष्कर उभारले आहे आणि जनरल्स हे पुन्हा एकदा टोकियोमध्ये अत्यंत प्रभावशाली शक्ती होऊन राहिले आहेत. जर लोकशाहीवादी पक्ष आणि संघटना हिच्या आड आल्या तर ही शक्ती फॅसिस्ट गळेकापूंना मदतीसाठी बोलावून घेईल असा संभव आहे. हे गळेकापू आणि हे जनरल्स हा अडथळा दूर करायच्या तयारीत आहेत.

शेवटची गोष्ट म्हणजे आपण खुद्द अमेरिकेकडे बघूया. वस्तुतः पेन्टॅगॉन हीच वॉशिंग्टनमधील खरी सत्ता आहे. परराष्ट्रीय खाते हे अमेरिकन मुत्सद्देगिरीचे कार्यालय असून ते आता जनरल हेग प्रतिनिधित्व करीत असलेल्या उजव्या गटाच्या लष्करी मडळींच्या नियंत्रणाखाली आले आहे. म्हणून आजच्या घटकेला तरी या लष्करी टोळक्याला सरकार बदलायची मुळीच जरूरी नाही. सत्तेचा लगाम अगोदरच त्यांच्या हाती आहे.

विवेकशून्य शस्त्रस्पर्धेला कंटाळून जर अमेरिकेतील जनतेने शांततामय सह-अस्तित्वाचा पुरस्कर्ता असा फ्रॅन्कलिन रुझवेल्टसारखा पुरोगामी माणूस व्हाइट हाऊसमध्ये पाठविला तर अमेरिकेत काय घडण्याची शक्यता आहे?

त्या परिस्थितीत अमेरिकन लष्करी टोळके स्वस्थ मुळीच बसणार नाही. कोरियातील युद्धानंतर लवकरच १९५० च्या दशकात काय घडले याचे नुसते स्मरण करायला हवे. वॉशिंग्टनच्या लष्करी वर्तुळांना अति-उजव्या गटाचा जनरल डग्लस मॅकार्थर याला त्यावेळी राष्ट्राध्यक्षाच्या खुर्चीवर बसवायला हवे होते. अतिपूर्वेकडील अमेरिकन सेनादलांचा माजी सरसेनापती जनरल मार्कक्लार्क

त्यावेळी म्हणाला की "अनेक अमेरिकन सेनापतींनी पूर्वी राजकारणाकडे पाठ फिरविलेली होती, परंतु अतःपर त्यांना तसे करता येत नाही."

मागाहून १९६१ साली उजव्या गटाचा जनरल एड्रिन वॉकर याने बेशरमपणे असा आग्रह धरला की अमेरिकेत लष्करी राजवट प्रस्थापित केली पाहिजे आणि खास करून स्वतःचेच नाव त्याने हुकुमशहाच्या पदासाठी सुचविले. त्यानंतर एक वर्षाने, जॉन केनेडी राष्ट्राध्यक्ष असताना **वॉशिंग्टन पोस्ट** या वृत्तपत्राने अशी नोंद घेतली की अमेरिकन सेनादलांमध्ये आणि राखीव दलांमध्ये अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि जनरल डिगॉल यांना उलथून पाडायचा प्रयत्न करुन राहिलेल्या फ्रेंच लष्करामध्ये (ओएएम् ! – अ. हे.) जी परिस्थिती उद्‌भवली होती तिच्याचसारखी परिस्थिती अमेरिकन सेनादलांमध्ये उद्‌भवलेली आहे. या "षष्ठम दलाचे" नेते कोण आहेत हे केनेडी सरकारला माहीत आहे अशी बातमी देऊन या वृत्तपत्राने ज्या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले ती म्हणजे ही की हे दल अमेरिकेच्या सरकारी राज्ययंत्रणेच्या सगळ्या विभागांमध्ये अधिकाधिक खोलवर शिरकाव करुन घेत आहे.

नेमका हाच निष्कर्ष **कम्युनिटी ऑफ फीअर** या ग्रंथाचे लेखकद्वय प्रोफेसर हॅरिसन ब्राऊन आणि जेम्स रीयाल यांनी काढला. त्याकाळी अमेरिकेत प्रकाशित झालेल्या या त्यांच्या ग्रंथाने अमेरिकन धोरणावर सर्वांगीण दृष्टिक्षेप टाकला आहे. याच्या एका प्रकरणांत हे लेखक लिहितात :

"अमेरिकेत असा एक लष्करी वरिष्ठांचा गट उदयास येत असलेला जरा स्पष्टपणेच दिसत आहे. हा गट सोविएत संघराज्याविषयी कायमचा वैरभाव ठवायच्या भूमिकेशी बांधिलकी पत्करलेला असून याच्या हाती प्रचंड राजकीय तसेच लष्करी सामर्थ्य आहे.

"...खरे सांगायचे म्हणजे, अमेरिकेच्या परराष्ट्रीय संबंधांमध्ये 'कमकुवतपणाची' कसलीही गंभीर स्वरूपाची लक्षणे उद्‌भवतील तर अमेरिकेच्या दमनकारी शक्तींवर प्रत्यक्ष राजकीय अधिकार हाती घ्यायला हे लष्करी वरिष्ठ सिद्ध असल्याचे स्पष्ट दिसत आहे." (हॅरिसन ब्राऊन, जेम्सरीयाल, **कम्युनिटी ऑफ फीअर**, कॅलिफोर्निया, १९६०, पृष्ठ ३४)

म्हणजे आन्तरराष्ट्रीय परिस्थितीत जर अधिक बिघाड झाला, तर अमेरिकेत लष्करी हुकुमशाही प्रस्थापित करायच्या योजना तयार असल्याचे हे लेखक सावधपणे सूचित करतात.

त्याचप्रमाणे जी. राइट मिल्स या प्रख्यात अमेरिकन समाजशास्त्रज्ञाचा हवाला आपण देऊ या. **पॉवर ईलाइट** या आपल्या ग्रंथात हे महाशय लिहितात की अमेरिकेकडे एक लष्करी टोळके आहे, त्याला "पॉवर ईलाईट" हे नाव देणे अधिक बरे ठरावे, कारण त्यांत लष्करी लोक, तसेच अर्थशास्त्रज्ञ आणि

राजकारणी, म्हणजे ज्यांच्या हितसंबधांची वाढत्या प्रमाणात एकवाक्यता आहे, अशांचा समावेश होतो.

अध्यक्ष केनेडी यांच्या अमदानीत ही अशी परिस्थिती होती. त्या वर्षांच्या अवधीत व्हाइट हाऊसला "षष्ठम दळ" हुकुमशाहीकडे वाटचाल करीत असल्याची धास्ती वाटू शकत होती, परंतु आजच्या घडीला अमेरिकन राज्यघटना शाबूत राहिलेली असली तरी हे "षष्ठम दळ" आणि व्हाइट हाऊस यांना आता एकात्मता प्राप्त झालेली आहे असे म्हणण्यात आपली चूक होत असेल काय ?

सत्य घटना या अशा प्रकारच्या आहेत. आपल्याला हेच चित्र सर्वत्र दिसते : हुकुमशहा होण्यासाठी "पांढऱ्या घोड्यांवर स्वार झालेले जनरल्स" काहीही करायला मागेपुढे पाहणार नाहीत.

२३

आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. सत्तेवर येण्यासाठी कोणते व्यावहारिक इलाज अमलात आणले पाहिजेत ? त्या इलाजांनी लष्करी हुकुमशाहीचा मार्ग त्यांनी निष्कंटक कसा करायचा ? या प्रयत्नापोटीच दहशतवादी डावपेंचांचा विचार होत असतो.

एकंदरीने पाहता दहशतवादी डावपेच विशिष्ट देशांतील परिस्थिती अशा प्रकारे निकरावर आणतात, की या टप्प्यावर असताना एखादा " संकटहर्ता सेनापती " राष्ट्रावर लादता येतो. नेमके हेच उद्दिष्ट फ्रान्स आणि इटली या देशांतील न्यू ऑर्डर (म्हणजेच ब्लॅक ऑर्डर), स्पेनमधील न्यू फोर्स व फॅलेन्ज, पोर्तुगालमधील लिबरेशन आर्मी, पश्चिम जर्मनीतील स्पोर्टस ग्रूप व नॅशनल सोशालिस्ट ॲक्शन फ्रंट, इंग्लंडमधील ब्रिटिश मूव्हमेंट, आणि अमेरिकेतील कु क्लक्स क्लान व जॉन बर्च सोसायटी यांजसारख्या ब्लॅक इंटरनॅशनलच्या शाखांचे, आणि विविध देशांतल्या डझनावारी अशाच प्रकारच्या टोळक्यांचे आहे.

याच उद्दिष्टासाठी दहशतवादी हल्ले व कत्तली, खुनाचे आणि जाळपोळीचे प्रकार करण्यात येतात. प्रत्येक गोष्ट लष्करी फॅसिझमसाठी करण्यात येते आणि ब्लॅक फॅसिझमचा मार्ग मोकळा करण्यात येतो. काही झाले तरी नव–फॅसिस्ट याचीच आशा धरुन आहेत. आजचे नव–फॅसिस्ट वाढत्या प्रमाणात दहशतवादाचा अवलंब का करतात ? हा प्रश्न आदल्या प्रकरणाच्या आरंभी उपस्थित केलेला होता, त्याचे हे उत्तर मानायला हरकत नाही.

त्यांच्या या कृतींची जी कारणमीमांसा अनेक भांडवलदारी निरीक्षक करतात ती चुकीची आहे. फॅसिस्ट युवक " हताश झालेले " असतात, त्यांच्या अंगी व्यक्तिगत क्रौर्य असते, त्यांना मिळालेले " घरचे वळण वाईट " असते, आणि त्यांच्या अंगी " आंधळा पिसाटपणा " बाणलेला असतो, असे या निरिक्षकांचे म्हणणे असते. या प्रश्नाच्या बाबतीत निर्णायक गोष्ट म्हणजे स्वभावाची लक्षणे ही नसून धोरण हीच निर्णायक गोष्ट असते.

खुद्द नव–फॅसिस्टांनीच याची खातरजमा करुन दिलेली आहे.

पश्चिम जर्मनीतल्या दहशतवादी मिलिटरी स्पोर्टस ग्रूपचा म्होरक्या हॉफ्मान याने असे रोखठोकपणे सांगितले की आपल्या संघटनेच्या " लष्करी कवायतींचा "

उद्देश म्हणजे "ज्या दिवशी लष्करी पोलिसांना एकटचांना डाव्यांवर मात करणे जमणार नाही, त्या दिवसासाठी" तयारीत राहणे हा असतो.

याचा खुलासा तो असा करतो: "जर डावे आणि कम्युनिस्ट सरकारमध्ये वरचढ होतील, आणि पोलिस जर त्यांना आवरू शकणार नसतील तर आम्ही नक्कीच पोलिसांना मदत करु. यादवी युद्धाच्या निकट येऊन ठेपलेल्या परिस्थितीत आम्हाला मोठी मागणी नक्कीच येईल... कम्युनिस्टांना विरोध करायच्या बाबतीत आम्हाला कसलेही विधिनिषेध असणार नाहीत."

साता समुद्रापलीकडील अमेरिकेतल्या नॅशनल सोशालिस्ट व्हाइट पीपल्स पार्टीचा फूहरेर मॅट्ट कोएहल हा हॉफ्मान याचे बोलणे प्रतिध्वनित करतो आणि सांगतो: "सर्वनाश जेव्हा ओढवेल, राज्यकर्त्या प्रतिष्ठितांना घबराट झालेल्या जमावावर अतःपर काबू ठेवता येणार नाही, तेव्हा आमची वेळ येईल. मग आम्ही विचार देऊ आणि नेतृत्व देऊ आणि आमच्या शत्रूंना दयामाया मूळीच दाखविली जाणार नाही."

ब्रिटिश मूव्हमेंटचा नेता डेर्माट मॅकलाफ्लिन याने म्हटले आहे: "आम्ही एका 'स्वतंत्र दलाच्या' स्थापनेचे भविष्यचित्र पाहतो आहोत...सरकारी शक्ती जर स्थिरता टिकवीनाशा होतील तर." (**मॉर्निंगस्टार**, तारीख ६ फेब्रुवारी १९८१ पृष्ठ १).

ही आणि अशाच सारखी विधाने म्हणजे लष्करी टोळक्यांना मिळणारा सिग्नल आहे तो असा: "अचानक हल्ला करून सत्ता बळकावायचा कार्यक्रम अमलात आणा आम्ही तुमच्याबरोवर आहोतच!" असल्या विधानांचा उगम व्लॅक इंटरनॅशनलने दिलेल्या एका सर्वसाधारण आदेशामध्ये सापडणे अगदी शक्य आहे.

बेल्जियन संरक्षणमंत्री व्हॅन्डेन बोयनान्ट्स याने आपल्या परीने अशी खातरजमा करून दिली: "विशिष्ट परिस्थितीत सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी लष्कराला पाचारण केले जाईल!" परंतु फॅसिस्टांना खात्री वाटते तदनुसार लष्कर जर या कामगिरीला पुरे पडण्यात अपेशी ठरले तर?

गोव्बेल्सचा माजी एडीसी विल्फ्रेड फ्रॉन ओव्हेन याच्या संपादकात्वाखाली पश्चिम जर्मनीत प्रसिद्ध होत असलेले नियतकालिक **डॉयश्चलँड इन गेस्टिश्चे उन्ड गेगेन्वोर्ट** ("जर्मनी पास्ट अँड प्रेझेंट") याने "फूहरेरच्या सरदारशाही" जर्मनीचा जमाना परत चालू करण्याचा विचार सादर केला आहे. "सरदारशाही"चा तो जो स्पष्टपणे अर्थ करतो तो म्हणजे हिटलरने आपल्या मृत्यूच्या किंचित अगोदर आपला वारसदार म्हणून नामनिर्देश केलेला ॲडमिरल कार्ल डोनिट्झ प्रतिनिधीत्व करीत असलेले हुकुमशाही लष्करी टोळके.

१९८१ च्या फेब्रुवारी महिन्यात स्पेनमध्ये जनरल्सनी अचानक हल्ला करून सत्ता बळकावायचा प्रयत्न केला त्यावेळी असे उघडकीस आले की "संयुक्त

लष्करी–मुलकी अधिकारपदस्थ टोळक्यामध्ये " न्यू फोर्स या दहशतवादी फॅसिस्ट संघटनेचा अध्यक्ष आणि फ्रॅन्कोवादी फॅलान्जचे दोन नेते यांचा समावेश व्हायचा होता. वरिष्ठ जागांची भागीदारी बरीच अगोदर करून ठेवलेली होती.

अशा प्रकारे, विशिष्ट देशाला अनुसरून अतिउजव्या लष्करी नेत्याशी फॅसिझमशी युती एक तर चालू आहे किंवा चालू व्हायची घाटत आहे. स्पेनमध्ये खातरजमा झाली तदनुसार नवफॅसिस्ट हे संपूर्ण नेतृत्व व पुढाकार लष्करी टोळक्याच्या हाती सोपवू इच्छितात असा याचा अर्थ नव्हे. त्यांना जे हवे आहे ते हे आहे की आपल्यासाठी मार्ग मोकळा करू शकणारी शक्ती या नात्याने त्याना हे टोळके हवे आहे.

हुकुमशहांच्या राजवटीतला त्यांचा पहिला बेत म्हणजे जुन्या पोलिसदलाच्या जागी आणण्यासाठी एस्एस्वाल्या गळेकापूंच्या तुकड्या तयार करणे हा आहे. या लुटारुंना " शॉक " लष्करी युनिट्सना– म्हणजे, छत्रीधारी सैनिकांना, कमांडोजना, नाविकांना व इतर नेहमीच्या " शॉक " सैनिकांना– रस्तोरस्ती रक्त सांडायच्या कामी मदत करायला फर्मावण्यात येईल. नव–फॅसिस्टांच्या हिशेबानुसार ते अखेरोस प्रत्यक्ष नेतृत्व आपल्याकडे घेतील, आणि अशा प्रकारे नवे हिटलर्स व मुसोलिनीज यांचे युग चालू करतील.

अजब आहेत ना या योजना ? शंकाच नाही. परंतु आपण हे विसरता कामा नये की भांडवलदारी जगांतील या योजनांच्या पाठीशी खूपच सामर्थ्यशाली अशा कट्टर–प्रतिगामी शक्ती उभ्या आहेत.

म्हणजे नजीकच्या भविष्यकाळात पश्चिम युरोपातील प्रमुख देशांमध्ये मोठ्या प्रमाणावरील दहशतवादी चढाया करायची तयारी नवफॅसिस्ट करीत आहेत असा याचा अर्थ होतो काय ? नक्की असा अर्थ होतोच असे नाही. हे करायला ते समर्थ आहेत किंवा नाही हे काळच दाखवून देईल आणि बरेचसे आन्तरराष्ट्रीय घडामोडींवर अवलंबून आहे. अगोदरच म्हटले आहे तदनुसार, असल्या समस्या ज्या मार्गाने सोडविल्या जातील त्याच्यावर पेन्टागॉन व अमेरिकेचे परराष्ट्रीय खाते यांच्याकडून अंगिकारल्या जाणाऱ्या व्यूहरचनेचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होईल. (या वस्तुस्थितीची नोंद घ्यायला हवी की लष्करी हुकुमशाही प्रस्थापित झाल्यावर उजव्या अतिरेक्यांच्या विजयाच्या आशा नेहमीच फलद्रूप होतात अशातला प्रकार नसतो. १९८० साली टर्कीच्या प्रकरणी हे दाखवून देण्यात आले. त्या वेळी राक्षसी अतिरेकी दडपशाहीचा कहर करण्याच्या परिणामी जो लष्करी गट सत्ताधारी झाला, त्याने ताबडतोब " डाव्या " आणि उजव्या अशा दोन्ही गटांच्या दहशतवाद्यांची सामुदायिक धरपकड आरंभली. ही गोष्ट खास परिस्थितीमुळे घडली हे उघड दिसत होते. कारण टर्कीमध्ये शुद्ध कत्तलखोर धर्तीच्या फॅसिझमने त्या देशाच्या परराष्ट्रीय संबंधांमध्ये गुंतागुंत निर्माण केली

असती. तथापि राज्यकर्त्या लष्करी गटाच्या अंतर्गत फॅसिस्ट-धार्जिणी फळी असत्याचे सर्वश्रुत आहे.)

अर्थात् अधिकृत फॅसिस्ट वाङ्मय असल्या प्रकरणांची चर्चा उघडपणे करत नसते. लेखकांना व प्रकाशकांना अजूनही कोर्टात खेचता आले असते आणि फॅसिस्ट-विरोधक असल्या प्रकरणी सक्रिय हस्तक्षेप करू शकतात. परंतु खाजगी प्रसारासाठीच्या सायक्लोस्टाइल्स हस्तपत्रकांमध्ये आणि अधिक पिसाट नव-फॅसिस्टांनी केलेल्या भाषणांमध्ये उजव्या गटाच्या जनरलसशी संगनमत करण्याबाबतच्या संकल्पांची विधाने अनेकदा करण्यात येतात.

याच्या भरीला हेही सांगायला हवे की भांडवलदारी देशांतले सगळेच जनरल्स आणि इतर लष्करी नेते लष्करी फॅसिझमच्या गोटातले म्हणून मानू नयेत, त्यांच्यात असेही लष्करी नेते आहेत की ज्यांना आपले सहकारी मानव जातीवर भयंकर धोका आणायची तयारी करीत असल्याचे जाणवत असते आणि ते लोकशाहीला मजबुती आणायचा हिरीरीने पुरस्कार करतात. असे असूनही वर्चस्व मात्र साम्राज्यवादीधार्जिण्या व प्रतिगामी सेनाधिकाऱ्यांचेच असते.

हे सगळे जनरल्स, बोनापार्टस् आणि भावी बोनापार्टस्, हे कट्टर फॅसिस्ट किंवा निम–फॅसिस्ट असतात काय ? व्यवहारामध्ये परिभाषेला महत्व नसते. जनरॅलिसिमो फ्रँकोसारख्या नाटो जनरल्सनी स्वतःला अधिकृतरीत्या कधीही फॅसिस्ट म्हणवून घेतले नाही. आपल्याला मात्र हे ठाऊक असते की " पांढऱ्या घोड्यांवर स्वार झालेले जनरल्स," हे " फूहरेरपासून," " ड्यूमेजपासून " आणि " कॉडिल्लोजपासून " केवळ एकच पायरी दूर असतात. इतिहासाने आपल्या पिढीला हे निर्णायकपणे सिद्ध करून दाखविले आहे. लष्करी बोनापार्टीझम आणि " शुद्ध " फॅसिझम हे सख्खे भाऊ आहेत, आणि यातला थोरला भाऊ धाकट्याला घोड्यावर स्वार व्हायला मदत करण्यासाठी रिकीब धरूनच उभा असतो.

आजच्या घडीला उजव्या गटाचे लष्करी टोळके हे त्याच्या दाढीआड लपून राहिलेल्या राजरोस फॅसिस्टांच्यापेक्षा अधिक धोकेबाज आहे. या टोळक्याचे राजकीय व व्यावहारीक चाव्यांवर नियंत्रण आहे. या चाव्या अजून फॅसिस्टांच्या आटोक्याबाहेर आहेत आणि आण्विक धडाके उडवायसाठी दाबायच्या कळी या टोळक्याच्या हातांपासून फार मोठ्या अंतरावर नाहीत.

हा सेवानिवृत्त जनरल्स व मार्शल्स यांचा व्यक्तिगत हितसंबंधाचा प्रश्न नव्हे, मात्र हे हितसंबंध देखील प्रमुख भूमिका बजावतातच. भांडवलदारी देशांमध्ये क्रियाशील असलेली सगळी लष्करी टोळकी किंवा " षष्ठम दळे " ही तणाव-शमनाच्या व निःशस्त्रीकरणाच्या विरोधकांच्या अग्रभागी आहेत. शीतयुद्ध हे मानवजातीला धोका आणणारे असले तरी देखील ते चालूच ठेवायची हाक ते सगळे देत आहेत. लोकशाही स्वातंत्र्याचा बळी देऊन कडक कम्युनिस्ट-विरोधी इलाजांची मागणी त्या सगळ्यांनी चालविलेली आहे.


अतिउजवे लष्करवादी एकमेकांना भीत असले व एकमेकांचा द्वेष करीत असले तरी आन्तराष्ट्रीय वर्गलढ्याचा व राष्ट्रीय बंधविमोचन चळवळीविरुद्ध त्यांनी चालविलेल्या लढ्याच्या आघाड्यांवर ते संगनमताने क्रियाशील आहेत. प्रत्येक गोष्ट ही वस्तुस्थिती निदर्शनास आणून देत आहे की लष्करी अतिरेक्याना फॅसिझमची साखळी सदृश्य प्रतिक्रिया ही वेगवेगळ्या देशातल्या हुकूमशहाच्या एकामागून एक होत असलेल्या कट कारस्थानाची मालिका या नात्याने दिसत आहेत.

आन्तरराष्ट्रीय प्रतिगाम्यांच्या सगळ्या छावणीसमवेत ते नव–फॅसिस्टांना लोकशाहीवादी शक्तींशी सामना देण्यासाठीचे अत्यंत आवश्यक असे राखीव दल मानतात. म्हणूनच १९८१ च्या फेब्रुवारी महिन्यात स्पेनमधील जनरल्सच्या अचानक हल्ल्याचा फज्जा उडाल्यानंतर न्यू फोर्स फॅसिस्टांनी कटवाल्यांच्या गौरवपर निदर्शने केली आणि त्यांच्या उदाहरणापासून कित्ता घ्यायची हाक दिली यात नवल मुळीच नाही.

अशा रीतीनं आजचे फॅसिस्ट हे १९४५ साली आपल्या अगोदरच्यांनी जे घालविले ते परत मिळवायच्या विचारात आहेत. आताची कामगारवर्गीय चळवळ ही त्यांच्या लेखी भलतीच सामर्थ्यशाली आहे. ते स्वतःच्या हिंमतीवर तिच्याशी लढू शकत नाहीत. परंतु ते तुच्छतावाद्यांना दमदाटी द्यायला समर्थ आहेत, सार्वजनिक घबराट निर्माण करू शकतात आणि आपल्या लाडक्या हुकुमशहांना सत्तेवर यायला मदत करू शकतात. खून, जाळपोळ, आणि चिथावणीखोरपणा करायला त्यांना जनतेच्या पाठिंब्याची जरुरी नसते.

फॅसिझम, मग तो गणवेशांतला असो किंवा मुलकी वेशांतला असो, या अगर त्या देशांत कसले ना कसले तरी विजय मिळवायचा संभव आहे, अशी शक्यता जरुर अस्तित्वात आहे. घडामोडींच्या अनुरोधाने परिस्थिती बदलत असते, आणि या घडामोडी कधीकधी अनपेक्षित असतात.

असे असूनही जागतिक शक्तींची सध्याची मांडणी असे दर्शविते की कसलाही फॅसिझम, लष्करी अरेरावी फॅसिझम देखील, जनतांशी मुकाबला करू शकत नाही.



प्रकरण सातवे

उजव्या आणि "डाव्या" दहशतवाद्यांची युति

१

उजवे आणि "डावे" दहशतवादी. थेट परस्परविरोधी दिसणाऱ्या भूमिका घेणारे दोन गट. ज्यांच्या दरम्यान जीवन-मरणाचा संघर्ष असायला हवा अशा दोन प्रवृत्ती. खरोखरी हे असे आहे काय ?

नाही. हे असे नाही.

१९६० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून एक फारच विचित्र घटित निदर्शनास आले आहे, म्हणजे ज्या क्षणी डाव्या-अतिरेकी दहशतवादी संघटना उदयास आल्या त्याच नेमक्या क्षणापासून : या दोन दहशतवादी प्रवृत्तींची आपसात गुप्त गुंफण काही बाबतीत संपूर्ण एकजीव होण्याचा बिंदु गाठणारी. हे अविश्वसनीय वाटते. परंतु निर्विवाद सत्य घटनांनी हे सिद्ध करून दिले आहे.

ही दोस्ती इटलीमध्ये, म्हणजे आजच्या भांडवलदारी जगातील सगळ्यात जास्त "दहशतवादी" देशामध्ये, विशेषेकरून निदर्शनास आली आहे. तिथे अगोदरच उजव्या आणि डाव्या अतिरेक्यांच्या संयुक्त कृती घडलेल्या आहेत आणि काही बाबतीत तर संयुक्तपणे सह्या केलेली हँडबिले वाटण्यात आली आहेत. अति-डावी वृत्तपत्रे नव-फॅसिस्टांवर टीकेचे हल्ले करण्यापासून परावृत्त होतात असे ध्यानात आले आहे. काही भाष्यकार असे म्हणतात की उभयतांच्या दरम्यान एक प्रकारचा "अनाक्रमणाचा करार" झालेला आहे. (पाहा. **जागतिक अर्थव्यवस्था आणि आन्तरराष्ट्रीय संबंध**, अंक ८ वा, १९७९, पृष्ठ १२०).

१९७८ साली ब्लॅक ऑर्डरच्या म्होरक्यांपैकी एक नव-फॅसिस्ट फ्रँको फ्रेडा म्हणाला : "जे डावे सध्या अस्तित्वात असलेल्या पद्धतींचा धिक्कार करतात (म्हणजे जे दहशतवादाला अनुकूल आहेत असा याचा अर्थ घ्यायचा–अ. हे.) त्यांना देखील आम्ही आवाहन करतो. त्यांच्याशी कृतीच्या बाबतीत ऐक्य साधायचा आम्हाला विश्वास वाटतो." नव-फॅसिस्ट ब्लॅक ऑर्डरचा प्रमुख पिनो राउती याने अशी खातरजमा केली : "ज्याप्रमाणे आमचे मुख्य लक्ष्य म्हणजे डावे गट हे

नव्हेत, हे आमच्या पोरांना मी पटवून देतोय, त्याचप्रमाणे या डाव्या गटांनी देखील हे समजायला पाहिजे की त्यांचे मुख्य लक्ष्य म्हणजे आयएस्एस् हे नव्हे."

टचूरिन येथील मारियो पानाची या सात वर्षे वयाच्या शाळकरी मुलाला रेड ब्रिगेड्सनी पळविले आणि मोठ्या खंडणीची मागणी केली, त्यावेळी आयएस्एस्चा प्रतिनिधी आलेला खासदार एम्. त्रामाग्लिया या वकिलाने मध्यस्थाची भूमिका केली.

याहूनही अधिक ठसठशीत अशा सत्य घटना आहेत. १९७६ सालापासून तुरुंगात आसलेला रेड ब्रिगेड्सचा सर्वमान्य नेता व " विचारवन्त " रेनाटो फुर्सियो हा पूर्वी न्यू ऑर्डरच्या इटालियन शाखेचा प्रमुख आणि तिच्या संस्थापकांपैकी एक होता– ही न्यू ऑर्डर म्हणजे माजी एस्एस्वाल्यांनी स्थापन केलेली बहुराष्ट्रीय दहशतवादी संघटना आहे आणि इटलीमध्ये नवफॅसिस्ट आयएस्एमशी ही संलग्न आहे.

कुर्सियो याने १९७० च्या दशकारंभी " रेड ब्रिगेड्सना " भूमिगत केले; हा अजूनही आजच्या घडीला या संघटनेचा आध्यात्मिक नेता म्हणून वावरतो, आणि तुरुंगातून हिच्यावर देखरेख करतो. १९८१ च्या जानेवारी महिन्यात जी. द'उर्सो या न्यायखात्यातल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याला रेडब्रिगेड्सनी पळवून नेल्यावर कुर्सियोने आपल्या तुरुंगातील कोठडीतून असे निवेदन जाहिर केले : " आम्ही अगोदरच असे ठरविलेले आहे की द ' उर्सो यांना, जणू त्यांची थट्टा करण्यासाठी जिवंतपणी घट्ट बांधून एका मोटारीत त्यांच्या कचेरीजवळ म्हणजे न्यायखात्याच्या कचेरीजवळ ठेवून द्यायचे. "

कुर्सियोचे मतान्तर फॅसिस्ट दहशतवादातून डाव्या–अतिरेकी दहशतवादात झाले– हे मतान्तर त्याने अगदी अनपेक्षितपणे केले– इटलीतील व इतर देशांतील असल्या अनेक प्रकरणांपैकी हे केवळ एक प्रकरण आहे. मिलानचे नियतकालिक **गिर्योर्नो** याच्या म्हणण्यानुसार कांही देशांमध्ये फॅसिस्टांना पुढील आदेश देण्यात आले आहेत : " माओवादी असल्याचे ढोंग करा ! निसटत्या रेडब्रिग्रेड्स आणि ब्लॅक सप्टेंबर गट स्थापन करा ! "

इटालियन पोलिसांनी असे सिद्ध करून दाखविले आहे की अगोदरच सांगितले आहे तदनुसार एक्झिक्यूटर्स ऑफ इटली ही फॅसिस्ट संघटना आहे आणि जिने सेंट बार्टोलोम्यूच्या धर्तीची कत्तल करायची देशाला धमकी दिलेली होती तिच्या यंत्रणेत एक खास विभाग असून त्याचे काम म्हणजे सदस्यांना डाव्या अतिरेक्यांची सोंगे घ्यायला सांगायचे आणि विशिष्ट संघटनामध्ये शिरकाव कसा करून घ्यायचा याचे त्यांना शिक्षण द्यायचे. हे लांडगे स्वत:चे वर्णन असे करतात की आपण सीक्रेट कॉंटेंपोररी प्रोलेतारियन आर्मीचे पाठिराखे आहोत, तसेच असोसिएशन फॉर द एलिमिनेशन ऑफ फॅसिस्टस या संस्थेचे पाठिराखे आहोत, द स्ट्रगल

गोज ऑन या संघटनेचे सदस्य आहोत, आणि इंटरनॅशनल ब्लॅक सप्टेंबर ऑर्गनायझेशन या संस्थेचेही सदस्य आहोत.

उजव्या–डाव्या मिश्र दहशतवादी संघटना स्थापन करायचे देखील प्रयत्न करण्यात आले. उदाहरणार्थ न्यू राइटिस्ट्स या संस्थेच्या युवकांनी पश्चिम जर्मनीतील टचूटोबुर्गेर वाल्ड (जंगल) मध्ये एका दिवशी एक परिषद भरविली. ही टोळी दहशतवादी छापे घालणे, रस्त्यात दंगलखोरी करणे असले उपद्व्याप करीत असे आणि अधिकृत नव–नाझी एन्डीपी या संस्थेवर तिच्या "अपुऱ्या क्रियाशीलपणा बद्दल" (!) टीका करण्याची मजल या टोळीने गाठली. या कत्तलखोरांनी हिटलर, गोब्बेल्स आणि माओ झेडाँग यांना आपले गुरु म्हणून मान्यता दिली !

१९७८ साली इंटरनॅशनल फेडरेशन्स ऑफ रेझिस्टन्स मुव्हमेन्ट्स या संस्थेचे अध्यक्ष इटालियन सेनेटर आरियाल्दो बान्फी यांनी अशी बातमी दिली की अगिन्तेर या संस्थेच्या इटालियन फॅसिस्ट हस्तकांनी एक "व्यूहरचनात्मक टिपण" तयार केले असून त्यात असे म्हटले आहे : "आमच्या मते आद्य कामगिरी म्हणजे राज्ययंत्र मोडून टाकणे ही असायला हवी आणि हे डावा अतिरेकीपणा व अराज्यवाद्यांचा बहाणा करून करायला हवे. या प्रवृत्तीच्या गटांमध्ये आम्ही आमच्या माणसांना अगोदरच घुसवून ठेवले आहे. आमच्या सगळ्या कामगिऱ्या म्हणजे प्रचार आणि हिंसाचारी कृती–या सोंगाशी मिळत्या जुळत्या करून घ्यायला पाहिजेत हे उघड आहे. जणू काय या कामगिऱ्या आमच्या वैऱ्यांकडूनच होत आहेत असा देखावा आम्ही उभा करायला हवा."

याच दस्तऐवजाने असेही दाखवून दिले आहे की ज्या संघटनेतून रेड ब्रिगेड्स वाढीस लागली त्या मेट्रॉपॉलिटन पोलिटिकल कलेक्टिव्हमध्ये फॅसिस्ट हस्तकानी शिरकाव करून घेतला. हा शिरकाव करायच्या वेळीच कुसियोने अतिउजव्या न्यू ऑर्डर मधून रेडब्रिगेड्समध्ये प्रवेश केला. ज्या प्रकारची प्रचार मोहीम कुसियो चालवीत होता तीच मोहीम चालवायचे काम दक्षिण इटालियन अतिडाव्या दहशतवादी आर्म्ड प्रोलेतारियन न्यू क्लिआय (एन्एपी) या संस्थेचा "पालक-पिता" डोमेनिकोडेपकी वेनेरी याने आरंभले. या संस्थेचे सदस्यसंख्यावळ नव-फॅसिस्ट मुसोलिनी ॲक्शन ग्रूपच्या संख्यावळाइतकेच जवळ जवळ आहे अशी बातमी आहे.

येवढ्यावरच सगळे भागलेले नाही. याच्या अगोदर, १९६० च्या दशकात, बनावट अति-डावा स्विल्झर्लंडचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी लेनिनवादी) स्थापन करण्यांत आला त्यावेळी त्याचे प्रमुख सदस्य यवेस गुएरिन सेराक आणि रॉबर्ट लेरॉय हे दोघे पूर्वी एस्एस शार्लमेन पथकाचे माजी अधिकारी होते आणि नंतर हे फ्रेंच दहशतवादी ओएएस चे क्रियाशील सदस्य झाले. या दोघांचेही स्विस राजधानीतल्या माओवादी वकिलातीत सदैव स्वागत होत असे. (**डास कोन्सेप्ट** झूरिच, तारीख २० नोव्हेंबर १९७८).

१९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात इटालियन फॅसिस्ट मारियो मेलिनो हा मागाहून स्विट्झर्लंडच्या माओवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वृत्तपत्रात लेख लिहीत आहे, त्याला सेराक आणि लेरॉय यांनी मार्च २२ नामक एका इटालियन अराज्यवादी गटाची स्थापना करण्यात भाग घ्यायचा आदेश दिला. मागाहून हा गट आपल्या दहशतवादी कृत्यामुळे व रेड ब्रिगेड्शी असलेल्या त्याच्या लाग्याबांध्यामुळे कुप्रसिद्ध झाला.

" डाव्या " दहशतवादी संघटनांमध्ये फॅसिस्टांनी घुसायचे काही प्रयत्न इतर देशांमध्ये देखील करण्यात आले. उदाहरणार्थ स्पेनमध्ये माओवाद–धार्जिण्या पीसाई (आर्) गटाची एक शाखा **ग्राप्रो** या दहशतवादी संघटनेमध्ये घुसायचा असा प्रयत्न झाला. असल्या विलीनीकरणावरून इटालियन कम्युनिस्ट उगो पेच्चिओली यांना असे भाष्य करावेसे वाटले की " इकडे डाव्या गटाचा दहशतवाद ओसरत आहे तसतसे उजव्या गटाच्या दहशतवादाचे पुनरुज्जीवन होत आहे, यावरुन एकाच डोक्यांतून या दोन्ही अतिरेक्यांना चालना मिळत असावी की काय असे सुचवावेसे वाटते. "

काही अतिडावे दहशतवादी गट डाव्या गटाच्या युवकांना आकर्षित करून घेण्याच्या आणि त्यांच्या डोक्यात फॅसिस्ट विचार बिंबविण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आले असावेत असा संशय येतो. असली एक संघटना इटलीमध्ये आणि फ्रान्समध्ये वर्कर्स ऑटॉनॉमी हे नाव घेऊन कामगिरी बजावत आहे. शान्ततापूर्ण निदर्शनांच्या प्रसंगी प्रतिकूल हल्ले करणे, रक्तपाती दंगलींना चिथावणी देणे, इटालियन कम्युनिस्ट पक्षाविषयी द्वेष बाणविणे या खास कामगिऱ्या ही संस्था पार पाडते. या गटाचे सदस्य चांगलेच शस्त्रसज्ज असतात आणि त्यांच्यातले बरेचजण फॅसिस्ट असतात असे सांगण्यात येते.

ही सगळी हालचाल जाणूनबुजून चालू आहे याची खातरजमा पुढील सत्य घटनेवरून होते. फॅसिस्ट दहशतवादी हे अतिडाव्या संघटनांमध्ये " सामील झाल्याचे " अनेक दाखले आहेत, तर याच्या उलट डावे अतिरेकी क्वचितच अतिउजव्या संघटनांमध्ये सामील होतात.

नव-फॅसिस्टांनी " डाव्या " दहशतवाद्यांमध्ये घुसायचा निर्धार केलेला आहे यात मुळीच शंका नाही. अतिडाव्यांना फॅसिस्टांच्या प्रमाणे दमदाटी देण्याची व तणाव निर्माण करायची व्यूहरचना अमलात आणायची गळ घालणे हा या मागचा हेतु आहे.

ही कामगिरी काही ठिकाणी कांहीशा यशस्वीपणे चालू करण्यात आली आहे हे कबूल करणे भाग आहे.

२

आपल्याला बहुधा अशी विचारणा करावीशी वाटेल की फॅसिस्टांनी अति-डाव्यांची फसवणूक करायचा हा प्रश्न आहे काय? किंवा असे आहे काय, की कुर्सियो व मेर्लिनो यांजसारख्या ज्यांनी आपण निदानपक्षी भेकड नाही असे सिद्ध केले आहे त्या लोकानी उजव्या गटाचा "त्याग केला आहे" आणि हा मार्ग पसंत केला आहे, कारण त्यांचा कशाच्यातरी योगाने पुनर्जन्म झालेला आहे आणि त्यांची श्रद्धा "कट्टर–क्रान्तिकारक" समाजसत्तावादावर बसलेली आहे आणि या कारणास्तव ते आपल्या माजी शत्रूंच्या गोटांत दाखल झाले आहेत?

असे खरोखरीच ठसठशीत "हृदयपरिवर्तन" झाले आहे काय? एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे स्थलान्तर, खुलासा करण्याजोगे असे, झाले आहे? सखोल मानसिक पुनर्जन्मच झालेला आहे?

निश्चितच असे काही झालेले नाही. असे घडल्याची क्वचित काही उदाहरणे असली तरी देखील नेहमीची प्रथा म्हणजे राजकारणी लोक आपल्या मतांच्या बाबतीत असल्या कोलांट उड्या सहसा मारत नसतात.

असा संभव असेल की काही बदमाषांना नव-फॅसिस्ट आणि अति-डावे दहशतवादी यांच्या दरम्यान मूलभूत फरक कसलाच दिसत नसेल, आणि म्हणून अंतिम पारितोषिक मिळविण्यासाठी आपण कोणाच्या वतीने खून करतो, हल्ले करतो व लुबाडतो हे त्यांना सारखेच वाटत असेल–परंतु उजवा अतिरेकीपणा व डावा अतिरेकीपणा यांचा एकजीव होत आहे ही मात्र वस्तुस्थिती आहेच आहे.

याच्या भरीला आणखी एक गोष्ट म्हणजे डाव्या गटांचे कार्यकर्तेच तेवढे आपसांत एकजूट करीत आहेत अशातला प्रकार नाही; त्यांची वैचारिक धोरणे देखील एकमेकांच्या जवळजवळ येत आहेत. हे एकत्र येणे विचित्र दिसत असले तरी याला दस्तऐवजी पुराव्याचा पाठिंबा आहे.

अलीकडेपर्यंत पश्चिमजर्मनीतील डावी–अतिरेकी दहशतवादी संघटना म्हणजे तथाकथित रेड आर्मी फॅक्शन (आरएएफ–**रोटे आर्मी फ्राक्शओन**) किंवा बाअडेर माइनहॉफ ग्रूप ही १९७५ साली उदयास आलेली संघटना होती. तिच्या संस्थापकामध्ये श्रीमंत भांडवलदारी वर्तुळातल्या व्यक्ती होत्या, त्याचप्रमाणे मध्यमवर्गातल्या आणि लुम्पेन प्रोलेतारियत मधल्या व्यक्ती होत्या. त्यानंतर तिने रेडब्रिगेड्स, फ्रंट लाइन आणि इतर इटालियन टोळ्या यांच्या धर्तीनुसार अनेक

खळबळजनक खून केलेले आहेत. पश्चिम जर्मनीच्या प्रॉसिक्यूटर जनरल सीगफ्रीड बूब्याक, बँकर पॉन्टो, मालक संघाचा अध्यक्ष हान्स–मार्टिन श्लेचर, आणि इतर यांच्या खुनांना ही संघटना जबाबदार आहे.

नव–फॅसिस्टांनी आरएएफ् मध्ये शिरकाव केल्याची कोणतीच उदाहरणे उघडकीस आलेली नाहीत. परंतु जनतेत भय निर्माण करून, भांडवलदारांना घाबरवून आणि लष्करी वर्तुळांना चिथावून, या संघटनेने वस्तुनिष्ठदृष्ट्या नव-नाझींच्या हस्तकांची कामगिरीच बजाविली.

बहुधा या वस्तुस्थितीची अचानक जाण आली म्हणूनच या गटाचा १९७६ साली तुरुंगात गेलेल्या आन्द्रियास बाअडेर व उल्रिके माइनहॉफ या नेत्यांना आपल्या कोठडीत आत्महत्या करायची आणि अशा रीतीने आपल्या संघटनेचा शिरच्छेद करायची प्रेरणा झाली. ओघाओघाने सांगायचे म्हणजे यांच्या कोठडयांत एक सबंध शस्त्रागारच सांपडले. आपण कुठे चाललो आहोत, कुणाला मदत करीत आहोत, हे अखेरीस त्यांच्या ध्यानांत आले असेल काय ? त्यांचे खूनही झाले असते. ते काहीही असो, पण या गटाचा मागे राहिलेला तिसरा नेता एच्. माहलेर याने दूरदर्शनवर पुढील निवेदन सादर केले :

" सध्याची आरएएफ् संघटना या तत्त्वाचे पालन करते : पहिली गोष्ट म्हणजे आम्हाला सगळ्या गोष्टी सपशेल खराब व्हायला हव्या आहेत, म्हणजे (अखेरीस अ. हे.) त्या अधिक चांगल्या होतील. याचा अर्थ म्हणजे फॅसिझमला घुलवून घुलवून उघडयावर आणले पाहिजे हा आहे...या संकल्पनेच्या आधारावर आरएएफ्चे सध्याचे सदस्य हे आत्मनिष्ठदृष्ट्या अतःपर डावे मानले जाऊ नयेत... ते प्यादी आहेत आणि राजकीय सत्तेच्या खेळामध्ये ते वेगळे लोक होत आहेत... भांडवलदारांना हे ठाऊक आहे की अरिष्ट फार काळ टिकणार नाही, " म्हणून ते आरएएफ्चा फायदा घेण्यासाठी मार्ग मोकळा करीत आहेत." (कॉंक्रेट, हॅम्बर्ग, अंक १ ला, १९७८, पृष्ठ २४)

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे पश्चिम जर्मनीतले अतिडावे दहशतवादी हे इटलीतल्या अति–डाव्यांच्या प्रमाणेच आपल्या कामगिऱ्यांची परिणती देशात लष्करी हुकुमशाहीच्या स्थापनेत होऊ शकते ही गोष्ट नाकारत नाहीत, आणि ते स्वतःच उजव्या गटाच्या भांडवलदारांना व लष्कराला ही परिणती साधायला मदत करीत आहेत ही गोष्टही ते नाकारत नाहीत. किंबहुना लष्करी हुकुमशाही आलेली देखील त्यांना बघायला हवी आहे. कारण पाशवी फॅसिस्टांचे वारसदार या नात्याने त्यांना त्यांच्या जागी यायला हवे आहे. राजकीय वेडेपणाची याच्या पेक्षा उच्चतर मर्यादा असू शकते काय ?

टर्कीमध्ये डाव्या अतिरेक्यांनी आपल्या वैचारिक शस्त्रागारात उघड उघड कम्युनिझमविरोधाची भर घातली आहे. टर्कीच्या कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीम

इस्माइल बिलेन यांनी असे दाखवून दिले आहे की "कम्युनिस्ट पक्षाविषयीचा वैरभाव हा नेमका नव–फॅसिस्टांना आणि टर्कीतील सर्व प्रकारच्या अति–डाव्या माओवादी दहशतवाद्यांना एकत्र आणत आहे."

सगळे डावे अतिरेकी "जितके अधिक वाईट तितके अधिक चांगले" याच तत्वविचाराला चिकटून राहिले आहेत. याचा अर्थ म्हणजे क्रान्तिकारक कामगार-वर्गीय चळवळीपेक्षा फॅसिझम अधिक चांगला, हाच आहे. अशाच अर्थाचे विधान १९६८ साली पॅरिस येथील दंगलखोर विद्यार्थ्यांचा नेता व अराज्यवाद्यांचा निकटवर्ती डावा अतिरेकी डॅनियल कोहन बेन्डिट याने केले होते ते असे : "तरुण नव-नाझींनी कितीही भयंकर गोष्टी केलेल्या असल्या तरी राजकीय सत्ता साध्य करायचे ध्येय असलेल्या डाव्यांच्या पेक्षा तेच अजूनही आमच्या अधिक निकटवर्ती असतील..." (पाहा **डाय टागेस्झायटुंग**, पश्चिम बार्लिन, तारीख १५ जून १९७९)

सगळ्या गोष्टी अति-डावे दहशतवादी आणि नव-फॅसिस्ट यांच्या दरम्यानचे वैचारिक ऐक्य दर्शवितात.

हे आश्चर्यकारक आहे काय ? मुळ च नाही. **त्यांच्या स्वतःच्या खुषीनेच** अति-डावे दहशतवादी हे सारा वेळ नव-फॅसिस्टांचा मार्ग अंगिकारत राहिले आहेत. नव-फॅसिस्ट हे हिंसाचाराच्या कृत्यांनी समाजाला धाकांत ठेवू पाहतात. ते कम्युनिस्टांचे आणि समाजसत्तावादी राज्यांचे कमालीचे द्वेष्टे असतात; अति-डावे असेच असतात. नव-फॅसिस्टांचे मार्गदर्शन सीआयए आणि इतर साम्राज्यवादी हस्तक करतात; अति-डाव्यांचेही तसेच असते. नव-फॅसिस्टांना लष्करी हुकुमशहा सत्ताधारी व्हायला हवे असतात; अति-डाव्यांनाही तेच हवे असतात.

केवळ वेडे लोकच असले विचार मनात आणू शकतात.

अंतिम विश्लेषणदृष्टचा उजव्या व बनावट डाव्या दहशतवाद्यांच्या युतीमुळे फायदा कुणाचा होतो ? बनावट डाव्या दहशतवाद्यांचा तर नक्कीच फायदा होत नाही. हिच्यापासून फायदा होतो तो नव-फॅसिझमचा आणि तो देखील स्वतःला जवळजवळ मुळीच तोशीस लागून न घेता; कारण या युतीच्या मदतीने तो भांडवलदारी देशांमध्ये दहशतीच्या सर्वसाधारण लाटेला तीव्र स्वरुप आणू पाहतो, आणि अशा प्रकारे लष्करी हुकुमशाहीचा आसरा घ्यायच्या तुच्छतावाद्यांच्या इच्छेला खतपाणी घालतो.

हार खातात ते प्रामाणिक डाव्या-गटाचे लोक; त्यांच्या अननुभवीपणाचा फायदा घेण्यांत येतो आणि त्यांच्या आकांक्षाच्या विरुद्ध असलेल्या दिशेकडे त्यांना रेटण्यात येते. आपला उपयोग कसा करण्यात आला आहे हे एक दिवस तरुण डाव्या अतिरेक्यांच्या ध्यानांत येईल आणि त्यावेळी त्यांच्या अंगावर शहारे येतील. म्हणूनच इटलीसारख्या देशात नवफॅसिस्ट संघटनांवर अति-डाव्यांचे वर्चस्व आहे हा भ्रम आहे.

उजव्या आणि "डाव्या दहशतवाद्यांच्या" दरम्यान कसलाही सरळमार्गी समझोता झालेला नाही. उलटपक्षी प्रसंग विशेषी त्यांच्या दरम्यान, अलिकडेच पॅरिस शहरी घडल्या तशा प्रकारच्या, रक्तपाती झटापटी होतात. असे असूनही उभय गटांच्या धोरणांमध्ये बऱ्याचशा सामाइक गोष्टी आहेत आणि राज्याराज्यांच्या दरम्यान खऱ्याखुऱ्या शान्ततामय सह–अस्तित्वाची उभयतांना विशेषकरून धास्ती वाटते, कारण यामळे त्यांचा आधारच तुटेल.

जे घडते ते हे असे असते : पाश्चात्य देशातले प्रामाणिक परंतु गोंधळलेले डावा-गटवाले अनेकदा त्यांच्यासाठी लावून ठेवलेल्या सापळ्यात अडकतात. आजच्या फॅसिझमच्या डावपेचातली ही नवी क्लुप्ती असते आणि ती छाननी करण्याच्या योग्यतेची आहे.

कपाळावर नाझी स्वस्तिकाचा शिक्का असलेले राजकीय मुडदे आपल्या दफन-भूमीतून उठून उभे राहत आहेत. फॅसिझमचे खरेखुरे पुनरुज्जीवन होऊ घातले आहे असा विचार मात्र आपण मनात आणता कामा नये. ३६ युद्धोत्तर वर्षांच्या ओघात फॅसिझम वस्तुतः पराभूत झालेला आहे; त्याचे जन्मस्थान जे युरोपखंड, तिथे त्याचे सगळे प्रयत्न विफल करण्यात आले आहेत. इटली, आणि मुख्यत्वे करून त्याचा दक्षिण भाग, हा अपवाद वगळल्यास युरोपखंडामध्ये एकही महत्त्वाचे

स्थान हस्तगत करण्यात तो अपेशी ठरलेला आहे. आजच्या जगातील खरेखुरे डावागटवाले आणि उजवागटवाले यांच्या दरम्यानचे शक्तींचे संतुलन डावागट वाल्यांना अनुकूल असे इतक्या प्रमाणात बदलले आहे की फूहरेरचे आणि ट्रूचेचे वारसदार एकसारखे हार खात आहेत.

परंतु युद्धखोर साम्राज्यशाहीला फॅसिस्टांची पुन्हा एकदा गरज लागेल त्यावेळी परिस्थिती बदलायचा संभव आहे. शीतयुद्धाचा अंतिम शेवट झाल्यावर त्यांच्या-वर मरणाचा धोका ओढवेल. या कारणास्तव ते तणावशमन विफल करण्यासाठी, जनतेच्या मनाला ताण देण्यासाठी आणि राष्ट्रांच्या शान्ततामय जीवनात विघाड आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतील.

नव-अराज्यवादी आणि नव-नेचायेववादी यांच्याविषयी म्हणाल, तर त्यांना भवितव्य मुळीच नाही, ज्याप्रमाणे बाकूनिन आणि नेचायेव यांना मुळीच भवितव्य नव्हते, तसेच यांनाही भवितव्य नाही. जनतेपासून अलग पडलेले मूठभर संतप्त युवक हेच काय ते त्यांच्या पाठीशी उभे आहेत किंवा उभे राहतील. लुम्पेन प्रोले-तारियत समाज तर जग बदलायला आणि इतिहास घडवायला असमर्थ आहे.

परंतु आणखी एक राजकीय शक्ती आज आस्तित्वात नाही काय ? आणि ती अगदी क्रियाशील आहे. ती म्हणजे माओवाद. या माओवादाने समाजसत्तावादाचे वैरी असलेल्या उजव्या गटाच्या व बनावट-डाव्यागटाच्या अशाच सारख्या योजना अमलात आणण्यासाठी त्यांना गाठायचा प्रयत्न चालविलेला आहे.

प्रकरण आठवे

माओवादी साथीदार

१

अराज्यवाद्यांचा कित्ता गिरवून डावे अतिरेकी जवळजवळ नेहमीच आणि जवळजवळ सर्वत्रच असे सांगतात की, सगळ्यात जास्त महत्वाची गोष्ट म्हणजे आम्ही राज्य संस्थेचे तत्वनिष्ठ विरोधक आहोत आणि आम्हाला कोणत्याही सरकारशी काही एक कर्तव्य नाही. विविध देशांतल्या कम्युनिस्टांवर ते असा आरोप करतात की कम्युनिस्ट हे " सोविएत संघराज्याच्या सरकारवर अवलंबून असतात आणि म्हणून ते खरेखुरे क्रांतिकारक धोरण अंगिकारायला असमर्थ असतात. "

म्हणजे आजच्या जगातले कोणतेही सरकार खुद्द डाव्या अतिरेक्यांची काळजी घेत नाही असा याचा अर्थ होतो काय ?

असले सरकार अस्तित्वात आहेच आहे आणि ते अनेक देशांतल्या बनावट–डाव्यांना गुप्तपणे आश्रय देत आहे. याच्या भरीला आणखी असे सांगायला हवे की या पाठिंब्याच्या अभावी अनेक देशांतल्या अतिडाव्या दहशतवादी संघटना टिकून राहायला असमर्थ ठरल्या असत्या आणि विलयाला गेल्या असत्या.

आम्ही चीनच्या जनता प्रजासत्ताकाच्या माओवादी सरकारविषयी बोलतो आहोत. डावे अतिरेकी आणि माओवादी हस्तक यांच्या दरम्यानच्या बंधनांची भरपूर पुरावा उपलब्ध आहे. उजवे आणि बनावट-डावे दहशतवादी यांच्या दरम्यानच्या संबंधांप्रमाणेच ही बंधने दुहेरी स्वरुपाची आहेत : उभय बाजूंचे जरासे पडद्यांतले थेट संपर्क आणि " वैचारिक " राजकीय साधर्म्य असे यांचे स्वरुप आहे. हा दुहेरीपणा सत्य घटनांचा निःपक्षपाती व काळजीपूर्वक अभ्यास केल्यास दिसायला लागतो.

ही तर बराच काळ सर्वज्ञात अशी गोष्ट आहे की सुमारे १९६० च्या दशकापासून पुढे भांडवलदारी जगात खोटे " कम्युनिस्ट पक्ष " उदयास आलेले दिसत आहेत– या संघटना स्वतःला " कम्युनिस्ट " म्हणवून घेतात परंतु प्रत्यक्षांत खऱ्या कम्युनिस्ट पक्षांचा छळवाद करण्यात अविश्रांतपणे गुंतलेले असतात आणि यांच्याकडे मार्क्सवाद–लेनिनवादाशी समाइक असे काही एक नसते.

त्याचप्रमाणे लक्षणीय गोष्ट अशी की जिथेजिथे या संघटनांची पाळेमुळे खोल रुजलेले असतील, तिथेतिथे पुढे मागे यांच्यातून दहशतवादी गट उदयास येतात. ही गोष्ट इटली, पश्चिम जर्मनी, स्पेन, पोर्तुगाल, स्विझर्लंड आणि टर्की त्याचप्रमाणे आशिया खंडातील व लॅटिन अमेरिकेतील अनेक देश यांमध्ये घडलो. ही एक संघटना असली की हिच्यातून हमखास दुसरी जन्माला आली.

उदाहरणार्थ, इटली. इथे स्वतःला फाइटिंग कम्युनिस्ट पार्टी (एफ्सीपी) म्हणवून घेणारी एक संघटना उदयास आली आणि आता, जिथे जिथे हिला शक्य आहे तिथे तिथे ही इटलीच्या खऱ्याखुऱ्या व सामुदायिक कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यात अडथळा आणत आहे. रेड्ब्रिगेड्सशी एफ्सीपी सहकार्य करते असे उघडकीस आले. ब्रिगेड्सच्या एका अनामिक प्रतिनिधीने **एक्प्रेस्सो** या वृत्तपत्राच्या प्रतिनिधीला सांगितले की " आमची मार्गदर्शक सूत्रे म्हणजे मार्क्सवाद-लेनिनवाद व चीनची सांस्कृतिक क्रांती हीच राहिलेली आहेत आणि हीच राहतील...कामगार-वर्गीय शक्तींची उभारणी ही फाइटिंग कम्युनिस्ट पार्टी आणि सामुदायिक क्रान्तिकारक सेल्स या दोन घटकांच्या लष्करी–राजकीय साहचर्यातून एका सबंध ऐतिहासिक कालखंडभर घडत राहील" (**एक्प्रेस्सो**, तारीख ११ जानेवारी १९८१)

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे रेड्ब्रिगेड्स आणि तिचे दोस्त सध्याच्या चीनच्या माओवादी नेत्यांच्या देखील पुढे जातात, कारण चीनच्या नेत्यांनी तर " सांस्कृतिक क्रान्तीचा धिक्कार केला आहे. यावरून आपण असे अनुमान काढू शकतो काय, की माओवाद्यांनी व रेड्ब्रिगेड्सनी किती तरी अगोदर निकटचे संबंध प्रस्थापित केले होते ? –आणि हे संबंध नुसतेच शुद्ध राजकीय स्वरूपाचे नव्हते ?

पश्चिम जर्मनीत माओवादी–धर्जिणा जर्मन कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी–लेनिनवादी) क्रियाशील आहे. तो **रोटेर मॉर्गेन** (रेड मॉर्निंग) हे वृत्तपत्र प्रसिद्ध करीत असतो आणि " जर्मन कम्युनिस्ट पार्टी मुर्दाबाद !" अशी घोषणा (खऱ्या खुऱ्या पश्चिम जर्मन कम्युनिस्ट पक्षाला अनुलक्षून) देत असतो. या माओवादी पक्षाचा लक्षणीय कल दहशतवादाकडे आहे, याचा संपर्क दहशतवादी बाअडेर–माइनहॉफ गटाशी असण्याचा संभव आहे. ओघाओघाने सांगायचे म्हणजे मायकेल बोर्चार्डट हा माओवादी धार्जिण्या सीपीजी (एम्एल) चा माजी सदस्य आता फ्रँकोच्या धर्तीच्या फॅसिझमचा प्रचार करणा-या एका फॅसिस्ट आघाडीची डेर **औफमार्श** (कँपेन) पत्रिका तिचे मुखपत्र म्हणून प्रसिद्ध करतो.

सुमारे दोन वर्षांपूर्वी पश्चिम जर्मनीच्या नव-नाझी नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टीचा अध्यक्ष फ्रिट्झ–उलिरच बुन्ड्ट याने आपला पाठिराखा समजून एका माणसाला विश्वासांत घेऊन सांगितले की " एम्एल् वाल्या पोऱ्यांशी (म्हणजे माओवादी

धार्जिण्या पक्षाशी –अ. हे.) आम्ही सहज समझोता करु शकतो. त्याच्यात व आमच्यात बरेचसे समाइक आहे. उदाहरणार्थ, स्वतंत्र जर्मनीची मागणी (ही सूडवाद्यांची घोषणा आहे–अ. हे.), रशियनांविरुद्ध निवेदने .... आम्ही आणि माओवादी जर एकत्र आलो तर पुढील काही वर्षात गोष्टी खरोखरी मार्गाला लागतील !' (जे. पोमोरिन, आर्. जुंगे, **डाय नेओनाझीज**, डॉर्टमुन्ड, १९७८, पृष्ठ १९) त्यानंतर कित्येक महिन्यांनी बॉन आणि हॅम्बर्ग येथे नव-नाझी आणि माओवादी धार्जिण्या गटांनी सोविएत अध्यक्ष लिओनिद ब्रेझ्नेव यांच्या पश्चिम जर्मनीच्या भेटीला निषेध करणाऱ्या समाइक घोषणा देणारी निदर्शने केली

'जून २ ची चळवळ' या नावाची तरुणांची दहशतवादी टोळी पश्चिम बर्लिन शहरी कार्यरत होती आणि स्थानिक अराज्यवादी तसेच माओवादी यांच्याशी तिची दोस्ती होती.

पश्चिम युरोपमधील इतर अति–डाव्या दहशतवादी गटांनी देखील म्हणजे पोर्तुगालमधील एम्आर्पीपी व एओसी, याजसारख्यांनी, माओवाद्यांशी संपर्क प्रस्थापित केलेले होते. हे गट कम्युनिस्टांच्या व इतर पुरोगामी संघटनांच्या कार्यालयांवरील हल्ल्यांमध्ये भाग घेत असत. १९७० च्या दशकाच्या मध्यावर त्यांनी निवडणूक मोहिमेच्या नेहमीच्या कार्यात अडथळा आणण्यासाठी लिस्बन शहराच्या मध्यभागी दंगलींना चिथावणी द्यायचा प्रयत्न केला. मागाहून या गटांपैकी एका गटाचे नेते आदेश मिळवायला पेकिंगला गेले. तिथे तर असल्या गटांवर देखरेख करणारे एक खास खातेच आहे हे उघड दिसते.

जपानमध्ये मिलिटंट्स व रेड आर्मी यांजसारखे माओवादी धार्जिणे दहशतवादी गट आहेत; टर्कीमध्ये–दहशतवादी कामगार–शेतकरी पक्ष आणि क्रांतिकारक कम्युनिस्ट पक्ष; निकाराग्वामध्ये अतिडावा वर्कर फ्रंट; भारतात–नागालँड, मिझोराम आणि देशाच्या ईशान्य भागातील इतर प्रदेशातले फुटीरवादी हे तिथे पेकिंग धर्जिण्या कळसुत्री बाहुल्यांचे सरकार स्थापन करायचे प्रयत्न करीत आहेत. त्यांना चीनमधील खास शाळांतून व शिबिरांतून दहशतवादी डावपेचांचे शिक्षण दिलेले असते.

१९८१ च्या जून महिन्यात भारतीय वृत्तपत्रांनी अशी बातमी दिली की भारताच्या ईशान्य भागातील माओवाद्यांनी स्थापन केलेल्या स्पेशालिस्ट कमिटी ऑफ नागालॅंड या संस्थेने मिझो नॅशनल फ्रंट, नॅशनल व्हॉलंटियर फोर्सेस, आणि नॅशनल लिबरेशन आर्मी ऑफ मणिपूर, असल्या फुटीरवादी संघटनांशी, त्याचप्रमाणे आसाम राज्यांतील राष्ट्रवादी संघटनांशी निकटचे संबंध प्रस्थापित केले आहेत. (**न्यू वेव्ह**, दिल्ली, तारीख २७ जून १९८१). एकीकडे चीनचे मुत्सद्दी भारताशी नेहमीचे संबंध प्रस्थापित करण्याच्या आपल्या इच्छेविषयी बोलत होते आणि त्याचवेळी चीन आपल्या घातपाती कारवाया करण्यात गुंतलेला होता.

फिलिपाइन्समध्ये दहशतवादी कामगिऱ्या माओवादी धार्जिण्या न्यू-पीपल्स आर्मीकडून अमलात येत असतात; पेरु देशात सेन्देरो लुमिनोसोने १९८० च्या जुलै महिन्यापासून १९८१ च्या जून महिन्यापर्यंत दहशतवादाची ८०० हून अधिक कृत्ये केली. नकाशावर नजर टाकल्यास असे दिसून येते की ज्या प्रदेशांवर आपल्या संकल्पित महान चिनी साम्राज्याचे प्रभाव-क्षेत्र म्हणून पेकिंग हक्क सांगते त्या प्रदेशांतून माओवादी धार्जिण्या दहशतवादी संघटनांची एक मालिकाच पसरलेली आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे चीनकडेदेखील राज्यपुरस्कृत दहशतवादाची एक पध्दती आहे.

इटालियन **युरोपियो** या वृत्तपत्राच्या म्हणण्यानुसार १९७८ साली विविध देशांतील उजव्या गटाच्या दलांच्या दोन बैठकी ब्राझील आणि स्पेनमध्ये झाल्या आणि त्यामध्ये असे ठरविण्यात आले की ब्लॅक इंटरनॅशलच्या कार्यक्रमातील काही कलमांना मान्यता देणाऱ्या अति डाव्या गटांशी सहकार्य विकसित करण्याकडे जास्त लक्ष देण्यात यावे. **यूरोपियो** या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत स्पॅनिश फॅलिस्ट जोसे तोलो ब्लास्को म्हणाला, "माओचा सिद्धान्त हा हिटलरच्या सिद्धान्तापासून फार दूर राहिलेला नाही याचे अगोदरच निरीक्षण करण्यात आले आहे ..... आम्ही ज्यांच्या भेटी घेतल्या त्या डाव्या-अतिरेकी गटांच्या सदस्यांमध्ये इटालियन्स अर्थात होतेच. रेडब्रिगेड्स का ? या विषयी मी सांगू शकत नाही. मी फक्त कांही हिन्ट्स ' देऊ शकतो. रेड्ब्रिगेड्स संघटनेत फूट पडलेली आहे .....चिनी विचार-सरणीचा प्रचार करणाऱ्या गटांशी आमचे संपर्क होते ."

डाव्या अतिरेक्यांसाठी पेकिंगने चिनी जनता प्रजासत्ताकाच्या सरहद्दीपलीकडील तरुण लोकांना तत्त्वविचारात तरबेज करण्याची एक पध्दतीच तयार केली असल्याचे दिसते-ही पध्दति ' सांस्कृतिक क्रान्तीचा अनुभव ' हिशोवात घेते. त्याचे लक्ष म्हणजे मुख्यतः अपरिपक्व आणि कमीतकमी शिस्त असलेले तरुण लोक वहुतांशी मध्यमवर्गातून आणि लुम्पेन प्रोलेतारियत मधून आलेले हेच असतात. अद्वातद्वा भाषणबाजी, अराज्यवादी उपजत बुद्धीला उत्तेजन, कत्तलखोर आणि सत्तावळकावू भावना चेतविणे, वडिल पिढीविषयी तिरस्काराची जोगवण करणे-लाचलुचपत-ही सगळी साधने उपयोगात आणली जातात. विद्यापीठांमध्ये माओ' वादी गुप्त गट निर्माण करण्याकडे विशेष लक्ष देण्यात येते. मोठ्या प्रमाणात वितरण होत असलेल्या माओवादी वाङमय देखील विद्यार्थ्यांना अनुलक्षूनच असते.

बनावट-क्रांतिकारी, गुंडगिरीच्या घोषणांच्या योगाने युवकांना बिघडविण्याची कामगिरी सतत चालू ठेवण्यात येत आहे. लुम्पेन प्रोलेतारियन्सविषयी म्हणाल तर गुंडगिरी कशी करावी हे त्यांना शिकवायची जरुरीच नसते. चीनबाहेरील अति-

डाव्या दहशतवादाचे आधारस्तंभ कशा प्रकारचे आहेत हे माओवाद्यांना समजते

दुसऱ्या बाजूकडून प्रतिसाद का मिळतो याची कारणे देखील सुस्पष्ट आहेत. भांडवलदारी देशांतल्या अति–डाव्या संघटनांना पैशाची नड असते. केवळ दरोड व ओलीस ठेवलेल्यांचे पैसे यांच्यावर ते अस्तित्वात राहू शकत नाहीत. कोणतेही कटकारस्थान म्हटले की त्याला खूप पैसे लागतात. कटवाल्यांची झटपट हालचाल हवी असलेल्यांना आणि कार्यक्षम दलाल पदरी बाळगणाऱ्यांना विशेष करून खूप पैसे लागतात.

यात आणखी भर म्हणजे अति–डाव्या दहशतवाद्यांना देखील मुत्सद्यांकडून मिळणाऱ्या गुप्त संरक्षणाबरोबर राजकीय संरक्षण लागते. पैसा आणि संरक्षण या दोन्ही गोष्टी प्रमुख परकीय सत्तांकडून (अमेरिकेकडून किंवा चीनकडून) तत्परतेने मिळत असतील, तर मग असल्या व्यवहारांच्या फायद्यांबाबत दहशतवाद्यांमधील मतांमध्ये फरक असतो.

माओवादी व अति–डावे अतिरेकी यांची एकजूट घडवून आणणाऱ्या गोष्टी म्हणजे संघटनात्मक व द्रव्यविषयक बाबीच तेवढ्या असतात अशातला प्रकार नसतो. त्यांचा एक समाईक विचारसरणीही असते.

२.

त्यांची एकजूट घडवून आणणारी पहिली गोष्ट म्हणजे सगळ्या देशी. देशींच्या कामगारवर्गीय चळवळीविषयी त्यांना उघड उघड वाटत असलेला वैरभाव ही असते.

या चळवळीविषयी डाव्या अतिरेक्यांच्या वृत्तीबाबत आम्ही अगोदरच सांगितले आहे. ते कामगारवर्गाची नालस्ती करतात. कामगार वर्ग हा भांडवलदार झालेला आहे असा त्यांचा दावा असतो, आणि म्हणून अनन्य क्रांतिकारक शक्ती म्हणजे युवक आणि लुम्पेन–प्रोलेतारियत हेच असतात असा त्यांचा दावा असतो. माओ झेडाँग यांच्या नेतृत्वाखाली माओवाद्यांनी हीच भूमिका अंगिकारली. युवक आणि लुम्पेन प्रोलेतारीयत या विधायक घटकाला त्यांनी शेतकऱ्याची जोड दिली. शेतकरी हे "गनिमी युद्धात" भाग घ्यायला तयार असतात असा त्यांचा दावा होता. सुरुवातीपासूनच नेचायेव आणि बाकूनिन यांच्या मतांचा अंगिकार हे माओ आणि त्यांचे अनुयायी यांचे वैशिष्ट्य होते.

आपल्या वाङ्मयात "आन्तरराष्ट्रीय कामगार चळवळ" ही शब्दयोजना टाळण्यापर्यंत माओवाद्यांची मजल गेली, आणि त्यांनी कामगारांच्या संपाच्या चळवळीला 'स्वयंस्फूर्त असंतोष' हे लेबल लावले. त्यांच्या मते पाश्चात्य देशांतील शहरी

कामगारवर्गाने "क्रान्तीला वेग आणण्याच्या" कामगिरीला प्रेरणा देण्यापेक्षा त्या कामगिरीत अडथळाच अधिक आणला. परंतु लुम्पेन प्रोलेतारियतशी त्यांचे सूत छान जमले (नव–फॅसिस्ट देखील सगळीकडे कामगारवर्गाला रक्तात बुडवायसाठी लुम्पेन प्रोलेतारियन्सना आणि युवकांना जवळ करीत नाहीत काय ?).

कामगारवर्गीय चळवळीविषयीची माओवाद्यांची ही वृत्ति त्यांनी पश्चिम युरोपातील आणि इतर ठिकाणच्या कम्युनिस्ट पक्षांना ज्या रीतीने वागविले तीमध्ये ठळकपणे प्रतिबिंबित झालेली होती. या पक्षांचे जे नेते माओ झेडाँग यांना व्यक्तिशः भेटले होते ते याविषयी बोलले आहेत आणि त्यांची मते मिळतीजुळती आहेत. माओ झेडाँग यांनी निःसंदिग्धपणे त्यांची अशी समजूत करून दिली की "माझा तुमच्यावर विश्वास नाही. आणि तुमच्या पक्षांना मी मोठेसे महत्व मुळीच देत नाही." (पेकिंगने भांडवलदारी देशांतल्या ज्या बनावट कम्युनिस्ट पक्षांच्या स्थापनेला पैशाची मदत केलेली होती त्यांच्याशी पेकिंगने वेगळ्या रीतीने वर्तन केले. असे असूनही हे पक्ष म्हणजे खऱ्याखुऱ्या अधिकृत संघटना म्हणून पेकिंगने मानल्या नाहीत तर केवळ सोईस्कर दलाल अशाच मानल्या.)

जेव्हा एका प्रमुख इंग्रज कम्युनिस्टाने असा युक्तिवाद केला की तिसरे जागतिक महायुद्ध हे तुलनात्मक दृष्टया लहानशा ब्रिटिश राष्ट्रावर जवळ जवळ संपूर्ण सर्वनाशाचा धोका ओढवून आणील त्यावेळी त्याला असे सांगण्यात आले की 'विश्वव्यापी समाजसत्तावादी राष्ट्रकुटुंबाची उभारणी इंग्रजांसमवेत करायला हवी असे कोण म्हणालाय ?'

एका झेकोस्लोवाक कम्युनिस्टाने माओवाद्याना विचारले, "झेकोस्लोवाकियातील सगळेच्या सगळे दीड कोटी नागरिक नष्ट करण्यात आले तर माझ्या देशात समाज सत्तावादाची उभारणी कोण करील ?" याला उत्तर असे मिळाले की "मोठ्यासाठी लहानाचा बळी आपल्याला देता आला पाहिजे."

पश्चिम जर्मन कम्युनिस्ट पक्षाच्या निवेदनात म्हटले आहे की "१९६० साली मॉस्को येथे कम्युनिस्ट आणि कामगार पक्षांची जी आन्तरराष्ट्रीय बैठक झाली तीत आमच्या प्रतिनिधींनी चिनी कॉमरेड्सना सांगितले की आण्विक युद्ध हे आमच्या जनतेच्या लेखी राष्ट्रीय सर्वनाश ठरेल" त्यांना तेच उत्तर मिळाले.

माओ झेंडाँग आणि इटालियन कम्युनिस्ट पक्षाचे नेते पाल्मिरो तोग्लियानी यांच्या दरम्यान मतभेद झाला. १९६९ च्या वसंत ऋतूत माओवाद्यांच्या **हुन्क्वी** या तात्त्विक नियतकालिकाने उघड उघड इटालियन कम्युनिस्ट पक्षाच्या विरुद्ध रोख असलेला एक लेख छापला. त्यात म्हटले होते : "विचित्र जरी दिसत असले, तरी या लोकांना राष्ट्रीय बंधविमोचन चळवळींच्या क्षेत्रातील (म्हणजे आशिया खंडातील–अ. हे.) जनतांच्या बंधविमोचन चळवळींची प्लेगासारखी भीती वाटते...त्यांना एकच काळजी वाटते आहे ती म्हणजे ही की त्यांच्या प्रदेशांतल्या दलित राष्ट्रांच्या आणि जनतांच्या प्रतिकाराच्या ठिणग्या

सर्वनाश तर घडवून आणणार नाहीत ना ? आणि ही काळजी त्यांच्या मनाला शांति मुळीच मिळवून देत नाही" (**हुन्क्वी** अंक ३-४, १९६९). अनुमान हे आहे की सर्वनाशाला प्रतिबंध करणे हे पाप आहे.

साहजिकच, पाश्चात्य देशांतल्या कम्युनिस्टांना आपल्या राष्ट्रांच्या भवितव्याचा विचार केल्यावाचून राहवेना. माओवाद्यांना हे मुळीच महत्त्वाचे वाटत नव्हते–आणि अजूनही वाटत नाही. वस्तुतः त्यांनी पाश्चात्य देशांतल्या श्रमिक बहुजनसमाजाला हिशेबांतून काढूनच टाकले आहे.

आजचे डावे अतिरेकी हे कामगारवर्गाविषयी जी वृत्ति धारण करतात तिच्याशी याचे केवढे तरी ठसठशीत साम्य आहे ! मग माओवादी त्यांची येवढी काळजी घेतात याचे नवल मुळीच वाटायला नको !

याच्याच ओघातली बाब म्हणजे कामगारवर्गीय चळवळीविषयींचा चिनी वर्चस्ववाद्यांचा वैरभाव त्यांच्या परराष्ट्रीय धोरणात प्रतिबिंबित झालेला आहे. या धोरणाने पिसाट सोविएत–विरोधवादाचे सोंग घेतलेले आहे. ही गोष्ट सर्वश्रुत आहे. आजच्या घडीला देखील, म्हणजे १९८० च्या दशकात, साम्राज्यवादी जी आक्रमक सोविएत–विरोधी भाषा वापरतात, तिच्या पेक्षाही अधिक आक्रमक सोविएत विरोधी भाषा मास्कोवाद्यांनी चालूच ठेवलेली आहे. पुन्हा गोष्ट अशी की सोविएत संघराज्याला शिव्याशाप द्यायचा विडा उचललेल्या पाश्चात्य डाव्या अतिरेक्यांची मते आणि ही मते यांची संपूर्ण एकवाक्यता आहे. उदाहरणार्थ इटलीची रेड ब्रिगेड्स. यांनी आपल्या सोविएत–विरोधी भावना लपवून ठेवणे दूरच राहिले. उलटपक्षी त्या त्यांची जाहिरात करतात.

माओ झेडाँग यांच्या वारसदारांना ही केवळ सोविएत संघाच्या विषयी वैरभाव प्रदर्शित करायचीच तेवढी बाब नाही. एक वर्चस्ववादी महासत्ता निर्माण करायचा उद्देश ठेवून ते आपले एकंदर परराष्ट्रीय धोरण ज्या ठाम मतावर आधारतात ते म्हणजे हे की तिसरे जागतिक महायुद्ध अपरिहार्य आहे आणि त्याची परिणति चीन ही अशी जगावर प्रभुत्व गाजविणारी सत्ता म्हणून उदयास येण्यात होणार आहे.

असल्या युद्धाच्या भवितव्याविषयी डावे अतिरेकी कसा विचार करतात ? त्यांनाही तिसऱ्या जागतिक महायुद्धाचे स्वप्नरंजन करावेसे वाटते असे त्यांच्या निवेदनांवरून उघड दिसते. त्यांचे असे ठाम मत दिसते की जगाचा नाश करणारे सर्वनाशकारी युद्ध आपल्याला समृद्धिकारी भविष्यकाळ आणून देईल.

असल्या "तर्काची" अपेक्षा त्यांच्याकडून करता येते. सखोल अमर्याद निराशावाद कधीकधी हताशपणा उत्पन्न करतो. हे राजकारणाला लागू पडते तसेच खाजगी जीवनाला लागू पडते. वस्तुतः अति–डाव्या दहशतवाद्यांच्या सगळ्या "तत्त्वविचारात्मक" वक्तव्यामधे हताशपणा ओतप्रोत भरलेला असतो. आपल्या कालखंडाच्या खऱ्या स्वरूपाचे आणि जागतिक शक्तींच्या मांडणीचे विश्लेषण

करण्याऐवजी आणि क्रांतिकारक चळवळींनी अंगिकारायची अत्यंत परिणामकारक व्यूहरचना विचारात घेण्याऐवजी ते अराज्यवादी गोंधळ प्रदर्शित करतात आणि सर्वनाशाच्या स्वीकाराची तयारी दर्शवितात. पाश्चात्य देशांतील आपल्या राजकीय दोस्तांकडून माओवादी परराष्ट्रीय धोरणकर्ते नेमक्या याच गोष्टीची अपेक्षा करतात.

दहशतवाद्यांशी माओवाद्यांचे सूत जमायचे आणखी एक गुप्त कारण आहे. माओ झेडाँग हे खुद्द स्वतःच वस्तुत. आपली सगळी हयातभर मध्यमवर्गीय अतिरेकी होते. ते कम्युनिस्ट चळवळीत सामील झाले आणि तीत दृढमूल झाले ते दहशतवादी इलाजांच्या योगानेच. त्यांनी पक्षामध्ये आणि देशामध्ये रूढ केलेले आपले व्यक्तिमहात्म्य याला मोठ्या प्रमाणात पोषक ठरले.

माओ झेडाँग आपली एक आठवण सांगताना म्हणाले की तरुणपणी आपण अराज्यवाद्यांच्या निकट होतो. त्यांच्यामध्ये आपले अनेक मित्र होते आणि एका काळी आपल्याला एक अराज्यवादी संस्था संघटित करायला हवी होती. त्याकाळी विद्यार्थ्यांच्या एका वृत्तपत्रांत लिहिलेल्या लेखात त्यांनी क्रॉपोट्किनचा गौरव केला, आणि त्याला मार्क्स यांच्या पेक्षा श्रेष्ठ ठरविला. (पी. ए. क्रॉपोट्किन, १८४२–१९२१), रशियन प्रिन्स, पंडित व प्रवासी; आन्तरराष्ट्रीय अराज्यवादी चळवळीचा एक तत्त्वविशारद, मार्क्सवादाचा खंबीर विरोधक. –संपादक) नंतर ते म्हणाले. "अराज्यवादावरील लेख वाचून मी खूपच प्रभावित झालो. त्या काळी त्याच्या तत्त्वाशी सहमत होतो."

परंतु त्यांनी अराज्यवादी राहणे चालूच ठेवले. मागाहून ते चिनी लाल सेनेचे पोलिटिकल कोमिसार झाले त्यावेळी त्यानी आपल्या भवितव्याची मदार लुम्पेन प्रोलेतारियतवर ठेवली. ते "उडाणटप्पू डावपेचांविषयी" क्षमाशील असत- याच्यापायी फौजेचे परिवर्तन लुटारूंच्या टोळ्यांत झाले असते. १९२८ साली चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या सहाव्या अधिवेशनांत हे धोरण अराज्यवादी म्हणून याचा धिक्कार करण्यात आला.

"सांस्कृतिक क्रान्तीच्या" काळामध्ये माओ आणि त्यांचा गट यांनी "दंगल हे न्याय्य कार्य असते," "क्रान्ती म्हणजे नासधूस" इत्यादी सारख्या चक्क अराज्यवादी घोषणा सादर करायचे आदेश दिले, **हुन्वेईपिंग्ज** (रेड गार्डस) या राक्षसी संस्थेला सगळे उलथून पाडा, सगळे नाकारा, सगळ्यांची शंका घ्या, आणि या "तत्त्वज्ञानाचा" आधार घेऊन पक्षाच्या सार्वजनिक व सांस्कृतिक संघटना यांच्यावर छापे घाला,–असे शिक्षण देण्यांत आले.

गोंधळलेल्या व बेफाम तरुणांना अशाच प्रकारच्या निरर्थक हिंसाचारी कृती करायची चिथावणी देत असलेल्या भांडवलदारी जगातले डावे अतिरेकी गट जी प्रचार मोहीम चालवितात, तिच्याहून असला प्रचार कोणत्या बाबतीत वेगळा असतो?

१९०६ साली लेनिन यांनी त्या काळातील रशियातल्या शोषणाच्या प्रकाराविषयी लिहिले : "समाजाचे उडाणटप्पू घटक, लुम्पेन प्रोलेतारियन आणि अराज्यवादी गट यांनी लढ्याचा हा प्रकार सामाजिक लढ्याचा अधिक पसंत किंबहुना **एकमेव** प्रकार म्हणून अंगिकारला." (व्ही. आय. लेनिन, संकलित ग्रंथ, खंड ११ वा, पृष्ठ २१६).

सार्वजनिक कामगिरीचे मार्ग व साधने याबाबतची या वर्गविहीन घटकांच्या मतांची भागीदारी आजच्या घडीला डाव्या अतिरेक्यांनी व माओवाद्यांनी पत्करलेली आहे.

आता हे तर खरेच आहे की, डेंग खियाओपिंग यांच्या नेतृत्वाखालील सध्याच्या राज्यकर्त्या माओवादी टोळक्याने "सांस्कृतिक क्रान्तीच्या" डावपेचांचा त्याग केलेला आहे. वस्तुतः उपरोक्त "सांस्कृतिक क्रान्तीला" खुद्द हे टोळकेच जवळजवळ बळी गेलेलेच होते. आणि पाश्चात्य देशांतील कामगारवर्गीय चळवळीवर अतःपर पेकिंगमध्ये टिकेचा थेट हल्ला होत नसतो. परंतु भांडवलदारी देश व त्यांची राज्यकर्ती वर्तुळे यांच्याशी आपली दोस्ती दृढमूल करण्यासाठी चिनी जनता प्रजासत्ताकाच्या सरकारने अंगिकारलेली ही केवळ डावपेचात्मक क्लृप्ती आहे. आजच्या डाव्या अतिरेकवादाची "वैचारिक" पाळेमुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात माओवादानेच जोपासलेली आहेत आणि त्याच्या गाभ्यामध्ये कसलाच बदल झालेला नाही.

मागच्या प्रकरणात अतिडावे दहशतवादी आणि नवफॅसिस्ट यांच्या दरम्यानच्या ऐक्याचा पुरावा सादर करण्यात आला. या प्रकरणात अतिडावे दहशतवादी व पेकिंगचे वर्चस्ववादी यांच्या दरम्यानचे अशाच प्रकारचे ऐक्य दाखवून देण्यात आले आहे. यांतल्या एकाकडून दुसऱ्याचा छेद जात नाही राजकीय रंगमंचावर चंचुप्रवेश मिळविण्यासाठी डावा अतिरेकवाद कोणाही कम्युनिस्टविरोधी शक्तींशी दोस्ती करायला तयार असतो, मग ती शक्ती उजवीकडील असो वा डावीकडील असो. खुद्द माओवादीच–यावेळी सरकारी पातळीवर साम्राज्यवादी शक्तींची बाजू घेत आहेत म्हणून ही गोष्ट विशेषेकरुन लागू पडते. संबंधितांपैकी कोणत्याही एका बाजूची तत्त्वावर निष्ठा ठेवली आहे किंवा नाही याचा शोध घेण्यात काहीच अर्थ नाही.

ते काहीही असले तरी वस्तुस्थिती मात्र अशीच राहिलेली आहे की जगातील एक मोठ्यात मोठे व जास्तीत जास्त आक्रमक राज्य म्हणजे माओवादी चीन हा डाव्या–अतिरेकी दहशतवादाचा छुपा असला तरी थेट साथीदार आहे.

प्रकरण नववे

सी. आय. ए. : रसकारी दहशतवाद

१.

दहशतवादाच्या सामाजिक कारणांचे विश्लेषण करताना आणि बेफाम बेकार युवकांविषयी आणि लुम्पेन प्रोलेतारियत विषयी सांगताना आतापर्यंत आम्ही आणखी एका दहशतवादी पद्धतीच्या कामगिऱ्यांचा समाचार घेतलेला नाही. ही पद्धती सातासमुद्रापलीकडून कार्यरत असून हिला सामर्थ्यशाली सरकारी आधार आहे. मात्र सामाजिक आधार नाही–ही पद्धती म्हणजे अमेरिकेची सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी (सीआयए).

आम्ही सीआयएच्या विशिष्ट कामगिऱ्यांची छाननी करणार नाही, या विषयाचा समाचार अनेक ग्रंथातून आणि संबंधित पार्लमेंटरी आयोगांच्या अहवालातून घेण्यात आलेला आहे. हे प्रकरण या एजन्सीच्या खास राजकीय उपलक्षणांचाच तेवढा ओझरता उहापोह करील.

उपलब्ध माहिती असे दाखवून देते की जिथे सी आय एची एखादी शाखा नाही व तिचे निवासी हस्तक नाहीत असा एकही देश जगामध्ये नाही; अमेरिकन सरकारने असल्या उद्दिष्टांसाठी मंजूर केलेल्या वार्षिक रकमा भरमसाट आणि अभूतपूर्व असतात. आता गेली अनेक वर्षे सी. आय. ए. आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कमालीच्या रक्तपाती कारवायांसकट घाणेरड्या साधनांचा अवलंब करून राहिली आहे. गेल्या तीस वर्षांच्या अवधीत सीआयएने पार पाडलेल्या प्रमुख खास कामगिऱ्यांपैकी काही पुढे दिल्या आहेत.

१९५३ : इराणचे पंतप्रधान मोहम्मद मोस्सादीक यांचा पाडाव घडवून आणणारा कट. यांतून त्यांचे प्राण मात्र वाचले.

१९५८ : ईजिप्तचे अध्यक्ष गमाल अब्दुल नास्सेर यांचा खून करायच्या योजना; त्या विफल झाल्या.

१९५९ : सीलोनचे (आताच्या, श्रीलंकाचे) पंतप्रधान सॉलोमन भंडारनायके यांचा खून.

१९६१ : कांगोच्या (आताच्या झायरेच्या) प्रजासत्ताकाचे पंतप्रधान पॅट्रिस लुमुम्बा यांचा खून.

१९६६ : घानाचे अध्यक्ष क्वामे अन्क्रुमा यांना उलथून पाडण्यात परिणत झालेले कटकारस्थान.

१९६७ : विख्यात लॅटिन अमेरिकन क्रान्तिकारक चे ग्वेवारा यांच्या मृत्यू-मध्ये परिणत आलेले कटकारस्थान.

१९६९ : मोझांबीक लिबरेशन फ्रंटचे (फ्रेलिमोचे) अध्यक्ष एदुआर्द मोंडलान यांचा खून.

१९७३ : आफ्रिकन पार्टी फॉर इंडिपेन्डन्स ऑफ गिनी अँड केप व्हेर्डे या पक्षाचे सरचिटणीस आमिल्कार काब्राल यांचा खून.

१९७३ : चिलीचे गृहमंत्री जनरल कार्लोस प्रॅट्स यांचा खून.

१९७३ : चिलीचे अध्यक्ष साल्वादोर आल्लेन्दे यांचा खून.

१९७५ : केनियाचे पुरोगामी नेते जोशिया सारिउकी यांचा खून.

१९७५–१९८० : मोझांबीकच्या अध्यक्षांचा खून करण्याची कट–कारस्थाने.

१९७५ : लिबेरियन अध्यक्षांचे बंधू अर्थमंत्री स्टीफन टोल्बेर्ट यांचा खून.

१९७६ : आल्लेन्दे सरकारातील माजी मंत्री ओरलॅन्डो लेतेलियेर यांचा खून.

१९७७ : काँगोच्या जनता प्रजासत्ताकाचे अध्यक्ष मारियेन अन्गौआबी यांचा खून.

१९६०–१९८१ : क्यूबाचे नेते फिडेल कॅस्ट्रो रुझ यांच्या खुनाचे पुनः पुन्हा प्रयत्न.

१९७९–१९८१ : इराणचे नेते आयातोल्ला खोमेनी यांच्या खुनाच्या योजना.

१९८१ : इराणमध्ये बॉम्बचा स्फोट. या स्फोटात राज्यकर्त्या इस्लामिक रिपब्लिकन पार्टीचे सरचिटणीस आयातुल्ला मुहम्मद बेहेश्ती यांच्यासकट पक्षाचे ७२ प्रमुख सदस्य ठार झाले.

१९८१ : झाम्बियाचे अध्यक्ष केन्नेथ कौन्डा यांच्या खुनाचा प्रयत्न.

१९८१ : पनामानियन नॅशनल गार्डचे सरसेनापति जनरल ओमर तोरिजोस हेरेरा यांना पूर्वनियोजित विमान अपघातात ठार करण्यात आले.

१९८१ : लिबियाचे नेते कर्नल मुहम्मद अल्–गद्दाफी यांचा खून करण्याची कट–कारस्थाने.

लॅटिन अमेरिकेतील देशांमध्ये सीआयएने केलेल्या अनेक कटांचा निर्देश आम्ही वगळला आहे–त्यांची संख्या येवढी मोठी आहे की त्या सगळ्यांचा निर्देश इथे करता येणे शक्य नाही. उदाहरणार्थ, मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील अनेक

विरोधी पक्षांच्या नेत्यांचे खून ज्यामध्ये करण्यात आले असे सुप्रसिद्ध ऑपरेशन कॉन्कॉर्ड तिकडे घडले. आणि निकाराग्वा व साल्वादोर येथील अलिकडल्या घडामोडी तर सर्वश्रुत आहेतच.

सी. आय. ए.ने सालोसाल सातत्याने चालविलेल्या विश्वव्यापी कामगिऱ्यांच्या काही थोडक्या ज्ञात गोष्टींपैकी केवळ थोडक्याशाच अशा या सगळ्या गोष्टी आहेत. माजी सीआयए वाला फिलिप ॲगी सांगतो की सीआयएने संघटित केलेली सगळी कट कारस्थाने, अचानक हल्ला करुन सत्ता बळकवण्याचे प्रकार, खुनांची सत्रे, भाडोत्री सैनिकांच्या स्वाऱ्या, आणि बॉम्ब हल्ले संपूर्ण तपशीलांनिशी वर्णन करणे अशक्य आहे. त्याच्या म्हणण्यानुसार सीआयएच्या कामगिरीचे हे सगळे प्रकर. आजतागायतपणे अजूनही असेच चालू आहेत.

१९७७ च्या नोव्हेंबर महिन्यात **यूएस न्यूज अँड वर्ल्ड रिपोर्ट** या वृत्तपत्राने लिहिले की १९६१ आणि १९७६ यांच्या दरम्यान सरकारे उलथून पाडणे आणि अन्य प्रकारे परदेशांतील राजकीय घडामोडींवर प्रभाव पाडणे अशा सुमारे ९०० प्रमुख गुप्त कामगिऱ्या सीआयएने पार पाडल्या (**यूएस न्यूज अँड वर्ल्ड रिपोर्ट** तारीख २१ नोव्हेंबर १९७७, पृष्ठ, ३७). अमेरिकन सेनेटच्या चिकित्सा समितीने हेरगिरीच्या कामगिरीबाबत १९७५ च्या अखेरीस एक अहवाल प्रसिद्ध केला. त्या अहवालाने असे उघड करून दाखविले की सीआयए या उद्दिष्टांसाठी गुन्हेगारांना कामाला लावत आहे. म्हणजे नव–फॅसिस्ट आणि डाव्या अतिरेकी दहशतवादी संघटना ज्या पद्धतींचा अवलंब करतात त्यांचाच अवलंब सीआयए करीत आहे. तोच अहवाल असेही सांगतो की सीआयएची जिवानिशी माणसे मारायची एक सेवा उभारण्याबाबत उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यानी चर्चा केली होती आणि बहुधा तिला मंजुरी देखील दिली होती.

सातत्याने चाललेला विश्वव्यापी दहशतवाद ! परंतु सीआयएच्या दहशतवादी कामगिऱ्यांच्या **आंतरराष्ट्रीय** प्रमाणाच्या जोडीला त्यांचा वेगळेपणा दर्शविणारी उपलक्षणे काय काय आहेत ?

मूलभूत फरक म्हणजे बिनसरकारी दहशतवादी शक्तींच्या प्रमाणे सीआयए स्वतः कामगिऱ्या करत नसते, तर ती हस्तकांच्या द्वारा कामगिऱ्या करत असते. प्रत्येक कामगिरी इतरांच्या हातून, परकीय हस्तकांकडून पार पाडण्यात येते आणि हे परकीय हस्तक ही कामगिरी जणू काय आपल्या स्वतःच्याच हितसंबंधांसाठी आहे. आपल्या स्वतःच्याच उद्दिष्टासाठी आहे, असे समजून पार पाडतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे सीआयए हा एक प्रकारचा **अप्रत्यक्ष** साम्राज्यवादी दहशतवाद अमलात आणते, ती आपला चेहरा एखाद्या मुखवट्याआड आणि कधीकधी कित्येक मुखवट्याआड सदैव लपवून ठेवत असते.

नव–फॅसिस्ट दहशतवादी आपल्या बांधव नागरिकांना स्वतःच ठार करतात आणि अति–डावे दहशतवादी देखील हेच करतात. परंतु सीआयए जागतिक

रंगमंचावर कामगिरी करते आणि ती ज्यांच्या आड लपलेली अशा संघटनांच्या व व्यक्तिच्या द्वाराच अशी कामगिरी करते. आपला माग काढणाऱ्यांचा गोंधळ व्हावा आणि संशय टाळता आला नाही तरी जबाबदारी टाळता यावी म्हणून ती त्यांच्या द्वारा ही कामगिरी करते. इतर गोष्टींच्या जोडीला ही पद्धति सीआयएला हे खून करणाऱ्या उजव्या व अति डाव्या दहशतवाद्यांची सेवा मोठ्या धोक्याशिवाय संपादन करायला वाव मिळवून देते.

केवळ व्यक्तिगत प्रकरणांच्या बाबतीत मात्र सीआयएचे काही वरिष्ठ अधिकारी सीआयएच्या कामगिरीविषयी अर्धसत्य जरी नाही तरी किमानपक्षी सत्याचा अंश का होईना सांगतात. हे बहुतांशी पेन्शनीत निघालेले व कशाविषयी तरी असंतुष्ट असलेले असे माजी सीआयए अधिकारी असतात. असे लोक खरोखरीच गौप्यस्फोट करतात आणि आपल्याला बडतर्फ करणाऱ्या वरिष्ठावर सूड उगवितात; त्याचवेळी आपल्या गौप्यस्फोटांनी उडविलेल्या खळबळीमुळे त्यांना आनंद होतो आणि या सनसनाटी बातम्यातून मिळालेला मोबदला ते खिशांत घालतात. या मार्गाने सीआयएची काही रहस्ये वृत्तपत्रातून बाहेर येतात.

तथापि मुख्यत: गुप्ततेची भक्कम भित पक्की उभारून ठेवलेली असते आणि सगळचा गोष्टी संघटनांच्या पडद्याआडून करण्यात येतात अशा प्रकारे सीआयएच्या कामगिऱ्या म्हणजे **गुप्त पोलिस खात्याचा** दहशतवाद असे त्याना नाव देता येईल आणि हा दहशतवाद कसलीही जाहीर निवेदने करीत नसतो, कसल्याही विचारसरणीचा पुरस्कार करीत नसतो आणि माहिती जमविणे याहून अधिक काहीही करण्यात आपण गुंतलेलो नसतो असा बहाणा करतो. परंतु दहशतवादांच्या या पद्धतीच्या हाती अफाट पैसा आणि वेगवेगळचा देशांमध्ये कार्य करणाऱ्यांची एक सबंध फौजच्या फौज असते.

उदाहरणार्थ ज्या गोष्टीची तयारी करायला रेड ब्रिगेड्सला महिनेच्या महिने जिवापाड काम करावे लागते, तीच गोष्ट सीआयएचे लोक टेलिफोन वरुन आदेश मिळाल्यापासून एक अगर दोन दिवसांत करुन मोकळे होतात इतर सगळचा गोष्टींच्या जोडीला सीआयएच्या जाळचाला राजनैतिक मुभेचे संरक्षण सुरक्षितपणे लाभलेले असते.

आपल्याला जगाच्या विविध भागांतील सीआयएच्या जशा कित्येक मदतनीस संस्थांची नावे सांगता येतात, की ज्या सीआयएसाठी (आणि आपल्या स्वत:साठी) घाणेरडे काम करीत असतात.

अशांपैकी एक संस्था म्हणजे **सावाक** ही इराणच्या शहाची गुप्त पोलिस संस्था होती. एकटचा १९७८ सालात या संस्थेने ३००० पेक्षा अधिक लोकांचे मुडदे पाडले आणि याहून कितीतरी अधिक लोकांना जायबंदी व पंगू करून ठेवले. लोकांना छळ-घरांत आणि रस्त्यांत ठार मारण्यांत आले.

व्यावसायिक लोकांच्या घराघरांतून बाँबस्फोट घडविण्यात आले. सरकारशी मतभेद दर्शविणाऱ्या प्रश्यात लोकांवर भाडोत्री गळेकापूंच्या टोळ्या तुटून पडल्या आणि त्यांनी या लोकांना मरेमरेतो मारले. मागाहून असे उघडकीस आले की सीआयए ने या **सावाक** हस्तकांना वॉशिंग्टन येथील तथाकथित आन्तरराष्ट्रीय पोलीस अकादमीमध्ये शिकवून तयार करण्यात आले आणि तिथे इतर गोष्टींच्या जोडीला त्यांना " कसून चौकशी करण्याच्या पद्धतींचा " अभ्यासक्रम शिकविण्यांत आला. तेहरानमधील असल्या व्यवहारांचा प्रमुख म्हणजे इराणमधील अमेरिकन राजदूत रिचर्ड एम. हेल्म्स हा माजी सीआयए संचालक होता. सीआयए कडून पगार मिळणारे लोक आज, देखील इराणमध्ये क्रियाशील आहेत. १९८१ साली त्यांनी तेहरान येथील मे–दिनाच्या सभेत हातबाँब फेकला.

अफगाणिस्तानाच्या भूप्रदेशावर दहशतवादाच्या कृती बुऱ्हाणुद्दिन रब्बानी या कटवाल्याच्या नेतृत्वाखालील तथाकथित इस्लामिक अलायन्सकडून करण्यात येत आहेत. या संघटनेचे मुख्य कार्यालय पाकिस्तानातील पेशावर या शहरात आहे आणि हिचा मुख्य आश्रयदाता सीआयएच्या वॉशिंग्टन येथील एका कार्यालयात सापडतो.

टर्कीमध्ये १९७० च्या दशकातील सीआयएच्या कामगिऱ्या बहुतांशी ग्रेवल्व्हज या फॅसिस्ट संघटनेकडून चाललेल्या असत. १९८० सालापर्यंत हिच्या बळीनी २५०० लोक एवढा आकडा गाठलेला होता. सीआयएकडून या संघटनेला मिळालेला आदेश म्हणजे हिंसाचाराच्या कृती क्रान्तिकारकांकडून करण्यात येत आहेत असा विश्वास जनतेला वाटायला लावण्यासाठी इलाज करा असे दर्शवीत होता. असे करताना त्यांनी क्रूरपणा व खून करायला मागेपुढे पाहू नये असे या आदेशात म्हटले होते.

इस्राएलमध्ये मोस्साद हे सरकारी हेरखाते सीआयएची पोटशाखा म्हणून कामगिरी करीत राहीले आहे. अंगोलाला अनेक वर्षे युनिटा ही अमेरिकेच्या पैशाचा पुरवठा होत असलेली टोळी सतावत आहे. मॅरिटानियामध्ये राज्यकर्त्या राष्ट्रीय मुक्तता लष्करी समितीचे प्रमुख मुहम्मद औल्ड हैदुल्ला यांचा खून करण्याचा एक कट १९८१ च्या मार्च महिन्यात उघडकीस आला. त्याच वर्षीच्या जून महिन्यात झाम्बियाचे अध्यक्ष केन्नेथ कौंडा, तसेच लष्करी प्रमुख, पोलिस प्रमुख आणि कित्येक वरिष्ठ सुरक्षा अधिकारी यांचे खून करण्याचा कट झाम्बियन सुरक्षा दलाने हाणून पाडला. या कटाचे सूत्रधार दक्षिण आफ्रिकन हेरखाते होते आणि याचे लागेबांधे सीआयएशी असतात. अरब पूर्वमध्ये सीआयए आणि दहशतवादी मुस्लिम ब्रदर्सहुड यांच्या दरम्यान निकटचे संबंध असून या ब्रदरहूडने अध्यक्ष नास्सेर यांचा खून करायचे कित्येक प्रयत्न केले. क्यूबामधून परागंदा झालेल्या प्रतिक्रांतिकारकांच्या मध्यस्थी द्वारा सीआयएने क्यूबाविरुद्ध कारवाया

चालविल्या आहेत. फिडेल कॅस्ट्रो यांना ठार मारायचा तिचा अगदी ताजा कट १९८१ च्या मार्च महिन्यात उघडकीस आला.

पोर्तुगीज नवफॅसिस्ट दहशतवादी संघटना एओपी आणि डीडीओपी यानी अचानक हल्ला करायचा कट केल्याची बातमी वृत्तपत्रानी १९८१ च्या मार्च महिन्यात दिली. त्यावेळी दोन सत्य घटना उजेडात आल्या. पहिली म्हणजे दहशतवाद्यांना पोर्तुगालमधील बड्या धंदेवाल्यांनी पैसा दिलेला होता, आणि दुसरी म्हणजे सीआयए या कटात अप्रत्यक्षपणे गुंतलेली होती. पोर्तुगालमधील अमेरिकेचे राजदूत फ्रँक सी कार्लुस्सी हे एकाकाळी सीआयएचे उपसंचालक होते आणि १९८१ साली ते अमेरिकेचे उपसंरक्षणमंत्री झाले. पुन्हा तोच हात गुंतलेला होता.

१९८१ च्या जुलै महिन्यात पी–२ मेसॉनिक लॉज या गुप्त फॅसिस्ट धार्जिण्या संघटनेचा प्रमुख लिसियो गेल्ली यांच्या मुलीला अटक झाली. त्यावेळी पोलिसांना सापडलेले दस्तऐवज इटालियन वृत्तपत्रानी प्रसिद्ध केले. ही संघटना अटक व्हायच्या अगोदरच उघडकीस आली. हे दस्तऐवज अमेरिकन हेरखात्याच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी तयार केलेले होते आणि ते म्हणजे पश्चिम युरोपियन देशांतील आपल्या हस्तकांना दिलेले "आदेश" होते. दस्तऐवज क्रमांक एफ् एम् ३०–३१ हा अमेरिकन लष्कराचा माजी चीफ ऑफ स्टाफ जनरल वेस्ट मोअरलॅन्ड याने तयार केलेला असून त्यात असे म्हटले आहे की पाश्चात्य देशांतील दहशतवादी चळवळींचा वापर अमेरिकेच्या हितसंबंधासाठी करायला हवा. उद्देश म्हणजे आवश्यक वाटल्यास संबंधित देशामध्ये राजकिय अस्थिरता निर्माण करणे आणि यादवी युद्ध देखील चेतविणे हा आहे.

विशिष्ट देशांतील परिस्थितीचे "नियंत्रण" अमेरिकन हस्तकांना त्या इलाजाच्या योगाने करता येते ते असे. निमलष्करी घातपाती गट तयार करणे, दंगली आणि पोलिसांशी झटापटी घडवून आणण्यात सशस्त्र चिथावणीखोरांनी भाग घेणे, न्यायखात्याचे अधिकारी व पोलिस यांना बदनाम करणाऱ्या कृती करणे, सरकारी संस्थांमध्ये शिरकाव करून घेणे, स्फोट घडवून आणणे, पोलिसांचे खून घडवून आणणे, वगैरे, वगैरे.

कोणत्या उद्देशाने हे करायचे ? कम्युनिझमच्या धोक्याबाबत मित्र देशांतील सरकारची व लोकमताची खातरजमा करून देणे हा उद्देश आहे (**पॅनोरामा**, रोम, तारीख २२ जुलै १९८१). सीआयए च्या कामाची ही सुपरिचित शैली आहे आणि ही नव-फॅसिस्ट दहशतवादाच्या व्यवहाराशी पूर्णपणे मिळती जुळती अशीच आहे.

पाश्चात्य देशांतील धंद्यांच्या परिभाषेमध्ये "होल्डिंग कंपनी" हा शब्दप्रयोग असतो. ही अशी कंपनी असते की इतर कंपन्यांची

सूत्रे प्रत्यक्षांत तिच्याकडे असतात व त्यांच्यावर तिचे नियंत्रण असते. परंतु या कंपन्यांच्या व्यवहारात मात्र ती कसलाही भाग घेत नसते सी.आय.ए. ही एकप्र कारची दहशतवादी 'होल्डिंग कंपनी' आहे, ही विविध देशांतल्या लढाऊ शाखा संघटनांचे नियंत्रण करते. अशा प्रकारचे वॉशिंग्टनचे जेम्स बाँड हे काल्पनिक मुळीच नाही. परंतु इयान फ्लेमिंगच्या प्रमुख पात्राप्रमाणे स्वत.चे काम स्वतः न करता ते आपल्यासाठी इतर लोकाना काम करायला लावतात. ते नव–फॅसि. टांशी, डाव्या अतिरेक्यांशी, उदारमतवादी सरकारी संस्थांशी सौदे करतात- आपल्या आश्रितांच्या राजकीय ध्वजांची त्यांना काळजी नसते. सरकारी साम्राज्यट वादी दहशतवाद त्या सगळ्या तिन्ही प्रकारांचा वापर करतो.

सीआयएचे आणखी एक उपलक्षण असे आहे: उजवे किंवा डावे अतिरेकी करतात त्याप्रमाणे ते बिन–पद्धतशीर दहशतवादाचे थैमान घालत नसते, तर अमे- रिकन साम्राज्यशाहीला जे आवडत नाहीत अशा निश्चित लक्ष्याविरुद्ध व विशिष्ट लोकांविरुद्ध आपल्या दहशतवादाचा रोख ठेवते. हे देखील सरकारी दहशतवादाचे एक उपलक्षण आहे. या बाबतीत हा दहशतवाद त्याच्या इतर प्रकारांपेक्षा अधिक कार्यक्षम असतो.

आता हे तर सांगायची जरूरीच नाही, की आंतरराष्ट्रीय दहशतवादाची जोपासना करायची आस्था एकट्या सीआयएलाच आहे अशातला प्रकार नसतो पहिल्या जागतिक महायुद्धापूर्वी असल्या बाबतीतले नेतेपद इंग्रजांच्या साम्राज्यवादी सीआयडी खात्याकडे, सीक्रेट इंटेलिजन सर्व्हिसकडे (एसआयएसकडे) होते. त्या खात्याची पाळेमुळे इंग्लंडची राणी पहिली एलिझाबेथ हिच्या मर्जीतल्या सर फ्रॅन्सिस वॉलसिंगहॅमच्या इतकी मागे पोचतात.

सीआयए प्रमाणेच एसआयएसला देखील इंग्रज सरकारला जेव्हा जेव्हा आवश्यक" वाटेल तेव्हा तेव्हा इतर राष्ट्राच्या भूप्रदेशावर दहशतवादी काम गिऱ्या करायला कसलेही विधिनिषेध अजिबात वाटत नव्हते, परंतु पूर्वीच्या काळी ते आपले स्वतःचे विश्वव्यापी गुप्तहेर सेवेचे जाळे उपयोगात आणून स्वतःच्या कामगिऱ्या स्वतःच करणे अधिक पसंत करीत असे आजच्या घडीला जेम्स बाँड हे पात्र वास्तव राहिलेले नाही, कारण लेखक इयान फ्लेमिंग (इंग्र- जांच्या हेरखात्याचा माजी नोकर) त्याचे चित्रण समकालीन गुप्तहेरगिरी तज्ज्ञ आपण पगार देत असलेल्या स्थानिक लोकांना देत आहे असे करण्याऐवजी स्वतःच्या हिंमतीवर खून करणारा असे करतो.

परंतु सीआयए ज्याप्रमाणे येवढ्या मोठ्या प्रमाणावर दहशतवादी कामगिऱ्या करते त्याप्रमाणे एमआयएसने कधीच केलेल्या नाहीत. त्यांच्याकडे येवढी प्रचंड पैशाची तरतूद आणि हस्तकांचे व पोट-हस्तकांचे येवढे आन्तर- राष्ट्रीय दल कधीच नव्हते. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर इंग्रज साम्राज्यवाद्यांनी

सीआयएशी स्पर्धा करण्याची आपली असमर्थता ध्यानात घेऊन सरकारी दहशतवादाच्या प्रकरणातील अग्रहक्क सीआयएला बहाल केला आणि काही प्रमाणात अमेरिकेचे संरक्षण देखील घेतले, याचा भरपूर पुरावा आहे. यासाठी एक उच्च पातळीवरचा गुप्त करार झाला असण्याची शक्यता आहे. परंतु, उदाहरणार्थ, उत्तर आयर्लंडपुरती मात्र इंग्रज राज्यकर्ती वर्तुळे आपल्या स्वतःच्या हितसंबंधांसाठी सरकारी दहशतवादात अजूनही गुंतलेली आहेत.

सतत चौदा वर्षे लंडनचे सरकार त्या प्रांताच्या कॅथलिक पंथियाविरुद्ध युद्ध करीत आहे. तो प्रांत त्यांनी जबरदस्तीने इंग्लंडला जोडून घेतलेला आहे आणि आयर्लंडच्या प्रजासत्ताकाशी फेरविलीनीकरण व्हावे अशी त्या प्रांताची मागणी आहे. उत्तर आयर्लंडमधील झटापटीमध्ये २००० पेक्षा अधिक लोक मारले गेले आहेत आणि २०,००० पेक्षा अधिक जखमी झाले आहेत. बेलफास्ट आणि डेरी या शहरातील कामगार वस्तीत दहशतीचे अधिराज्य चालू करण्यात आले आहे. १९८१ च्या ऑगस्ट महिन्यात बेलफास्ट बाहेरील छळ छावणीत दहाव्या अन्न सत्याग्रहीला मृत्यु आला. या दहशतीला उत्तर आयर्लंडमधील कॅथलिक पंथीय लोक सामुदायिक निदर्शनानी जबाब देत आहेत. तरुण लोक सातत्याने मेढेकोट उभारत आहेत. इंग्लंड व शेजारचे आयरिश प्रजासत्ताक या दोहोंमध्ये खळबळ माजलेली असते. असे असूनही इंग्रज पोलिसांचा दहशतवाद चालूच आहे.

सीआयएला आणखी दोन मातब्बर प्रतिस्पर्धी होते—एक नाझींचा गेस्टोपो (याच्या भरीला वहेमाख्टच्या हेरखात्याची सेवा) आणि जपानी हेरखाते. परंतु या दोहोंना सातासमुद्रापलीकडील सरकारी दहशतवाद्याकडे शरणागती पत्करावी लागली. आजच्या घडीला पश्चिम जर्मन आणि जपानी हेरखाती राजरोस अमेरिकेच्या आश्रयाखाली राहून कामगिरी करतात. बहुराष्ट्रीय दहशतवादी पद्धतीचे मुख्य कार्यालय सीआयए हेच आहे.

२.

आजच्या घडीला सीआयएच्या बहुतेक सगळचा कामगिऱ्यांचा रोख कोणाकडे वळलेला दिसतो ? उत्तराबाबत कसलीच शंका असू शकत नाही. त्यांचा रोख कम्युनिझम विरुद्धच वळलेला असतो, समाजसत्तावादी राज्यांच्या राष्ट्र कुटुंबाविरुद्ध आणि राष्ट्रीय बंधविमोचन चळवळीविरुद्ध वळलेला असतो.

सीआयएची प्रत्येक कामगिरी, मग ती कुठेही चाललेली असो आणि कोणत्याही बनावट गुप्तहेर संघटनेचा बुरखा तिने घेतलेला असो, ही कामगिरी या असल्या मार्गाने या मुख्य उद्दिष्टाशी निगडीत झालेली असते आणि याच्याशी तिने एकसूत्रीपणा साधलेला असतो. सीआयएमध्ये २० वर्षाहून अधिक काळ सेवाकार्य

केलेला राल्फ मॅकघी याने १९८१ च्या एप्रिल महिन्यात दिलेल्या माहितीनुसार "आन्तरराष्ट्रीय कम्युनिझम" बाबतचे एक खास खातेच या एजन्सीमध्ये आहे (पाहा, **द नेशन** तारीख ११ एप्रिल १९८१ पृष्ठ २३).

अमेरिकन काँग्रेसच्या एका चौकशी समितीने सीआयएचा माजी संचालक व मागाहून सायगाव येथे अमेरिकेचा राजदूत म्हणून कामगिरी केलेला विल्यम कोल्बी याला त्याच्या कामगिऱ्यांविषयी विचारले असताना तो उतारला की दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या समाप्तीपासून सीआयएने "कम्युनिस्ट धोका" हाणून पाडण्यासाठी विविध शक्तींना मदत करण्याखेरीज अन्य काहीही केलेले नाही.

वास्तवात, अगदी ताज्या माहितीने दर्शविले आहे तदनुसार कम्युनिस्ट चळवळीविरुद्ध अमेरिकन गुप्तहेर खात्याच्या (म्हणजे सीआयएच्या पूर्वजांच्या) पहिल्या वहिल्या कामगिऱ्या १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीच्या किती तरी अगोदरपासूनच योजून ठेवलेल्या होत्या आणि त्यांचा रोख व्यक्तिशः लेनिन यांच्या विरुद्ध होता.

अमेरिकन हेरखाते आणि प्रति-हेरखाते या विषयीच्या आपल्या ग्रंथामध्ये अमेरिकन लेखक टी. जॉन्सन अशी माहिती देतो की रशियातील १९१७ च्या फेब्रुवारी क्रान्तीनंतर अमेरिकन हेरखात्याचे जे हस्तक युरोपात कामगिरीवर होते त्यांनी लेनिन यांच्या सकट अजून हद्दपारीवर आलेल्या बोल्शेविक नेत्यांना एकामागून एक ठार मारायचा बेत केला. जॉन्सन याच्या मते ही कामगिरी जर पार पाडण्यात आली असती तर सोविएत प्रजासत्ताक मुळी अस्तित्वातच आले नसते आणि "लाल धोका!" मुळी राहिलाच नसता.

या बातमीची खातरजमा अन्य कुणी नव्हे, तर सीआयएचा माजी संचालक आणि उत्साही स्फूर्तिदाता ॲलन डल्लेस यानेच केलेली आहे. **सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्ट** या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या आपल्या आत्मचरित्रात त्याने मनमोकळेपणाने लिहिले आहे की आपल्या वॉशिंग्टन येथील वरिष्ठांनी आपल्याला जहाल मते असलेला "रशियन परागंदा पुढारी इल्यिन" (लेनिन यांचे हे लेखनातले टोपणनांव होते) याच्याकडे लक्ष द्यायचा सल्ला दिला (त्यावेळी डल्लेस स्वित्झर्लंडमध्ये कामगिरीवर होता). कोणत्या उद्दिष्टासाठी? शक्य असल्यास त्याला राजकीय रंगमंचावरून काढून टाकणे शक्य आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी. या सल्ल्याकडे डल्लेसने दुर्लक्ष केले. आणि तो सांगतो की या प्रकरणी आपल्याला आपला सारा जन्मभर बाईट वाटले.

त्यानंतर मात्र आपल्या दहशतवादी 'तोफखान्याचा' नेम धरताना असल्या 'चुका' टाळायचा प्रयत्न सीआयएने केला. आणखी एक माजी सीआयए संचालक विल्यम कोल्बी याने आपण इटलीमध्ये जे कोटचावधी डॉलर खर्च केले त्यांच्या विषयी तो काय म्हणाला याचे स्मरण करू या. तो म्हणाला, जिथे "जिथे कम्युनिस्ट संघटना अस्तित्वात होती, तिथे तिथे अमेरिकेने कम्युनिस्टविरोधी संघटनांना

पैसा पुरविला किंवा नवी कम्युनिस्टविरोधी संघटना स्थापन केली. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे आम्ही जे सांगत आलो आहोत त्याचीच खातरजमा कोल्बीने करुन दिली, ते म्हणजे हे की विविध देशातले आपले जे कळसूत्री बाहुल्यासारखे हस्तक आहेत, मग ते उजवे असोत किंवा बनावट डावे असोत, त्यांची अधिकृत "तत्वे" काय आहेत यांच्या विषयी सीआयएला पर्वा नसते. महत्वाची गोष्ट म्हणजे रक्तपाती कम्युनिस्ट-विरोध व्यवहारात आणणे ही आहे. म्हणून लॅटिन अमेरिकेतील जवळ जवळ सगळ्याच वॉशिंग्टन–ध जिण्या प्रकाशनामध्ये "कम्युनिस्टांचा नायनाट करा!" यांजसारख्या शब्दयोजना असतात यात नवळ काहीच नाही. टर्कीमध्यें सीआयए कडून पैसे पुरविला जात असलेल्या ग्रे वूल्व्हज या दहशतवादी संघटनेतले गळेकापू हे "कम्युनिझमचा मुकाबला करणे" या घोषणेनिशी लोकांना ठार करायला धाडून दिले जात असत.

चिलियन पुरोगामी नेता ओर्लांदो लेतेलियेर यांना सीआयएने कट करुन ठार करविले, त्याचा तपास चालू असतांना सीआयएच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी एकजण जनरल व्हार्नान वॉल्टर्स निःसंकोचपणाने म्हणाला की लेतेलियेर हा कम्युनिस्ट होता आणि तो ठार मारायच्या योग्यतेचा होता. म्हणजे ही गोष्ट योगायोग नव्हे तर.

म्हणून सीआयएच्या स्वरुपाविषयी तिचे एक अधिकारी व "बिचारवन्त" यांच्याशी युक्तिवाद करायची मुळी जरुरीच नाही. सीआयएची उद्दिष्टे ते मुळीच लपवून ठेवत नसतात. मात्र आपल्या कामगिऱ्याबाबत तेवढी ते गुप्तता राखतात उजव्या आणि "डाव्या" दहशतवादाप्रमाणे भांडवलदारी समाजाच्या ऐतिहासिक अरिष्टातूनच उदयास आलेला असल्यामुळे अमेरिकेचा सरकारी दहशतवाद हा आजच्या साम्राज्यशाहीच्या कम्युनिस्टविरोधी व्यूहरचनेपासून अलग करताच येत नाही. सीआयए म्हणजे उजव्या आणि "डाव्या" दहशतवाद्यांच्या टोळ्या जशा आज आहेत आणि उद्या कदाचित लुप्त होतील तसा योगायोगाने एकत्र आलेला कटवाल्यांचा व मारेकऱ्यांचा गट नव्हे, हा भांडवलदारी राज्ययंत्रणेचा एक घटक विभाग आहे.

परंतु जे लोक आपल्या संस्था निर्माण करतात त्यांच्या गुन्हेगारीच्या जबाबदारीतून त्यांना याच्यामुळे मुक्त होता येत नाही.

आणखी एक गोष्ट आम्हाला नक्की ठाऊक आहे. ती म्हणजे ही की सीआयए आणि तिच्याच सारख्या विचारसरणीच्या शक्ती यांचे प्रयत्न निरर्थक आहेत. कम्युनिझमचा नायनाट फॅसिस्ट अतिडावे किंवा सरकारी साम्राज्यवादी दहशतवाद यांच्याकडून होणे शक्य नाही.

प्रकरण दहावे

लेनिन यांची उत्तरे

१

आता आपण पाश्चात्य देशांतील **प्रामाणिक** डाव्या अतिरेक्यांकडे नजर टाकू या. हे लोक दहशतवादाचा प्रश्न हा काही प्रमाणात व्यक्तिगत बाब मानतात आणि त्यांचे मनापासून असे ठाम मत असते की सामुदायिक पाठिंब्यावर अवलंबून असलेले लहान लहान मर्यादित गट किंवा पक्ष आणीबाणीच्या क्षणी हिंसाचाराच्या कृतींचा अवलंब करून प्रत्यक्षांत "क्रान्तीला वेग आणतात." असला प्रश्न भांडवलदारी जगातील काही सर्वस्वी सद्धेतुप्रेरित कम्युनिस्टांच्या पुढचात देखील उभा राहतो असाही संभव असतो

या समस्येबाबत श्रेष्ठ धंदेवाईक क्रान्तिकारक लेनिन हे काय म्हणाले तेवढे त्यांचे नुसते उतारे या लोकांना उत्तरादाखल सादर केले तरी भागण्याजोगे आहे. **"डाव्या गटाचा" कम्युनिझम-एक बालरोग"** या आपल्या ग्रंथात लेनिन यांनी आजचा डाव्या अतिरेक्यांना असा धडा शिकविलेला आहे की तो त्यांच्या नेहमींच्या युक्तिवादांच्या चिंधड्या उडवितो.

ही विधाने १९२० च्या दशकातल्या इतक्या मागच्या काळात केलेली असली, तरी त्यांचे संपूर्ण महत्व आजतागायत जसेच्या तसे राहिलेले आहे, कारण आजचे अति-डावे कोणतेही "नवे कोरे" युक्तिवाद उकरून काढत असले, तरी ते १९२० च्या दशकांतल्या अतिडाव्यांच्या युक्तिवादाचे थेट वारसदारच आहेत. ते देखील आपल्या छोटचा छोटच्या गुप्त संघटनांसाठी बहुजनसमाजाकडे दुर्लक्ष करतात; ते देखील वर्गीय शक्तींची मांडणी हिशेबात न घेताच बंड करतात; ते देखील प्रचलित वास्तवता समजून घेत नाहीत–किंवा समजून घेऊं इच्छीत नाहीत. **"डाव्या गटाचा" कम्युनिझम** वाचताना आपली अशी धारणा होते की लेनिन हे रेड ब्रिग्रेड्सच्या सदस्यांशी किंवा बाअहेर माइन हॉफच्या सदस्यांशीच बोलत आहेत आणि क्रान्तीला "वेग कसा आणता येतो" व "वेग कसा आणता येत नाही" हे त्यांना दाखवून देत आहेत. काही स्थळे अशी आहेत की तिथे ते त्यांचे आक्षेप ऐकून घेत आहेत व ते खोडून काढत आहेत असे वाटते.

या छोटेखाशा प्रकरणात लेनिन यांचे उतारे दिलेले आहेत. ज्या वाचकाला **मार्क्सवादी–लेनिनवादी व्यूहरचनेविषयी** अधिक जाणून घ्यायला हवे असेल त्याला या उताऱ्यांविषयी आस्था वाटेल. प्रस्तुत लेखकाच्या मते प्रचलित इतिहासात व्यूहरचनेच्या प्रश्नांकडे एक अत्यंत महत्त्वाची भूमिका चालत आलेली आहे.

लेनिन यांनी १९२० साली लिहिले आहे की " रशियामध्ये दीर्घकालीन, दुःखदायक आणि रक्तरंजित अनुभवाने आम्हाला जे सत्य शिकविले आहे ते म्हणजे हे की क्रान्तिकारक डावपेच केवळ क्रान्तिकारक " मूड " वर उभारता येत नाहीत. विशिष्ट राज्यामधील (आणि त्याच्या सभोवारच्या सगळ्या राज्यांमधील आणि जगातल्या सगळ्या राज्यांमधील) **सगळ्या** वर्गीय शक्तींच्या समंजस आणि काटेकोर वस्तुनिष्ठ मूल्यमापनावर, त्याचप्रमाणे क्रान्तिकारक चळवळींच्या अनुभवाच्या अशा मूल्यमापनावर डावपेच आधारले पाहिजे. पार्लमेंटरी संधिसाधूपणावर नुसतीच शिव्यांची लाखोली वाहून किंवा पार्लमेंटात भाग घेणे नुसतेच धुडकावून लावून आपला क्रान्तिकारक संताप दाखविणे फार सोपे असते; तथापि यातला खुद्द सोपेपणाच याचे परिवर्तन एका कठीण, एका फारच कठीण समस्येच्या सोडवणुकीत करू शकत नाही." (व्ही. आय. लेनिन, **संकलित ग्रंथ**, खंड ३१ वा, पृष्ठ ६३–६४)

१९८० च्या दशकांतील डावे असे म्हणतात की " क्रान्ती अधिक नजीक आणायला हवी आहे म्हणून आम्ही काय वाटेल ते करायला तयार असलेल्या लढाऊ अग्रदलावर आमच्या आशांची मदार ठेवतो," आणि या अग्रदलाच्या मदतीने ध्येयाकडे प्रगति करायचे प्रदीर्घ टप्पे त्यांना जणु काय वगळता येणे शक्य होईल. ते उतावळे झालेले आहेत.

असल्या उतावळेपणाचे वैशिष्ट्य सांगताना लेनिन म्हणाले की एकोणिसाव्या शतकात, १८७४ साली, त्या काळातल्या डाव्या अतिरेक्यांनी, तथाकथित ब्लान्क्विवस्टांनी, आपल्या " जाहीरनाम्यात " लिहिले, आणि त्यात त्यांनी छोट्या गुप्त क्रान्तिकारक संघटनेच्या कटकारस्थानावर भिस्त ठेवली: " आम्ही कम्युनिस्ट आहोत, कारण मधल्या टप्प्यांवर न थांबता, विजयदिन नुसताच लांबणीवर टाकणाऱ्या व गुलामगिरीचा कालखंड लांबवणाऱ्या कसल्याही तडजोडीशिवाय, आम्हाला आमचे ध्येय साध्य करायला हवे आहे." (**कित्ता**, पृष्ठ ७७).

न थांबता घोडदौड करीत वस्तुनिष्ठ परिस्थितीची पर्वा न करता सगळ्या अडथळ्यांवरून उड्डाण करीत ! साहसी अग्रदल हे स्वतःच सगळ्या गोष्टींना गरागरा फिरायला लावते ! हे उद्‌गार शंभर वर्षांपूर्वी एखाद्या ब्लान्क्विवस्टाच्या तोंडून निघालेले दिसत नाहीत, परंतु आजच्या रेड् ब्रिगेड्सच्या सदस्याच्या तोंडूनच निघालेले दिसतात.

लेनिन यांनी ब्लान्क्विवस्टांना असे उत्तर दिले आहे: " एकट्या अग्रदलाने विजय मिळविता येत नाही. सगळ्या वर्गाने, विस्तृत बहुजनसमाजाने, अग्रदलाला थेट पाठिंबा द्यायची भूमिका घेतलेली असण्यापूर्वी, किंवा निदानपक्षी अग्रदलाविषयी

सहानुभूतिपर तटस्थतेची भूमिका घेतलेली असण्यापूर्वी, आणि शत्रूला मिळणारा पाठिंबा अडविला जाण्यापूर्वी, नुसत्याच अग्रदलाला निर्णायक लढाईत झोकून देणे हे मूर्खपणाचे ठरेल इतकेच नव्हे, तर ही गुन्हेगारी ठरेल." (**कित्ता** पृष्ठे ९२-९३)

नेमका हाच गुन्हा आजच्या डाव्या अतिरेक्यांकडून करण्यात येत नाही काय ? त्यांची कृत्ये क्रान्तिकारक अग्रदलाचे सामर्थ्य केवळ निरर्थक व्यर्थ दवडण्यात परिणत होत नाहीत काय ?

लेनिन पुढे सांगतात, की तात्कालिक उद्दिष्ट " .. म्हणजे क्रान्तीमध्ये अग्रदलाच्या विजयाची पक्की तरतूद करणाऱ्या नव्या भूमिकेवर **बहुजनसमाजाला** नेता येणे हे आहे, आणि डावा पोथीनिष्ठपणा नष्ट केल्याखेरीज, आणि त्याच्या चुका पूर्णपणे काढून टाकल्याखेरीज ही भूमिका गाठता येत नाही." (**कित्ता**, पृष्ठ ९३).

हे कसलाही आडपडदा न ठेवता त्याच मंडळीना उद्देशून लिहिलेले आहे. इतरत्र लेनिन पुन्हा सांगतात:

" कोणत्याही कृतीच्या स्वातंत्र्यापासून आगाऊच स्वत:ला वंचित करून घेणे, जो शत्रू आताच्या घडीला आमच्यापेक्षा अधिक चांगला शस्त्रसज्ज आहे त्याच्याशी आम्ही लढणार आहोत किंवा नाही आणि केव्हा लढणार आहोत हे त्याला उघडपणे कळविणे हा मूर्खपणा आहे, हा क्रान्तिकारकपणा नव्हे. ज्यावेळी एखादी लढाई उघड उघड शत्रूला फायदेशीर आहे परंतु आम्हाला फायदेशीर नाही, अशावेळी लढाई अंगावर घेणे ही गुन्हेगारी आहे." (**कित्ता**, पृष्ठ ७७).

तर मग खऱ्याखुऱ्या क्रान्तिकारक बाण्याची खूण कोणती ?

लेनिन म्हणतात: " ज्यावेळी थेट, उघडउघड, खऱ्याखुऱ्या सामुदायिक व खऱ्याखुऱ्या क्रान्तिकारक लढ्याला अनुकूल परिस्थिती **अजून अस्तित्वात नसते**, अशावेळी क्रान्तीच्या हितसंबंधांचा कैवार घेता येणे, (प्रचार, चळवळ व संघटना करून) बिनक्रान्तिकारक संस्थामध्ये, आणि अनेकदा राजरोस प्रतिगामी संस्थांमध्ये, बिनक्रान्तिकारक परिस्थितीत, क्रान्तिकारक कार्यपद्धतीची गरज तावडतोब उमजायला जो असमर्थ आहे अशा बहुजनसमाजात असा कैवार घेता येणे–अशा परिस्थितीत क्रान्तिकारक होणे कितीतरी अधिक कठीण असते,– आणि कितीतरी अधिक मोलाचे असते." (**कित्ता**, पृष्ठ ९७)

रेड ब्रिगेड्सचा सध्याचा नेता आणि माजी नव–फॅसिस्ट रेनाटो कुर्सियो हा बहुधा ही विधाने धुडकावून लावील. परंतु या विधानांचे सत्य सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे, मग त्याला हे आवडो वा न आवडो. क्रान्ती घडवून आणणे आणि क्रांतीचा खेळ करणे सर्वस्वी वेगळ्या गोष्टी आहेत.

प्रत्यक्षात काय असते याचा खुलासा करताना लेनिन अखेरीस डाव्या अतिरेकीपणाचे सामाजिक व राजकीय स्वरूप उघड करून सांगतात :

" बोल्शेविझम जो साकार झाला, विकसित झाला, आणि **मध्यवर्गीय, क्रान्तिकारकपणाविरुद्ध** वर्षानुवर्षे चाललेल्या लढ्यातून तो तावून सुलाखून निघाला.

या मध्यमवर्गीय क्रान्तिकारकपणात अराज्यवादाचा अंश असतो किंवा त्याच्याकडून तो थोडीफार उसनवारी करतो आणि सगळ्या आवश्यक बाबतीत, सुसंगतपणे कामगारवर्गीय अशा वर्गलढ्याच्या परिस्थितीच्या व गरजांच्या बाबतीत तो उणा पडतो–

"भांडवलशाहीच्या भयानकतेने मध्यमवर्गीयाला पिसाट करणे हे अराज्यवादाप्रमाणेच सगळ्या भांडवलदारी देशांचे वैशिष्ट्य असलेले सामाजिक घटित असते. असल्या क्रांतिकारकपणाचा अस्थिरपणा, त्याचा भाकडपणा, आणि झपाट्याने अंकितपणात, औदासीन्यात, कल्पनातरंगात किंबहुना या अगर त्या भांडवलदारी खुळचट विचारावर पिसाटपणे फिदा होण्यांत परिवर्तन होणे – या सगळ्या सर्वज्ञात गोष्टी आहेत. तथापि आपल्या त्या सत्यांना तात्त्विक किंवा अमूर्त मान्यता देणे याच्या योगाने जुन्या चुकांतून क्रांतिकारक पक्ष मुळीच मुक्त होत नसतात; या चुका अनपेक्षित प्रसंगी, काहीशी नवी स्वरूपे धारण करून, आतापर्यंत अपरिचित असलेल्या वेशांत किंवा भोवतालच्या परिस्थितींत असामान्य–किंवा कमी अधिक असामान्य परिस्थितीत नेहमीच डोके वर काढत असतात.

"अराज्यवाद हा अनेकदा कामगारवर्गीय चळवळीच्या संधिसाधू पापांबद्दल तिला मिळालेली एक प्रकारची शिक्षा असतो. या दोन राक्षसी गोष्टी एकमेकींना पूरक असतात." (**कित्ता**, पृष्ठ १२)

"भांडवलशाहीच्या भयानकतेने पिसाट केलेला मध्यमवर्गीय"- हाच माणूस लेनिन यांच्या म्हणण्यानुसार अतिडाव्या दहशतवादी संघटना निर्माण करीत असतो. ही गोष्ट सदैव घडत आलेली गोष्ट आहे–आणि अजूनही ती अशीच चालू आहे. लेनिन यांची ही व्याख्या प्रसंगोचित आणि अचूक आहे. आम्ही पुन्हा भर देऊन सांगतो : ही व्याख्या १९२० साली ज्यामानाने प्रसंगोचित होती त्यामानाने १९८२ साली देखील ही कमी प्रसंगोचित मुळीच नाही. प्रश्नाचा गाभा तोच आहे, आणि त्याची पाळेमुळेही तीच आहेत.

लेनिन यांनी "**डाव्या गटाचा**" **कम्युनिझम–एक बालरोग**" हा ग्रंथ १९२० साली कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या जुलै–ऑगस्टमध्ये भरलेल्या दुसऱ्या काँग्रेसच्या उद्घाटन प्रसंगी लिहिला आणि याच्या प्रती सगळ्या प्रतिनिधींना भेट म्हणून देण्यात आल्या. त्या काळांतल्या डाव्या अतिरेक्यांशी आपल्याला लढाई द्यावी लागणार आहे हे त्यांना ठाऊक होते. हे अतिरेकी दहशतवादाला पाठिंबा देत नसले तरी देखील एकंदर जनतेपासून कम्युनिस्ट पक्षाना एक प्रकारचा एकांगी अलगपणा पतकरायचे आवाहन करीत होते. या लढाईत लेनिन यांचा विजय झाला.

आज जे लोक आपल्या अतिडाव्या विचारांना लेनिन यांच्या नांवाचा कोट घालत आहेत (पाश्चात्य देशांतले या प्रवृत्तीचे अनेक पक्ष व गट आपल्या नावांना मार्क्सवादी–लेनिनवादी ही उपाधि जोडून नेमकी हीच गोष्ट करीत आहेत) ते राजरोस राजकीय खोटारडेपणा करीत आहेत.

२.

वाचकाकडून अशी विचारणा होण्याचा संभव आहे की " निव्वळ दहशतवादाच्या समस्येविषयी लेनिन यांची वृत्ति काय होती ? '

सर्वप्रथम आपण ही नोंद घेऊ या की दहशतवादाची समस्या ही सामुदायिक किंवा बिनसामुदायिक संघटनांपासून अलग करता येत नाही—याच समस्येबाबत आपण अगोदरच लेनिन यांचे मत शिकून घेतलेले आहे. सामुदायिक क्रान्तिकारक संघटनांना व्यक्तींवर दहशत बसवायची मुळीच जरूरी नसते हे उघड आहे, कारण ही गोष्ट त्यांची खूपच हानि करते. व्यक्तींविरुद्ध दहशतवादाच्या कृतींच्या खास प्रश्नाविषयी लेनिन यांनी देखील आपली मते व्यक्त केलेली आहेत. ते या गोष्टीच्या निर्धारपूर्वक विरुद्ध होते.

ऑक्टोबर क्रान्तीच्या बऱ्याच अगोदरपासून झारशाही रशियातच लेनिन यांनी दहशतवादाविरुद्ध खंबीर भूमिका घेतली असल्याकारणाने दहशतवादाच्या अखंड कृत्यांवर आपली मुख्य मदार ठेवून राहिलेला सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्ष (एस्आर्स) या मध्यमवर्गीय पक्षाविरुद्ध त्यांना अनेक निकराच्या लढाया द्याव्या लागल्या. आज जसे डावे अतिरेकी कम्युनिस्टांचा द्वेष करतात, तसेच त्या काळी एस्आर्स हे लेनिन यांचा द्वेष करीत असत. हे साम्य योगायोगाने म्हणण्यापेक्षा तर्कशुद्धच आहे (या संबंधात एक नोंद घेण्याजोगी गोष्ट म्हणजे काही काळ एका एस्आर दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेला बरीस साविन्कोव याचे चरित्र हे काही प्रसंगी इटलीची रेड ब्रिगेड्स किंवा फ्रंट लाइन या संघटनेच्या सध्याच्या म्होरक्यांपैकी एखाद्याचे चरित्र असल्यासारखे जाणवते. अशाच प्रकारे विद्यार्थी चळवळीत भाग घेऊन प्रारंभ केल्यानंतर साविन्कोव हा एका लढाऊ एस्आर् संघटनेचा प्रमुख झाला. पूर्वी या संघटनेचे नेतृत्व पोलिसांचा हस्तक आझेफ याजकडे होते. साविन्कोवने झारचा नातेवाइक व मॉस्कोचा गव्हर्नर जनरल ग्रँडड्यूक सेर्गेइ रोमानोव याच्या खुनाचा कट संघटित केला. इतर अनेक हिंसाचारी कृत्यांबद्दल तो कुप्रसिद्ध झाला. शेवटी त्याला अटक झाली. परंतु फाशी जायच्या अगोदर तो परदेशात पळून गेला. तिथे तो " पश्चात्तप्त दहशतवादी " झाला. १९१७ साली रशियात परत आल्यावर साविन्कोववर केरेन्स्कीची मर्जी बसली आणि यानंतर एक वर्षाने लेनिन यांचा खून करायच्या कटात तो सामील झाला).

या शतकाच्या आरंभी झारशाही रशियात असंतोषाचो परिस्थिती होती. गंभीर आर्थिक अरिष्टाचा तडाखा त्याला बसला आणि त्याच्या जोडीला पिके

बुडाली आणि अनेक प्रांतांमध्ये दुष्काळ पडला. कामगारांचे संप झाले. शेतकऱ्यांनी दंगली केल्या. बंडखोर विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. अनेक शहरांमध्ये सोशल-डेमोक्रॅटिक संघटना अस्तित्वात होत्या परंतु त्या एकमेकीशी संलग्न झालेल्या नव्हत्या. तथापि सोशालिस्ट-रेव्होल्यूशनरीज हे पक्ष स्थापन करायला तयार होते त्यांच्या कार्यक्रमातले पहिले कलम म्हणजे व्यक्तींना दहशत घालणे हे होते. अशा वेळी सोशल डेमोक्रॅटांनी काय करायचे ?

१९०१ च्या मे महिन्यात लेनिन यांनी "सुरुवात कुठून करायची ?" हा लेख लिहिला. त्यात व्यक्तींविरुद्धच्या दहशतीच्या विषयावर असे लिहिले आहे :

"आम्ही...असे भर देऊन जाहीर करतो की सध्याच्या परिस्थितीत लढ्याचे असले साधन अप्रासंगिक आणि गैरलागू आहे ; अत्यंत क्रियाशील लढवय्यांना ते त्यांच्या खऱ्या कार्यापासून विचलित करते. एकंदर चळवळीच्या हितसंबंधांच्या दृष्टिकोनातून जे कार्य सगळ्यात जास्त महत्वाचे आहे त्या कार्यापासून त्यांना विचलित करते ; आणि सरकारच्या दलांचा विस्कट करत नाही, परंतू क्रान्तीच्या दलांचा विस्कट करते...क्रान्तिकारक संघटना आणि असंतुष्टांचा, निषेध प्रदर्शकांचा, लढ्याला प्रवृत्त झालेल्यांचा विस्कळित बहुजनसमाज, नेमका विस्कळित असल्या कारणानेच दुर्बल असलेला हा बहुजनसमाज, यांच्या दरम्यानचा संपर्क तुटायचा धोका नसतो काय ? असे असूनही हा संपर्क हीच आमच्या विजयाची एकमेव हमी असते... दहशतीच्या आहारी जाण्याविरूद्ध, लढ्याचे हेच मुख्य व मूलभूत साधन मानण्याविरूद्ध, आजच्या घडीला असे मानण्याकडे अनेक लोकांचा जो खूपच कल असतो त्याविरूद्ध कडक इशारा देणे हे आमचे कर्तव्य आहे" (व्ही. आय्. लेनिन, संकलित ग्रंथ, खंड ५ वा, पृष्ठ १९).

१९०१ च्या उत्तरार्धातील व १९०२ च्या पूर्वार्धातील रशिया : कामगार आणि शेतकरी यांच्या क्रान्तिकारक कृती अधिकाधिक वेळा होत होत्या; वातावरण तापू लागले होते; देश मोठमोठ्या उद्रेकांच्या नजीक येऊन ठेपला आहे असे जनतेच्या ध्यानात यायला लागले होते. लेनिन यांनी **काय केले पाहिजे ?** हा आपला ग्रंथ निर्माण केला आणि दहशतवादाच्या प्रश्नाचा पुन्हा समाचार घेताना भर देऊन सांगितले : "... राजकीय जागृतीच्या जागी खळबळ उडविणारा दहशतवाद आणायचा विचार आपल्याला राजकीय दृष्टया मागे खेचतो." (**कित्ता**, पृष्ठ ४६१)

त्यानंतर कित्येक महिन्यांनी त्यांनी लिहिले :

"आपल्या कार्यक्रमांत दहशतवादाचा समावेश करून आणि त्याच्या आजच्या स्वरुपात राजकीय लढ्याचे एक साधन या नात्याने त्याचा पुरस्कार करून त्या योगे सोशालिस्ट रेव्होल्यूशनरीज हे चळवळीची अत्यंत गंभीर स्वरूपाची हानि करीत आहेत, समाजसत्तावादी कार्य आणि क्रान्तिकारक वर्ग असलेला बहुजन-समाज यांच्या दरम्यानची अतूट बंधने नष्ट करीत आहेत. सोशालिस्ट रेव्होल्यू-

शनरीज जो आजच्या घडीचा दहशतवाद व्यवहारात आणत आहेत व पुरस्कारत आहेत त्याचा बहुजनसमाजातील, बहुजनसमाजासाठीच्या किंवा बहुजनसमाजा समवेतच्या कार्याशी **कोणत्याही रीतीने संबंध नाही** ही निर्विवाद सत्यघटना कोणतीही तोंडी आश्वासने व प्रतिज्ञा खोडून काढू शकत नाहीत; पक्षाकडून दहशतवादी कृतींची जी संघटना केली जात आहे, ती आमच्या फारच तुटपुंज्या शक्तींचे लक्ष, क्रान्तिकारक **कामगारांचा** पक्ष संघटित करायच्या त्यांच्या कठीण आणि अजिबात पूर्ण न झालेल्या कामगिरीपासून विचलित करीत आहे; **व्यवहारात** सोशालिस्ट रेव्होल्यूशनरीजचा दहशतवाद हा एकास एक अशा लढचाहून अन्य काहीही नाही, आणि ही पद्धति इतिहासाच्या अनुभवाने संपूर्णपणे धिक्कारलेली आहे." (व्ही. आय. लेनिन, **संकलित ग्रंथ** खंड ६ वा, पृष्ठ १७३).

१९०२ च्या मे महिन्यात एस्आर्स हे बेताल झाले. त्यांनी आपली पहिली प्रमुख दहशतवादी कृती केली : त्यांनी झारचा गृहमंत्री सिप्यागिन याचा खून केला. हा सिप्यागिन म्हणजे कामगार, शेतकरी आणि विद्यार्थी यांच्या विरुद्ध रानटी शिक्षांचे इलाज करण्यात पुढाकार घेणारा होता. "क्रान्तिकारक साहसवाद" या मथळ्याच्या एका लेखात लेनिन यांनी लिहिले :

"ही कृती कोणत्याही रीतीने बहुजनसमाजाशी संबंधित नाही हे सगळ्यांना पूर्णपणे चांगले ठाऊक आहे आणि दिसत आहे.....तसेच ज्या व्यक्तींनी ही दहशतवादी कृति केली त्यानी बहुजनसमाजाकडून कोणत्याही निश्चित कृतीवर किंवा पाठिंब्यावर भिस्तही ठेवली नाही किंवा त्याची आशाही धरली नाही. सोशालिस्ट रेव्होल्यूशनरीज आपल्या पोरकटपणाच्या भरात हे ध्यानात घेत नाहीत की दहशतवादाविषयीची त्यांची ही आपुलकी कार्यकारणदृष्टचा एका वस्तुस्थितीशी निकटपणे निगडित झालेली आहे–अगदी थेट सुरुवातीपासूनच कामगारवर्गीय चळवळीपासून ते सदैव दूर राहिलेले आहेत आणि अजूनही दूर राहत आहेत, ही ती वस्तुस्थिती." (**कित्ता**, पृष्ठ १८७). लेनिन यांनी या लेखाचा समारोप ज्या शब्दांत केला ते शद्ब असेः "दहशतवादी कृती करायची उर्मी म्हणजे तात्पुरती मनस्थिती असते." (**कित्ता**, पृष्ठ १९४)

१९७८ च्या मे महिन्यात माजी इटालियन पंतप्रधान आल्दो मोरो यांचा डाव्या अतिरेक्यांकडून जो खून झाला त्याने बहुजनसमाजाचा पाठिंबा हस्तगत केला असे आपण म्हणू शकतो काय ?"

ही विधाने आजच्या इटलीतील रेडब्रिगेड्सची आठवण आपल्याला करून देत नाहीत काय ?

लेनिन म्हणाले की दहशतवादाने क्रान्तिकारक शक्तींना मागे खेचले. त्यांना पुढे कशाने रेटले ? १९०२ च्या उत्तरार्धात रोस्तोव–ऑन–डॉन या प्रमुख दक्षिण रशियन बंदरात कामगारांच्या प्रचंड समूहाच्या सहभागानिशी संपाचा उद्रेक झाला. लेलिन यांनी लिहिले:

"लाखोंच्या श्रमिक बहुजनसमाजाने इथल्या सभांमध्ये भाग घेणे, त्यांच्या जिव्हाळ्याच्या हितसंबंधांची, तसेच राजकारण व हे हितसंबंध यांच्या दरम्यानच्या लाग्यावांध्याची चर्चा होणे यातून येवढा उत्तेजनकारक व शिक्षणप्रद परिणाम होतो तसा परिणाम राजहत्येचे शंभर प्रकार देखील कधीही निर्वाण करू शकत नाहीत असे आमचे ठाम मत आहे दहा बदमाषांच्या बदल्यात देखील एका क्रान्तिकारकाचा **बळी देणे** म्हणजे आमच्या सदस्यांची केवळ विघटना करणे होय अशी आमची खात्री पटलेली आहे." (**कित्ता**, पृष्ठ २७८).

आणखी काही काळ गेल्यावर लेनिन यांनी लिहिले की सोशालिस्ट रेव्होल्यूशनरीजची "प्रवृत्ति म्हणजे उक्तीमध्ये फारच क्रान्तिकारक असणे परंतु खरी मते व क्रान्तिकारक वर्गाशी संपर्क ठेवणे याबाबतीत क्रान्तिकारक मुळीच नसणे, अशी आहे." (**कित्ता**, पृष्ठ २८६).

बोल्शेविक पक्ष १९०३ च्या उन्हाळ्यात ब्रुसेल्स व लंडन येथे भरलेल्या रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीच्या दुसऱ्या काँग्रेसमध्ये अंतिम स्वरूपात साकार झाला. त्यावेळी देखील व्यक्तिगत दहशतवादाच्या समस्येचा विसर लेनिन यांना पडला नाही. काँग्रेससाठी या विषयावर त्यांनी तयार केलेला खास ठराव म्हणतो:

"काँग्रेस निर्धारपूर्वक दहशतवाद धुडकावून लावते ; म्हणजे राजकीय लढ्याचे साधन या नात्याने अलगअलग राजकीय खुनांची पद्धति धुडकावून लावते ; ही पद्धति सध्याच्या काळात फार मोठ्या प्रमाणात गैरसोईची आहे, ही जिव्हाळ्याचे आणि तातडीने आवश्यक असे संघटनात्मक व जागृतिक कार्य करण्यापासून सर्वोत्तम कार्यकर्त्या शक्तींचे लक्ष विचलित करते ; क्रान्तिकारक वर्गीय बहुजनसमाजाशी असलेली क्रान्तिकारकांची बंधने ही पद्धति नष्ट करते ; खुद्द क्रान्तिकारकांमध्ये देखील आणि सर्वसाधारण जनतेमध्ये अरेरावशाहीशी करायच्या लढ्याच्या कामगिऱ्यांबाबत-व पद्धतींबाबत सपशेल चुकीचे समज ही पद्धति निर्माण करते" (**रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीची दुसरी काँग्रेस**, जुलै-ऑगस्ट १९०३, वृत्तांत, मॉस्को, १९५९).

लेनिन यांनी ७८ वर्षांपूर्वी लिहून काढलेला हा दस्तऐवज आजच्या एकंदर जागतिक कम्युनिस्ट चळवळीला लागू पडतो. समकालीन डाव्या अतिरेकी नेत्यांनी हा वाचला आहे काय ? आणि तसे म्हटले तर दहशतवादाबाबतची लेनिन यांची वक्तव्ये तरी त्यांनी वाचली आहेत काय ?

लेनिन यांनी सदैव या मताचा खंबीरपणे पाठपुरावा केला. सिप्यागिनच्या जागी झारचा गृहमंत्री म्हणून आलेला व पोलिसप्रमुख, पिसाट ब्लॅक हंड्रेडवाला प्लेहवे याचा १९०४ च्या जुलै महिन्यात स्पेशालिस्ट रेव्होल्यूशनरीजनी खून केला, त्यावेळी "अरेरावशाही आणि कामगारवर्ग" या मथळ्याच्या लेखात लेलिन यांनी पुन्हा एकदा अशी नोंद घेतली :

"प्लेहवे याच्या खुनापायी दहशतवादी संघटनेला प्रचंड प्रयत्न खर्ची टाकावे लागले आणि प्रदीर्घ तयारी करावी लागली हे उघड आहे. या दहशतवादी कृतीचे एक यशच कितीतरी अधिक ठळकपणे रशियन क्रांतिकारक चळवळीच्या एकंदर इतिहासाची खातरजमा करीत आहे आणि दहशतवादासारख्या असल्या लढ्याच्या पद्धतींविरूद्ध आपल्याला इशारा देत आहे. रशियन दहशतवाद हा सदैव खास करून लढ्याची बुद्धीवादी पद्धति होऊन राहीला आहे...सत्य घटना निर्विवादपणे असा पुरावा देतात की आमच्या देशात व्यक्तिगत राजकीय खून आणि जनतेच्या क्रान्तीच्या जबरदस्तीच्या कामगिऱ्या यांचा अर्थाअर्थी काही एक संबंध नसतो." (व्ही. आय्. लेनिन, **संकलीत ग्रंथ**, खंड ८ वा, पृष्ठ २२)

व्यक्तिगत दहशतवादाला त्यांचा विरोध होता, परंतु जर तिच्यासाठी काळ परिपक्व असेल तर सामुदायिक क्रान्तिकारक कृतीला त्यांचा विरोध नव्हता. १९०५ साली रशियामध्ये जनतेच्या खऱ्या खुऱ्या क्रान्तीचा उद्रेक झाला त्यावेळी लेनिन यांनी "क्रान्तिकारक सेना दलांच्या कामगिऱ्या" हा लेख लिहीला आणि त्यात त्यांनी लष्करी कामगिऱ्यांच्या डावपेचांचे तपशीलवार वर्णन केले आणि जनतेचे मार्गदर्शन कसे करावे, शस्त्रसज्ज कसे व्हावे, पोलिसांवर हल्ले कसे करावेत आणि शस्त्रे कशी हस्तगत करावीत, पकडलेल्यांना किंवा जखमींना कसे वाचवावे, इमारतीच्या शेवटच्या मजल्यांवरून झारशाही लष्कराशी कसे लढावे, इत्यादि, इत्यादि त्यांनी दाखवून दिले. (पाहा, व्ही. आय. लेनिन, संकलित ग्रंथ, खंड ९ वा, पृष्ठे ४२०-४२१).

त्याच प्रमाणे १९१७ च्या ऑक्टोबर क्रान्तीच्या ओघात देखील बोल्शेविकांनी दहशतवादाचा अवलंब केला नाही; त्यावेळी तर सत्ता त्यांच्या हाती आली. मात्र नंतरच्या वर्षी ज्यावेळी सोशालिस्ट रेव्होल्यूशनरीजच्या नेतृत्वाखाली प्रतिक्रान्तिकारकांनी दहशतीची मोहीम आरंभली आणि लेनिन यांच्या खुनाचा कट रचला, त्यावेळी मात्र सोविएत सरकारने कडक इलाज योजून याचा बंदोबस्त केला. क्रान्तीच्या रक्षणाचा अन्य कोणताच मार्ग उपलब्ध नव्हता.

वाचकाला दिसू शकते तद्नुसार, हे प्रकरण लेनिन यांच्या ग्रंथांतील काही उतारे देऊन सजविलेले आहे (या विशिष्ट विषयाबाबत त्यांनी जे म्हटले आहे त्या सगळ्याचे उतारे मुळीच देण्यात आलेले नाहीत) ते पद्धतशीर रीतीने वाचकाला सादर करायचा मी केवळ प्रयत्न केलेला आहे. लेनिन सुमारे ६० वर्षांपूर्वी निधन पावले, परंतु क्रान्तिकारक कामगारवर्गीय चळवळीचे ते एक तेजस्वी व्यूहरचनाकार होऊन राहिले आहेत. आजच्या अतिडाव्या अतिरेक्यांना व इतर दहशतवाद्यांना त्यांच्या ग्रंथांमध्ये जो उत्तरे सापडू शकतात ती पुरेशी सर्व संग्राहक आहेत, मग इतिहास आमच्या जीवनात अनुभवाची केवढीही मोठी भर घालत राहो.

जे लोक (बहुतांशी विद्यार्थी आणि इतर तरुण लोक) "क्रान्तीला वेग

आणायच्या " आपल्या प्रामाणिक इच्छेपोटी डाव्या–अतिरेकी संघटनांमध्ये दाखल होतात त्यांच्या हातून झालेल्या सखोल चुकीची खातरजमा जगातल्या पहिल्या समाजसत्तावादी राज्याचे संस्थापक आपल्याला करून देतात. वास्तवात ते क्रान्तीला अधिक निकटतर आणत नाहीतच, परंतु––याची जाणीव नसताना–ते तिच्या शत्रूंना मदत मात्र करीत आहेत. अनेक देशांतल्या कित्येक तरुण लोकांना ही गोष्ट लागू पडते.

आता हे तर खरेच आहे की त्यांना काळ तर मोठा कठीण आलेला आहे. कामगारवर्गावरील अविश्वास, बहुजनसमाजामध्ये धीर धरुन कार्य करण्याऐवजी संकुचित मनोवृत्तीचा एकांगीपणा, शक्तींच्या खऱ्याखुऱ्या मांडणीच्या समजदारीची उणीव, आणि मग दहशतवादात उडी घेणे––या सगळ्या गोष्टी त्यांचे प्रयत्न निरर्थक करून ठेवतात. त्यांच्यातले अनेकजण क्रान्तीसाठी आत्मबलिदान करायला तयार असले तरी देखील ते हरणारी लढाई लढत आहेत.

जरा थांबावे आणि याचा गंभीरपणे विचार करावा हे अधिक चांगले नाही का होणार ?

प्रकरण अकरावे

यांची मृत्युघंटा वाजलेली आहे

१

आता आपण या माफक अभ्यासाची फलश्रुती सांगू या.

या ग्रंथाच्या कामाला मी सुरुवात केल्यानंतर जे महिने लोटले आहेत त्यांच्या अवधीत दहशतवाद जगाचा रंगमंच सोडून गेलेला नाही. भांडवलदारी देशांमध्ये त्याचे थैमान पूर्वीप्रमाणेच चालू आहे. आणि तो तणावाचे वातावरण निर्माण करीत आहे. उजव्या काय, किंवा अतिडाव्या दहशतवादी संघटना काय, किंवा अमेरिकन साम्राज्यशाहीचे हस्तक काय यांच्यापैकी कोणीही कमी क्रियाशील झालेला नाही आणि कमी अमानुष झालेला नाही.

नवफॅसिस्टांनी कत्तलींच्या सत्रामध्ये गुंतून राहणे चालूच ठेवलेले आहे, ते रस्तोरस्ती अतिरेकी दंगलींना चिथावण्या देतच आहेत, आणि फॅसिस्ट विरोधकांवर सुरीहल्ले व मशीनगन्सचा मारा करीतच आहे. ब्लॅक इंटरनॅशनल विविध खंडातून लष्करी हुकुमशाही फॅसिझमच्या शक्तीची जमवाजमव चालूच ठेवलेली आहे. डावे अतिरेकी, विशेषेकरून इटलीमध्ये आणि इतर लॅटिन देशांमध्ये अजूनही राजकीय खुनांचे व पळवापळवीचे सत्र चालू ठेवून राहिलेलेच आहेत. "शहरी गनिमी युद्धाचा" नीच सिद्धान्त हा दहशतवादाचा बुरखा आहे आणि बनावट डाव्यांमध्ये समाजसत्तावादी क्रान्तीच्या लेनिन यांच्या व्यूहरचनेच्या बदल्यात उभा केलेला आहे. सीआयएने इतर संघटनांच्या व आपल्या हस्तकांच्या द्वारा खुन्यांची संघटना करायचे काम चालूच ठेवले आहे.

तारीख १३ मे १९८१ रोजी रोम शहरी टर्किश फॅसिस्ट महमद अली आग्सा याने दिवसाढवळ्या पोप जॉन पॉल दुसरे यांच्यावर तीन गोळ्या झाडल्या आणि त्यांना जखमी केले. पोलिसांनी असे प्रस्थापित केले की आग्सा स्वतःच्या एकट्याच्या जबाबदारीवर हे कृत्य करीत नव्हता. आपण असे विचारू की यावेळी खुनाच्या प्रयत्नाचे लक्ष्य जागतिक कॅथोलिक धर्मपीठाचे प्रमुख यांजसारखे असामान्य व्यक्तीमत्व हे का करण्यात आले आणि ज्याचा इटलीशी व धार्मिक बाबींशी कसलाच संबंध नव्हता असा टर्कीचा इसम मारेकरी का झाला ?

या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण नाही. खुनाच्या प्रयत्नाची संघटना करणा, त्यांचा उद्देश भांडवलदारी जगातील वातावरण जास्तीत जास्त तणावपूर्ण करणे लोकांमध्ये घबराट वाढविणे, हा होता. ७० कोटी कॅथॉलिकांच्या नेत्यांचा खून करण्याचा उद्देश म्हणजे बहुजनसमाजाला जास्तीत जास्त प्रमाणात चिंताग्रस्त करणे, दैनंदिन गोंधळाच्या आगीत तेल ओतणे, "कायद्याच्या राखणदारांना," "शुभ्र घोड्यांवर स्वार झालेल्या जनरल्सना" सत्तेवर येण्यास मदत करणे– आणि ते देखील केवळ कॅथॉलिक देशांमध्येच नव्हे,– हा होता.

हे तर पूर्णपणे स्पष्टच आहे की व्हॅटिकनच्या प्रमुखाचा जीव घेण्याचा प्रयत्न हा उद्देश समोर ठेवून जो करण्यात आला तो टर्किश किंवा इटालियन दहशतवाद्यांकडून करण्यात आला नाही, तर तो नवफॅसिस्ट दहशतवाद्यांच्या **आन्तरराष्ट्रीय** केन्द्राकडून करण्यात आला. आता ठाऊक झाले आहे तदनुसार, मारेकरी आग्सा हा टर्कीमध्ये दहशतवादी कृत्यांबद्दल अगोदरच शिक्षा झालेला आहे आणि इस्तंबूलच्या तुरुंगांतून पळून गेल्यानंतर त्यांने पश्चिम जर्मनीत स्वतःचे बस्तान बसविलेले होते, आणि संशयास्पद पश्चिम जर्मन वर्तुळांशी त्याचप्रमाणे इटलियन नवफॅसिस्टांशी संपर्क चालू ठेवलेला होता. असाही पत्ता लागला की पश्चिम जर्मनीतील आणि स्विट्झर्लंडमधील बँकामध्ये त्याच्या नांवाने कडक चलनांत मोठमोठ्या रकमांची खाती खोलण्यात आलेली होती आणि त्याला "निर्दोष" दस्तऐवज उपलब्ध करून देण्यात आले होते. या गुन्हेगाराला आपल्या स्वाधीन करण्याबाबत टर्कीच्या अधिकाऱ्यांनी पश्चिम जर्मन सरकारला केलेल्या विनंतीला उत्तर द्यायचे तसेच राहिले. अति–उजव्या दहशतवाद्यांचे आन्तरराष्ट्रीय मध्यवर्ती कार्यालय योजनेनुसार कार्य करते हे उघड दिसत आहे.

जवळजवळ त्याच वेळी एका अन्य खंडामध्ये आणखी एक दहशतवादी कृत्य घडले. तारीख २९ मे १९८१ रोजी भारताचे शेजारी असलेल्या बंगलादेशी प्रजासत्ताकाचे अध्यक्ष झियाउर रहमान यांचा खून मेजर जनरल अहमद मन्झूर यांच्या परिवारातल्या कटवाल्यांनी केला. इथे आशिया खंडाच्या ऐन हृदयस्थानी घडलेल्या या खुनाची कारणे स्थानिक होती, परंतु त्यांना देखील एक आन्तरराष्ट्रीय छटा होतीच. मेजर जनरल मन्झूर हे चिनी हस्तकांशी त्यांच्या लाग्याबांध्यामुळे, विशेषतः माओवादी धार्जिण्या "पूर्व बांगला साम्यवादी दल" या संघटनेशी आणि बहुधा त्याचवेळी सीआयएशी देखील असलेल्या लाग्याबांध्यांमुळे कुप्रसिद्ध झालेले होते.

स्वतः पेकिंगनेच दहशतवादामध्ये गुंतवून घेण्यास प्रारंभ केला आहे असे गृहीत धरायचा पाठपुरावा करणारी आणखी एक गोष्ट उपलब्ध आहे. वजनदार वृत्तपत्र **वॉशिंग्टन पोस्ट** याने सीआयएच्या एका गुप्त अहवालाचा दाखला देऊन असे म्हटले आहे की जे आफ्रिकी देश सोविएत संघराज्याशी आणि इतर समाजसत्तावादी राज्यांशी मैत्रीचे संबंध ठेवून आहेत त्यांच्यामध्ये अचानक हल्ले करुन

सत्ता बळकावायची योजना चीन आखत आहे. हे हल्ले अमलात आणायची कामगिरी खास शिकवून तयार केलेल्या दहशतवादी गटांकडे सोपविण्यात आलेली आहे. (पाहा, **वॉशिंग्टन पोस्ट**, तारीख **१०** मे १९८१).

चीनचे हेरखाते आणि सीआयए यांनी पेकिंगचे मुख्य लष्करी कार्यालय आणि पेन्टागॉन यांच्या दरम्यानच्या करारासारखा एखादा "कामचलाऊ करार" केलेला आहे काय ? आपण एका सत्य घटनेची नोंद घेतली पाहिजे, ती म्हणजे ही की अमेरिकेचे सध्याचे उपाध्यक्ष जॉर्ज बुश हे एका काळी सीआयए चे प्रमुख होते आणि मागाहून पेकिंग येथे अमेरिकन राजदूत होते.

"डाव्या" दहशतवाद्यांचे संपर्क विस्तारत आहेत. अलीकडे असे निदर्शनास आले आहे की ज्या संस्थांचे राज्यकर्त्या वर्तुळांमध्ये बरेच वजन आहे अशा वरकरणी "लोकशाहीवादी" किंवा "उदारमतवादी" दिसणाऱ्या संघटनांमध्ये असल्या व्यक्ती शिरकाव करून घेत आहेत. १९८१ च्या मे महिन्यांत असेच एक बिग रोम शहरी उघडकीस आले; "पी–२" या गुप्त मेसॉनिक लॉजचे बिंग फुटले आणि असे उघडकीस आले की त्याच्या सदस्यांमध्ये राज्यकर्त्या ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रमुख व्यक्ती होत्या तसेच प्रख्यात सोशालिस्ट, सोशल–डेमोक्रॅट्स व उदारमतवादी हेही होते. "पी–२" लॉजचे प्रतिनिधी सरकारच्या आणि सार्वजनिक संस्थांच्या सगळ्या पातळ्यांवर होते. मंत्रिमंडळात (तीन मंत्री), इटालियन पार्लमेंटात, लष्करात आणि हेरखात्यांत, न्यायाधीश मंडळीत आणि धर्मपीठात, औद्योगिक आणि बँकिंगच्या दुनियेत आणि वृत्तपत्रांत. राजरोस फॅसिस्ट देखील या लॉजचे सदस्य होते. याचा संस्थापक लिसिओ गेल्ली हा मुसोलिनीच्या पक्षांतला होता आणि युद्धाच्या काळात तो पूर्व आघाडीवर सोविएत संघराज्याशी लढला. एक माजी मेसन सोशालिस्ट ई-बेनेडेट्टो याने एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की १९७२ साली "देशामध्ये योग्य सुव्यवस्था चालू करण्यात लष्कराकडून पुढाकाराचा अभाव दाखविला जात आहे" अशी तक्रार गेल्लीने केलेली होती. म्हणजेच इटलीमध्ये लष्करी हुकूमशाही स्थापन करण्याची त्याने हाक दिलेली होती. याच्या भरीला बेनेडेट्टी याने असेही सांगितले की "पी–२" या संस्थेत फॅसिस्टांची भाऊगर्दी झालेली आहे. ओघाओघाने सांगायचे म्हणजे याच्यामुळे इटालियन सोशालिस्ट पक्षाचा एक प्रमुख सदस्य एफ् सिचितो याला लॉजमध्ये भाग घ्यायला प्रत्यवाय आला नाही; तिथे त्याला गुंडाच्या गुप्त हस्तकांशी वाटाघाटी करायला वाव होता. त्याचप्रमाणे हेही ठाऊक झाले की १९७४ च्या ऑगस्ट महिन्यात "इटालिकस" या एक्प्रेस गाडीचा जो सनसनाटी स्फोट झाला, तसेच रोमचे सरकारी वकील व्ही. ऑक्कोर्सियो यांचा १९७६ साली जो खून झाला त्यामध्ये "पी–२" चा हात होता.

एका काळी मेसन्स म्हणजे राजा, सरंजामी धर्मपीठ आणि अरेराव सरदार यांच्या विरुद्ध लढणारी उदारमतवादी भांडवलदारी संघटना होती; त्यांनी काही

भांडवलदारी क्रान्त्यांमध्ये देखील भाग घेतलेला होता. जुन्या काळी मेसन्सच्या सदस्यांमध्ये व्हॉल्टेर, दीदरो, बेंजामिन फ्रांकलिन, गटे, लेस्सिंग मोझार्ट यांजसारख्या जागतिक सांस्कृतिक क्षेत्रांतील नामांकित व्यक्ती, तसेच रॉबेस्पियर, जॉन मारात, रशियन डिसेम्ब्रिस्ट पेस्टेल, गॅरिबाल्डी, जोसेफ मॅझिनी इत्यादी सारखे क्रान्तिकारक राजकारणी लोक होते. आजच्या घडीला मात्र फॅसिस्ट दहशतवादाच्या प्लेगाने मॅसॉनिक चळवळीत शिरकाव केलेला आहे.

कम्युनिस्ट विरोधी "विचारवन्तांविषयी" म्हणाल, तर ते सगळा दोष सोविएत संघराज्याच्या "आन्तरराष्ट्रीय दहशतवादाच्या" माथी मारतात. उदाहरणार्थ १९८१ च्या वसंत ऋतूत कोणा एका क्लेअर स्टर्लिंग याच्या आन्तरराष्ट्रीय दहशतवादाविषयीच्या ग्रंथाची मोठी आवृत्ति एकाच वेळी अमेरिका, फान्स, पश्चिम जर्मनी, इंग्लंड, इटली, हॉलंड, ऑस्ट्रेलिया, मेक्सिको आणि स्पेन या देशांमध्ये प्रसिद्ध करण्यांत आली. लेखकाचे वर्णन "दहशतवादासंबंधांतील प्रमुख विशेषज्ञ" असे केलेले आहे, मात्र सीआयएचा निर्देश मुळीच केलेला नाही. याची सर्वच्या सर्व (एकूण सोळा) प्रकरणे प्रमुख अमेरिकन नियतकालिकांतून क्रमशः प्रकाशित करण्यात आली.

वॉशिंग्टन पोस्ट भर देऊन सांगितले की हा ग्रंथ अमेरिकन धोरणावर आपला प्रभाव गाजवील. मॉस्को हेच जगातील दंगलीना जबाबदार आहे या अमेरिकन सरकारच्या आरोपांना हा ग्रंथ नवी प्रेरणा देईल असे या वृत्तपत्राने मत दिले. वस्तुतः अलीकडेच हे आरोप भुईसपाट होऊ लागलेले होते. याच्या भरीला या वृत्तपत्राने म्हटले आहे की वॉशिंग्टनमध्ये आजच्या घडीला तीन प्रकारचे लोक आहेतः पहिला प्रकार म्हणजे असे लोक की जे सोविएत संघराज्य हेच दहशतवादाला जबाबदार आहे असे सतत मानत आले आहेत; दुसरा प्रकार म्हणजे ज्यांना या गोष्टीवर विश्वास ठेवायला हवा असतो असे लोक; आणि तिसरा प्रकार म्हणजे ज्यांना सरकारी दरबारी आपला प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी या गोष्टीवर विश्वास असल्याचे ढोंग करावे लागते.

या ग्रंथामध्ये खास दस्तऐवजी पुराव्यानिशी मांडलेल्या सत्य घटना मुळीच नाहीत. त्याचे सगळे युक्तिवाद म्हणजे नांवे न दिलेल्या व्यक्तींच्या दाव्यांवर, अफवांवर किंवा निव्वळ कल्पनेवर आधारलेले आहेत. त्याचवेळी या ग्रंथाच्या ३०९ पृष्ठांमध्ये अलीकडे सगळ्या जगाला ज्यांच्याविषयी ऐकायला मिळालेले आहे अशा दहशतवादी कृत्यांचा अजिबात निर्देश नाही. हे पुस्तक म्हणजे सीआयए आणि तिचे सहकार्यकर्ते यांच्या प्रतिक्रिया दहशतवादाच्या विश्वव्यापी चर्चेविषयी कशा असतात याचे उदाहरण आहे. जे अस्तित्वातच नाही त्याच्याविषयी गदारोळ उठविणे आणि जे खरोखरी अस्तित्वात आहे त्याच्याविषयी मूग गिळून बसणे–हा सीआयएचा रामबाण इलाज असतो.

सर्वसामान्य जनतेला सर्व रंगाच्या दहशतवाद्यांविषयी धास्ती आणि शिसारी

असते. तथापि आपल्याला हे मात्र नाकारता येत नाही, की १९८० च्या दशकात दहशतवादाने युवकांच्या एका विशिष्ट विभागाच्या मनोभूमिकेत राजकीय विषाचे व मूर्ख साहसबाजीचे इंजेक्शन देऊन ठेवले आहे. युवकांना आकर्षित करून घेण्यातला नवफॅसिस्टांचा व अतिडाव्यांचा उद्देश म्हणजे त्यांना कामगारवर्गीय चळवळीपासून अणि शान्ततेसाठी व लोकशाहीसाठी लढणाऱ्या पुरोगामी शक्तींपासून अलग पाडणे हा आहे.

अगोदरच नोंद घेतलेली आहे तदनुसार, डाव्या अतिरेक्यांमध्ये प्रामाणिक आणि सदसद्विवेकबुद्धी असलेले असे लोक,बहुतांशी १८ ते २५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसलेले, असे आहेत आणि भांडवलदारी समाजात आपल्याला कधीही स्थान मिळणार नाही अशा नैराश्याने त्याना घेरलेले आहे; त्यांच्या मनांत गोंधळ माजलेला आहे आणि काय घडते आहे हे त्यांच्या ध्यानात येईनासे झाले आहे. असले युवक अनेकदा आत्मबलिदान करायला तयार असतात; इटलीतल्या व इतर देशांतल्या तुरुंगांमध्य त्यांची गर्दी झालेली असते. परंतु इटलीतल्या रेड ब्रिग्रेड्सचे किंवा पश्चिमजर्मनीतल्या रेड आर्मी गटाचे धोरण ठरविणारे लोक हे या तरुणांपैकी नसतात; या तरुणांचा नुसताच वापर करण्यात येतो. लगाम राहिलेला असतो दुहेरी डाव खेळणाऱ्या साहसबाजांच्या व पिसाटांच्या हाती. आपल्या अतिउत्साही " क्रान्तिकारकपणाच्या " जोरावर हे लोक आपल्या हाताखालच्यांच्या डोळचांत धूळफेक करतात.

तथापि त्यांचा एवढा सगळा आटापिटा चाललेला असूनदेखील डाव्या अतिरेक्यांनी प्रगती मुळीच केलेली नाही. त्यांचे नेते त्यांना खून करायला व लुटालूट करायला फर्मावतात; स्वतःभोवती रोमँटिक रम्य कथांचे जाळे ते विणू शकतात. परंतु क्रान्तिकारक प्रक्रियेला एका दिवसाचाही वेग आणायला ते असमर्थ आहेत.

उलटपक्षी ते जनतेला धाक घालत असल्याकारणाने त्या कृतींपायी या प्रक्रियेचा विकास ते लांबणीवर मात्र टाकत आहेत. दरम्यान भांडवलदारी देशांतले पोलिस अधिकारी जनतेला दडपून टाकायची नवी " तंत्रे " घाईघाईने तयार करीत आहेत आणि रस्त्यांवरील लढायांसाठी नवी हत्यारे शोधून काढत आहेत.

तर मग, उजवा आणि " डावा " अशा या दोन्ही दहशतवादांचा बंदोबस्त कसा करायचा ? वाचकाला साहजिकच या प्रश्नाविषयी सगळचांत जास्त आस्था असणार. आपल्या युगामध्ये दहशतवाद हा अपरिहार्य किंवा नेहमीचा प्रकार मानू नये. त्याचा प्रतिकार करण्यासाठी, आपल्या काळात ज्या तीन शक्तींचा बळी देऊन तो वाढत आहे त्यांचा विचार आपण केला पाहिजे. त्या तीन शक्ती म्हणजे युवक आणि लुम्पेन प्रोलेतारियत या दोन, आणि तिसरी शक्ति जी साम्राज्यशाही तिच्याविषयी सांगायची जरूरीच नाही.

पुरोगामी शक्ती लुम्पेन प्रोलेतारियतला आपल्याकडे वळवून घेऊ शकतात

आणि त्यांनी त्याला वळवून घेतले पाहिजे, असे मत चुकीचे ठरेल. लुम्पेन प्रोलेतारियत ही स्वभावतःच विघातक शक्ति आहे. ती कायमची राहणारी नाही; कम्युनिस्ट समाजामध्ये ती विलयाला जाईल. परंतु जोपर्यंत भांडवलदारी समाजव्यवस्था अस्तित्वात आहे तोपर्यंत लुम्पेत प्रोलेतरियत तीत जगत राहील आणि वाढत राहील, आणि ही शक्ति कामगारवर्गीय चळवळीशी कट्टर वैर चालूच ठेवील.

त्याचप्रमाणे सीआयए ही तुलनात्मकदृष्टचा शान्ततामय सहअस्तित्वाच्या जमान्यात देखील एखाद्या दिवशी आपली विश्वव्यापी कारस्थाने बंद करील असा भरवसा धरणे तितकेच अर्थशून्य ठरते. ही सामर्थ्यशाली हेरगिरीची व दहशतवादी संघटना स्वखुषीने आंतरराष्ट्रीय रंगमंच कधीही सोडून जाणार नाही. याच कारणास्तव ही गोष्ट वाढत्या प्रमाणात स्पष्ट होत आहे की ही समस्या सोडवायची गुरूकिल्ली कामगारवर्गाच्या आणि खुद्द युवकांच्याच हाती आहे.

खऱ्याखुऱ्या डाव्या गटाच्या शक्ती, आणि सगळचात जास्त महत्वाची गोष्ट म्हणजे कम्युनिस्ट लोक, जर गोंधळलेल्या व चलबिचल झालेल्या युवकांना उजव्या आणि बनावट डाव्या अतिरेक्यांच्या प्रभावांतून मुक्त करण्यांत यशस्वी होतील तर दहशतवादाची वाढ नष्ट करता येईल याविषयी कसलीही शंका जवळ जवळ मुळीच राहणार नाही. बहुधा सध्या अस्तित्वांत असलेल्या बहुतेक सगळचा दहशतवादी गटांचा तशा परिस्थितीत विभक्त होईल.

या संबंधात पुरोगामी शक्तींच्या पुढचात एक प्रचंड आणि अत्यंत कठीण कामगिरी वाढून ठेवलेली आहे. याचे थोडक्यात विवेचन मी पुढे करणार आहे.

२.

जर्मनीत हिटलर सत्ताधारी झाल्यानंतर दोन वर्षांनी कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या सातव्या काँग्रेसला उद्देशून भाषण करताना जॉर्जी दिमित्रोव ह्यांनी फॅसिझमचो चढाई आणि कामगारवर्गाच्या ऐक्यासाठी करायच्या लढचातील कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या कामगिऱ्या याविषयी विवेचन केले.

ते म्हणाले: "आपण हे मनमोकळेपणाने सांगितले पाहिजे की श्रमिक युवकांच्या बहुजनसमाजाला भांडवलशाहीच्या चढाई विरुद्ध करायच्या लढचात, फॅसिझम विरुद्ध करायच्या लढचात आणि युद्धाच्या धोक्याविरूद्ध करायच्या लढचात खेचून आणायच्या आमच्या कामगिरीकडे आम्ही दुर्लक्ष केले आहे... फॅसिझम विरुद्ध करायच्या लढचांतील युवकांचे प्रचंड महत्व आम्ही कमी लेखलेले आहे. युवकांचे खास आर्थिक, राजकीय व सांस्कृति कहितसंबंध आम्ही नेहमीच हिशेबात घेतलेले

नाहीत. त्याचप्रमाणे आम्ही युवकांना क्रान्तिकारक शिक्षण देण्याकडे योग्य लक्ष पुरविलेले नाही.

"या सगळ्याचा उपयोग फॅसिझमने फारच हुशारीने करून घेतलेला आहे. काही देशांमध्ये, विशेषत: जर्मनीत, युवकांचे मोठमोठे विभाग फॅसिझमने भुरळ घालून कामगारवर्ग–विरोधी मार्गावर नेले आहेत." (जॉर्जी दिमित्रोव, **निवडक ग्रंथ**, खंड २ रा, सोफिया प्रेस, १९७२, पृष्ठ ५८).

दिमित्रोव यांनी हे ४६ वर्षांपूर्वी म्हटले आहे. जुन्या काळातल्या चुका पूर्णपणे दुरुस्त करण्यात आल्या आहेत असे आपण म्हणू शकतो काय ?

"आमचा दुबळेपणा जेवढा वैचारिक व राजकीय पातळ्यांवर आहे तेवढा संघटनात्मक पातळीवर नाही" या मुद्याचा ऊहापोह करताना, आणि उजवा अतिरेकी नव्हे तर डावा अतिरेकी धोका लक्षांत घेऊन, इटालियन कम्युनिस्ट पक्षाचे एक प्रमुख सदस्य डी. आमेन्दोला यांनी **ल' यूनिता** मध्ये लिहिले:

"मुद्दा हा आहे की आमची सगळी डावी बगल बराच काळ कच्ची राहिलेली आहे ... अलीकडे लेफ्ट सेंटरशी (म्हणजे राज्यकर्त्या ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाने सोशालिस्ट, सोशल-डेमोक्रॅट व रिपब्लिकन्स, या पक्षांशी केलेल्या युतीशी आहे.) सामना देण्याच्या आवश्यकतेने आम्हाला आमचे लक्ष उजव्यांवर केन्द्रित करणे भाग पाडले आहे, तर आन्तरराष्ट्रीय रंगमंचावर अतिरेक्यांनी व अराज्यवाद्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या विरुद्ध चालविलेली चढाई वाढत्या प्रमाणात जाणवत होती."

१९६८ साली पॅरिस शहरभर उसळलेल्या विद्यार्थ्यांच्या तुफानी उद्रेकांचे विश्लेषण करताना फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या सर्व सदस्य बैठकीने त्या वर्षीच्या जुलै महिन्यात असे भाष्य केले: "पक्षाचा बराचसा प्रभाव विद्यार्थी वर्तुळांत होता तरी देखील तो अपुरा असल्याचे सिद्ध झाले आणि ज्यावेळी उजव्या गटाच्या शक्तींच्या हातचे बाहुले होऊन अतिडावे गट विद्यार्थ्यांमध्ये क्रियाशील झाले त्यावेळी याचा प्रतिकूल परिणाम दिसून आला."

१९७६ च्या मे महिन्यात जर्मन कम्युनिस्ट पक्षाच्या बोर्डाच्या अध्यक्षमंडळाने पश्चिम जर्मनीत कारवाया करीत असलेल्या अराज्यवादी आणि माओवादी गटांच्या कारस्थानांचा आवेशाने धिक्कार केला आणि त्यांच्या प्रचाराने प्रभावित झालेल्यांना आपल्या भूमिकेचा फेरविचार करायची व साहसवादापासून फटकून राहायची हाक दिली.

भांडवलदारी जगातल्या कम्युनिस्ट पक्षांचे नेते **आजच्या घडीला** युवकांमध्ये कार्य करण्यातल्या उणीवा व अडचणी याबाबत जी टीका करीत आहेत ती ही अशी आहे. ६५ वर्षांपूर्वी (म्हणजे ऑक्टोबर क्रान्तीपूर्वी !) लेनिन यानी या समस्येचे अधिक सखोल विश्लेषण केले. १९१६ च्या डिसेंबर महिन्यात **द सोशल डेमोक्रॅट** या लेखसंग्रहात प्रकशित झालेल्या एका छोटया लेखात त्यांनी **द यूथ**

इंटरनॅशनल याच्या पहिल्या सहा अंकांचे प्रकाशन जाहीर केले आणि या नियतकालिकाची शिफारस करताना लिहिले:

"अर्थात् युवकांच्या ठायी **अजूनही** तात्त्विक स्पष्टता व सुसंगतपणा यांची उणीव आहे. बहुधा ते हे कधीच संपादन करणार नाहीत, याचे नेमके कारण म्हणजे हे सळसळणाऱ्या, अवखळ, चौकस तरुणांचे मुखपत्र आहे. तथापि **असल्या** लोकांच्या तात्त्विक स्पष्टतेच्या उणीवेविषयी आमची वृत्ति सर्वस्वी वेगळी असायला पाहिजे. आमचे "ओ. सी. वाले", "सोशालिस्ट रेव्होल्यूशनरीज," टॉल्स्टॉयवादी, अराज्यवादी, युरोपियन कौट्स्कीवादी ("सेंटर") वगैरे ... यांच्या डोक्यांतला तात्त्विक सावळा गोंधळ आणि हृदयातली क्रान्तिकारक सुसंगतपणाची उणीव यांच्याविषयी आमची जी वृत्ति आहे आणि असायला पाहिजे, तिच्याहून आमची उपरोक्त वृत्ति सर्वस्वी वेगळी असायला पाहिजे. मध्यम वयस्कांना व वयोवृद्धांना युवकांशी कसे वागावे हे अनेकदा **ठाऊक नसते**, कारण युवकांनी अवश्यमेव समाजसत्तावादाकडे आपल्या वडिलधाऱ्यांच्यापेक्षा **वेगळ्या मार्गाने, अन्य वाटांनी, अन्य प्रकारांच्या रुपाने, अन्य परिस्थीतीत** वाटचाल केली पाहिजे" (व्ही.आय.लेनिन, संकलित ग्रंथ, खंड २३ वा.पृष्ठ १६४),

युवक संघटनांच्या चुकांवर "मैत्रीपूर्ण टीकेच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा" पुरस्कार करताना लेनिन यांनी भर देऊन सांगितले की "आपण युवकांची खुशामत करता कामा नये." (**कित्ता**) त्यांनी आपल्या लेखाचा शेवट पुढील शब्दांनी केला: "आम्ही पुन्हा सांगतो, की या चुका खोडून काढल्या पाहिजेत आणि समजावून सांगितल्या पाहिजेत. त्याच वेळी युवक संघटनांशी संपर्क ठेवायच्या आणि अधिक निकटचे संबंध जोडायच्या गोष्टी शोधून काढण्यासाठी आपण हरप्रकारे प्रयत्न केले पाहिजेत आणि हरमार्गाने त्याना मदत केली पाहिजे. परंतु आपण त्यांच्याकडे जायची **योग्य** रीत शोधून काढली पाहिजे." (**कित्ता**, पृष्ठ १६६).

दोन तृतीयांश शतकापूर्वी लिहिलेली असली तरी लेनिन यांची ही शिफारस आजच्या काळाला प्रसंगोचित अशीच आहे. १९८० च्या दशकात जे युवक नवफॅसिस्टांचे, अति-डाव्यांचे माओवादी-धार्जिण्यांचे लक्ष्य झालेले आहेत त्यांची मने व हृदये जिंकून घेण्यासाठी करायच्या लढ्यामध्ये नेमका हाच दृष्टिकोन हवा आहे.

लेनिन यांनी दिलेला सल्ला ध्यानात घेऊन आपण युवकांची खुशामत करू नये. परंतु युवकांची क्रन्तिकारक मनस्थिती व त्यांची सामर्थ्ये कमी लेखणे हे ताबडतोब आणि कायमचे बंद केलेच पाहिजे. त्यांना तात्त्विक अमूर्त गोष्टी सांगण्याऐवजी त्यांच्याशी त्यांच्या स्वतःच्या भाषेत बोलायला शिकले पाहिजे आणि जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तेव्हा कसलेही आढेवेढे न घेता त्यांच्याशी प्रेमळ स्वरात बोलायला शिकले पाहिजे. युवकांच्या जिव्हाळ्याच्या हितसंबंधांना जेव्हा बाधा होत असेल, तेव्हा आपण परिस्थितीचे आकलन झटपट केले पाहिजे, आणि आग अगोदरच विझून गेल्यानंतर मग निवेदने व खुलासे करीत बसता कामा नये. आपण

सर्वंकर्ष **व्यवहार्य** कार्यक्रम सुस्पष्ट व सूत्रबद्ध घोषणांनिशी आखला पाहिजे. शेवटची गोष्ट म्हणजे जिथे जिथे शक्य असेल तिथे तिथे गुणी व परिस्थितीला प्रतिसाद देणाऱ्या लोकांना पुढे आणले पाहिजे, आणि शुद्ध तात्विक ज्ञान असलेल्या व्यक्तीना नव्हे.

हे करणे तितकेसे सोपे नाही. मला जुन्या जर्मनीतली परिस्थिती आठवते. त्यावेळी नाझी लोक सत्ता बळकावायची तयारी करीत होते. ते मध्यम वर्गीयांतून व त्याचप्रमाणे कामगारवर्गीय कुटुंबातून तरुण लोकांची रिक्रूट भरती करीत होते. रासवट राष्ट्रवादी प्रचार प्रत्येक रस्त्याच्या नाक्यानाक्यावरुन करण्यात येत होता आणि श्रोत्यांची माथी भडकविण्यांत येत होती. राष्ट्रीय दुरभिमानाने कोटचावधी तुच्छतावाद्यांना व अपरिपक्व तरुण लोकांना आंधळे करून टेवले होते, त्यांना अमली पदार्थासारखी नशा चढवलेली होती, तर याच्या उलट भलतीकडे जात असलेल्या जनतेला उद्देशून भाषणे करताना त्यावेळच्या फॅसिस्ट विरोधकाना अनेकदा विनचूक युक्तिवाद शोधून काढण्यात व योग्य दृष्टिकोन धारण करण्यात अपेश आले.

शुद्ध तात्त्विक व अमूर्त युक्तिवाद कितीही समर्थक असले तरी बहुसंख्य श्रोत्यांच्या मनाची पकड घेऊ शकले नाहीत. जे पाहिजे होते ते मनोवैज्ञानिक कौशल्य पाहिजे होते, आणि नुसतेच शास्त्रीय तत्त्वनिरुपण नव्हे. जे घडत होते ती तात्विक चर्चा नव्हती, तर जनतेची हृदये जिंकायची ती लढाई होती.

हिटलर, गोबेल्स, गोएरिंग आणि ' जुगेन्ड फुहरेर " बाल्डूर फॉन शिराख यांना जमावाच्या भावनांना कसे आवाहन करायचे हे ठाऊक होते. मागाहून खातरजमा झाली तदनुसार, राजकीय व मनोवैज्ञानिक पूर्वतयारीची उणीव फॅसिस्टविरोधकांना भलतीच महागात पडली. फॅसिस्टांविरुद्ध लढणे हे पूर्वीच्या भांडवलदारी विरोधकांशी किंवा उजव्या गटाच्या सोशल डेमोक्रॅटांशी लढण्यापेक्षा कितीतरी अधिक कठीण असल्याचे सिद्ध झाले.

हे तर खरेच आहे की आजच्या घडीला देखील पाश्चात्य देशातील तरुण लोक अनेकदा अगदी सहजासहजी अतिरेक्यांच्या प्रभावाच्या आहारी जातात. परंतु त्याचबरोबर हे देखील तितकेच खरे आहे की आजच्या घडीला अनेक प्रकरणी याबाबतीतला दोषाचा भारी भाग अधिक वयस्कर लोकांकडे जातो, कारण ते युवकांची " मनःस्थिती " व विचार योग्य रीतीने हिशेबात घेत नाहीत आणि म्हणून आज ना उद्या त्यांच्याशी जिवंत संपर्क हरवून बसतात.

काही वयस्कर लोक तरुण लोकांपासून स्वतःला अलग करून घेतात. ते तरुण लोकांच्या सध्याच्या पिढीचे साधर्म्य, ते स्वतः कित्येक दशकांपूर्वी ज्या तरुण पिढीत होते तिच्याशी कल्पितात, म्हणून आणि कधी कधी तरुणांविषयी उपरोधिक उद्गार काढून. वयस्कर पिढीने तरुणांशी त्यांच्या स्वतःच्या भाषेत बोलले पाहिजे इतकेच नव्हे, तर तिने तरुण लोकांच्या प्रश्नांचे भय बाळगता कामा नये आणि

तरुण लोक चुकीच्या मार्गाने युक्तिवाद करायला लागतील तेव्हा तिने वायकुतीला येऊन चिडता कामा नये.

आमच्या शतकाच्या उत्तरार्धात युवकांच्या स्वभावामध्ये व आकांक्षामध्ये अनेक नवे किंवहुना अनपेक्षित घटक आहेत ही वस्तुस्थिति पुरोगामी लोकांनी हिशेवात घेतली पाहिजे आणि हिच्यामुळे आपला विरस होऊ देता कामा नये. ही वस्तुस्थिती जर त्यानी ध्यानात घेतली, तरच भांडवलदारी देशातल्या फॅसिस्ट-विरोधकांना उजव्या व डाव्या अतिरेक्यांचा दुष्ट प्रभाव निकामी करता येईल. काल ज्या पद्धती योग्य होत्या त्या आज तशा नसतील आणि उद्या तर त्या असण्याचा संभव याहूनही कमी असेल.

या सगळ्या गोष्टी ध्यानात घेऊन जर आपण युवकांसमवेत कार्य करू, तर जे सगळे अनेकानेक तरुण स्त्री-पुरुष आंधळेपणाने शत्रूच्या गोटात वाट चुकून दाखल झाले आहेत किंवा ज्यांना कोणत्या बाजूला वळावे ते ठाऊकच नाही, त्या सगळ्यांना समाजसत्तावादाच्या झेंड्याखाली आणणे खरोखरीच शक्य होणार नाही काय ?

माझे असे ठाम मत आहे की अशी शक्यता अस्तित्वात आहे. ही शक्यता व्यवहारात आणली पाहिजे हे जागतिक क्रान्तिकारक प्रक्रियेच्या लेखी अतिशय महत्वाचे आहे.

३

युवकांसाठीच्या लढ्यामध्ये खऱ्याखुऱ्या डाव्या शक्तींना इतिहास अनुकूल का असतो याचे एक खास कारण आहे. अंतिमदृष्ट्या निर्णायक अशी जी एक परिस्थिती असते ती त्यांच्या विजयाला पोषक ठरते.

घडामोडीच्या शान्ततापूर्ण ओघामध्ये, आन्तरराष्ट्रीय सुरक्षिततेमध्ये, जगाच्या लोकसंख्येच्या अन्य कोणत्याही विभागांच्यापेक्षा युवकांचा अधिक मोठा स्थापित हितसंबंध असतो. युवकांच्या लेखी त्यांच्या अवघ्या हयातीत सुरक्षितता हा जिव्हाळ्याचा घटक असतो. प्रत्येक तरुण व्यक्तीला, मग त्या व्यक्तीचे वास्तव्य कुठेही असो, तिच्या महत्त्वाकांक्षा आणि श्रद्धा कोणत्याही असोत,— ही गोष्ट लागू पडते. शान्ततेची समस्या सगळ्या तरुण लोकांच्या पुढ्यात उभी आहे आणि ती सदैव त्यांच्या पुढ्यात उभी राहील.

प्रत्येकाला हे दिसू शकते आहे की घडामोडींचा पेटे अशा रीतीने उलंगडते चालला आहे की पुढील काही दशके तरुण पिढीच्या लेखी एकतर विशेषकरून

अनुकुल ठरतील किंवा विशेषेकरून धोकेबाज ठरतील. हा विरोधाभास नव्हे, ही आपल्या काळाची तर्कसंगत वस्तुस्थिती आहे.

जग एका महत्त्वाच्या चवाठ्यावर येऊन ठेपले आहे. उजवीकडे जाणे म्हणजे अपरिहार्यपणे अभूतपूर्व विश्वव्यापी सर्वनाश होणार आणि त्यात तरुण लोक त्यांच्या आयुष्याच्या ऐन उमेदीच्या वयात नष्ट होणार. डावीकडे वळणे म्हणजे शान्ततेकडे आणि सामाजिक प्रगतीकडे वळणे, म्हणजे तणावशमनाकडे आणि निःशस्त्रीकरणाकडे वळणे, म्हणजे तरुण पिढीपुढे अशा अमर्याद संधी उभ्या ठाकणे की ज्या पूर्वी त्यांना स्वप्नांत देखील बघायची हिंमत होऊ शकली नसती. युद्धाशिवाय जग, विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि संस्कृती यांच्या सर्वांगीण विकासावर आपल्या सगळ्या प्रयत्नांचे केन्द्रीकरण करणारे जग; ज्यांत बेकारी मुळीच नाही आणि जे अवकाश जिंकून घेत आहे असे जग;—असे जग आमच्या हयातीत वास्तव होऊ शकते.

अशा जगासाठीच डाव्या गटाची शक्ती आपले सर्व सामर्थ्य एकवटून झटत आहेत. त्या जर **कुशल** असतील तर आण्विक सर्वनाशाला जवळजवळ आवाहन करीत असलेल्या उजव्या व डाव्या अतिरेक्यांवर याच्या योगाने त्यांना प्रचंड मात करता येण्याची तरतूद होईल.

ही सगळ्यात जास्त महत्वाची गोष्ट आहे. याच भूमिकेवरून तरुणांना सगळ्या गोष्टी समजावून देण्याचे कार्य चालविले पाहिजे. युवकांच्या देहान्तर्गत समस्या आणि समाजसत्तावादाचे शांततामय परराष्ट्रीय धोरण यांच्या दरम्यान असलेल्या थेट दुव्याचा खुलासा हा अतिरेक्यांच्या पायाखालची जमीनच खचवून टाकू शकतो. युवकांमधील अत्यंत तिरपागडे, मागासलेले व भ्रष्ट घटकच तेवढे त्यांच्या पुढचांत उभ्या ठाकलेल्या ऐतिहासिक शृंगापत्तीविषयी बेफिकीर राहू शकतात.

परंतु, मी पुन्हा सांगतो, की आपण युवकांशी **त्यांना** समजू शकणाऱ्या भाषेत बोलले पाहिजे आणि त्यांच्या तोंडावर सर्वसाधारण सूत्रे आणि गुळगुळीत शब्दप्रयोग फेकून मारता कामा नयेत. त्यांच्याशी जी चर्चा करायला पाहिजे ती वाटेल त्या अलबत्या गलबत्या अधिकाऱ्याने करता कामा नये, तर ज्यांना त्यांच्या मनोवृत्तीची समज आहे अशा खास शिकवून तयार केलेल्या व्यक्तीनीच ती करायला पाहिजे.

असाही संभव आहे की हे कार्य जर यशस्वी झाले तर अतिडाव्या संघटनांकडून चुकीच्या मार्गाला लावले गेलेले अनेक तरुण लोक आपल्या भूमिकेचा फेरविचार करतील. ज्या अतिरेक्यांना आपल्या चुकांची उमज पडलेली आहे त्यांना पुनः शिक्षित होण्यासाठी मदत केली पाहिजे; त्याना व्यावहारिक मदत दिली पाहिजे, म्हणजे ते कामगारवर्गीय चळवळीमध्ये सक्रिय भाग घेऊ शकतील आणि निरर्थक दंगलीमध्ये भाग घेणार नाहीत.

नव-फॅसिस्टांविषयी म्हणाल, तर त्यांच्याबाबतीत कसलीही नरमाई असता

कामा नये; ते कट्टर वैरीच आहेत. उलटपक्षी, त्यांच्याविरुद्धचा लढा जास्तीत जास्त निर्धाराने चालविला पाहिजे. या गोष्टीची नोंद घ्यायला हवी की अलीकडील काही वर्षांच्या अवधीत भांडवलदारी देशातले नव-फॅसिस्ट हे याच **आक्रमक** लढ्याच्या पद्धतीचा अवलंब करून राहिले आहेत.

उदाहरणार्थ, पश्चिम जर्मनीतील काही शहरामध्ये फॅसिस्ट-विरोधकांनी शहरी क्षेत्रातून नव-नाझींना हद्दपार करायची मागणी केली. १९८१ च्या मार्च महिन्यात स्पेन मधील उजव्या गटाच्या जनरल्सचा कट फसल्यानंतर माद्रिद शहरात अभूतपूर्व असे प्रचंड फॅसिस्ट-विरोधी निदर्शन झाले. अशाच प्रकारची निदर्शने त्या साऱ्या देशभर करण्यात आली. वृत्तपत्रांनी अशी नोंद घेतली की " कत्तलखोरांना रस्तोरस्ती रणगाडे आणायला हवे होते, परंतु त्याच्या ऐवजी त्यांनी कोटचावधी स्पॅनियड लोकांना रस्तोरस्ती आणले." पोर्तुगालमध्ये लिस्बन शहरी अडीच लाखाहून अधिक लोक १९८१ च्या एप्रिल महिन्यात फॅसिस्ट राजवटीच्या उलथणुकीचा सातवा वाढदिवस साजरा करायच्या मेळाव्याला हजर होते.

फॅसिस्ट-विरोधी लढ्याला अशा कृतीचे रुप मिळणे, लाखो, किंबहुना करोडो लोक एकजुटीने कृती करायला लागणे, या गोष्टी इतर देशामध्ये देखील घडतील असे मानायला तशी कारणे आहेत. अशाच प्रकारचे काहीतरी इटलीमध्ये घडत आहे. लष्करी फॅसिझम देखील खरीखरी सामुदायिक चळवळ हाताळू शकत नाही. युद्धपूर्व काळातील फॅसिस्ट-विरोधक हे बहुतांशी बचावाचे धोरण चाळवीत होते. १९८० च्या दशकातील फॅसिस्ट-विरोधकांनी विजयी होण्यासाठी **चढाईचा अंगिकार** केला पाहिजे. अतिरेक्यांचे ब्रीदवाक्य " मृत्यु ! " हे आहे, तर याच्या उलट फॅसिस्ट-विरोधकांचे ब्रीदवाक्य " जीवन ! " हे आहे.

अतिरेकी जेव्हा युवकांवरचा आपला पगडा घालवून बसतील त्यावेळी ते सगळेच घालवून बसतील कारण लुम्पेन प्रोलेतारियत आणि पशुत्व प्राप्त झालेले मूठभर मध्यमवर्गीय यांच्या मदतीने त्यांना काहीच साधता येणार नाही; अमेरिकन साम्राज्यशाहीचे हस्तक जरी त्यांना आश्रयाचा हात देऊ लागले तरी देखील ते निष्प्रभच ठरतील. युवकांच्या अभावी त्यांची मृत्युघंटा वाजलेली असते.

दहशतवादाचा अमेरिकन विशेषज्ञ ब्रियान जेन्किन्स याचे भाकित असे आहे की दहशतवाद हा धोरणाचे सातत्य म्हणून चालू राहील. त्याचा एक सहकारी रॉबर्ट ए. फ्राइडलँडर म्हणतो: " रुक्ष आणि निर्विकार वास्तवता ही आहे की दहशतवाद हा कधीही नष्ट केला जाऊ शकत नाही, परंतु तो आटोक्यांत ठेवता येतो. आणि कदाचित परिणामकारकपणे आटोक्यांत ठेवता येतो." (**दहशतवाद: तत्त्व आणि व्यवहार**, संपादक वाय्. अलेक्झांडर, डी. कार्लटन आणि पी. विल्किन्सन, वेस्टव्हयू प्रेस, १९७९, पृष्ठ २३४)

हे खरे नाही. दहशतवाद नष्ट करणे **शक्य आहे** परंतु तो नष्ट करणे केवळ समाजसत्तावादी समाजाकडूनच शक्य आहे, कारण समाजसत्तावाद अतिरेकीपणाची

सामाजिक पाळेमुळे तोडून टाकतो; तो बेकारी नष्ट करतो आणि लुम्पेन प्रोलेतारियत नष्ट करतो. तो फॅसिस्ट संघटना बरखास्त करतो आणि युवकांना विस्तृत संधी उपलब्ध करून देऊन आणि अतिडावेपणाचा निरर्थकपणा सिद्ध करून त्यांना कोंडीतून सोडवतो. भावी इतिहास ग्रंथांमध्ये असे लिहिण्यात येईल की भांडवलशाहीचे सार्वत्रिक अरिष्ट निकरावर येण्यातून भांडवलदारी समाजाला आलेल्या झटक्यांतून निर्माण झालेल्या विसाव्या शतकातील राक्षसी अपत्यांपैकी एक अपत्य दहशतवाद हे होते. दहशतवाद अजूनही जिवंत आहे आणि अजूनही वाढतो आहे, परंतु सामुदायिक फॅसिस्ट-विरोधी चळवळीने त्याची मृत्यूघंटा वाजविलेली आहे.

लेनिन यांनी १९०६ साली लिहिले:

"आम्ही भविष्यकाळाचा पक्ष आहोत, आणि भविष्यकाळ युवकांच्या हाती आहे. आम्ही नवनिर्मात्यांचा पक्ष आहोत, आणि नवनिर्माणकर्त्यांना अत्यंत औत्सुक्याने अनुसरणारे युवक हेच सदैव असतात....

"आम्ही सदैव पुढारलेल्या वर्गाच्या युवकांचाच पक्ष राहू." (व्ही. आय. लेनिन, संकलित ग्रंथ, खंड ११ वा, पष्ठे ३५४-३५५). दहशतवादाला मिळालेली ही प्राणदंडाची शिक्षाच म्हणायची.

□ □ □

REFBK-0024564